नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका


युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०१९



अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
वर्ष ७४ वे
जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०१९

युगवाणी

संपादक
प्रफुल्ल शिलेदार

अनुक्रमणिका

संपादक
प्रफुल्ल शिलेदार

मुखपृष्ठ क्र. १, २, ३ वरील चित्रे व आतील पृष्ठ क्र. २७, २८ व २९ वरील चित्रे व रेखाटने कविता महाजन
(कविता महाजन यांची सर्व चित्रे व रेखाटने दिशा महाजन यांच्या सौजन्याने)
पृष्ठ क्र. ५४, ५७, ५९, ६२, ६४ व ६६ वरील रेखाटने राजू बाविस्कर
पृष्ठ क्र. ८३, ८७ व ९० वरील कवींची छायाचित्रे चंद्रकांत पाटील यांच्या सौजन्याने
इतर छायाचित्रे आंतरजालावरून व लेखकांच्या व्यक्तिगत संग्रहातून साभार
मुखपृष्ठावरील सुलेखन : चंद्रमोहन कुलकर्णी

संपादकीय पत्रव्यवहार
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५
ई-मेल : edityug@gmail.com

प्रकाशक
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

जाहिरात सहयोग : प्रदीप दाते, वर्धा

मुद्रितशोधन : दीपक रंगारी

अक्षरजुळणी व मुद्रण :
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर । भ्रमण : ९३२६९९९०१५

युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :
- युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी-विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
- युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
A/c. No.: 04650100 005638
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
Fifth Character is 'ZERO'

- युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

व्यवस्थापन :
वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :
नितीन सहस्रबुद्धे, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२ । भ्रमणभाष : ९४२३१०३३०१

प्रकाशनाची कालनियतता : त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये
वार्षिक वर्गणी : २०० रुपये, त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये
वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये भरणे गरजेचे आहे.

अनुक्रमणिका

अं त रं ग

संपादकीय...

अल्बर्ट आईनस्टाईन एका सूत्रात म्हणतो, 'उर्जा कधीही नष्ट होत नसते ती फक्त आपले रूप बदलत असते.' विचार ही देखील मानवी जीवनाकरता उर्जा आहे. मानवी विचारसंचितातील विचारही नष्ट होत नसतात. त्यात परिष्करण होते, परिवर्तन होते, संदर्भ बदलत जातात पण ते वेगवेगळ्या रूपाने येतच राहतात. हे सगळ्याच बऱ्या आणि वाईट विचारांनाही लागू आहे. विचार करूनच माणूस हा माणूस झाला. मानवी बुद्धीची क्षमता अफाट असल्याने अनेक पद्धतीने तो विचार करू लागला. वेगवेगळ्या विचारांमुळे विविधता आलेली असली तरी त्यात पुढे मतभेद होऊ लागले. विचार एकमेकांना छेद देऊ लागले त्यातून अधिक चांगले काही निघू लागले. वाद-प्रतिवाद होऊ लागले त्यातून विचारांची रूपे, मांडणी बदलत गेली. ते मानवी प्रगतीचे द्योतकच होते. मात्र नंतर विचार करणाऱ्या एका माणसाला दुसऱ्या माणसाच्या विचारांचे वावडे होऊ लागले. आपल्यापेक्षा वेगळ्या विचारांचे असणे सहन होईनासे झाले. आता अशी वेळ येऊन ठेपली आहे की माणसाला वाद-प्रतिवाद नको आहेत. माणसाला फक्त आपल्याच विचाराचे साम्राज्य हवे आहे. त्यात इतर विचारांना थारा नको आहे. फक्त आमचेच विचार या भूमीवर नांदायला हवेत हा आग्रह सुरू झाला आहे. वेगळ्या विचारांचा प्रतिवाद नव्हे तर तिरस्कार आणि द्वेष सुरू झाला आहे आणि तो हिंसेच्या पातळीवर पोहोचला आहे. विचार नष्ट होत नाहीत पण विचार करणारा माणूस तर नष्ट होऊ शकतो ना, त्यालाच नष्ट करा असा विचार सुरू झाला आहे. जगातल्या बहुतांश युद्धाची, हिंसाचाराची बीजे विरोधी किंवा वेगळा विचार सहन न करण्याच्या असहिष्णूतेत रुजलेली आहेत. थोडक्यात, माणूसपण संपायची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागली आहेत. मात्र अशा वेळेसही माणूसपण टिकवून धरायचा वसा घेतलेल्या लोकांची संख्या कमी नाही ही समाधान देणारी गोष्ट आहे. शतकानुशतकांच्या उत्क्रांतीतून आपण जे कमावले ते आता एकारलेल्या, संकुचित आणि स्वमग्न विचारांच्या लाटेत वाहून जाणे कुठल्याही परिस्थितीत परवडण्यासारखे नाही. आपण माणूस म्हणून मिळवलेले स्वातंत्र्य आणि आत्मसन्मान टिकवण्याची जबाबदारी ही सामूहिक आहे. ती लेखक, कलावंत, विचारवंत आणि समाजातल्या सगळ्याच सुजाण नागरिकांची आहे. लेखकाने त्याच्या लेखनातून एका उन्नत समाजाचे चित्र पाहिलेले असते. त्याने आपल्या लेखनातून समाजातील हीण काय आहे ते दाखवून दिलेले असते. आपल्या परीने तो आपल्या लेखनातून माणूसपण टिकवून ठेवायचा किल्ला लढवत असतो आणि त्याकरता लढणाऱ्या लोकांना बळ देण्याचा प्रयत्न करत असतो. अनेक प्रसंगी त्याचीही कसोटी लागते. तो काय बोलतो, काय लिहितो आणि कुणाची बाजू घेतो यावरून त्याचे सत्व दिसून येते. या सत्वपरीक्षेत तो जेव्हा टिकतो तेव्हाच तो काळाच्या कसोटीवरही टिकत असतो. लेखक त्याच्या लेखनातून काहीएक भूमिका घेत असतोच, मात्र त्याने त्याच्या लेखनविश्वातून बाहेर येऊन प्रकट भूमिका घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे आणि लेखक त्याला सकारात्मक प्रतिसादही देताना दिसत आहेत ही उमेद टिकवून ठेवणारी बाब आहे.

काही दिवसांपूर्वी कविता महाजन या मराठीतील उमद्या लेखिकेचे अकाली जाणे अवघ्या मराठी साहित्यविश्वास चटका लावून गेले. या अंकात त्यांनी 'युगवाणी'करिता दिलेली एक रेखाटनमालिका आम्ही देत आहोत. कादंबरीतून, कवितेतून दिसून येणारे त्यांचे संवेदनशील सामाजिक व्यक्तिमत्व आपल्याला या रेखाटनांमधूनही ठळकपणे दिसून येते.

मराठी विश्वात आपले अनन्य स्थान निर्माण करणारे हरहुन्नरी बहुआयामी व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आम्ही या अंकात एक विशेष विभाग दिला आहे. त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू होते. विनोदी लेखक या प्रतिमेबाहेरील काही वेगळ्या पैलूंचा मागोवा या विभागातील लेखांमधून घेऊन आम्ही त्यांच्या स्मृतींना अभिवादन करीत आहोत.

– प्रफुल्ल शिलेदार

अनुक्रमणिका

कविता

कवीच्या आत्मचरित्रातील काही दुर्लक्षित नोंदी

– दिनकर बेडेकर



१.

कवीला चारचौघांत नीट वावरता येत नाही
त्याला साफ दिसत असतं
हसण्यामागचं विष
किंवा जाणवतात
हातात हात घेताना बोचलेली वाघनखं –
कवीला चारचौघांत नीट वावरता येत नाही...

• • •

२.

कवीला नाव होतं
घर-दार, गल्ली-मोहल्ला,
शहर, देश
सारं होतं
फक्त
कवीच्या भोवताली
धुक्यानं गच्च भरलेली
दरी होती.

• • •

३.

कवीला काहीच
गृहीत
धरता येत नसे
शब्द, त्यांचे नाद, त्यांचे अर्थ
आणि समोरच्या कागदातून
मात्र सतत रोखून बघत राहात
अनेक अनोळखी चेहरे

• • •

४.

हळूहळू शब्द
कवीला ओळखायला लागले
आणि त्यांच्या पाठीवर पारा चढला
मग एका शब्दाचे
शंभर तुकडे केले तरी
त्यात एकच एक चेहरा दिसायला लागला...

• • •

५.

खरंतर कवीचं सुख-दुःख
फक्त शब्दांना ठाऊक होतं
कवीलाही आवडायचं
शब्दांशी खेळायला,
त्यांच्यावर हक्क गाजवायला
पुढे शब्दांचे अर्थ फिरले
आणि मग
कवीला लपायलाही
जागा उरली नाही...

• • •

अनुक्रमणिका

६.
कवितेच्या वाटेवर
काटेकुटे, खाचखळगे
असणार हे आधीच
नीट समजून असावं.
ते टाळण्याचा प्रयत्न केला
तर भलत्याच रस्त्याला
लागण्याची शक्यता असते.
बाकी कविता म्हणजे
विशेष वेगळं काही नसतं
आपण रोज जे, जसं जगतो
तितकंच भयंकर असतं,
फक्त रोजचं जगणं
कुठे छापून येत नाही.
आणि –
• • •

७.
पुढे बरंच काही लिहिलेलं आहे
पण त्यातून कळतं ते एवढंच –
एक एकलकोंडी खोली
एकच
दिवसरात्र सताड उघडी खिडकी
त्यातून दिसणारा
बाहेरच्या जगाचा तुकडा
त्यावर नजर खिळवून
शेवटच्या क्षणापर्यंत
वाट पाहात बसलेला
कवी...
• • •

८.
कवीला पूर्वी जाणवत असे
अन्याय, निराशा, भ्रमनिरास
कवी बोलत असे, वाद घालत असे, भांडत असे
आताही अन्याय होतो, निराशा येते,
भ्रमनिरास होतो
पण कवी गप्प राहतो
मनाचा एक एक तुकडा निमूटपणे
मरताना बघतो...
• • •

शेवटची नोंद

खूप पसारा होता खोलीभर
धुळीनं भरलेलं, फाटत तुटत चिंध्या होणारं
असं खूप काही जगलेलं भोगलेलं.

लोकांनी समजावलं
शेवटी नाइलाजानं
साफ करायचं ठरलं

काही हाती लागलं
बाकी सारं कुठंतरी
कचऱ्याच्या ढिगाखाली असेल.

आता जो माणूस
खोलीत वावरताना दिसतो
तो आपल्या ओळखीचा नाही.

पण एवढं नक्की की तोही एक दिवस
काही न बोलता
निमूटपणे मरून जाईल.
• • •

▪ **दिनकर बेडेकर** । टी-१, उत्कर्ष शीतल, ३३ अंबाझरी ले-आऊट, नागपूर-४४० ०३३ । भ्रमणभाष : ९८३३१४४१५२

अनुक्रमणिका

कविता

मेघराज मेश्राम यांच्या कविता



तू

तू मातीतून उगवलेली
सर्जनाचे नाते घेऊन आलेली

तू महासूर्य
पाऊल ठेवतेस तेथील
काळोखाचे होते उच्चाटन

तू घनगर्द आकाश
तुझ्या डोळ्यांत झुळझुळतो
संजीवन झरा

तू महामाया
तुझ्या कुशीत पहुडलाय बुद्ध
मंद स्मित करत

तू प्रलय
धुऊन काढतेस सारी जळमटे
पुन्हा जीवन हसण्यासाठी

तू जननी
तुझ्या उदरात अंकुरू दे महाकाव्य
जगकल्याणाचे

• • •

कवितेशिवाय

अंधाऱ्या सुनसान वाटेवरही
मी चालतो बिनदिक्कत
आतल्या वाटेने
ऐकत रातकिड्यांना
मोजत चांदण्यांना...
अडकत नाहीत पाय
भयफासात
दचकत नाही मन
अवचित शांतताभंगाने
मी चालतो धुंदीत
अंधार कापत
कुणी आलाच आडवा
तमा कशाची?
असं काय आहे माझ्याजवळ
कवितेशिवाय!

• • •

अनुक्रमणिका

भाकर

मी उडतो आकाशात
हा डिजिटल जमाना डोक्यावर घेऊन

तरी
भूक बावरली की,
यावेच लागते जमिनीवर
कारण
भाकर करता येत नाही डाऊनलोड
• • •

तू काय मेन्टेन करत होती?

माय, तू यायची थकूनभागून वावरातून
मी बिलगायचो वासरागत
तुझ्या घामेजल्या आभाळदेहाला

तू म्हणायची,
''एवळा मोटा घोळ्या झालास रे
पर दुद सोळायचा नाव घेत नाईस''

तू मुद्दाम आटवला नाही पान्हा
तुझ्यासाठी मी राहिलो सदा तान्हा

हल्ली फिगर मेन्टेन करण्यासाठी
स्तनपान टाळतात आया

माय, तू काय मेन्टेन करत होती?
• • •

शाश्वत सत्य

अनंत गूढ पोटात घेऊन
फिरत असते कृष्णविवर
काळडोहाच्या डोक्यावर

अजस्र अंधारलाटा उसळतात भयंकर
डोळ्यांचे हात पोहचू शकत नाहीत तळाशी
तिथे वेदनेचा धुमसतो लाव्हा अखंड

दु:ख व्यापून आहे अणुरेणू, तरीही
सुखकणांचा शोध सुरूच आहे निरंतर

सबंध ब्रह्मांड गोठून जाईल एका बिंदूत
तरीही तुझ्याशी जुळलेली माझी नाळ
घेत राहील श्वास
मी मिटलो तर तू पुन्हा घालशील जन्मास
या शाश्वत सत्यापाशी येऊन थांबतो तेव्हा
समोर सूर्य हसू लागतो मंद मंद
• • •

यंत्र

खूप थकून गेलोय मी
या गतिमान रस्त्यांमागं धावताधावता

पायांच्या नसानसांतून ठिबकत आहे रक्त
उरले नाही बळ देहात जराही
तरीही शर्यतीतून बाहेर पडता येत नाही, थांबता येत नाही

लहानशा गावात मी सुखी होतो, माणूस होतो
महानगरात आलो आणि यंत्र झालो!
• • •

▪ **मेघराज मेश्राम ।** C/o. मोहन मेश्राम, गल्ली नं. १२ (क), के.डी.के. कॉलेज रोड, राजेंद्रनगर,
उभा मारुती मंदिराजवळ, नंदनवन, नागपूर - ४४०००९ । भ्रमणभाष : ८३२९३५३३७६

अनुक्रमणिका

कविता



गणेश कनाटे यांच्या कविता

देहात जागणारे जन्मगाव...

या शहरात आता माझे घर आहे
अगदी तसेच जसे नागपुरात होते
(नागपुरात माझा जन्म झाला, अशी नोंद आहे)

या शहरात आता आई आहे, दोन्ही बहिणी आहेत
बाबूजींचा फोटोही आहे घरात
अगदी तसाच जसे नागपुरात होते
(आई आणि बहिणी, कुणीही आता नागपुरात राहात नाही)

या शहरात माझी बायकोही आली आहे पाहुणी
आणि शेजारच्या खोलीत माझ्या दोन्ही मुलीही आहेत
हेही तसेच जसे नागपुरात होते
(मी, बायको, मुली, आम्ही सगळे आता नागपुरात राहात नाही)

हिवाळ्यात, या शहरात थंडी पडते
दुलई, ब्लँकेट घेऊन झोपावे लागते
हे अगदी तसेच जसे नागपुरात होते
(गेली १३ वर्षे मी, बायको आणि मुली मुंबई/ठाण्यात राहतो आणि तेथे थंडी नसते.)

पण हे शहर पुणे आहे, नागपूर नाही
याची सतत जाणीव असते
अगदी तसेच जसे ठाणे/मुंबईत होते
(पुणे काय नि ठाणे/मुंबई काय; माझ्या देहातले नागपूर नेहमीच जागे असते.)

एका मित्राच्या देहात पटना तर दुसऱ्या मैत्रिणीच्या देहात लंडन नेहमीच जागे असते.
प्रत्येकाच्या/प्रत्येकीच्या देहात त्याचे/तिचे जन्मगाव नेहमीच जागे असते
– तुम्ही जगात आणि जग सोडून कुठेही गेलात तरी
• • •

अनुक्रमणिका

जमिनीत गाडली जाण्याचं सौभाग्य न लाभलेली नाळ

आपली नाळ गाडलीच गेली नाही
पण गेली कुठे ते कळलेच नाही

आपण
जन्मापासून तुटलेले
आईपासून तुटलेले
नुसतेच तुटलेले
कुठेही न जोडलेले
अधांतरी लटकलेले

स्वप्नात का होईना
उलटे उडायचे
पाणी असेल तर
पोहायचे
आणि
लागलीच जमीन पायाला
तर धावायचे
आईच्या गर्भात
परत जायचे
गर्भातून परत
बाहेर यायचे
नाळ कापताना
डोळे उघडून बघायचे
कुठे फेकतात नाळ
ते लक्षात ठेवायचे
देह सोडून आईजवळ
आपण नाळेसोबत जायचे
जिथे नाळ जाईल
ते आपले भविष्य; ओळखायचे
तिथेच आपण आपले
काही जुने काही नवे जगायचे
शिकायची भाषा; गाणे लिहायचे
शिकायचे नृत्य; खूप नाचायचे
गळा आभाळ होईल; एवढे गायचे
परंतु
नाळेसोबत येताना
गाणे लिहिताना
धुंद नाचताना
आभाळ गाताना
अवतीभवती बघायचे
जीवांना जन्मताना बघायचे
देहांना जगताना बघायचे
माणसांना मरताना बघायचे
संभोगाचे सोहळे
मृत्यूचे तांडव बघायचे
आरतीचे ताट बघायचे
रक्ताचे पाट बघायचे
जन्म घेऊन मरून जाणारे
षंढांचे लोंढे बघायचे
देशोदेशी जायचे
आकाश-पातळ फिरायचे
जे दिसेल ते बघायचे
जे दिसणार नाही
ते कल्पनेत आणायचे
आनंद वाटेल तेव्हा
मंद मंद हसायचे
जेव्हा रडू येईल तेव्हा
मनसोक्त रडायचे
जुनी जाळून सारी पुस्तकं
एक नवीन पुस्तक लिहायचे
जुनी मिटवून सारी गाणी
एक नवे गाणे लिहायचे
सप्तकात नसलेला सूर घ्यायचा
नवे नवे राग रचायचे
नंतर ठरवू, घाई नाही की
आपण आपल्याला काय म्हणायचे
पण आपण बदलून जायचे
आपण अगदी नवे, अगदी छान
आपण व्हायचे
आपण आपल्यालाच
आपण होत राहण्याचे वरदान द्यायचे
रोज रोज आपण फक्त आपण व्हायचे
• • •

अनुक्रमणिका

शेवटचा श्वास घेण्यापूर्वीच!

ती इवली इवली कोवळी रोपं
कच्च्या मातीच्या भांड्यात उगवलेली
मरून गेली होती
भांड्यातून मातीत पाय ठेवण्यापूर्वीच

ती पिवळीजर्द पानं
गळून पडली होती झाडांवरून
त्यांची गळून जाण्याची वेळ होण्यापूर्वीच
पानगळीचा ऋतू येण्यापूर्वीच

कळत नव्हतं तेव्हाची ही गोष्ट आहे
त्या कोवळ्या रोपांसोबत; त्या पिकल्या पानांसोबत
मला घ्यायचे होते दोन श्वास;
त्यांच्या श्वासांत श्वास मिसळून

पण राहूनच गेलं!
गळ्याची ती एक नस ताणून तुटेपर्यंत
टिपेला न्यायचा होता आवाज
त्या जीभ झडून पडलेल्या जीवांसाठी

माझ्यासारख्या सगळ्यांसाठी
गळ्यात घालायची होती एक पाटी
निषेधाच्या घोषणांची

रानटी, हिंस्र, कपटी आणि खुनी आहेत हे
ज्यांना आपण घालवून देणार होतो

पण ते आपल्यातच लपून राहिले
आपलेच कपडे घालून
आपलेच चेहरे त्यांच्या चेहऱ्यांवर लावून

आपल्याला ओळखायला आलीच नाहीत
आपल्यासारखी दिसणारी ही श्वापदं
आपले मालक बनण्याआधी

पण हेही राहूनच गेलं!

उशीर झालाय, कबूल
पण उपयोग असो की नसो
जे जे राहून गेलंय
ते सगळं करून घ्यायचं
शेवटचा श्वास घेण्यापूर्वीच!

• • •

माझे बाबा कुठे गेले?

स्मृती आणि विस्मृतीच्या उंबरठ्यावर
एक थकलेला, खचलेला म्हातारा...
तरुण मुलाच्या अकाली जाण्याने
अचानक गळून गेलेला म्हातारा...
तीन दिवस शून्यात डोळे लावून
मुलाचे बालपण आठवणारा म्हातारा...

हा म्हातारा तुमच्याकडे बघतो पण
तुम्हाला ओळखतच नाही...
अखंड रडणाऱ्या बायकोकडे
अपलक बघतो पण रडतच नाही...
तो सुनेकडे; सून त्याच्याकडे बघते
पण दोघेही एकमेकांकडे बघतच नाही...

यांचा मुलगा अपघातात गेला म्हणतात,
आणि त्या दुसऱ्या म्हाताऱ्याचा दंगलीत,
आणि त्या तिसऱ्याच्या मुलाचा खून झाला
आणि त्या चौथ्याचा युद्धात मारला गेला...

''माझे बाबा कुठे गेले?''
या नातवाच्या प्रश्नाला काय उत्तर द्यायचे
हा या सर्व म्हाताऱ्यांचा पडलेला
एकच प्रश्न आहे.

• • •


श्वास

नदीच्या प्रवाहाच्या मध्यांतरावर
नदीच्या तळाकडे बघताना
दुसरा श्वास घ्यायची वेळ आली असताना
पहिला श्वास सोडून देण्याआधी
वर जाऊन दुसरा श्वास घ्यायचा
की पहिलाच सोडून द्यायचा पाण्यात?

त्या क्षणी
एक निर्णय घ्यायचा असतो.

• • •

■ गणेश कनाटे
gankanate@gmail.com / Mob.: ९८२०१०५०००



भाई! तुमच्या बुद्धिवादाला वंदन!

यशवंत मनोहर

डॉ. यशवंत मनोहर
'लुंबिनी', ४५ लोकसेवानगर,
नागपूर ४४० ०२२
मो.: ८००७१५५५७७

भाई! २०१९ हे तुमचं जन्मशताब्दीचं वर्ष! मराठी संवेदनशीलतेला तुमच्याबद्दल मनापासून आदर वाटतोच; पण या वर्षाच्या निमित्तानं या संवेदनशीलतेनं तो आदर अधिक खुलून व्यक्त केला. हा आदर वाचताना मला वाटलं, भाईंच्या आणि आपल्या नात्याचं स्वरूप काय आहे त्याची स्पष्टता आपल्याशीच करून घ्यावी. ही स्पष्टता समजावून घेताना हे लक्षात येत गेलं की इतर अनेकांच्या लेखी संभवतं त्या नात्यापेक्षा हे नातं वेगळं आहे. हे नातं आपण मनातच ठेवू नये. ते फार मौलिक आणि एका महान मानवी संस्कृतीचं द्योतक असं नातं आहे, हे नातं वाङ्मयीन आहेच; पण ते वाङ्मयातही मावणारं नातं नाही. हे नातं बौद्धिक आहे. रॅशनल आहे. 'आम्ही भारताचे लोक' मध्ये अभिप्रेत आहे तसं हे नातं आहे.

भाई, सर्वांनाच आदर वाटेल असा साहित्यिकपणाचा आदर्श आपण घालून दिला. महाराष्ट्राचे एक लाडके साहित्यिक आपण आहात. नट, नाटककार, गायक, संगीतकार, हजारोंच्या सभा जिंकणारे वक्ते. खाजगी मैफिली रंगवणारे प्रतिभावंत 'रंग'कर्मी, भाषांतरकार, हसवणारे आणि हसवता हसवता लोकांना अंतर्मुख करणारे विनोदकार, साहित्यावर आणि विशेषतः कवितेवर अनन्य प्रेम करणारे जाणते प्रतिभावंत, माणसावर उदंड भरोसा असणारे थोर आशावादी विज्ञानशील माणूस आणि गडगंज देणग्या देऊन परिवर्तनप्रकल्पांना बळ देणारे, प्रबोधनाच्या पाठीशी उभे राहणारे प्रज्ञावंत म्हणून आपणाला महाराष्ट्र परम आदर देतो.

आपले हे व्यक्तिमत्त्व असामान्यच आहे. त्याची महत्ता मीही मान्यच करतो; पण वरील सर्वच गोष्टींसंबंधींचा आदर अधिकच गहन झाला आहे आणि त्याचे कारण आहे तुमच्यातला बुद्धिवाद! महाराष्ट्रातही आणि एकूण देशातही तुमच्यासारखी रॅशनल माणसेही आणि साहित्यिकही फार कमी आहेत.

भाई, मृत्यूनं तुमचं शरीर १२ जून २००० साली नष्ट केलं; पण तुम्ही निर्माण केलं त्या साहित्यातलं तुमचं मन त्याला नष्ट करता येणारच नाही. तुमच्या साहित्यात तुमचं घर आहे. त्या घरात वावरणारे आणि सर्वांच्याच दुःखांवर कळवळ्याची फुंकर घालणारे भाई अधिकच उजळून निघत आहेत.

भाई! आपण उत्थानगुंफेवर मोठा लेख लिहिला, सुनीताताईंनी त्यांच्या 'आहे मनोहर तरी'मध्ये माझ्यासंबंधी काही मजकूर लिहिला. 'गत शतकांची पापे घोरे' या नावाने तुम्ही १२-०१-१९७८ रोजी दीर्घ पत्र मला लिहिले. ते २००० च्या मौजेच्या दिवाळी अंकात श्रीनिवास विनायक कुलकर्ण्यांनी प्रकाशित केलं. मला इतरही पाच-सात पत्रं आपण लिहिली. तीनचारदा तुम्ही माझ्या घरी आलात. मीही तुमच्या पुण्याच्या घरी तीनचारदा आलो. चर्चा झाल्या. इतरही काही कार्यक्रमांच्या निमित्तानं आपल्या भेटी झाल्या. एक सुंदर कौटुंबिक नातं या सर्व गोष्टींच्या पोटी जन्माला आलं.

या सुंदर नात्याचा प्रारंभ उत्थानगुंफेनं केला. उत्थानगुंफेला या कारणामुळे मी मनापासून धन्यवाद देतो. पुढं हे नातं तुमच्या साहित्याच्या जबाबदार वाचनानं अधिकच तेजोमय होत गेलं. या नात्याला बुद्धिवादाचा भक्कम आयाम मिळाला आणि हे नातं आपल्याला बुद्धिवाद्यांच्या आणि विज्ञाननिष्ठांच्या सूर्यकुटुंबात घेऊन गेलं. तुमच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्तानं हे नातं स्वतःशीच स्पष्ट करून घ्यावं असं मला मनापासून वाटलं म्हणून तुमच्याशी असलेला अनुबंध स्पष्ट करण्यासाठी पत्रलेखनाचाच आधार मी घेतला आहे. तुमचं-माझं हे नातं स्पष्ट करून घेण्याच्या निमित्तानं मी तुमचं १९७४ चं इचलकरंजीच्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षीय भाषण वाचलं. मराठी भाषेचं जिवंत सौंदर्य या भाषणात आहे. या भाषणात मी मराठी केवळ वाचत नव्हतो तर तिचे वेल्हाळ बघत होतो. उत्कट भा.ं.ंचा आणि रॅशनल विचारांचा लावण्यसोहळा मला या भाषेत दिसला. १९७१ मध्ये प्रकाशित झालेल्या 'अस्मिता महाराष्ट्राची'साठी तुम्ही लिहिलेलं स्वागतपर गद्य या निमित्तानं पुन्हा वाचलं. 'एक शून्य मी'मधील धर्म, 'अंधश्रद्धा नि तुम्ही आम्ही', 'नामस्मरणाचा रोग' हे लेख वाचले. भाई, मी नास्तिक आहे. कुरुंदकरांनी एका ठिकाणी म्हटलेलं मी वाचलं आहे. धार्मिक लोक त्यांचं धार्मिक वाङ्मय वाचत नाहीत म्हणून ते बदलत नाहीत. मी धार्मिक वाङ्मय काळजीपूर्वक वाचले. त्यामुळे मी नास्तिक झालो. हा त्यांना त्यांच्या नास्तिक्याचा उगम वाटतो. आणि भाई तुम्हीही नास्तिकच आहात. देवा-धर्मांनी केलेले लोकांचे आर्थिक, बौद्धिक आणि सामाजिक शोषण हा माझ्याही नास्तिक्याचा उगम आहे.

भाई, या माझ्या नास्तिक्याला बळ पुरवणाऱ्या प्रतिभावंतांमधले आपण एक आदरणीय साहित्यिक आहात आणि भाषेच्या संदर्भात मी म्हणेन की भाई तुमच्या साहित्यात तुम्ही मराठीचा जिवंत सौंदर्योत्सवच उभारून ठेवलेला आहे. कुसुमाग्रज, तुम्ही, रा.ग. जाधव, बाबुराव बागुल आणि जनार्दन वाघमारे ही माझ्यासाठी भाषासौंदर्याची विद्यापीठे आहेत आणि तुम्हा सर्वांसारखंच सर्जक, सुंदर आणि प्रदीप्त मराठी लिहिण्याचा मी नेहमीच प्रयत्न करीत आलो आहे.

भाई, तुमच्या साहित्यातील सर्जनशील भाषेला मॅग्नेटिक व्यक्तिमत्त्व आहे आणि याच मोहस्वी भाषेनं तुमच्या रॅशनल व्यक्तिमत्त्वाचं सत्य फुलवलं आहे.

तुमचा बुद्धिवाद स्वतःला कुठेही वाकू देत नाही वा कोणाची मर्जी राखण्यासाठी कुठली तडजोडही करीत नाही. तुमचा बुद्धिवाद या अर्थाने शीलवंत वा पूर्ण चारित्र्यवान आहे. तुम्ही म्हटलं आहेः ''एक तर धर्म, ईश्वर, पूजा-अर्चा ह्यांत मला कधीही रस वाटला नाही. शिल्पकारांचे कौशल्य म्हणून मला मूर्ती पाहायला आवडतात. समजू लागलेल्या वयापासून माझा कोणत्याही मूर्तीला नमस्कार घडलेला नाही. पूर्वजन्म, पुनर्जन्म वगैरे थोतांडावर माझा विश्वास नाही. देव, धर्म या कल्पना धूर्त सत्ताधाऱ्यांनी दहशतीसाठी वापरलेल्या आहेत, याविषयी मला यत्किंचितही शंका नाही... आपल्या देशात इतके संत जन्माला यायच्याऐवजी निसर्गाचे रहस्य ओळखून ऐहिक जीवनाला विज्ञानाचे अधिष्ठान देणारे शास्त्रज्ञ जन्माला आले असते तर हा देश अधिक सुखी झाला असता. मला कुठल्याही संतापेक्षा ॲनेस्थेशियाचा शोध लावून वैद्यकीय शस्त्रक्रिया वेदनाहीन करणारा संशोधक हा अधिक मोठा वाटतो.

अनुक्रमणिका

—१—

पु.ल.देशपांडे

३.८.८५


प्रिय यशवन्त मनोहर,

तुमचे पत्र मिळाले. नागपूर विद्यापीठातर्फे प्रा. गोपाळ गणेश आगरकरांची स्मृति शताब्दी साजरी करण्यात येत असल्याचे वाचून आनंद झाला. सामाजिक सुधारणांचा पाठपुरावा करणाऱ्या विचारवंतांत आगरकरांचा क्रमांक फार मोलाचा आहे. आपला देश हा कालबाह्य रूढींना धर्म मानून चिकटून राहणारा असल्याने या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. सुधारणेचा आग्रह धरताना त्यांनी आपल्या समाजातील अनिष्ट आचार विचारांवर निर्भयपणे टीका केली. अशा प्रकारचे दोष दिग्दर्शन करणे हा राष्ट्रद्रोह आहे असे मानणाऱ्या परंपरावादी देशबांधवांशी त्यांना झगडणे आवश्यक वाटले. यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं ना करणीयं ही लोकोत्तर शिकवण परंपरानिष्ठ लोक-मानसात खोलवर रुजलेली होती. जीवनासंबंधी मोकळ्या मनाने विचार मांडायला माणसे भीत होती. त्यांना निर्भय करून नवे विचार मांडायचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण करण्याचे कार्य त्यांनी आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत चालू ठेवले. दुर्दैवाने नवे विचार मांडणे हा एक प्रकारचा इंग्रज धार्जिणेपणा आहे असा सूर तरुणात निघत होता.

विज्ञान जन्मजात श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व मानव नाही आणि सत्याचे दर्शन घडवणाऱ्या वैज्ञानिकाचा देवाचे नाव घेणाऱ्या धर्मगुरूंनी आणि त्यांच्या दहशतीखाली असणाऱ्या अडाणी राजे लोकांनी सर्वांत अधिक छळ केला. धर्मधर्म करणाऱ्या लोकांइतके सत्याचे आणि वास्तवाचे दुसरे शत्रू नसतील.'' (एक शून्य मी, २०१६, पृ.१२८) 'धर्म, अंधश्रद्धा नि तुम्ही आम्ही' हा पूर्ण लेखच भाईंच्या नास्तिक्याचं निशाण पूर्ण भयमुक्त चित्तानं फडकवतो. अ.भा. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात 'पुरोगामी हा शब्द मराठीत पुरोहिताला हाकलण्यासाठी प्रथम आला.'' (पृ.६८५) असे म्हणणारे तुम्ही परिवर्तनवाद्यांना एकदम आपले वाटता.

''माझ्या घरात मी आजवर कधीही सत्यनारायणच काय पण कुठल्याही मूर्तीची पूजा केली नाही.'' (पृ. १३८) ''जैसी स्थिती आहे तैशापरी राहे। कौतुक तू पाहे। संचिताचे' या कलेवरी जीवनदृष्टीला तुम्ही ठाम नकार दिला आहे. (पृ. १४१)'' ''...तो समाजही निरनिराळे बुवा, मातानी आणि नवसाला पावणाऱ्या देवदेवतांमागे लागलेला'' (पृ. १४२) किंवा ''भंग्याच्या डोक्यावर असलेली मैल्याची टोपली हजारो वर्षे आपल्या डोळ्यांची दगडी पापणी न हलवता पाहणारे आपले देव'' (पृ. १४२), ''...सावित्रीबाई फुले यांचे कार्य हे अधिक

अनुक्रमणिका



धर्म ही चिकित्सेपलीकडची गोष्ट मानणाऱ्या समाजात तर हा [illegible]
अधिक परिणामकारक ठरत होता. आजही त्या परिस्थितीत
मूलत: फार मोठा फरक पडला आहे असे नाही. वरपांगी
आधुनिक आणि पाश्चात्य पद्धतीचा पेहराव करणारी मॉडर्न स्त्री
वटपौर्णिमेला वडाभोवती सूत गुंडाळताना दिसते. आणि मॉडर्न पुरुष
गणपतीच्या मूर्तीपुढे नारळ [illegible] पीराच्या कबरीपुढे फुले,
नारळ, अगरबत्ती वगैरे अर्पण करण्यासाठी रांग लावून [illegible] 'बघू' [illegible]
राहिलेले दिसतात. गंडेदोरे वगैरे प्रकारात वाढच आहे. [illegible]
[illegible] वर्तमानपत्रातून [illegible] रोज वाचायला मिळते आहे.
[illegible] बनून माणसाच्या डोक्यावर लाथा मारणाऱ्या बुवांचे
भक्त आपली [illegible] दूर होईल म्हणून दुर्जनांच्या लाथांचा तो
प्रसाद स्वीकारताना दिसतात. अशा वेळी आपण कुठल्या काळात
वावरतो आहोत हेच कळत नाही. [illegible]
[illegible] जीवनातल्या विविध क्षेत्रात
उपयुक्त ठरणारी प्रचंड यंत्र सामुग्री वापरली जात आहे.
प्रगत देशातल्या यंत्र साधनांशी तुलना व्हावी अशी निर्मिती
आपल्या देशात घडवली जात आहे. त्याबद्दल मनाला अभिमान वाटत
असतानाच दुसऱ्या बाजूने मंत्र-तंत्र-जादूटोणा ज्योतिष-कुंडल्या
यज्ञ-याग यांची लोकप्रियता वाढलेली दिसते. वेषपरिवर्तन
झाले असले तरी विचारपरिवर्तन झालेले दिसत नाही.
शास्त्रज्ञांचेही मन अत्याधुनिक झालेले दिसत नाही.
वैज्ञानिक प्रयोगशाळेतही सत्य शोधण्याला [illegible]
महत्त्व दिले जाते.

जोखमीचे होते. कारण त्यांच्या या कार्याला विरोध करून त्यांचे जीवन असह्य करणारे कुणी परकीय राज्यकर्ते नव्हते.'' (पृ. १४३) ''जोतीबांना आपले द्रष्टे पूर्वज मानून त्यांचा वारसा सांगायचा असेल तर जात, वर्णवर्चस्व, मूर्तिपूजा असल्या गोष्टींचा त्याग आचरणाने सिद्ध करून दाखवावा लागेल.'' (पृ. १४४) ''फुले मानायचे म्हणजे पूर्वजन्म आणि कर्मसिद्धान्त ही दरिद्री जनतेने दारिद्र्याविरुद्ध बंड करून उठू नये म्हणून केलेली फसवणूक आहे हे मानावे लागेल.'' (पृ. १४४) ''...जन्माने ब्राह्मण असलेले तेवढे श्रेष्ठ आणि बाकीचे कनिष्ठ असले माणसामाणसांत भेद करणाऱ्या गीतेसारख्या ग्रंथाचे श्रेष्ठत्वदेखील आंधळेपणाने स्वीकारता येणार नाही.'' (पृ. १४४) ''...त्याच्यावर त्याला समजू लागण्यापूर्वीच हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन असली कसलीही लेबले चिकटवण्यात येता कामा नयेत. अशा प्रकारच्या बुद्धिनिष्ठ आचरणाचा हा वारसा आहे.'' (पृ. १४५) ''पण एकदा नामस्मरण सुरू झाले की माणसाचा देव होतो आणि बुद्धिनिष्ठ चिकित्सेची हकालपट्टी होते.'' (पृ. १४५) हा तुमचा रॅशनॅलिझम कोणत्याही निर्विचारी माणसाला हसण्यासाठीसुद्धा अजिबात आवडणार नाही. या सर्वच गोष्टी माणसांचे हसणेही पोरकट, थिल्लर आणि मनोरुग्ण असू नये तर ते

पु.ल.देशपांडे

१ रूपाली । ७७७ शिवाजीनगर । पुणे [illegible] । फोन: [illegible]

— २ —

अशावेळी अंधश्रद्धा, अनावश्यक रूढी, अनिष्ट आचार यांच्या विरुद्ध त्यांच्या विळख्यातून लोकांची सुटका व्हावी या तळमळीने लढणाऱ्या आगरकरांसारख्या देव न मानणाऱ्या देशभक्ताची आठवण मनाला स्थिर करणारी.

त्यांचे बुद्धीच्या कसावर घासून धारदार केलेले विचार तरुण पिढीपर्यंत नेऊन पोहोचवण्याची जबाबदारी मुख्यतः शिक्षण क्षेत्राची आहे. नागपूर विद्यापीठाने आगरकरांच्या स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने ह्या चर्चासत्राचे आयोजन केल्याचे वाचून आनंद झाला. महाराष्ट्रातल्या स्थानिक विचारवंतांचे सहकार्य तुम्हाला मिळत आहे ही विशेष लक्षणाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांपर्यंत आगरकरांचे स्फूर्तिदायक विचार जाऊन पोहोचतील याची मला खात्री आहे. चर्चासत्राला माझ्या शुभेच्छा.

पु. ल. देशपांडे

डॉ. यशवंत मनोहर,
[illegible]
प्रमुख,
पदव्युत्तर मराठी विभाग,
विद्यापीठ परिसर,
अमरावती रोड, नागपूर 440 010

त्याला मूल्यदृष्ट्या उन्मत करणारे, करुणामय आणि निरामय करणारे असावे' यासाठी तुम्ही सांगता. बुद्धिनिष्ठेचा हात सोडून हास्य भरकटते तेव्हा ते असभ्यतेला आनंद वाटावा याच दर्जाचे असते. श्रीपाद कृष्णांचा विनोद मला असाच बुद्धिनिष्ठेला वंदन करणारा वाटतो. तुमचा बुद्धिनिष्ठ विनोदही कधी सद्सद्विवेकाची संगत सोडत नाही, म्हणजे याचा अर्थ मूल्याभिरुची आणि प्रतिभेने केलेले सर्जन यांच्यात एकजीवत्व निर्माण झालेले असते असा आहे.

अस्मिता महाराष्ट्राचीला आपली स्वागतपर गद्य या शीर्षकाची प्रस्तावना आहे. त्यात तुम्ही म्हटलेलं आहे की बुद्धाने विचारचक्रपरिवर्तन केले (१८) ''विज्ञानयुगाचा सूर्य उगवून किती तरी वर आला पण त्याची किरणे आमच्या मनःपटलाला अजून उजळीतच नाहीत.'' (२३) ''विठ्ठलाला अठ्ठावीस युगात हटवता न आलेला पंढरपुरातला कॉलरा विज्ञानाने हटवला', (२३) 'आमच्या डोक्यावर स्वप्नातील विमान ध्वनिलहरींची सीमा भेदून ताशी हजारो मैल वेगाने जाताना आम्ही खाली जमिनीवर मारुतीच्या डोक्यावर तेल ओतीत बसलो तर आमच्यासारखे कर्मदरिद्री आम्हीच ठरू' (२६) 'कार्यकारण परंपरेचा शोध घेणारे विज्ञान आणि बुद्धिला 'चूप बस' म्हणणारी धार्मिक रूढी यांचा हा झगडा आहे.' (२९०) 'हा गणपती जर साऱ्या जगाचा चालक असेल तर एखाद्या जपान्याच्या स्वप्नात का जात नाही?'' (२७) 'चांभाराच्या पोराने वहाणा शिवाव्यात आणि शेतकऱ्याच पोराने नांगर धरावा म्हणणारी

समाजव्यवस्था आता संपली. तिची आठवण जितक्या लवकर बुजेल तितकी बरे!'' (२९) 'जीवनातला प्रत्येक हालचालीकडे आता वस्तुनिष्ठ वैज्ञानिक भूमिकेवरून पाहिले पाहिजे.' (१३०) भाई, तुम्ही भारतातील आदिसांख्य, लोकायत, महावीर, बुद्ध, फुले, बाबासाहेब आंबेडकर या 'भारतीय' बुद्धिवादी परंपरेचे आदरणीय खंदे पाईक आहात. या परंपरेचा आणि शोषक वैदिक परंपरेचा संघर्ष आजवरही सुरू आहे. भाई, कोणाच्या बाजूचे? या प्रश्नाचे एक उत्तर 'भारतीय' या नावाने जगात सन्माननीय असलेल्या बुद्धिनिष्ठ भारतीय परंपरेच्या बाजूचे हे एक मूल्यदर्शी उत्तर आहे आणि दुसरे उत्तर देशातील सर्व शोषितांच्या बाजूचे असे आहे. या दोन्ही उत्तरांसाठी मी तुमच्याप्रती अपार कृतज्ञता व्यक्त करतो. कारण तुम्ही म्हणतात ते सोपेही नाही आणि सोयीचेही नाही. पण तुमच्या वैचारिक बाणेदारपणाने तशी कोणती सोय बघितली नाही. 'तुका म्हणे सत्य सांगे, येवांत रात्रे येतील ते' अशीच तुमची जणू हा रॅशनॅलिझम सांगतानाची भूमिका होती. तुमचा मला अपार आदर वाटतो त्याचे हे कारण आहे. भाई! तुम्ही देशाच्या प्रधानमंत्र्यालाही भेट नाकारली होती. हे अफाट साहस तुमच्यात आहे. हा साहित्यिकपणाचा आदर्श तुम्ही आमच्यासाठी ठेवला, हे तुमचं साहित्यिकपण आम्हा सर्वच छोट्यामोठ्या साहित्यिकांना खूप आदरणीय वाटतं.

तुमचं साहित्य वाचताना वाचकांच्या ओठात हसू आणि डोळ्यात आसू असतात. स्वागतपर गद्यामध्ये तुम्ही सार्त्रचं रिस्पॉन्सिबिलीटीच्या संदर्भातलं वाक्य उद्धृत केले आहे ते मला तुमच्या साहित्याच्या वाचनाच्या संदर्भात फारच महत्त्वाचं वाटतं. साहित्याने दृष्टी अधिकाधिक निर्मळ करावी, उत्तम ललित साहित्याच्या वाचनातून उत्तम जीवनदृष्टी मिळते हे तुम्ही इचलकरंजीच्या भाषणात सांगितलच आहे. पण तुम्ही महनीय जीवनमूल्ये आणि साहित्यमूल्ये यांची जी सांगड घातली आहे ती तर मला फारच मोलाची वाटते. तुम्ही अ.भा. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ही सांगड उत्तम पद्धतीनं घातली आहे. तुम्ही म्हटलं आहे. 'अॅज आय शॅल् नॉट् बी ए स्लेव्ह, सो आय शॅल नॉट बी ए मास्टर!' (६९४) 'हे लिंकनचं महावाक्य आहे. त्यात मानवी जीवनातल्या समान न्यायाचा जाहिरनामा आहे. मी कोणाचा गुलाम होणार नाही आणि कोणाचा मालकही होणार नाही. हे लिंकनचं महावाक्य कलेतही महत्त्वाचं आहे (पृ.६९४) असं तुम्ही म्हणता. हे मला वाटतं साहित्याच्या महत्तेसाठी अपरिहार्य असच फ्युजन आहे.

भाई, साहित्याच्या निरनिराळ्या प्रकारांवर तुम्ही प्रेम केलंच पण सर्वात अधिक प्रेम तुम्ही कवितेवर केलं... कवितेवरील असे प्रेम करणारे रॅशनल भाई माझ्या आयुष्यातली एक झगमगती मर्मबंधातली ठेव आहे असंच मला वाटतं. या ठेवीला मी कृतज्ञतेने वंदन करतो.

• • •

साभार पोच

१) **छापा–काटा** (कादंबरी) – नीळकंठ महाजन, आर्ष पब्लिकेशन्स्, पुणे, पृ.७८, मूल्य : रु. १००/–

२) **सावलीच्या उन्हात** (कादंबरी) – श्रीराम हरी अत्तरदे, आर्ष पब्लिकेशन्स्, पुणे, पृ.१४८, मूल्य : रु. १७०/–

३) **इच्यार करीसन रे भो!** (लेखसंग्रह) – व.पु. होले, आर्ष पब्लिकेशन्स्, पुणे, २१४, मूल्य : २५०/–

४) **अंतपर्व** (कवितासंग्रह) – प्रेमनाथ रामदासी, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम, पृ.५०, मूल्य : रु. १००/–

५) **दगान** (कवितासंग्रह) – किशोर कवठे, सप्तरंग प्रकाशन, राजुरा, पृ.९७, मूल्य : रु. १२५/–

६) **परिमळामाजि कस्तुरी** (लेखसंग्रह) – सिसिलिया कार्व्हालो, ग्रंथाली, मुंबई, पृ.१००, मूल्य : रु. १२५/–

७) **डिप्टी कलक्टरी** : अनुवाद तथा अनुभव – मधुकर धर्मापुरीकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृ.११६, मूल्य : रु. १६०

८) **पैशाचा झगा** (लेखसंग्रह) – सु.श्री. पांढरीपांडे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.११२, मूल्य : रु. १७०/–

९) **जुगाड** (कादंबरी) – किरण गुरव, दर्या प्रकाशन, पुणे, पृ.२४७, मूल्य : २५०/–

१०) **थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन** (कवितासंग्रह) – संघमित्रा खंडारे, संवेदना प्रकाशन, पुणे, पृ.१०७, मूल्य : रु. १२५/–

जन्मशताब्दी विशेष

पु. ल. देशपांडे

आकाशवाणी आणि दूरदर्शनमधले पु.ल.

सुनील शिनखेडे

पु.ल. हा एक व्यक्तिविशेष नाहीच जणू! पुल ही एक दंतकथाच वाटावी! त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक लोभस पैलूंचं गारूड आजही मराठी मनांवर आहे. साहित्य, नाटक, चित्रपट, संगीत आणि विनोद हे त्यांचे पंचप्राण; तरीसुद्धा पुल उरतातच. अबोल राहून त्यांनी केलेल्या सामाजिक कामाचं मोल असू दे की आकाशवाणी-दूरदर्शनमध्ये त्यांनी केलेली दिशादर्शक कर्तबगारी... त्यांचा सुजनसहवास आणि त्यांचा सृजनशील प्रवास! प्रस्तावना लिहून पोटाशी धरणं असो की शाब्दिक वा कृतिशील पाठराखण असो - पुलंचं निर्मळ, निरपेक्ष मन म्हणजे माणूसपणाचा जिव्हाळ झरा! अशा पुलंच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणं सोपं नाही.

पुलंचा जन्म १९१९ चा. राम गणेश गडकरी १९१९ साली निवर्तले आणि त्यानंतर बरोबर नऊ महिन्यांनी हे पुरुषोत्तम जन्माला आहे. अल्पायुषी ठरलेल्या गडकऱ्यांचं उर्वरित कार्य नियतीनं पुलंकडून करवून घेतलं असं काही जणांनी म्हटलं आहे. काही अंशी ते खरं असेलही; पण असं म्हणणं पुलंवर बव्हंशी अन्याय करणारं ठरेल. मात्र, एक गोष्ट आपल्याला मान्य करावी लागेल; ती म्हणजे जो काळ आणि जेवढं आयुष्य पुलंना लाभलं त्याचं त्यांनी सोनं केलं.

पुलंचा धडपडीचा आणि संघर्षाचा काळ आयुष्याच्या चाळिशीपर्यंत सुरूच होता. सर्वमान्य स्थैर्य त्यांना त्या अर्थानं कधी लाभलं नाही. प्रयोगशील नटासारखे ते जगले. काळाची अनुकूलता म्हणाल तर मध्यमवर्गीय जाणिवांना सुखवणारं ते लिहीत राहिले. आजही तो मध्यमवर्गीय नॉस्टेल्जिया वेड लावतो. नॉस्टेल्जियात रमण्यासाठी आणि मुळात नॉस्टेल्जिया चांगला होण्यासाठी आधीचा वर्तमान चांगला असावा लागतो. महाराष्ट्राच्या तत्कालीन वर्तमानाला साहित्य संस्कृतीचं प्रसन्नचित्त चिरंतन हसरं तोरण पुलंनी बांधलं. त्यांनी आपल्याला भाषेवर प्रेम करायला शिकवलं. गाण्याबजावण्यातील परमानंदाची पर्वणी काय असते याची सुरेल अनुभूती पुलंनी आपल्याला दिली. पुलंनी सामान्यांना असामान्य चेहरा दिला. स्वतःवर हसायला शिकवलं. मध्यमवर्गीय सुखवस्तू अवकाशाला गवसणी घालतानाच पुलंनी अमंगळ भेदाभेदांना वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात थारा दिला नाही. त्यांच्या अंतःकरणात असलेल्या कृतज्ञतेच्या सामाजिक कळवळ्याला कृतिशीलतेची जोड होती. त्या अबोल कृतीतून त्यांनी महाराष्ट्राला देणाऱ्याचे हात हाती घ्यायला शिकवलं. आपण कधीच उतराई होऊ शकणार नाही इतकं भरभरून पुलंनी महाराष्ट्राला दिलं.

सुनील शिनखेडे
८०४, केदारनाथ रेसीडेन्सी,
४६/१, मुरारजीपेठ,
सोलापूर - ४१३ ००३
मो.: ९९७५२६५२१३

अनुक्रमणिका



शब्द आणि ध्वनीच्या माध्यमातून श्रुतींचा अवकाश समृद्ध करण्याचं काम पुलंनी आकाशवाणीच्या सेवेत असताना केलं. दूरदर्शनचे तर ते आपल्या देशातले सांस्कृतिक दूत ठरले. दूरदर्शनच्या सांस्कृतिक खिडकीतून महाराष्ट्राच्या संस्कृतीची गुढी त्यांनी उभारली आणि देशवासीयांना जे दर्शन घडवलं ते महाराष्ट्रासाठी आजही अभिमानाचा विषय ठरावा.

विंदा करंदीकर यांनी एका ठिकाणी असं म्हटलं आहे की, ''असामान्य व्यक्ती आणि कलावंत यांच्या गुणांचा आणि कार्याचा मुक्त कंठानं गौरव करताना, त्यामुळे आपण लहान ठरू अशी भीती पुलंना कधीच वाटली नाही. आम्हा लेखकांना ती पुष्कळदा वाटे. म्हणून पुलंच्या लिखाणातून, बोलण्यातून, कृतीतून अप्रत्यक्षपणे मिळालेला हा संदेश मोलाचा वाटतो.''

तर पुलंनी दिलेल्या निरामय आनंदाबद्दल कादंबरीकार श्री.ना. पेंडसे यांनी असं म्हटलं आहे की, ''पुलंनी सतत पन्नास वर्षेसामान्य माणसाला जो आनंद दिला आहे त्याला तुलना नाही. साहित्य, संगीत, नाट्य, सिनेमा अशा विविध क्षेत्रांत पुल आनंदाचा गुलाल उधळीत राहिले. या शुद्ध आनंदासारखं दुर्लभ जगात दुसरं काही नाही.'' पुल सुदैवी – ज्यांना असा शुद्ध आनंद सर्व क्षेत्रांत लाभला आणि आपणही सुदैवी; कारण पुलंनी तो आनंद आपल्याला भरभरून दिला. पुलंना आनंद कधी शोधावा लागला नाही. जिथे आनंद नाही तिथे त्यांनी तो निर्माण केला. आकाशवाणी आणि दूरदर्शनमधील त्यांच्या कर्तृत्वशाली कामगिरीकडे या दृष्टिकोनातून बघता येईल.

१९३७–३८ सालापासूनच पुलंना आकाशवाणी या माध्यमाची ओळख होती आणि आकर्षणही होतं. बालगायक, नट, नाटककार आणि लेखक या नात्यांनी त्यांनी आकाशवाणीला सेवेत येण्यापूर्वीही भरीव योगदान दिलं आहे. 'पानवाला', 'न पेलणारी पगडी', 'कसं

काय, बरं आहे' इत्यादी त्यांची भाषणं आकाशवाणी पुणे केंद्रावर पूर्वी झाली होती. साहित्य, नाटक, संगीत, चित्रपट अशा क्षेत्रांत पुलंची मुशाफिरी जोरात सुरू होती. नवनिर्मिती आणि सर्जनशीलता ऐन भरात असण्याचा तो काळ. त्या काळात म्हणजे १९५५ साली पुलं आकाशवाणीच्या सेवेत रुजू झाले. नभोवाणी मंत्रालयाचे त्या वेळचे मुख्य सचिव पुरुषोत्तम मंगेश लाड हे उत्तम साहित्य-रसिक आणि गुणग्राही होते. महाराष्ट्रातील साहित्य, संगीत, कला, संस्कृती या क्षेत्रांतील नामवंतांना त्यांनी आकाशवाणीच्या सेवेत सामावून घेतलं होतं. त्यांत बा.भ. बोरकर, व्यंकटेश माडगूळकर, गोपीनाथ तळवलकर, मंगेश पाडगावकर हे प्रामुख्याने होते.

व्यंकटेश माडगूळकर हे पुणे केंद्रात निर्माते होते. त्यांचे सहनिर्माते म्हणून पुल दाखल झाले आणि वर्ष दीड वर्षांचा काळ त्यांनी गाजवला. आपल्याला सांगितलं तर आश्चर्य वाटेल, पण माडगूळकर-पुल यांच्याकडे शेती कार्यक्रमाची जबाबदारी होती आणि आकाशवाणीवर ते 'उत्तम शेती' करीत. म्हणजे शेतीविषयक 'उत्तम कार्यक्रम' करीत. आकाशवाणीचा शेतकऱ्यांसाठी अधिक चांगला उपयोग कसा करून घेता येईल असा विचार त्या वेळी आकाशवाणीत उच्च स्तरावर सुरू होता. युनेस्कोतील एक अधिकारी पॉल न्युरेथ यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू होतं. तिकडचा रेडिओ फार्म फोरमच्या धर्तीवर इकडे नभोवाणी शेतकरी मंडळ सुरू झालं. माडगूळकर - पुल या जोडीनं वीस भागांच्या मालिकेचं नियोजन केलं. पहिला भाग तयार केला होता तो 'बया दार उघड' या नावानं. रेडिओमुळे ज्ञानाचं दार कसं उघडलं जाणार आहे अशी कल्पना करून या भागाचं लेखन करण्यात आलं होतं. न्युरेथ यांना ते आवडलं होतं. पुढे पुलंनी पुणे आकाशवाणीसाठी 'अमृतवृक्ष', 'जनाबाई' या संगीतिका लिहिल्या. 'वयम् मोठम् खोटम्' हे बालनाट्य पुलंनी याच काळात लिहून पुणे आकाशवाणीवर सादर केलं. पुण्यातली त्यांची कामगिरी बघून मुंबई आकाशवाणीवर नाट्य विभाग निर्माते या पदावर पुलंना बढती मिळाली आणि ते पुन्हा काही काळ मुंबईकर झाले. १९५६ ते ५८ ऑगस्ट एवढा काळ पुल आकाशवाणी मुंबई केंद्रात होते. या काळात त्यांनी आकाशवाणीसाठी सोळा-सोळा तास काम केलं. सुविधांची वानवा त्या काळातही होतीच. सुरुवातीला तर पुलंना बसायला स्वतंत्र टेबल-खुर्चीही नव्हती. टेबलाच्या दोन बाजूंना दोघं बसत; पण तिथे काम जबरदस्त चालायचं. प्रत्येक तिमाहीचं प्रोग्राम शेड्युल म्हणजे कार्यक्रमांची आखणी, स्वतः नभोनाट्य लिहिणं, सादर करणं, इतरांकडून लिहवून घेणं, चर्चांसाठी सतत नवे विषय, संगीताचे कार्यक्रम यांत ते व्यस्त असत. तशातही 'बटाट्याची चाळ' मध्ये नंतर गाजलेली एक संगीतिका पुलंनी याच टेबलाशी बसून लिहिली आणि आपल्या सहकाऱ्यांना गाऊन दाखवली होती.

मंगेश पाडगावकर यांनी त्याच काळात 'बिल्हण' ही संगीतिका आकाशवाणीसाठी लिहिली होती. त्या संगीतिकेचं संगीत दिग्दर्शन आणि निर्मिती पुलंनी केली होती. पं. भीमसेन जोशी, पं. जितेंद्र अभिषेकी आणि किशोरी आमोणकर यांनी त्या संगीतिकेतील गाणी गायिली होती हे विशेष. 'शब्दांवाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले' हे गाणं या संगीतिकेसाठीच लिहिलेलं होतं, जे पुढे रसिकांच्या ओठी कायम रुणझुणत राहिलं आहे. त्या काळात आकाशवाणीवर काही अभिजात मराठी नाटकांसाठी वेळ दिला जात असे. पुलंनी या मालिकेत 'स्वयंवर', 'मानापमान' सारखी नाटकं बसवून सादर केली. नावीन्याचं वेड तेव्हाही पुलंना होतंच. तेव्हा उमेदवारी करत असलेल्या विजय तेंडुलकर यांच्या काही नाटिका, पुलंनी मुंबई आकाशवाणीवर सादर केल्या होत्या. 'एखाद्याचा आजार' यासारखी विनोदी नाटिकाही त्यात होती. पुलंनी 'नवे गोकुळ' हे बालनाट्यसुद्धा मुंबई आकाशवाणीसाठीच लिहिलं. १६ ऑगस्ट १९५८ ला ते बालमोहन शाळेत मंचावर सादर केलं गेलं. तेच पुढे आकाशवाणीवर प्रसारित झालं. सरकारी नोकरीत तन्मयतेनं आनंद देत-घेत पुल काम करीत राहिले.

आकाशवाणी पुणे केंद्रात पुल देशपांडे सेवारत असतानाची गोष्ट आहे. एका गांधी जयंतीला कोणते कार्यक्रम आकाशवाणीवरून करावे याचं नियोजन सुरू होतं. बैठकीत अनेकांनी आपल्या कल्पना सांगितल्या. चर्चा खूप वेळ सुरू होती. सगळे बोलले; पण पुलं काही बोलत नव्हते. केंद्राधिकाऱ्यांनी पुलंना विचारले, ''तुम्ही काहीच बोलला नाहीत. तुमची एखादी कल्पना सांगा.'' मग त्यावर पुलं म्हणाले, ''महात्माजींना मौन फार आवडायचं. आपण त्या दिवशी एक दिवसाचं मौन पाळू या.'' अंमलात आणता येणार नसलेल्या या कल्पनेमुळे बैठकीत खसखस पिकली.

एक मजेदार अनुभव पुलं आणि मंगेश पाडगावकर या जोडगोळीला त्या वेळी आला अशी नोंद आहे. विनोबांचा संदेश आकाशवाणीला ध्वनिमुद्रित करून हवा होता. भूदान पदयात्रांचा प्रभाव ओसरला नव्हता तो हा काळ. विनोबांच्या पदयात्रा सुरूच होत्या. हा संदेश मिळवण्यासाठी या दोघांना कर्नाटकात विनोबांची पदयात्रा होती त्या पदयात्रेत सामील व्हावं लागलं होतं. पहिले चार-पाच दिवस विनोबांनी या दोघांना प्रतिसादच दिला नाही. भल्या पहाटे उठवून रोज सात-आठ मैल पदयात्रा मात्र करवून घेतली. दोन मिनिटांच्या संदेशासाठी एवढी पायपीट! शेवटी काकुळतीनं विनवणी केल्यावर छोटासा संदेश त्यांनी दिला. या काळात पुलंमधला चाणाक्ष लेखक-कलावंत जागा होताच. त्यांनी विनोबांचं जवळून निरीक्षण केलं. त्यांना अनुभवलं. उत्तम लेखक-कलावंतासाठी कुठलाही अनुभव वाया जात नाही हीच पुलंची धारणा त्यामागे असावी.

आकाशवाणीच्या सेवेतला पुलंचा आणखी एक विशेष म्हणजे सरकारी सेवेतला भावनिक कोरडेपणा त्यांच्यात कधीच उतरला नाही. उलट, सौजन्यानं वागून आनंदाची पेरणी ते करत असत. पुढे दिल्ली आकाशवाणीने आपल्या नभोनाट्य विभागाचे सर्वोच्च अधिकारी - चीफ ड्रामा प्रोड्युसर - म्हणून पुलंना पाचारण केलं. पुल दिल्लीला गेले. साल होतं १९५९. पुलं दिल्लीला गेले आणि आपला 'देश' मागे ठेवून तिथे 'पांडेजी' म्हणून त्यांनी अमाप लोकप्रियता मिळवली. राष्ट्रीय माध्यमात असल्याने देशभरच्या गुणवंत लेखक, कवी, नाटककार, गायक यांच्याशी त्यांचा संपर्क आला. पुलंच्या कला जाणिवेची क्षितिजंही त्या ठिकाणी विस्तारली. मधल्या काळात पुलंना आणखी एक अनोखी संधी चालून आली होती. इंपीरिअल रिलेशन्स ट्रस्टच्या निमंत्रणावरून मीडिया ऑफ मास एज्युकेशनच्या अभ्यासासाठी पुल लंडनला गेले. भारताने टेलिव्हिजनच्या प्रशिक्षणासाठी अग्रक्रमाने त्यांची निवड केली होती. तीन महिन्यांच्या या काळात पुल एका अनोख्या विश्वाची सफर सरून आले. हा आणि बीबीसीचा अनुभव त्यांना पुढे दूरदर्शनची पायाभरणी करताना खूप उपयोगी पडला.

राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते सप्टेंबर १९६० साली भारतात दूरदर्शनचं रीतसर उद्घाटन झालं तेव्हा विज्ञानभवनमधील त्या कार्यक्रमाची संपूर्ण मदार पुलंवर होती, हा आपल्या मराठी अस्मितेचा अभिमानविषय ठरावा. पुलंनी नेटकं नियोजन करून महाराष्ट्रासह एकूण भारतीय संस्कृतीचं दर्शन त्या वेळी घडवलं. दिल्लीच्या मुक्कामात पुलंनी महाराष्ट्रीय समाजाचीही खूप करमणूक केली. दूरदर्शनच्या भारतातील आगमनाचाही किस्सा संस्मरणीय आहे. दिल्लीत एका भव्य औद्योगिक प्रदर्शनासाठी इंग्लंडमधील एका कंपनीने मोठमोठे कॅमेरे, यंत्रणा आणली होती. त्या प्रदर्शनानंतर ते पुन्हा इंग्लंडमध्ये घेऊन जाण्याचा खर्च अवाढव्य होता. कंपनीने तो खर्च टाळण्यासाठी ते सगळे धूड दिल्लीतच राहू देण्याचा निर्णय घेतला. आकाशवाणीच्या भवनात दाखल झालेली ही यंत्रसामग्री अक्षरशः धूळ खात पडली होती. योगायोगाने पुलं जेव्हा मुंबईहून लंडनला गेले, तिथून परत दिल्लीला रुजू झाले तेव्हा पंतप्रधान पं. नेहरू यांनीच त्यांना पाचारण करून या सामग्रीचा काही उपयोग करता येतो का बघा असे म्हटले आणि चित्रपट निर्मितीचा अनुभव गाठीशी असलेल्या पुलंनी भारतात छोट्या पडद्याची पायाभरणी केली. अचानक हाती आलेल्या या सगळ्या सामग्रीचा त्यांनी निर्मितीसाठी उपयोग केला. पुलंबद्दल त्यासाठी आपण नेहमीकृतज्ञ राहायला हवं.

दिल्लीतल्या त्यांच्या वास्तव्याचं तपशीलवार वर्णन मंगला गोडबोले यांच्या 'चांदणे स्मरणांचे' या ग्रंथात आलं आहे. जिज्ञासुंनी ते मुळातून वाचावं. कृ.द. दीक्षित हे आकाशवाणीचे अधिकारी आणि संगीत मर्मज्ञ होऊन गेले. त्यांनी त्यांच्या 'सहवास' या ग्रंथात पुलंच्या दिल्ली दूरदर्शनमधील कारकीर्दीबद्दल दोन छोटे प्रसंग सांगितले आहेत. सुप्रसिद्ध कथक नर्तक बिरजू महाराज यांचा कार्यक्रम दूरदर्शनवर दाखवायचा होता. कथकची माहिती देतादेता बिरजू महाराज जेव्हा चौपट लयीत नृत्यझंकार करू लागले तेव्हा पुलंनी हलकेच तबल्याचा शॉट स्थिर करून त्यावर बिरजू महाराजांची थयथयणारी नुपूरबद्ध पावलं स्थिर केली. तबल्यावरच ते नाचताहेत असं दृश्य दिसलं. आज त्याचं कदाचित काहीच वाटणार नाही, परंतु तेव्हा हा चमत्कार पाहताना प्रेक्षक अक्षरशः उठून उभे राहिले. पंडित नेहरू यांची मुलाखत पुलंनी अशीच कौशल्यपूर्णरीतीनं रंगवली होती. कृष्णाकाठी कुंडल, गडकरी दर्शन हे दिल्लीच्या मुक्कामातील त्यांचे कार्यक्रम गाजले. बटाट्याची चाळ या बहुरूपी प्रयोगाची पूर्वतयारी दिल्ली वास्तव्यातून झाली.

असे सर्व असले तरी आकाशवाणी - दूरदर्शन ही

माध्यमं पुलंच्या कर्तृत्वाला पुरेशी पडणारी नव्हतीच. वाढत्या वयाच्या मुलाला कपडा जसा दाटायला लागतो तसं पुलंना झालं. पुलं म्हणत - ''एकदा तोंडाला पिवडी फासून रंगभूमीच्या प्रकाशात नाचायची सवय माणसाला झाली, की मग त्याला प्रेक्षकांच्या रांगेत अगदी पहिल्या खुर्चीवर बसवलं तरी चैन पडत नाही.'' याच भावनेनं सुखासीन पगाराची नोकरी आणि दिल्ली पुलंनी १९६१ साली सोडली.

पुलंनी आकाशवाणी सोडली त्या वेळी माझा जन्मही झाला नव्हता; पण पुढे याच माध्यमात आपल्याला काम करायला मिळेल. असं पत्रकारितेत असलेल्या मला वाटलं नव्हतं. ते भाग्य मला मिळालं. आणखी एक भाग्य मिळालं - पुलंच्या भेटीचं. नागपुरात १९८९ साली विदर्भ साहित्य संघात पुल - सुनीताबाई हे बोरकरांच्या कवितांचा कार्यक्रम सादर करण्यासाठी आले होते. मी तो कार्यक्रम तर अनुभवलाच; पण धाडसानं पुलंची मुलाखत घ्यायला गेलो. राम शेवाळकर त्या वेळी तिथे होते. माझी भीड काहीशी चेपली. 'भाई, हा बाबा आमटे आणि साधनाताईंचा जावई' - अशी माझी ओळख शेवाळकरांनी करून दिली. त्यात खरं तर माझं काहीच कर्तृत्व नव्हतं. स्नेहाशी स्नेह जुळल्यानं ते शक्य झालं. ती साधनाताईंची सख्खी भाची. या ओळखीमुळे असेल कदाचित, भाईंनी मला मुलाखत दिली. इतकंच नाही तर मुलाखतीनंतर सुनीताबाईंनी एक बॉक्स उघडला आणि त्यातील आंबाबर्फी पुलंच्या हातांनी मला दिली. त्या आंबाबर्फीची चव अजून माझ्या जिभेवर रेंगाळते आहे. मी दोघांनाही नमस्कार केला. मी केलेल्या नमस्काराचं मोल कायम माझ्या स्मरणात आहे.

आपलं कुलदैवत काय आहे हे अनेक घरांतल्या कर्त्या पुरुषांना माहीत नसण्याच्या सध्याच्या काळात, काल-आज आणि उद्याही - महाराष्ट्राचं 'पुलदैवत' असलेल्या या अवलियाला, या खेळियाला माझा शतशः प्रणाम!

• • •

जन्मशताब्दी विशेष

पु. ल. देशपांडे

अशा या पुलंचे करायचे काय?

अविनाश सप्रे

कोणत्याही वाङ्मयीन संस्कृतीमध्ये लेखक लिहीत असतात आणि वाचक वाचत असतात. लेखकांच्या साहित्यकृतींना मिळणारा प्रतिसाद कमी-जास्त स्वरूपाचा असतो. त्यामध्ये चढउतार असतात व मात्र काही लेखकांना सातत्याने मोठ्या प्रमाणावर वाचक प्रियता लाभलेली असते. वाचकांच्या अभिरूचीमध्ये बदल होत असतानाही अशांची वाचकप्रियता टिकून असते. आणखी एक महत्त्वाची बाब वाङ्मयीन संस्कृतीमध्ये घडत असलेली दिसून येते, ती म्हणजे काही लेखक त्या लोकप्रिय होता होता त्यांच्या सर्जनशील निर्मितीच्या चौकटीबाहेर पडून लेखक म्हणून समाजाचे सांस्कृतिक नेतृत्व करीत असतात. असे नेतृत्व त्यांच्यावर कुणी लादलेले नसते किंवा त्यांनी आपण आता नेतृत्व करायलाच हवे असा अहंभावाने केलेले नसते, तर त्यांच्या अंगभूत प्रतिभा सामर्थ्याने त्यांना ते मिळालेले असते आणि समाजानेही त्यांच्या सांस्कृतिक नेतृत्वाला सहज मान्यता दिलेली असते. समाजाला त्यांच्या लेखकीय व्यक्तिमत्वाबद्दल आदर वाटत असतो. त्यांच्या शब्दाला किंमत असते. समाजाच्या 'सद्सद् बुद्धीचे राखणदार) (कॉन्शंस कीपर) अशी त्यांची प्रतिभा असते. समाजात जर काही वेडेवाकडे होत असेल किंवा घडत असेल, तर त्या विरोधात ते आपला आवाज आपल्या लेखनातून आणि बोलण्यातून उठवत असतात. लोकमानसाला कटू वाटले तरी जे सत्य त्यांच्या अंतर्आत्म्याला कळले आहे ते त्याचा जाहीर उच्चार करतात. मराठी पुरते बोलायचे तर ज्यांचे लेखन लोकप्रिय होतेच पण ज्यांच्या व्यक्तिमत्वांचा प्रभाव लोकमानसावर पडला असे लेखक म्हणून सर्वश्री वि.स. खांडेकर, कवी कुसुमाग्रज आणि पु.ल. देशपांडे यांचा आवर्जून उल्लेख करता येईल. पु.ल. देशपांडेच्या पुरतेच बोलायचे तर एक प्रसिद्ध नाटककार, प्रवासवर्णनकार, विनोदी लेखक, अभिनेता, उत्तम परफॉर्मर, संगीतकार, कलावादक अशा अनेक गुणांनी मंडीत असलेले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून महाराष्ट्रात मान्यता पावले आणि महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व म्हणून मराठी जनतेने त्यांचा आनंदाने आणि अभिमानाने स्वीकारले. असे असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्वातील एका अत्यंत महत्त्वाच्या पैलूकडे मात्र महाराष्ट्राने आणि मराठी जनतेने सोयीस्कर दुर्लक्ष केले असे खेदाने म्हणावेसे वाटते. हा पैलू म्हणजे त्यांनी केलेला बुद्धिवादी दृष्टिकोणाचा अंगिकार आणि आपल्या व्यक्तीगत आचरणातून आणि सार्वजनिक जीवनातून केलेला प्रसार 'एक शून्य मी' च्या प्रकाशकांनी म्हटल्याप्रमाणे 'सत्य, न्याय, नीती, अहिंसा, प्रेम, करुणा,


अविनाश सप्रे
'सांगाती',
५८/५९ पार्श्वनाथनगर,
सांगली मिरज रस्ता,
मिरज - ४१६ ४१०
मो.: ९४२२०४१३१२
संपर्क :
avinashsapre1@gmail.com

धर्मजातीभेदातीत समता, कर्तव्य भावनेने संस्कारित असलेले स्वातंत्र्य, विज्ञाननिष्ठ विवेक या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी सदैव झटणारा सत्वशील, स्वायत्त व विधायक पुरुषार्थ'. ही मूल्ये व्यक्तीगत जीवनापुरती मर्यादित न ठेवता समाजजीवनात ती रूजली पाहिजेत हा त्यांचा ध्यास होता. महाराष्ट्राच्या अर्वाचीन काळातील प्रबोधन परंपरेला आलेले सुमधूर फळ म्हणजे पु.लं. देशपांडे यांचे जीवन आणि कार्य होय. उदारमतवाद, मानवतावाद आणि बुद्धिवाद यांचा भरभक्कम आधार त्यांच्या जीवनदृष्टीला होता. रूढी आणि परंपरेतून आलेल्या निरर्थक संस्कारावर प्रहार करताना 'जे संस्कार समाजात जबाबदार नागरीक म्हणून जगायची शिकवण देत नाहीत त्यांना काहीही अर्थ नसतो' असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. (संस्कार : एक शून्य मी.) 'धर्म, अंधश्रद्धा नि तुम्ही आम्ही' या लेखात 'एक तर धर्म, ईश्वर, पूजा-अर्चा ह्यात मला कधीही रस वाटला नाही... पूर्वजन्म, पुनर्जन्म वगैरे थोतांडावर माझा विश्वास नाही. देव, धर्म या कल्पना धूर्त सत्ताधाऱ्यांनी दहशतीसाठी वापरलेल्या आहेत. आपल्या देशात इतके संत जन्माला यायच्याऐवजी निसर्गाचे रहस्य ओळखून ऐहिक जीवनाला विज्ञानाचे अधिष्ठान देणारे शास्त्रज्ञ जन्माला आले असते तर हा देश अधिक सुखी झाला असता. मला कुठल्याही संतापेक्षा ॲनेस्थेशियाचा शोध लावून वैद्यकीय शस्त्रक्रिया वेदनाहीन करणारा संशोधक हा अधिक मोठा वाटतो' असे परखडपणे नोंदवले आहे आणि 'आमचे इतिहासग्रंथ हे जवळ जवळ कल्पनारम्य पुराणासारखे, ऐतिहासिक घटनांचे विश्लेषण नाही, आत्मपरिक्षण नाही, सदैव वास्तव नाकारत जगायचे, कुठल्याही घटनांचे कार्यकारण भाव लावण्याच्या फंदात पडायचे नाही. एक तर सारा हवाला देवावर नाहीतर दैवावर' या बद्दल विषाद व्यक्त केला आहे. (उपरोक्त) अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रमुख उपस्थितीत पु.लं. देशपांडे यांनी केलेले जाहीर भाषण प्रसिद्ध आहे. सावरकरांचे अनुयायी म्हणवणारे लोक सावरकरांना हिंदुत्ववादाचे खंदे पुरस्कर्तेम्हणून ओळखतात पण त्यांची प्रखर विज्ञाननिष्ठा मात्र सोयीस्करपणे विसरतात. पु.लं.नी प्रस्तूत भाषणात हिंदुत्व हा शब्दही न उच्चारता सावरकर कसे बुद्धीनिष्ठ होते, विज्ञाननिष्ठ होते हे सोदाहरण सांगितले आहे. सावरकर हे 'विज्ञाननिष्ठ नास्तिक' होते असेही त्यांनी म्हटले आहे. नशिब, देव, दैव, नियती अशा शब्दांतून व्यक्त होणाऱ्या विचारांनी आपल्याला दुर्बल केले आहे म्हणून हे शब्द आपल्या जगण्यातूनच हद्दपार केले पाहिजेत असे ते आग्रहाने सांगतात. कार्यकारण भाव न शोधणे आणि प्रश्न न विचारणे हा शहाणपणा नसून मूर्खपणा आहे असेही त्यांनी त्या भाषणात म्हटले आहे आणि सावरकर हे 'सेक्युलर होते या मूलभूत बाबीकडे लक्ष वेधले आहे. (सावरकरांचीही अशी प्रतिमा सावरकरांचे अनुनायी म्हणवणाऱ्यांनी पटणारी आणि पचणारी नाही हे उघडच आहे.) 'आहे मनोहर तरी' या आत्मवृत्तात सुनिताबाई देशपांडे यांनी पु.लं.च्या संबंधी ज्याप्रकारे लिहिले आहे ते पु.लं.चे चाहते म्हणवणाऱ्या अनेकांना आवडले नाही, या संबंधी त्यांना प्रश्न विचारला असता ते म्हणतात, ''महाराष्ट्राचं लाडकं दैवत' वगैरे विशेषणे मला लावली आहेत ना, ती ऐकून मला ओशाळल्यासारखं झालं. एकदा माणसाला दैवत केलं की, दैवतासारखं वागायची त्याच्यावर जबाबदारी पडते... (याच्यापेक्षा साधा माणूस राहू दे... मला अतिशय आनंद झाला... की जी सेट कल्पना आहे, की बाईनं घरामध्ये कसं वागावं, तिचं काय स्थान आहे, ह्याला तिनं धक्का दिला... सत्य काय आहे हे सांगायला ती घाबरली नाही.'' ('पु.लं. वृत्तांत' या अनुभवपटातून) आपल्या अत्यंत लोकप्रिय प्रतिमेवर आपल्याच पत्नीने केलेली टीका सपोर्टींगली घेण्याची जी वृत्ती पु.लं.नी इथं दाखवली आहे कसलाही खोटा नाटकीपणा नाही तर उदारमतवादाच्या संस्कारांतून निर्माण झालेली परमता बद्दलची सहिष्णुता आणि आदरभाव आहे, पूर्वी वर्चस्ववादाला छेद देऊन स्त्री-पुरुष समतेचे दर्शन घडवणारा आहे.

आणीबाणीच्या काळात इंदिराजींचे दमनपर्व निर्माण झाले होते. जयप्रकाशजींसारख्या आदरणीय, ज्येष्ठ आणि वृद्ध असलेल्या राष्ट्रीय नेत्यास तुरुंगात टाकण्यापर्यंतची मजल सत्ताधाऱ्यांनी गाठली होती. हे सारे घृणास्पद होते. लोकशाहीवर कलंक उठवणारे होते. कुठल्याही विचारी, संवेदनशील माणसाप्रमाणे पु.लं. आणि सुनीताबाई अस्वस्थ होत्या. तुरुंगामध्ये जयप्रकाशजींनी डायरी लिहीली होती आणि त्यातून त्यांची अगतिकता आणि दुःख व्यक्त होत होते. या डायरीची टाईप प्रत गुप्तपणे बाहेर आणण्यात आली आणि अ.भि. शहांनी ती पु.लं.च्या हवाली केली. रोजनिशीतून भळभळणारे दुःख लोकांपर्यंत जाणे गरजेचे होते.

रोजनिशी इंग्रजीत होती. पु.लं.नी त्याचा मराठी अनुवाद अत्यंत कर्तव्यभावनेने केला आणि 'स्वगत' या नावाने तो प्रकाशितही झाला. हा अनुवाद पु.लं. करीत आहेत याचा सुगावा बाहेर लागणे धोक्याचे होते. पु.लं.नी रात्री जागून मुद्रणप्रत तयार केली हे काम त्यांनी विनामूल्य तर केलेच पण स्वगतच्या शंभर प्रती स्वतः विकत घेऊन त्या मित्रांना दिल्या. लोकशाहीच्या रक्षणासाठी नागरीक म्हणून असलेली जबाबदारी पु.लं.नी अशा तऱ्हेने निष्ठेने पार पाडली. आणीबाणी नंतर झालेल्या निवडणुकीच्या पुण्यातल्या एका प्रचारसभेत त्यांनी ध्वनिमुद्रीत संदेश पाठवला, त्यात त्यांनी म्हटले होते, ''विचार स्वातंत्र्य गेले की माणसाचे माणूस म्हणून जगणे संपले.'' (पु.ल. एक साठवण)

पहिला 'महाराष्ट्र भूषण' हा सन्मान पु.लं. देशपांडेंना देण्यात आला. पु.लं. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे खंदे आणि कृतीशील पुरस्कर्तेहोते. ''जो जो वांछील तो ते लिहो'' असा संदेश त्यांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना जाहीरपणे दिला होता. मात्र सद्यास्थितीत या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येत आहे, त्याचा संकोच केला जातोय हे बघून ते अस्वस्थ होत होते. सदर सन्मान स्वीकारताना त्यांनी या संदर्भात आपला अभिप्राय स्पष्टपणे आणि परखडपणे नोंदवला होता. ते म्हणाले होते. ''एखाद्या विचाराला विरोध करायचा तर तो आपला स्वतःचा विचार मांडून करावा. विरोधकांच्या तोंडाला काळं फासणं, खोलीत कोंडून ठेवणं, विज्ञानाच्या प्रयोगशाळा जाळून टाकणं, आयुष्यभरच्या अभ्यासाच फळ नाहीसं करणं – हे लोकशाहीला मानवणारं कृत्य नव्हे. विचारांनी सिद्ध करायचे मुद्दे सुटले, की मुद्दे सुरू होतात आणि मुद्यांनी काहीच सिद्ध होत नाही... माझ्या वयाच्या या अखेरच्या टप्प्यात मला सर्वात अधिक अस्वस्थ करणारी गोष्ट जर कोणती असेल, तर ती म्हणजे, योग्य मुद्यांनी सिद्ध करण्याची घटना मुद्यांनी दडपून टाकण्याच्या प्रवृत्तीचा वाढता जोरही आहे. या अनिष्ठ प्रवृत्तीचा प्रभाव कमी करण्याऐवजी वाढीला लावणाऱ्या संघटनाही जोर धरताना दिसताहेत. माझ्या लिखाणातून, भाषणांतून मी विचार स्वातंत्र्याचा पाठपुरावा करीत आलो आहे.'' ('पाचामुखी') 'ह्या देशआचे राजकीय चित्र किती लज्जास्पद झाले आहे' हे पाहून आणि 'जिला भारतीय



जनता म्हणतात ती कुंभमेळे, पंढरीच्या वाऱ्या, तीर्थयात्रा, तिरुपती बालाजीचा तीन कोटी रुपयांचा हिऱ्यांचा मुकुट, संतोषीमाता ह्यातच देश आहे.' या बद्दल त्यांना तीव्र संताव व्यक्त करावासा वाटतो. (सत्तेच्या साठ्यातील लोकशाहीचा बळी'; एक शून्य) आपल्या समाजाला नामस्मरणाचा रोग जडला आहे आणि 'एकदा का नामस्मरण सुरू झाले की माणसाचा देव होतो आणि बुद्धीनिष्ठ चिकित्सेची हाकालपट्टी होते' असे सांगून ते 'दुर्दैव असे की ज्या सुशिक्षित आणि सुस्थित समाजाने ही अंधश्रद्धा नष्ट केल्याचे आदर्श आपल्या आचरणाने अशिक्षित समाजापुढे ठेवावेत तो समाजही निरनिराळे बुवा, माताजी आणि नवसाला पावणाऱ्या देवदेवता मागे लागलेला' आहे हे बघून दुःखी होतात. (नामस्मरणाचा रोग : एक शून्य)

उमदा स्वभाव आणि स्वागतशीलवृत्ती हे पु.लं.च्या व्यक्तिमत्वाचे विलोभनीय वैशिष्ट्य होते. स्वतःच्या लेखनीला, भाषणांना, नाटकांना, एकपात्री प्रयोगांना प्रचंड प्रतिसाद आणि प्रसिद्धी मिळूनही स्वतःमधे न रमता आपल्या बाहेर कलाविश्वात आणि साहित्य विश्वात जे जे म्हणून नवीन प्रयोगशील निर्माण होत आहे त्याची आवर्जून दखल ते घेते आणि त्याचे स्वागतही करीत. 'गुण गाईन आवडी' हा त्यांचा सहज स्वभावच होता. त्यामागे पेट्रनायजिंगचा भाग नव्हता, तर निखळ आणि



निर्मळ आस्वादकता होती. 'कोसला' वाचल्यावर 'या लेखकांना आम्ही डुलक्या घेत असताना आम्हाला खिंडीत पकडले' असं त्यांनी लिहीलं. दया पवारांच्या 'बलुतं'मध्ये त्यांनी 'दुःखानं गदगदलेलं झाड' पाहिलं. राम नगरकरांच्या 'राम नगरी'तल्या बिनधास्तपणाला त्यांनी दाद दिली. नव्या पिढीतील रंगकर्मींशी मैत्रभाव जपला. अशी कितीतरी उदाहरणे दाखवता येतील.

स्वतःच्या सर्जनशील कर्तृत्वातून मिळवलेल्या संपत्तीचे आपण मालक नसून 'विश्वस्त' आहोत अशा गांधीवादी भूमिकेतून पु.ल. (आणि सुनिताबाई) यांनी स्वतःच्या ट्रस्ट मार्फत लक्षावधी रुपयांच्या देणग्या विधायक काम करणाऱ्या संस्थांना दिल्या, त्यामागेही त्यांची आधुनिक आणि पुरोगामी दृष्टी होती, कसल्याही प्रकारचा श्रेयवाद त्यामागे नव्हता, तर सामाजिक उत्तरदायित्वाची विनम्र जाणीव होती. 'आयुका', 'अंधश्रद्धा निर्मुलन संस्था, आनंदवन, एशियाटिक लायब्ररी, रक्तपेढ्या, व्यसन मुक्ती केंद्र ही त्यातली काही उदाहरणे होत. ही उदाहरणे त्यांची जीवनदृष्टी कशा प्रकारची होती हे दाखवून देतात.

पु.लं.च्या स्वतःच्या साहित्याच्या दर्जाविषयी उलट सुलट चर्चा होत राहिली. त्यांच्या साहित्याला 'मध्यमवर्गीय' जाणिवांच्या मर्यादा आहेत, हे साहित्य प्रामुख्याने करमणुकप्रधान आहे, रंजनप्रधान आहे, ते लोकप्रिय जरूर आहे, पण गंभीर नाही ही त्यांच्या साहित्यासंबंधीची काही मते. पु.ल. स्वतः मतस्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्तेअसल्याने अशा मतमतांतराबद्दल खंतावले नाहीत. एक मात्र निश्चित की लेखक पु.लं.च्या बाबतीत मतमतांतरे असतील, पण 'लेखक या चौकटीच्या बाहेर पडून व्यक्तीगत आणि सार्वजनिक जीवनात एक 'माणूस' म्हणून त्यांनी आधुनिक मूल्यांची कृतीशील पाठराखण करून, जो आदर्श समाजापुढे ठेवला, तो दीपस्तंभासारखा सदैव दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरणारा आहे. पु.ल.ना कुणी 'विचारवंत' म्हटले नाही आणि खुद्द पु.लं.नीही हे बिरूद कधी स्वतःहून मिरवले नाही. पु.लं.नी स्वतःला कधी एका विशिष्ट 'विचारप्रणाली'च्या चौकटीत अडकून घेतले नाही. मात्र विवेकाधिष्ठीत विचारसंस्कृतीचा आयुष्यभर पुरस्कार केला आणि विकारांतून निर्माण झालेल्या कृत्यांचा तीव्र निषेध केला. पु.लं.चा बुद्धीवाद कोरडा नव्हता, त्यामध्ये भावनेला स्थान होते. पु.लं.नी साधेपणाचा अंगीकार केला, पण या साधेपणातून सौंदर्य वर्ज्य केले नाही, ''पु.लं.च्या हयातीत आणि पश्चातही त्यांच्या व्यक्तीगत जीवनावर, त्यातल्या साधन सूचितेवर, नैतिकतेवर कुठेही काहीही चरा, ओरखडा कोणी ओढला नाही. एवढी वर्ष, एवढ्या भूमिकांमधून, एवढ्या मोठ्या समाजस्तरावर वावरूनही पु.लं. निष्कलंक राहिले. एवढ्या प्रमाणात वाद-संवाद-विनोद ह्या वाटेवरून जाऊनही त्याला कधी दिलगिरी व्यक्त करावी लागली नाही.'' असं श्रीमती मंगला गोडबोले यांनी म्हटलंय. ('पु.लं. चांदणे स्मरणाचे) ते अगदी योग्यच आहे.

तर, असे हे साहित्यातून साहित्याच्या बाहेर येऊन जगण्याच्या प्रश्न विशाल प्रांगणात प्रत्यक्षपणे उतरलेले पु.लं. आजच्या मराठी माणसाला, मराठी समाजाला आणि महाराष्ट्राला मान्य आहेत काय? आपल्या आचार-विचारातून आणि वर्तन व्यवहारातून आणि उक्तीकृतीतून जगण्याची जी मूल्यगर्भ रीत त्यांनी आपल्या समोर ठेवली, ती वगळून त्यांना 'महाराष्ट्राचे लाडके दैवत' म्हणणे योग्य ठरेल का? साहित्यातील संदेशाबद्दल बोलताना जॉर्ज ल्यूकाचने लोकांना शर्करावगुंठीत गोळी' (शुगर कोटेड पिल) दिली तर लोक साखर तेवढी खातात आणि कडू गोळी फेकून देतात' असं म्हटलं होतं. पु.लं.चा स्वीकार आपण असा सोयीस्कररित्या केला का? करतो आहोत का? पु.लं.ना मान्य असणाऱ्या आणि आदर असणाऱ्या मूल्यांची धुळधाण पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात आजकाल ज्या तऱ्हेने होते आहे, ती पाहता अशा या पु.लं.चे करायचे काय? असेच खेदाने म्हणावेसे वाटते.

• • •

स्मरण


कविता महाजन

कविता महाजन यांची रेखाटने















अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

स्वागत

कादंबरी अंश

वीतभर सुट्टीत

शिवकन्या शशी

१.

आज तरी सुट्टी मिळायला काय हरकत होती? पण नाही. बाई म्हणतील, ''शाळेत या. काम नसले तरी बसा, मी मीटिंग घेईन. मी काय म्हणतेय ते ऐका मग जा.''

याची फ्लाईट कधीची? आज दुपारी चार वाजता निघेल. दुबईत पोहचेल. चार-पाच तासांचा ले ओव्हर असेल. थांबेल. विमानतळावर हा एक डार्क माणूस दिसेल. शार्प फीचर्सचा डार्क माणूस. काही वळून पाहतील. काही गोऱ्या बायका, काय हॉट् आहे असे म्हणून आपल्या पूर्वजांनी यांच्यावर उगाचच अन्याय केला असं म्हणतील किंवा अरे, यांना माझ्या आजी, पणजीने 'ठेवून' घेतला होता... असं म्हणत असतील का मनात? असतील. आपण गोऱ्या वंशाचे नाहीत. त्यामुळे त्यांच्या मनातले जे अंदाज आपण लावतो, ते आपल्या कातडीच्या रंगाच्या अनुभवानुसार लावतो. तर... हा दुबईच्या चमकधमक विमानतळावर असा एक फेरी मारेल. या सरकत्या जिन्यावरून त्या सरकत्या जिन्यावर असा गमतीने जाऊन येऊन करेल. पाण्याच्या उडत्या कारंजाकडे पाहील. वा! वाळवंटात पाण्याचे काय सौख्य...

पण, हे सगळं त्याला असंच वाटेल, कशावरून? सहा महिने झाले, घर नाही, बायको नाही, पेक्षा बाई नाही हे जास्त सत्य, पोरंबाळ नाहीत. बाहेरचे जेवायचे. कधीमधी कॉमन किचनमध्ये काही तरी शिजवायचे. असा चहुबाजूंनी उपवास घडलेला माणूस, दुबई विमानतळाच्या झगझगाटाला किती वेळ भुलणार?

त्याला त्याची कृष्ण रंगात बुडलेली घरची बाई आठवेल. आफ्रिकेतल्या एका देशातील, एका कोपऱ्यातल्या एका देशात, त्याची वाट पाहणारे घर तो त्याच्या पिवळट डोळ्यांत आणेल. आणखी काही तास, मग तो घरात. मुले त्याला बिलगतील, बायको प्रेमाने जवळ येईल. वृद्ध आई लांबून हसेल. अनेक पावसाळे पाहिलेले तिचे पांढरेशुभ्र दात मुलाच्या घरी येण्याने आणखी चमकतील. त्यांची कोणती तरी न कळणारी भाषा तो बोलत राहील.

सुट्टी परत आपल्या माणसांत नेऊन सोडते. स्वभाषेच्या बाराखडीत आणून ठेवते. तर बाईसाहेब आल्या. त्यांना नेहमीप्रमाणे किती आणि काय बोलावे याचे ताळतंत्र नव्हतेच. त्या बोलत राहिल्या.

शिवकन्या शशी
संपर्क :
shivkanyaindia@gmail.com

म्हणाल्या, ''माझ्या शाळेची बदनामी करत फिरणाऱ्यांनी माझ्या शाळेत काम करू नये. जर माझी शाळा चांगली नसेल, तर तुम्ही या शाळेत का आहात? जाऊ शकता...''

उठून सांगावेसे वाटत होते, 'बाई प्रसंग काय, तुम्ही बोलता काय! इथे आता बसलेला प्रत्येक शिक्षक मायदेशी जायची वाट पाहात आहे. त्यासाठी प्रत्येकानं आपली कामं दोन दिवस आधी संपवली आहेत. ज्यांना या वर्षी शाळा सोडायची होती, ते विमानतळावरून घरी पोहचलेसुद्धा. तरी बाई, तुम्ही उरलेल्या गरीब बिचाऱ्या शिक्षकांना का वेठीस धरत आहात?' पण नाही, कुणीही विचारले नाही. अरे, वर्षभरात त्यांचे इतके ऐकलेय, की आणखी अर्धा तास आरामसे ऐकायची तयारी होती. काहींनी कानात हळूच इअरफोन्स घुसवले... आणि बाई बोलत राहिल्या.

...बाईंचे संपताच सगळे जे धूम पळत सुटले ते तळमजल्यावरच्या कारकुनाकडे पोहचल्यावरच थांबले. प्रत्येकाला वाटले आपण पहिले; पण त्यांच्या आधीही बरेच पहिले, रांगेत उभे होते. आज सगळ्यांना पासपोर्ट मिळणार होता.

कालच अनेकांनी त्यांच्या त्यांच्या कंपूमध्ये आपापसात वाद घातला होता.

''या बाई पासपोर्ट कशा काय ठेवून घेऊ शकतात?

ही तर आपली खाजगी मालमत्ता आहे.

हे बेकायदेशीर आहे.

पुढच्या वेळेस मी तर माझा पासपोर्ट मुळीच देणार नाही.''

''मग काय करणारेस? लोणचे घालणारेस?''

''अरे, सुट्टीवरून परत येता येता पैसे संपलेले असतात. झकत काउंटरला आधी तू जाशील पासपोर्ट द्यायला.''

ख्या ख्या ख्या...

''अरे, सुनो, उधर कितनी बारीश हैं! इधर भी आनी चाहिये यार बारीश!''

''...और अपना ये स्कूल बह जाना चाहिये.''

''बह जाने दो, सिर्फ स्कूल कि मालकीन को बोलना, ये पासपोर्ट टेरेस पे रख दें.''

ख्या ख्या ख्या...

एली सोनेरी केस उडवत इकडून तिकडे, तिकडून इकडे करत होती. तिला सरूने विचारले, ''बाई, यंदा तरी जाणार का घरी?''

समोर अर्धवट झालेल्या बांधकामाकडे पाहात म्हणाली, ''जाणार''

''तिकीट बुक केलेस?''

''नाही. कुणी माणूस मिळतो का ते पाहतेय!''

''माणूस कशाला आता!'' सरूने डोळे मिचकावत विचारले.

''ओह, आय मीन माझी मांजरे सांभाळायला माणूस पाहिजे. तो मिळाला की मी निघेन.''

''काय काय प्लान आहे?''

''काही नाही. इथून आधी रोमला जाणार. तो आमचा कल्चरल फील घेणार. मुख्य म्हणजे इथून रोमला तिकीट स्वस्त पडते. मग आईचे घर आहे फ्रांसमध्ये, तिथे कोण आहे का ते पाहणार. नसेल तर युरोप फिरत फिरत शेवटी इंग्लंडला घरी पोहचणार. मग एखादा आठवडा स्कॉटलंड ब्युटी पाहण्यात घालवणार आणि मग परतणार.''

''घरी नाही राहणार फार?''

''तुम्हा इंडियन्स इतके नाही!'' ती मोठ्याने हसून म्हणाली. ''तुम्ही दर सहा महिन्याला घरी जाता. सगळ्यांना भेटता. परत येता.''

''तुला नाही वाटत?''

''...नाही, म्हणजे मी साधारण तशा कल्चरमधून आलेली नाही. सहा वर्षांची होते तेव्हापासून घराबाहेर आहे. आज पंचेचाळीस वर्षांची झालेय; पण बाहेरच आहे. त्यामुळे बाहेरचे जग हेच घर वाटते. नॉमिनल घर आहे...''

एलीने कितीदा 'बाहेर' हा शब्द वापरला हे सरूने आठवून मोजायचा प्रयत्न केला. एली ब्रॉड कल्चरल आउटलुक ठेवून बोलते. म्हणजे सगळी कारणं, दुखणी त्यात झाकली जातात.

२.

लांबलचक कॉरीडोर्समधून उस्ताद तारिक संथ पावले टाकीत चालले होते. स्वत:मध्येच मग्न. सगळे वर्ग रिकामे रिकामे. खुर्च्या, डेस्क, लॉकर्स, प्रोजेक्टर, सॉफ्ट बोर्ड, व्हाईट बोर्ड, सगळे सगळे गप्पगार झाले होते. मुले सुट्टीवर गेली, म्हणजे शाळा निष्प्राण होते. उस्ताद तारिक

विचार करत हळूहळू चालले होते.

त्यांनाही घरी जावेसे वाटत होते. पालेस्तीन. (Palestine). पालेस्तीनचा विचार आला की त्यांची निळी नजर बाहेरचे भाकभाक ऊन पाही. दूरवर पसरलेल्या डोंगरपट्टीकडे डोळे ताणून पाहात, तेव्हा त्याच्या कपाळावरच्या आणि गालावरच्या सुरकुत्यांच्या जंजाळात दोन निळ्या पाणीदार रेषा चमकून जात. सूर्याची ती आगपाखड त्यांना सहन होत नसे. आताही सहन झाले नाहीच. त्यांनी नजर परत सावलीत ओढली. खालच्या संगमरवरी चकचकीच फरशांकडे पाहात पुढे चालू लागले. मन कधीच मायदेशी पोहचले होते... त्यांना बोलावेसे वाटत होते. पण घरी जायच्या गडबडीत कोण आपल्याशी सविस्तर बोलत बसणार? त्यांनी स्टाफरूममध्ये डोकावले. गणिताच्या डॉक्टर बिना काहीतरी खुडखुड करीत होत्या. त्यांनी सहज 'हैलो' केले. त्यांनी कंपासने वहीवर पेन्सिल गोल फिरवावी तशी मान वळवून त्यांच्याकडे पाहिले आणि हसल्या.

उस्ताद तारिक क्षणभर थबकले; पण डॉक्टर बिना परत खुडबुडीत दंग झाल्याचे पाहून ते स्वतःशीच मंद हसत म्हणाले, ''गणिताच्या मास्तरकडून थोड्याशाही गप्पांची अपेक्षा ठेवणे चूकच... चूक त्यांची नाही, त्यांच्या विषयाची आहे. दोन अधिक दोन चार. ते गणित त्यांच्यासाठी संपले. त्याच्या पुढेमागे काही पाहावेसे वाटतच नाही त्यांना.''

डॉक्टर बिनांनी उस्ताद तारिक गेल्याचे ताडले आणि मोबाईल ऑन करून स्वतःचा चेहरा परत एकदा पाहिला, 'या लोकांची नजरच मेली वाईट! यांच्या नुसत्या बघण्यानेही चेहरा खराब होतो आमचा!' पर्समधल्या पद्मनाभाला नमस्कार केला. पुन्हा खुडखुड चालू.

उस्ताद तारिक यांना पाचच मिनिटे का होईना, कुणीतरी बोलायला हवे होते. तितक्यात समोरून कृष्णवर्णीय हेन्री दिसला. हा कूल आहे... तो जवळ येताच, 'हेलो' केले, त्याने दूरूनच 'ओह, उस्ताद तारिक, हाऊ आर ऊ?' करून निघून गेलासुद्धा. तारिकांच्या गोऱ्यापान वृद्ध चेहऱ्यावर मंद हसू झळकले. ते आपल्या केबिनकडे परत चालू लागले. कुणाशी बोलावे त्यांना कळेना... ते खुर्चीत बसले. समोर संगणक होता. ते तो कधीच वापरायचे नाहीत. ते प्रिंटस् मागवायचे... कागदावर द्या म्हणायचे. सगळ्यांना माहीत झाले होते. पण शाळेने शोसाठी म्हणून तो महागडा संगणक त्यांच्यासमोर ठेवला होता. त्यांनी चष्मा काढला, डोके मागे टेकवले, घरी जावेसे वाटत होते. त्यांनी डोळे बंद केले...

चार वर्षांपूर्वी ते असेच सुट्टीला घरी गेले होते. त्यानंतर आजपर्यंत गेले नव्हते. त्यांच्या डोळ्यांच्या कडा नकळत ओल्या झाल्या. त्यांच्या मनातला बारीक आवाज त्यांना फार मोठा वाटू लागला.

'असे जाळणारे ऊन आपल्या देशात नाही. आपण ज्या शहरात राहतो, तिथे नाही. तिथे ऑलिव्हच्या बागा आहेत. आपल्या अरबीत काय बरं म्हणतो आपण ऑलिव्हला? आताशा विसरतो आपण बरंचसं... हं आलं लक्षात, जैतून... कसा विसरलो मी हा इतका जवळचा शब्द!! आता त्यांच्या बागा कमी झाल्यात, पण आहेत. आपले लहानपण त्यांच्या संगतीत गेले. इथे बाटलीतले जैतून मिळते. किती वर्षे झाले आपण ते खातोय, पण घराच्या बागेतले जैतून... मोठा भाऊ म्हणाला, बाग काढून टाकू. मुलं मोठी झालीत. त्यांचे निकाह होतील. तेव्हा घर वाढवायला पाहिजे. आपण काहीच बोललो नाही. आपल्याला तो अधिकार नाही. तो मोठा. तो घरदार पाहतो. आपण अजनबी. परके झालो घराला... घरालाच का? देशालाही परके झालो... सदान्‌कदा भांडणं, युद्ध, म्हणून आपणच तरुणपणी घर सोडले, देश सोडला, माती सोडली, लढायचे सोडले, मारणाऱ्यांना मारायचे सोडले. नुसत्या बातम्या वाचून आणि ऐकून सुस्कारे सोडले... कधीमधी इथले रियाल घेऊन तिथे जाऊन आलो. पण... पण त्यात ती जान नव्हती. आजही नाही... घरी जायला पाहिजे... बाग वाचवायला पाहिजे. या देशात आणखी फारतर दोन वर्षे राहू शकेन. रिटायर होईन... मग कुठे जाईन? कोण मला इथे ठेवून घेईल? आत्ताच मी थकून जातो. माझ्या घरीच मला जावे लागेल. माझ्या देशातच मला जावे लागेल... इथे जीव रमला नाही, तिथे जीव रमवता आला नाही... आपण डेड आहोत... आपण डेड सी आहोत... मृत-समुद्र... आपल्या आत फक्त खारटपणा आहे. जे आपल्यावर पडले ते नुसतेच वर तरंगत राहिले. मनाचे वाळवंट झालेय... घरी जायला पाहिजे. बाग राखायला पाहिजे...' त्यांचे मन भारी जड झाले... त्यांनी हळूहळू

अनुक्रमणिका

डोळे उघडले. समोर चपराशी उभा होता. बांगलादेशी. समीर त्याचे नाव. असेल वीसबावीस वर्षांचा. सगळे शारीरिक कष्ट करून करून पीळपिळा होऊन गेला होता आत्ताच. आला होता तेव्हा तोंडही उघडत नसे. गप्प राहून, सांगितलेलं काम, कळेल तेवढं करायचा. हळूहळू त्याला गुडमॉर्निंग, थांक्यू, टेक, कम, गो सारखे सोपे सोपे इंग्लिश शब्द शिकवले. तो शिकला. जराजरा हसू लागला. त्याचा चेहरा बोलू लागला. मग इतर चपराशांपेक्षा तो बाईंच्या मर्जीत जरा जास्तच बसला. मग त्याला सगळ्या वरिष्ठांची सरबराई करण्याचे काम आले. आताही तो उस्ताद तारिक यांनी डोळे उघडायची वाट पाहात होता. त्यांनी डोळे उघडताच म्हणाला, ''सर, टाईम खतम...''

आज शाळा तासभर लवकर सुटली होती; पण त्यांना त्याचे भान नव्हते. कितीतरी वर्षांची सवय होती. काम करायची सवय. कामच करत राहायची सवय. त्याला पाहताच ते मंद हसले. म्हणाले, ''येस... तू जाणार का सुट्टीला घरी?''

त्याने चटकन मान खाली घातली. ''माहीत नाही. मुकादम काय म्हणतो बघू...''

''अरे जाऊन ये. दोन वर्षे झाली ना तुला इथे येऊन? दोन वर्षांनंतर एकदा तुम्ही घरी जाऊन परत येऊ शकता...''

''मालूम नहीं. मुकादम म्हणतो, एकदा गेलात तर परत घेणार नाही या देशात... काम कंटिन्यू केले तरच इथे टिकाल.''

''अरे... हा तर जुलूम आहे!''

''नाही. हे असेच आहे सर. तुम्हाला माहीत नाही.'' तो उदास हसून म्हणाला.

उस्ताद तारिक यांनी इथल्या अरबी वृत्तपत्रात पंधरा वर्षे काढली होती. अशा कामगारांचे जीवन त्यांना माहीत होते. त्यांना कसे आणले जाते, कुठून कसे कामावर ठेवले जाते, त्यांचा पगारपाणी काय असतो, त्यांचे जेवणखान, औषधपाणी, कपडेराहणे, या सगळ्यांची सगळी माहिती होती. बांगलादेश, श्रीलंका, फिलिपिन्स, पाकिस्तान, भारत, आफ्रिकेतल्या वेगवेगळ्या देशांतून आणताना मधले दलाल आणि इथे आल्यानंतर मुकादम कशी पिळवणूक करतात, अडवणूक करतात, त्यांनी स्वतः ऐकले होते, डोळ्यांनी पाहिले होते. तरीही, समीरला बरे वाटावे म्हणून ते बोलले... मग मनात म्हणाले, 'आपलं वय झालंय. आपल्या शब्दांत आता कुणाचे सांत्वन करायचीही शक्ती राहिली नाही.' उठता उठता त्यांनी वॅलेटमधून एक रियालची राणीकलरची नोट काढून त्याच्या हातावर ठेवली.

''काहीतरी घे यातून.''

''घर भेजूंगा...'' तो दोन्ही हात कपाळाकडे नेत म्हणाला.

त्याने त्यांची ब्रीफकेस चटकन पुढे होऊन उचलली. उस्ताद परत मंद पावले टाकीत चालू लागले. मागून समीरच्या स्लीपरचा चटचट आवाज त्यांच्या कानाला जागं करत होता.

'एका रियालचे बांगलादेशी रुपीमध्ये किती होत असावेत? दोनशेपेक्षा जास्त नक्की होत असणार! आपल्या पालेस्तीनमध्ये किती होतात? हां... आपल्या देशाची तर करन्सीपण नाही. हे देश गरीब आहेत. पण आपण कोण आहोत मग? आपण गरीब आहोत! स्वतःशीसुद्धा हे मान्य होत नाही. इस्राईलला करन्सी आहे. आपल्याला नाही... आपला देश करन्सीशिवाय चालतो. तसे पाउंड वापरतो आपल्या देशात, पण...!! पण हे म्हणजे दुसऱ्याची बायको वापरण्यासारखे आहे...' जिना आला, त्यांच्या विचारांची साखळी तुटली.

मनाने परत उचल खाल्ली, यंदाच्या सुट्टीत घरी जावे का? त्यांनी मनातल्या मनात हिशेब करायला सुरुवात केली. रियालचे पाउंडमध्ये करणे, त्यांचे मन सोडत नव्हते. पण मागून 'एक रियाल = दोनशे बांगलादेशी रुपीज' खिशात ठेवून चालणाऱ्या स्लीपरचा आवाज त्यांना एकाच वेळी दाता बनवत होता आणि किंचित खिजवतही होता.

समीर त्यांना खाली सोडून वर आला. त्यांच्या केबिनला कुलूप लावले. तेवढ्यात पलीकडून मोठा झाडू घेऊन उंचेला बाबू आला.

तो साधारण तिशीच्या आसपासचा तगडा गडी. केरळातल्या कुठल्यातरी खेड्यातून आला होता. वर्ष झाले होते. पण अवजड कामाला ऐकत नसे. त्याने एकदम कॉरीडोर्समधले लाईट्स घालवले. समीरने तोंड उघडायच्या आत त्याने त्याची गच्ची पकडली. तसा समीरने आपल्या शर्टचा वरचा खिसा गच्च पकडला. ''पैसा निकाल!''

पीळपिळा समीर म्हणाला, ''काहेका पैसा?''

''अरे. सारा पैसा तू लेगा क्या?''

''उस्तादने मुझे अकेले को पैसा दिया हैं!''

''ह्या ह्या... इधर बाबू को उसका हफ्ता देने का... मालूम नै क्या?''

समीरला दरदरून घाम फुटला.

......

बाई खालच्या मजल्यावरच्या प्रशस्त केबिनमध्ये बसल्याबसल्या समोरच्या सीसीटीव्हीवर रिकामी झालेली शाळा निरखून पाहात होत्या. कशाकशाचा मेंटनन्स करायचाय, याचा हिशेब त्यांच्या मनात चालू होता. त्याचबरोबर शाळा वाढवण्यासाठी समोर सुरू केलेले बांधकाम, नाही म्हटले तरी त्यांच्या मनात धडकी भरवत होते. मोठमोठाल्या खर्चाच्या बाबी! गुंतवणूक रुपयात असती तर, इतके काही वाटले नसते. पण ही रियालमधली भली मोठी गुंतवणूक दमछाक करणारी होती. पण ते त्यांना करायचे होते. जिद्द तर होतीच होती; पण धंदा वाढवणे हे कोणत्याही धंदेवाइकाप्रमाणे त्यांच्याही रक्तात होते. त्या रक्तामधून त्यांची सुटका नव्हती. ही शाळा उभी करताना त्यांनी जे हजारो रियाल घातले होते, ते गेल्या पाच वर्षांत भरून निघाले होते. म्हणूनच नवी वाढीव इमारत उभी राहात होती; पण सोबत खर्चाचे ठोकताळे बरोबर नाही झाले तर काय, ही भुणभुण कायम होतीच. या सगळ्या जंजाळात, समोर पाहिले तर एकदम टीव्हीवर अंधार दिसला. तीन मिनिटे होऊन गेली तरी चित्र दिसेना, म्हणजे वर काहीतरी गडबड झाली असणार, शॉर्टसर्किट झालं असणार... त्यांनी एकदम टेबलावरची बेल खणखण वाजवली. पलीकडे बसणारा झियाद चटकन उठून आला.

''जा उपर देख, अंधेरा क्यूं हो गया?''

तो लागलीच वर आला तर बाबू समीरच्या छातीवर बसून त्याला मारत होता. समीरचे पाय तडातडा उडत होते. झियादने आपल्या सर्वशक्तिनिशी बाबूला बाजूला केले.

दोघेही बाईंच्या केबिनमध्ये उभे होते. समीरचा चेहरा रडवेला झाला होता तर बाबू बेफिकिरीचा आव आणून कोपऱ्यातल्या उधळलेल्या घोड्याच्या मूर्तीकडे पाहात होता. बाईंचा संताप वाढत होता. पण हाणामारीवर उतरणाऱ्या अशा कामगारांना आपण स्वतः काही न बोलता, थेट त्यांच्या मुकादमाकडे त्यांची तक्रार करायची, हे त्या अनुभवाने शिकल्या होत्या. नाहीतर, हे निगरगट्ट कामगार कुठला वचपा कुठे काढतील याचा भरवसा त्यांना वाटत नव्हता. त्यांनी संताप गिळला. दोघांनाही मारामारीचे कारण विचारले.

समीरने काय झाले ते सांगितले. पण बाबूजवळ सफाई देण्यासारखेही काही नव्हतेच. त्यांनी झियादला बोलावून समीरला घेऊन जायला सांगितले. बाबूला रिसेप्शन हॉलच्या बाहेर थांबायला सांगितले. आधी कॉल करून खालच्या मजल्यावर अजूनही रेंगाळणाऱ्या उस्ताद तारिक यांना केबिनमध्ये बोलावून घेतले.

''उस्ताद, तुम्ही समीरला रियाल का दिले?''

अचानक असा प्रश्न अंगावर आल्याने ते जरा दचकले. पण जुने खोड बाईंना ओळखून होते.

''दिले असेच. चांगला मुलगा आहे. का आता कुणाला आपखुशीने रियाल द्यायच्या आधी तुमची परवानगी घ्यावी लागणारेय?'' त्यांनी जरा कडवटपणे विचारले.

त्यांच्या एकूण वयासमोर, माणसे हाताळायच्या हुकुमतीसमोर आणि मुख्य म्हणजे अरबी भाषेवर असलेल्या प्रचंड प्रभुत्वासमोर बाई नेहमी नमतं घ्यायच्या. त्यांना स्वतःला इतकी वर्षे इथे काढूनही अरबीतला अलिफपण येत नव्हता. इंग्लिश फरडायच्या, नाहीतर हिंदीत दणदणायच्या.

''प्रश्न माझ्या परवानगीचा नाही. पण एकाला दिले अन् दुसऱ्याला नाही दिले तर ही मारामारी सुरू होते. अगदी शाळेतच! हे कोण निस्तरणार?''

झाला प्रकार त्यांनी उस्ताद तारिकांना सांगितला. त्यावर तारिक हात झटकत म्हणाले, ''यात माझी काहीही चूक नाही. खुशीने कुणाला बक्षिशी देणे यात काहीच गैर नाही.''

बाईंना उस्तादांचे हे वागणे माहीत होते. त्यांना एखाद्या मामल्यात लक्ष घालायचेच नसले की ते असं अंग काढून घेत. वय तर होतंच; पण ही बाई, कधीही आता आपले चंबूगबाळ गुंडाळून त्यांना घरी पाठवू शकते, हे त्यांना माहीत होते. ते मग एकदम असे रिॲक्ट व्हायचे. आताही तसेच झाले, ते उठून बाहेर गेले.

बाईंनी त्यांच्याकडे असा एक जळजळीत कटाक्ष टाकला आणि सरळ मुकादमाला फोन लावला.

अनुक्रमणिका

''उद्यापासून मला बाबू नको शाळेत!'' असं म्हणून काय घडले ते त्यांनी सविस्तर सांगितले.

''उद्या, गंभीर दुखापत झाली. जीवावर बेतले तर मला केवढ्यात पडेल बाबा हे? नकोच नको, मला तो आडदांड बाबू नको.''

''माझ्याकडची सगळी माणसं संपली, मोहतरमा. बदली म्हणून मी कुणालाच देऊ शकत नाही.''

बाईंच्या डोक्यात क्षणार्धात सगळा हिशेब तरळून गेला. आता शाळेला सुट्टीच आहे. अजून महिनाभर तरी सगळे चपराशी लागणार नाहीत. बाबूला Physical assault च्या नावाखाली रजा द्या. पगार वाचवा त्या महिन्याचा. लगेच बाई म्हणाल्या, ''मला नकोय बदली. प्रसंगी मी काम करीन माझ्या शाळेसाठी; पण बाबूसारखा हाणामारी करणारा माणूस मला माझ्या शाळेत नको.''

तिकडे मुकादमने मोठ्या रजिस्टरमध्ये डोळे खुपसले. बाबूच्या नावाचा व्हिसा आणखी दीड वर्षे चालणारेय इथे. त्याची कागदपत्रे करण्यात इतके पैसे आत्ताच घातलेत. लगेच त्याला बिनकामाचे इथे कोण ठेवून घेणार? त्याला फुकटचा कोण पोसणार? पेक्षा, समीरचा व्हिसा पुढच्या आठवड्यात संपेल. साला, त्याला जाऊ दे की परत. मी कशाला फुकटचा बुच बसवून घेऊ? तो क्षणभर विचार करून म्हणाला, ''मोहतरमाजी, बाबूची चूक आहेच. वादच नाही. पण पहिली चूक समीरची आहे. त्याने पगाराव्यतिरिक्त इतर रियाल घेतलेच का? मुळात चूक त्याची आहे. पाहिजे तर समीरला कमी करू शकता, पण बाबूला नाही!''

ते ऐकून बाईंचे डोके आणखी गरगरू लागले.

३.

लैलाने लिहाफ काढून बाजूला ठेवला. सगळे केस चपटे होऊन डोक्याला चिकटले होते. तिने आरशात पाहिले. तिचे रेखीव अरबी रूप तिलाच आज पाहायला नको नकोसे वाटत होते. या सुट्टीत घरी जाऊन काय करायचे? बघता बघता आरशाने भिंत भरून गेली आणि तिला त्यात स्वतःची प्रतिमा एवढीशी वाटू लागली. या भकास मोठ्या जगात आपण एकट्याच उरलो, या जाणिवेने ती असह्य झाली.

तीन वर्षांपूर्वीचे सगळे तिला आरशात स्वच्छ दिसत होते. जॉर्डनमधल्या एका सरकारी शाळेत ती तेव्हा काम करायची. अरबी शिकवायची. या शाळेची जाहिरात तिला तिच्या मोठ्या भावाने दाखवली होती. तिने अर्ज भरला. अम्मानला इंटरव्ह्यू झाला. तिचे बोलणे आणि मुलांबद्दलची एकंदर समज पाहून तिचे तिथेच सिलेक्शन झाले... आणि नाही म्हटले तरी तिच्या विलक्षण देखणेपणाचा प्रभाव मुलाखत घेणाऱ्यावर पडलाच होता.

सणसणीत उंची. एखाद्या ग्रीक देवतेसारखे नाक, डोळे, जिवणी. एकसलग तजेलदार गोरा वर्ण. विलक्षण बोलके डोळे आणि बोलणे... विलक्षण गोड लयीत. अरबीतले खास तीव्र स्वरही तिच्या गळ्यात मवाळ होऊन जात. ऐकणाऱ्याला ऐकत राहावेसे वाटे. ती इथे आली. बघता बघता आपल्या सौंदर्याने, गोड स्वभावाने तिने सर्वांना आपलेसे केले.

तीन वर्षे कशी गेली, ते तिला समजलेही आणि समजले नाहीही. पहिले वर्ष सगळं समजून घेण्यात, इथल्या नव्या हवेशी, माणसांशी जुळवून घेण्यात गेले. प्रचंड त्रास. शाळेने तिला एका व्हिल्यात एक मोठी रूम दिली होती. काम संपले की त्यात ती बसून राहायची. वाचायला फारसे काही नव्हते. टीव्ही नव्हता. मोबाईल किती वेळ पाहणार? तिला घरी फोन करावासा वाटे. पण किती वेळ? उरलेला वेळ आणि आजूबाजूच्या भयाण रूक्ष डोंगररांगा तिच्या जीवावर उठल्यासारख्या वागत.

तिने आरशापासून दूर होत मोबाईल उघडला. जॉर्डनचे फोटो. तिथल्या वसंत ऋतूत बहरून आलेल्या डोंगरांचे, झाडांचे, फुलांचे, तिने फुलवलेल्या बागेचे फोटो. तिला आताशा माणसांचे फोटो पाहावेसे वाटत नसत. पण, तरीही ती पाही. ज्या मोठ्या भावाने तिला इथे पाठवण्यासाठी मदत केली, तो त्या फोटोत खुर्चीवर आरामात बसलेला होता. लहानपणापासून हा असाच. आरामकर्ता. तिच्या मनात आले :

'याने आपल्याला मदत केली म्हणून आपण किती हुरळून गेलो होतो! पण... पण दर महिन्याला आईचा कॉल असतो. मुसाबला यासाठी इतके दिनार पाठव, त्यासाठी तितके दिनार पाठव. आपण पाठवतो. का पाठवतो? थोरला भाऊ आहे, पाठवायला पाहिजे म्हणून? याला तीन मुली आणि दोन मुलं. आपल्याला आपली भाच्चे कंपनी आवडते. त्यांनी शिकावंसं वाटतं. त्या तीन मुलींनी तर आणखी शिकून पुढं जावंसं वाटतं. आपल्या नशिबाला जे आलं, ते त्यांच्या येऊ नये.' तिने भरभर स्क्रीन पुढे सरकवला आणि तीन गोड भाच्यांचा

अनुक्रमणिका

फोटो समोर धरला. तिघीही खिदळत होत्या, लैलाच्या मागे बागेत जात होत्या. तिला क्षणभर भरून आले.

'तीन वर्षांत या पोरी किती उंच झाल्या! मोठ्या झाल्या. आपण घरी गेलो की आमती, आमती (आत्त्या) म्हणून आपल्याला अशा बिलगतात! मला माणसांत गेल्यासारखे वाटते. त्या तिघींच्या गप्पा संपत नाही. शाळेत हे झाले, ते झाले, आम्हाला असं नाहीत शिकवत, ते असं कुठं असतं का? हे बघ तुझ्यासाठी आम्ही काय काय करून ठेवलंय... मागच्या सुट्टीत गेलो, तेव्हा थोरलीला मन्सफ करायला शिकवलं होतं. अधूनमधून फोटो पाठवते. पण यंदा गेलो की तिला आणखी दोन-चार पदार्थ शिकवू. ही दोन नंबरची, आगाव आहे एकदम... तिच्या आईसारखी. जरा म्हणून काही ऐकून घेत नाही.'

भावजयीचा विचार येताच ती जरा अस्वस्थ झाली. तिने मोबाईल बंद केला. केस मोकळे सोडले. डोळे मिटले. 'ही भावजय नसती, तर आपले जीवन निराळे असते का आज? ती निकाह होऊन आपल्या घरात आली आणि आपल्या लग्नाची बोलणी चालू झाली. तिचा भाऊ लग्नाचा होता. हिने लगेच मध्यस्थी केली. आपली या घरातून तिच्या माहेरी रवानगी करायची किती घाई झाली होती तिला? आपल्याला अजून शिकायचे होते. लगेच निकाह करायचा नव्हता. पण अलअबा (बाबा) नसलेल्या मुलीचे कोण ऐकून घेणार? मुसाब तर निकाह झाल्या दिवसापासून तिच्या मुठीत. आपल्या उम्मला (आईला) पण वाटले, होत असेल हिचा निकाह लगेच, तर होऊ दे. मेहेर मिळेल. मुसाबच्या लग्नात झालेला काहीतरी खर्च भरून निघेल. जाऊ दे... आपली उम्म तशी नाही. तिने दिनारचा विचार नंतर केला; पण तिला आपली लैला निकाह होऊन स्वतःच्या घरी जावी असे फार वाटत होते. म्हणून नव्या सुनेकडून मुसाबमार्फत विचारणा होताच, तिने मनावरच घेतलं. आपलं शिकणं तिथंच राहिलं. पुढच्या महिनाभरात लग्न होऊन आपण तिच्या माहेरी गेलोसुद्धा. आपले मायेचे घर सुटले... सुटले ते असे सुटले की...' आठवणींनी तिचा गळा दाटून आला. बंद डोळ्यांआड जॉर्डन नदीचे पाणी पूर होऊन वाहू लागले.

लैलाच्या डोळ्यांतून जॉर्डन नदी वाहू लागली आणि तिला त्यात आंधळे आंधळे झाल्यासारखे वाटले. डोळ्यांतल्या पाण्यात तिने पाहिलेल्या गोड बाळाची छबी दिसू लागली. ते बाळ पाण्यातून आपल्याकडे दुडुदुडु धावत येत आहे असा तिला जीवघेणा भास झाला. तिने पोटावर हात ठेवला, तितक्यात तिच्या रूमची बेल वाजली. ती भानावर आली. चटकन डोळे पुसले. आरशात पाहिले. फटकन लिहाफ गुंडाळला. आज शेवटच्या दिवशी कोण आले असेल म्हणत तिने दरवाजा उघडला. समोर सरू उभी होती. म्हणाली, "खाली करीम आलाय. तुला निरोप द्यायला सांगितलाय."

"येते म्हणून सांग..." ती झर्रकन वळली.

तो फक्त बायकांचा व्हिला होता. एकूण सहा जणी त्यात राहायच्या. खालच्या मजल्यावर तिघी आणि वरती तिघी. करीम लैलाकडे यायचा, पण खाली मोठ्या गेटपाशी उभा राहून बेल दाबायचा किंवा तिला कॉल करायचा. त्याने कधीही चुकूनही त्या व्हिल्याचा उंबरठा ओलांडला नव्हता.

लैला खाली आली. तिच्या लालबुंद झालेल्या डोळ्यांत करीमने पाहिले.

"हबीबती! काय झालं बाई तुला? घरी जायचेय दोन दिवसांत! आज कुठे जायचे सांग..."

करीमची नेहमीची बडबड सुरू झाली. पण लैला काहीच बोलली नाही. करीमने कार चालू केली. फैरुजचे गाणे लावले. तिच्या आवडीची म्हणून फैरुजची गाणी.

लैला एकसारखी खिडकीबाहेर पाहात होती. गाण्यात प्रियकराच्या आठवणींनी व्याकूळ होणाऱ्या प्रेयसीचे वर्णन होते. तिचे मन आणखी व्याकूळ होत होते. जराशाने ती म्हणाली, "करीम, हे बंद कर."

करीमने शांतपणे रेकॉर्ड बंद केला. त्याला कळून चुकले. आज काहीतरी फार बिनसले आहे. त्याने आधी स्वतःला पटपट तपासून पाहिले. आपले काही चुकले तर नाही अलीकडे? त्याला काही सापडेना. त्याने मोकळ्या रस्त्यावरून कार भर्राटपणे चालवायला सुरुवात केली. बाहेरची खजुराची शिस्तीतली झाडं, जागोजागी फुलवलेले फुलांचे ताटवे, कारंजे सगळे भरभर मागे पडत होते. दहाच मिनिटांत ते समुद्रकिनारी पोहचले.

निळानिळा समुद्र डोळे उघडे ठेवून शांतपणे हेलकावे घेत होता. नेहमीप्रमाणे या बीचवर फारशी गर्दी नव्हतीच. ती उतरून पुढे गेली. करीम पाहातच राहिला. दरवेळी ते इथे यायचे तर लैला डिक्कीतली चटई, थर्मास,

अनुक्रमणिका

काव्हाचे ग्लास, त्याचा छोटा हुक्का सगळं घेऊन पुढे जायची. सगळी मांडामांड करायची. मग दोघे निवांत बसायचे. ती काव्हा ग्लासमध्ये हळूहळू ओतायची. तिच्याकडे बघत बघत करीम त्याचा हुक्का पेटवायचा. वेगवेगळ्या फ्लेवरचा तंबाकू त्यावर सोडला की असा सुगंध पसरायचा, की आसमंत धुंद होऊन जायचा. समोर सौंदर्याची पुतळी मंद हसत त्याच्याकडे पाही. लैलाच्या समोर असण्यानेही करीमला भारी वाटे. आज काय? तर बाईसाहेब निघून गेल्या...

त्याने मग घाईघाईत जमेल तितके सामान घेतले. बीचवर त्याच्या पुरुषी बुद्धीला समजेल तशी सगळ्याची मांडामांड केली. 'लैला, लैला, लैला... हबीबती!' म्हणून हाका मारल्या. पण तिने जे समुद्राकडे तोंड केले होते, ते तसेच. तो भरभर तिच्यापाशी गेला. हातात हात घातला आणि तिला चटईवर आणून बसवले. तिच्या डोळ्यांतली उदासी संपत नव्हती. बघता बघता ते तितके सुंदर डोळे भरून गेले. करीम तिच्याजवळ बसला, "काय झालं?"

तिने पाणीभरल्या डोळ्यांनी त्याला विचारले, "माझ्यासोबत राहशील?"

"हयाती, मी तुझ्यासोबतच तर आहे... राहीन..."

"असं नाही... निकाह करशील माझ्याशी?"

करीमने तिचा हात हळुवारपणे दाबला आणि दूर समुद्रात पाहू लागला. बराच वेळ कुणीच काही बोलले नाही. लैला मनातल्या मनात हसली. करीम मनातल्या मनात स्वतःचे घरदार आणि आधीच्या दोन बायका, चार मुलं आठवू लागला. त्याला धर्माने आणखी दोनदा निकाह करता आले असते. पण...

"सामानाची बांधाबांध झाली?" करीमने उगाच विचारले.

"हे काही माझ्या प्रश्नाचे उत्तर नाही." ती जरा कडकपणे म्हणाली.

"तुझ्या प्रश्नाचे उत्तरच माझ्यापाशी नाही." तो कसाबसा म्हणाला.

"का पण?" तिने आवेगाने विचारले.

"...कारण माझे तुझ्यावर खरेखुरे प्रेम आहे." तो तिच्याकडे रोखून पाहात म्हणाला.

"निकाह करणे म्हणजे प्रेम संपणे का?"

"होय. मला अनुभव आहे. तुला...?"

"मला फक्त निकाहचा अनुभव आहे. निकाह होतो, तलाक होतो, एवढंच मला माहीत आहे. त्यात प्रेम असते की नाही माहीत नाही; पण वासना मात्र प्रचंड असते. माझा अनुभव तेवढाच." ती कोरडेपणाने म्हणाली.

यावर करीम काहीच न बोलता हुक्का ओढत राहिला. त्याच्या डोक्यात पुढचे हिशेब घोळत होते.

• • •

अनुक्रमणिका

कथा

आपुले मरण...

□

रवींद्र दामोदर लाखे

संध्याकाळ संपूर्ण झाली. काळोख आत आला. अगदी मला काहीच दिसत नाही. मीसुद्धा. मी शूजवरचा दिवा लावतो. देवावरचा दिवा लावावा तसा. हिरव्या रंगाचा. देवघरासारखंच शू रॅक आहे. विजेच्या बटणापर्यंत जायला मला वेळ लागतो म्हणून संधिप्रकाश असतानाच मी तिथे जाऊन उभा राहतो. दरवाजातला उन्हाचा कवडसा हळू हळू लहान होत होत लुप्त होतो. तो नाहीसा झाला की तिथला काळोख सारखा होतो. मग मी दिवा लावतो. मी सैन्यात होतो. टायमिंगचं महत्त्व आमच्या रक्तात घोटून घेतलेलं असतं. शत्रूच्या आधी आपण जागे असायला हवे किंवा देव जागायच्या आधी आपण जागे व्हायचे असते.

घरातले इतर लोक शूज बाहेर फेकायला निघाले होते. तर मीच त्या लोकांना घराबाहेर फेकलं. आता या घरात मी आणि हे शूज. घरकामाला येणारी गडीमाणसं येऊन जाऊन असतात. वीस वर्षांपूर्वी हे शूज ह्या जागेवर घाईघाईत ठेवले गेले होते. मी ते तसेच राहू दिले. सुरुवातीसुरुवातीला कुणाच्या पायांनी त्यांची जागा बदलायची. मी त्यांना परत आधी होते त्या जागी आणि त्या पोझिशनमध्ये त्या लोकांना ठेवायला सांगायचो. मग मी ते शूज शू रॅकमध्ये ठेवायला लागलो. रॅकचा पुढचा प्लाय काढून रॅकचा पुढचा भाग मोकळा केला. मला शूजचं दर्शन व्हावं म्हणून.

ते खूप फाटलेल्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. लोकांनी सुचवून पाहिलं की शिवून का घेत नाही. मी नाकारलं. मला ते आहेत तसेच दिसायला हवे होते. त्यांना तसं पाहिलं की मधली वीस वर्षे नाहीशी होतात. मधला नकोसा काळ नाहीसा करण्याच्या माणसाकडे अनेक युक्त्या आहेत. माझ्याकडे ही एकच युक्ती आहे.

एकदा काय झालं की, म्हणजे अगदी सुरुवातीला. मला अजिबात हलता येत नव्हतं आणि शूजची प्रतिष्ठापना रॅकमध्ये झाली नव्हती. मी झोपलो होतो. मी झोपलेलो असताना कुणीतरी आलं. शूजना धक्का लावून गेलं. मी जागा झालो. आरडाओरडा करत घरातल्यांना बोलावलं. (हे घडलं ते घरच्या लोकांना घराबाहेर काढण्याआधी) तर सगळे बाहेर गेलेले. आता त्यांची पोझिशन पूर्ववत कशी करायची? कुणी येण्याची वाट पाहावी लागणार. खूप वेळ कुणी आलं नाही. मी मग नुसताच शूजकडे पाहात राहिलो. ते दोन शूज एकमेकांच्या विरुद्ध दिशेला तोंड करून पडलेले होते. मला एकाची पाठ दिसते आहे, एकाचं तोंड. ते पाहून गंमत वाटली. माणसं अशी एकमेकांच्या विरुद्ध दिशेला तोंड करून बसली की त्यांच्यात भांडण

रवींद्र दामोदर लाखे
२०१, रॉयल पॅलेस,
पोस्ट ऑफिससमोर,
टिळक चौक,
कल्याण (प.) - ४२१ ३०१
मो.: ९८६९३९६३६९
संपर्क :
lakheravindra@gmail.com

अनुक्रमणिका

झालंय असं वाटतं. पण माझे शूज काही एकमेकांशी भांडताहेत असं काही मला वाटलं नाही. म्हणजे एक डावा आणि एक उजवा असूनसुद्धा. उजवा आहे म्हणून डाव्याला डावा म्हणता येतं. डावा आहे म्हणून उजव्याला उजवा म्हणता येतं. त्यांच्या नुसत्या असण्यातच छान संवाद आहे. डाव्याने उजव्याचे वेगळेपण खुलेपणानं मान्य केलंय. त्यामुळे तो महान आहे. उजव्याने डाव्याचे वेगळेपण मान्य केलंय त्यामुळे उजवा महान आहे. हे सगळं मला जयपूर फूट मिळण्यापूर्वी. आता मी चालू शकतो थोडा अडखळत का होईना.

✲✲✲

दुसऱ्या दिवशी दुपारी जेवण झाल्यावर कन्नड लेखक यू.आर. अनंतमूर्तींच्या लेखांच्या भाषांतराचं पुस्तक वाचत पडलो. ते म्हणत होते :

''मृत्यू शेवटाशी नसता तर हिटलर आजही जिवंत राहिला असता. म्हणूनच मृत्यूत नवसर्जनाची सूचनाही आहे. मृतदेह सजवून टिकविणे हे जगातल्या कुरूप गोष्टींपैकी एक आहे.'' ग्लानी. ग्लानीत विचार. ग्लानीतल्या विचारांना विचार म्हणायचं का? मी एका माणसाला वाचवलं. हे निसर्गाविरुद्ध आहे. तो मरणार होता. मी का त्याला वाचवायला गेलो? कोण तो माझा? कुणीही नाही. मला त्या वेळी तो एक जिवंत रेषेसारखा दिसला. ती रेषा वाहती राहू देणं हे माझं काम आहे. नेमकं मिलिटरीमन काम करतो त्या विरुद्ध. सैन्यातल्या लोकांचं तसं कंडिशनिंग नाही होत का? माझ्या अंगात त्या वेळी कोण आलं होतं. जीव खाऊन मी धावलो त्या मुलाला वाचवायला आणि माझं काय झालं तर हे. लंगडेपण आलं माझ्या वाट्याला. चांगल्या कृतीचं फळ चांगलं मिळतं वगैरे झूट. की माझा जन्मच ह्या एका घटनेसाठी झालाय. थकवा. थकवा. थकवा. मेंदू बधिर आणि झोप.

✲✲✲

ट्रेनची गती रोखता येणार नव्हती. तिच्या धडाडत्या आवाजाशी माझ्या हृदयाची धडधड स्पर्धा करीत होती. ट्रेनची गती एवढी होती की मला माझी गती वाढवावी लागेल. तो यमराज रेड्यावर बसून येतो ना? मग आज काय ट्रेनने येतोय की काय? असा विनोदी विचारही माझ्या मनात येऊन गेला. ट्रेनने त्या मुलाच्या आयुष्याला गाठण्याआधी मी त्या मुलाला गाठले पाहिजे. ट्रेनचा हॉर्न वाजत होता. त्या कर्कश्श हॉर्नमध्येच मीही मुलाला जीवाच्या आकांताने हाका मारत होतो. मला त्या हाकांनी माझाच जीव जाईल की काय असे वाटत होते. मुलाला ना हॉर्न ऐकू येत होता ना माझ्या हाका. एवढं त्याचं मन खिळ्यासारखं ठोकलं गेलं होतं कुठल्यातरी विचारात. की तो आत्महत्या करायला आलाय? ह्या शंकेनं मी पुरता हादरलो. माझ्या जीवाच्या पुढे मी पळत सुटलो. मुलगा अगदी जवळ दिसत होता. मी त्याच्याजवळ जवळ जात होतो. काही फुटांवर गाडी असताना मी मुलापाशी पोहचलो. कसंतरी मुलाला रेल्वेरुळातून बाहेर खेचलं. च्यायला. तो उलटा जोर लावत होता. मादरचोद अशी शिवी बाहेर पडली नि त्या शिवीच्या जोरावर मी त्याची कॉलर धरली. त्याच्या वयाचा विचार न करता त्याला पूर्ण शक्ती लावून ट्रॅकबाहेर उलटया बाजूला न ढकलता अंगावर खेचलं. त्यानं इतका उलटा जोर लावला होता की हे करताना मी ट्रॅकमध्ये खेचला गेलो. मला कळत होतं की मी आता काही वाचत नाही. सर्व शक्तिनिशी मी ट्रॅकबाहेर उडी मारण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नात पाय ट्रॅकमध्ये असतानाच ट्रेन माझ्या पायांवरून धडाडत गेली. बेमुर्वत आयुष्यासारखी. माझे दोन्ही पाय ट्रॅकमध्ये धडापासून वेगळे होऊन पडलेले. आपला एखादा अवयव आपल्यापासून तुटून वेगळा पाहणं कुणालाही जमणार नाही. मी बधिर झालो होतो. मी माझ्या तुटलेल्या लालभडक पायांकडे पाहात होतो. त्या माझ्या पायात कालच खरेदी केलेले नवीन शूज होते. खूप आवडून खरेदी केलेले. अन्यथा बॉर्डरवर आमचे शूज असतात जडबदक. ते शूज माझ्या आता उपयोगाचे नाही हे माझ्या धडाला कळत नव्हतं. माझ्या धडान माझं मन उतरलं होतं. मनाची इच्छा केवळ जिवंत होती. ते शूज मी पुढे वापरण्याशी तिचा काही संबंध नव्हता. माझं धड आवेगानं पायाकडे सरकलं. हातांवर क्रॉलिंग करत करत मी माझ्या तुटलेल्या पायांपर्यंत पोहचलो. मी माझा एक पाय हातात घेतला. त्या पायातला शू काढून घेतला. दुसरा पाय हातात घेतला त्या पायातला शू काढून घेतला. दोन्ही शूज छातीशी कवटाळताना मला तुटलेल्या पायांच्या ठिकाणी वेदना जाणवायला लागल्या होत्या. बधिरपणा नष्ट होऊन, मी माझ्या शूजकडे नि माझ्या तुटलेल्या पायाकडे आलटून पालटून पाहात असताना मी बेशुद्ध झालो.

अनुक्रमणिका

मला वाचनाचं वेड अतोनात आहे. पण एक वाईट सवय आहे. साधारणपणे जेव्हा केव्हा झोपायचं असतं तेव्हा मी वाचन करतो. झोपून. मग माझी सगळी झोप स्वप्नात जाते. त्या स्वप्नात हे एक असतं स्वप्न. पण हे दुपारीच पडतं; कारण ती घटना दुपारी घडली. दुपारी हे असं स्वप्न पडल्याशिवाय मला रात्री झोप येत नाही. अर्थात ही स्वप्नात दिसणारी घटना वास्तव आहे. नोकरी सोडावी लागली. पेन्शन सुरू झालं. बॉर्डरवर मानवी स्वभावाचे वेगळे त्रास असतात. पण कुटुंबातले मानवी स्वभावाचे त्रास जास्त भयंकर असतात. हे जे स्वप्न मला पडतं ना ते माझं आयुष्य जागं ठेवतं. मला माझ्या अर्धवट धडानं शूजच्या दिशेनं केलेल्या हालचालीची आठवण म्हणजे मृत्युंजय मंत्र वाटते. मी पुटपुटू लागतो. ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात्...

***

मला कधी कधी वाटतं की हा अपघात माझ्या पथ्यावर पडला आहे. मी आता लेटलो आहे त्या दिवाणावर मला खूप रिलॅक्स्ड वाटतं. मी लेटतो त्याच्या उजव्या बाजूला एक खिडकी आहे. खिडकीतून एक जुनी १९७५ साली बांधलेली लोडबेअरिन्गवाली इमारत दिसते. एक मजली. ती डेव्हलप होणार आहे म्हणे. सध्या रिकामी केलीय मालकानं. अपघातानंतर मला साक्षात्कार झाला की आपल्याला आयुष्यात काहीही कुठलंही महत्त्वाचं काम करायचं नाहीय. नोकरी म्हणून सैन्यात गेलो होतो. अर्थार्जनासाठी आणि घरातल्या कटकटीपासून दूर जायचं म्हणून. खूप काळ झोपून होतो तेव्हा लक्षात आला आधीच्या साक्षात्काराच्या वरचा साक्षात्कार. शरीराला स्वतःला हालचाल करायचीच नसते. मुळात हालचाल होत असते ती मनाची. मनाचं भटकणं इतकं वेगवान असतं की थांबवता येत नाही. सगळे विकार म्हणजे प्रचंड वादळी हालचाली. मी त्यामुळे विकास दूर करायच्या भानगडीत पडलोच नाही. अध्यात्मवाले खूप लोक आले. उपाय सांगून गेले. नामस्मरणापासून ते प्रॅक्टिस ऑफ डाइंग-पर्यंतचे. मी हाकललं त्यांना. म्हटलं हे विकार म्हणजेच मी धडधाकट असल्याचा पुरावा आहे. पोलिसांपर्यंत तक्रारी गेल्या आहेत माझ्या. माझं पांगळेपण आणि माझी सैन्यातली नोकरी त्यांना मागं फिरवते. लहान मूल माझ्या घरात डोकावलं तर मी त्याला चॉकलेटच्या निमित्ताने घरात बोलावतो. आधी त्याला माझ्या शूजना नमस्कार करायला लावतो. त्यांना चॉकलेट हवं असतं ते घाईघाईत शूजना नमस्कार करतात. मी त्याला चॉकलेट देतो पण त्याला चांगला मांड्यांमध्ये आवळून धरतो. ते मूल ओरडतं. चॉकलेट खात खात. ते रडलं की मी त्याला मारतो. ह्या साऱ्या दृश्यात प्रचंड हालचाली घडतात. मला तर एखाद्या गावी जाऊन आल्यासारखा मोठ्ठा प्रवास वाटतो तो... मग त्या मुलाचे आईवडील येतात माझ्याशी भांडायला. मी माझ्या पांगळेपणाला ढालीसारखं समोर ठेवून त्यांच्याशी बोलतो. माझ्या बाजूनं बोलायला माझ्याकडे घरकाम करायला येणारी तरुण विमल असते. साहेब असे नाहीतच म्हणते. ती माझी बाजू घेते; कारण मी तिच्याकडून हातकाम करून घेतो. माझ्या दिवाणाच्या कडेवर बसते नि ते काम करते. मी नुसता पडून राहतो.

एकदा माझा चांगुलपणा उफाळून आला माझ्या नकळत. मी तिला विचारलं, तुला वाईट वाटत असेल ना? 'मी चांगली दहावी झालेली आहे. वाचन पण आहे माझं.' मी म्हटलं, 'अगं हो, मला माहीतीय. तुझ्याकडून वाचून घेतो की मी काही पुस्तकं.' माझ्या बोलण्याकडे तिचं लक्षच नव्हतं. 'तो इंद्र, त्याला काय कमी बायका होत्या? गौतम ऋषीचं रूप घेऊन झोपायला गेला त्या अहल्येच्या शरीरावर? देवांना नाही चुकलं. तुमचं तर लग्न नाही झालेलं आणि त्यात धडधाकट वर्षं तिकडं सैन्यात काढलेली. तिथं पण उपासमारच ना. पण एक अट माझी कायम राहणार आहे, माझ्या होणाऱ्या नवऱ्याची जागा नाही देणार तुम्हाला.' मी हसलो. म्हटलं, 'मला नकोच आहे ती. तसे कष्ट नको वाटतात मला. माझं मन ते काम करीत असतं. ते शिरतं तिथं आत.' एकदा तिनं स्वतःच विचारलं, 'लग्न करता का माझ्याशी? म्हणजे प्रेमबीम नाही हां. व्यवहार म्हणून मी लग्न करणार तुमच्याशी.' मी नाही म्हटलं.

मनात आलं, ह्या अशा तडजोडी लग्न झालेल्यांमध्ये पण असणार. आठवड्यातून एकदा माझे दोन मित्र येतात माझ्या घरी प्यायला. माझा मिलिटरीचा स्टफ असतो. खरंतर त्यासाठी ते येतात. त्यातला एक स्वतःला तत्त्वज्ञ समजतो. मी त्याच्या विरुद्ध बाजू घेऊन त्याची मारतो. मुद्दाम. तो निरुत्तर झाला की मला मजा वाटते. म्हणजे आहेच तो तसा विपुल वाचन आणि चिंतन करणारा. तो म्हणाला एकदा पिताना, 'अरे

नवराबायकोचं नातं कसं आहे किंवा पुढे कसं असू शकेल हे बेडवर ठरतं.' म्हणाला, 'अरे तिथं प्रथम हालचाल मनांची आणि मग शरीरांची किंवा आधी शरीरांची पण त्या शरीरांच्या हालचालीनं मनाच्या हालचाली सुरू झाल्या तर त्या शरीराच्या हालचाली कामाच्या.' 'कामाच्या' ह्या शब्दावर मग ते दोघंही कोट्या करीत हसत राहिले. हसता काय? माझं वाचन अफाट आहे. मी शक्य तो वाद घालत राहतो. तो असुरी आनंद मी चुकवत नाही. रोज एकटा असतो तर आत स्वतःशी अखंड बोलणं चालू असतं. त्या बोलण्यात मी माझं मन येऊ देत नाही. ते यायला लागलं तर मी कुत्र्याला हाकलावं तसं हाकलतो. तर पिण्याचा कार्यक्रम झाला की मित्रच सर्व पसारा आवरून ठेवतात. माझ्या जयपूर फूट्सह मला दिवाणावर नेऊन ठेवतात. दरवाजा ओढून घेतात नि जातात. लॅचचा हा एक फायदा माझ्यासारख्याला असतो. ह्या सगळ्या मैफिलीत मी माझे विकार जागे ठेवतो.

माझ्या घराजवळ पोस्ट आहे. रात्रभर पोस्टाच्या जवळच असलेल्या झाडावरचे बगळे ओरडत असतात. कर्कश आवाजात. दिसायला सुंदर असलेले बगळे बोलतात मात्र कर्कश. मी असा लंगडा असूनही काही लग्नाची प्रपोजल्स आली मला. म्हटलं काय बघणार आपण मुलीमध्ये? दिसणार केवळ अवयव. रंग. केस. डोळे. गाल-ओठ. वगैरे. बोललो जरी तरी माणूस अभिनयनिपुण जन्मतःच असतो. बोलेल गोड गोड आणि प्रत्यक्षात ह्या बगळ्यांसारखी ती मुलगी कर्कश असायची. माझ्याकडे टॅब आहे. मी त्यावर ह्या बगळ्यांचं संशोधन केलं. कारण सुरुवातीला मला वाटायचं वटवाघळं ओरडताहेत. पण एकदा खिडकीतून नीट पाहिलं तर ते बगळे होते. कवितेत वगैरे स्थान असलेले हे सुंदर समजले जाणारे बगळे असं ओरडतात? तर गुगल केल्यावर आढळलं, की ह्या बगळ्यांचं ओरडणं काही मैलांपर्यंत पोहचतं. इतकं जोरात ते का ओरडत असतील? ते काही शोधलं नाही. आपल्याला रात्रभर ह्या आवाजाची सोबत असते. त्यामुळे तो आवाज माझा मित्र आहे. एकट्या माणसाला उंदराच्या खुडबुडीचीही सोबत पुरते. सोबत म्हणजे काय मुळात. तर कुणाचा तरी आपल्या आसपास वावर. नातेवाइकांच्या स्वभावाचे वाईट अनुभव घेता हे असले वावर चांगले. वावरांना स्वभाव नसतो.

अफवांना बगळे म्हणावं का? असं मनात येऊन मजा वाटली. सर्जन झाल्यासारखं वाटलं. अफवा देशांतरं करतात. हा हा हा. हे हा हा हा म्हणायची सवय कशी लागली? टीव्ही तर नाहीय माझ्या घरात. सगळ्या सिरिअल्समधून चांगुलपणाचे गोडवे गायले जातात. व्हिलन पात्र असतं पण ते एकदम काळंकुळकुळीत रंगवलेलं असतं. हा हा हा करणारं. माझ्यासारखं तरी पाहिजे. मी प्युअर व्हिलन आहे. तर बगळ्यांच्या त्या कर्कश आवाजात मी झोपू शकतो. बॉर्डरवर तोफगोळ्यांच्या, बंदुकींच्या फैरींच्या आवाजात माझी पाळी आली की मी बिनधास्त झोपायचो.

सकाळी विमल येते. तिनं बेल वाजवली की मी हळूहळू दाराजवळ जातो. मी संशयी असल्यामुळे आधी पीपहोलमधून पाहतो विमलच आहे ना. मग दरवाजा उघडतो. ती चहा ठेवते तोपर्यंत मी ब्रश करून घेतो. आज ती आल्या आल्या म्हणाली –

''कळलं का?''

''काय? अगं कळलं का हा काय प्रश्न झाला. कसं कळणार? रात्री झोपेत मला काय कळणार...''

तिला माझ्या डाफरण्याची सवय झालीय. ती कोडगेपणानं पुढं बोलली.

''समोरच्या बिल्डिंगमधल्या राणेंच्या एका मुलाचं लग्न ठरलंय.'' लग्न शब्द उच्चारताना ती किंचित मोहरून गेलेली वाटली.

च्यामायला, कमवायची नाय अक्कल त्या पोराला. उंडरत असतो इथं तिथं नि लग्न करायला निघालाय. मी हॉलमध्ये गेलो नि त्या बिल्डिंगमधल्या राण्यांच्या घरात वरूनच डोकावलो. गडबड होती खूप घरात. पाहुणे जमले होते.

''काय गं विमल, आज आहे का लग्न? तू तर ठरलं म्हणालीस.''

''मला तेवढचं कळलं.''

मग ती पण हॉलमध्ये आली माझा चहा घेऊन आणि तिनंही राणेंच्या घरात डोकावलं.

''आजच दिसतंय.''

''झालं. आज दिवसभर त्रास आहे बँजोचा.''

''तुम्हाला नाय आवडत बँजो?''

तिच्या कुल्ल्यावर जोरात चापट मारून म्हणालो–

''मला चीड आणतेयस काय? तुला माहितीय मला नाय आवडत ते.''

पहिल्यांदा अशी चापट मारली तेव्हा ती नोकरी

अनुक्रमणिका

सोडून जायला निघाली होती. मी तिला म्हटलं, ''तुझ्या कुल्याला लागलं ना, तुला लागलं का?'' हा माझा प्रश्न खवचट होता. ती रडायला लागली. मला बरं वाटलं. मी तिला जवळ घेतलं. तर काय कमाल आहे. ती दुःखात आहे आणि तरीही माझे चिरंजीव हालचाल करायला लागले. पुढचा धोका टाळायचा म्हणून मी लगेच तिला दूर ढकललं. त्या ढकलण्यानं ती रडायची थांबली नि माझ्याकडे एखाद्या आक्रिताकडे पाहावं तसं पाहायला लागली. तिला ढकलताना मी खाली पडलो. तोंडून शिवी निघाली.

दिवसभर गोंधळ होता. समोर. अधेमधे विमल त्या इमारतीत पाहून तो गोंधळ एन्जॉय करत होती. मी माझी साउंड सिस्टिम चालू केली आणि त्यावर वेस्टर्न म्युझिक टिपेला नेऊन लावलं. तो आवाज समोर जायला लागला. अख्ख्या सोसायटीत घुमायला लागला. सोसायटीतले लोक आले. बंद करा सांगायला. आले ते घाबरतच. मी म्हटलं तो समोरचा गोंधळ तुम्ही थांबवा. सोसायटीतल्या लोकांचं नशीब की समोरचे राणे आणि त्यांचे पाहुणे ठरल्यापेक्षा लवकर लग्नघराकडे गेले. शांतता निर्माण झाली. मी म्युझिक बंद केलं. विमल स्वयंपाकाला लागली. मी आंघोळीला निघालो. आंघोळीसाठी विमलची थोडी मदत लागते. तेवढा वेळ स्वयंपाक सोडून ती माझ्या मदतीला आली. ते जयपूर फूट काढणे, अंग पुसणे नि परत ते जयपूर फूट घालणे. असं खूप असतं प्रकरण. शू रॅकसमोर नतमस्तक उभा राहिलो. विमलनं आणलेलं जास्वंदाचं एक फूल शूजना वाहिलं. अगरबत्ती लावली. प्रसन्न वाटायला लागलं तसा मी सावध झालो. प्रसन्नता टिकली नाय पाहिजे. चांगुलपणा वाईट. चांगुलपणापोटीच त्या पोराला वाचवायला गेलो ना. टाळायचं म्हणून टाळता येत नव्हता नजारा समोरच्या लग्नाचा. नवरी कशी आहे हे पाहायला मी सारखी टेहळणी करीत होतो. संध्याकाळी ते दोघं नवरा-बायको आले. वाजतगाजत च्यायला. गळ्यात हार वगैरे तसेच. नवे कपडे कडक इस्त्रीचे. नवऱ्याने सूट घातला होता. त्या नवरीच्या हातात एका कुत्र्याचा पट्टा. तो सतत भुंकत होता. च्यायला, मस्त वाटलं. कुत्रा भारी जातीतला असावा. नंतर कळलं की पाठराखण करायला तिच्या आईवडिलांनी हा कुत्रा पाठवला होता. पाठराखण म्हणून कुत्रा हे मला नवीनच होतं. विचित्र होतं त्यामुळे मला आवडलं.

कामाच्या दुसऱ्याच दिवशी विमल चकित होऊन माझ्याकडे आली. स्वयंपाकघरातून. काहीतरी भयंकर पाहिल्यासारखं तिनं विचारलं. ते स्वयंपाक घरातलं देवघर रिकामंच? देव कुठे गेले? मी म्हटलं, दिले भंगारात. माझ्या ह्या वाक्यानं आतापर्यंतचा तिच्या आयुष्याचा सेटअप होता तो ढासळून पडलेला मला तिच्या डोळ्यांत दिसला. ती भ्यायलीसुद्धा असावी. चाचरत परत तिनं विचारलं की, मग हे देवघर तरी का ठेवलं? माझ्या मांजरींचं राहण्याचं ठिकाण आहे ते. पाहिलं नाही का आत? तिनं पाहिलं. आत एक काळी-कुळकुळीत मांजर होती.

घरात बाप देवपूजा करायचा. त्याची देवपूजा चांगली एक तास चाले. त्या पूजेसाठी जे सामान लागतं त्याची ऑर्डर ते आईला सोडत. मग घाईघाईत आईनं ते सामान त्यांच्या पुढ्यात ठेवायचं. देवांना आंघोळ घालणे, ते पुसणे, गंध उगाळणे, ते लावणे, फुलं वाहणे बरीच मोठी प्रक्रिया असे. ही माझ्या अपघात होण्याआधीची गोष्ट, नुकताच सुटीवर आलो होतो. मी संडासात होतो. तिथंच मला हुक्की आली. बापाच्या आरत्या चालू होत्या आणि मी मनात काही चित्रं आणण्याचा प्रयत्न करीत होतो. त्या आरत्यांच्या आवाजांनी माझं ते चित्र मनात आणण्याचं काम यशस्वी होईना. बाकी पण करून पाहिलं. काही जमेना. मी त्या आरत्यांच्या आवाजानं डिस्टर्ब होत होतो. रागाचा पारा चढत गेला. कुल्ले धुऊन मी तिरिमिरीत बाहेर आलो. हात पण धुतले नाहीत. एक पिशवी घेतली. बापाला बाजूला ढकललं. तो घालीन लोटांगण करीत होता. आई घाबरून बाजूला झाली. मी सगळे देव पिशवीत गोळा केले नि तडक बाहेर निघालो. तो एकदम भंगारवाल्याच्या दुकानासमोर थांबलो. त्याला ते दिले. तो घाबरून म्हणाला,

''साब ऐसा मत करो. भगवान है. श्रापबीप लग गया तो?''

मी त्याला विचारलं, ''तुला घ्यायचेत की नाही? नाहीतर मी कचराकुंडीत देतो फेकून.''

''नही नही साब... ऐसा मत करो, ओ तांबेपितल का दुकान है ना वो लेंगे, उधर दे दो, पैसा भी मिलेगा.''

मी त्या तांबंपितळच्या दुकानात गेलो. त्याला ते

देव दिले. तो वजन करायला लागला देवांचं. मला हसू आलं. म्हटलं वजन कशाला करतोस देवांचं? तो म्हणाला, वजनाप्रमाणे पैसे मिळतील तुम्हाला. मी म्हटलं, ठेव ते देव तुझ्याकडे मला नकोत पैसे. मी तिथून निघालो, घरी आलो. तर बाप लाललाल झालेला. आई डोक्यावर डोंगर कोसळल्यासारखी बसून होती. रडत होती... बहुतेक बाप बोलला तिला माझ्यावरून. लाडावून ठेवलंय वगैरे. हा घरात घडलेला आणि तणाव निर्माण करणारा पहिला प्रसंग. बाप एकदम जोशात मला म्हणाला, "तुला असंच वागायचं असेल तर घरातून निघून जा." त्यांच्या लक्षात नव्हतं की, घर माझ्या नावावर आहे, माझ्या नोकरीतल्या पैशांतून केलेल्या बचतीतून घेतलेलं. मी हसलो कुत्सितपणे. म्हटलं, "हे घर माझं आहे."

***

"मग ते बूट ठेवायचे ना ह्या देवघरात? त्याला तुम्ही रोज नमस्कार करता म्हणून म्हटलं." विमल म्हणाली.

"तो देव वेगळा आहे. त्या देवांपेक्षा पॉवरफूल आहे."

"ते कसं काय?" विमलचा वर प्रश्न आहेच.

"तू काम कर. बास झाल्या चौकश्या."

***

मी घरातले देव काढून टाकले आणि विकले. हे आमच्या सोसायटीभर झालं असावं. लोक माझ्याकडे विचित्र नजरेनं पाहायला लागले होते. लहान लहान मुलं पण. एक बारा-तेरा वर्षांचा मुलगा असंच बघत होता माझ्याकडे मी सोसायटीच्या गेटमधून बाहेर पडताना. मी त्याला विचारलं, "काय रे असा काय बघतोयस माझ्याकडे? आं?" तो धीट निघाला. मला म्हणाला, "तुम्ही देव घरातून फेकले ना बाहेर, कचराकुंडीत?" त्याच्या एक वाजवली नि मी बाहेर पडलो. तो रडत रडत घरी गेला. मी निघालो होतो. चिंचपोकळीला. माझ्या एकुलत्या एक मित्राकडे. दिवसभर त्याच्याकडे काढला. गप्पाटप्पा खूप झाल्या. त्याला माझे नवे शूज खूप आवडले. कुठे घेतले म्हणून त्यानं विचारलं. मी म्हटलं, "ठाण्यातच." मलाही माझे शूज खूप आवडले होते. चालताना खूप आरामदायी वाटलं होतं. त्याला मी देवांचं सांगितलं. तर तो म्हणाला, "चांगलंच केलंस." मी विचारलं, "तुझ्या घरात आहेत का देव असे?" तो म्हणाला, "आहेत तर. मी मानतो देवाला." "देव घरात असले म्हणजे देवाला मानणं होतं का?" मी विचारलं. "नाही तसं नाही, ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे." श्रद्धा की अंधश्रद्धा असं मी काही विचारलं नाही. मी तडक उठलोच तिथून. त्यानं विचारलं, "का रे? एवढ्या तडकाफडकी निघालास?" मी विचारलं की, "मी देव विकून टाकले ह्याला तू चांगलंच केलंस असं खोटं का बोललास? बाय."

चिंचपोकळी स्टेशनला सगळे रेल्वेलाईनीतूनच जायचे प्लॅटफॉर्मवर. तसाच मी रेल्वे वर्कशॉपच्या गेटशी आलो रेल्वेलायनीतून प्लॅटफॉर्मवर जायला नि एकदम समोर दिसलं की, एक मेल येते आहे फास्ट ट्रॅकवर आणि एक तरुण मुलगा ट्रॅकमध्ये उभा आहे. गाडी काही फुटांवर आली तरी तो मुलगा हलला नाही. मी पळत सुटलो त्याच्या दिशेनं. झेप घेतली त्याला पकडला. पुढचं मी सांगितलंच आहे आधी.

हॉस्पिटल ट्रीटमेंट वगैरे सगळे सोपस्कर झाल्यावर मला ॲम्बुलन्समधून घरी आणलं. सोसायटी जमा झाली होती मला कौतुकानं पाहायला. मी एका मुलाचा जीव वाचवला म्हणून. माझे दोन्ही पाय गेल्याचं कुणाच्या गावीही नसल्यासारखे ते पाहात होते आदरानं वगैरे. ज्याच्या मी वाजवली होती जाताना तो मुलगा नेमका आजही अगदी समोरच गेटपाशी उभा होता. खरंतर मी एक महिन्यानंतर घरी येत होतो. त्याचं ते इतकं समोर उभं राहणं म्हणजे मला चिडवल्यासारखं वाटलं. मी त्याला खूण केली, देऊ का एक. त्यावर तो हसला. माझे दोन्ही पाय गेल्याचं कळलं होतं सर्वांना. माझी लग्न झालेली मोठी बहीण यायची हॉस्पिटलला. कधी बापही यायचा. आई सुरुवातीला एकदा आली. मला म्हणाली, परत नाही येणार मी इथं. मला पाहावत नाही हे. मी म्हटलं, नको येऊस.

मी पुटपुटू लागतो. ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात्... परत परत हा मंत्र म्हणू लागलो. माझ्या नकळत. विमलनं मला हलवलं नि विचारलं, "काय झालं तुम्हाला, डोळे लागलेत तुमचे अंतराळाला आणि हे काय म्हणताय तुम्ही? मंत्र?" मी जागं होऊन हो

म्हटलं. ''मंत्र चालतो वाटतं तुम्हाला? देव नाही.'' मी म्हटलं, ''गप बस. तुला नाय कळायचं.''

***

मी बेशुद्ध पडलो तेव्हा माझे शूज मी छातीशी घट्ट आवळून धरले होते. एकदम मला शुद्ध आली ती तिसऱ्या दिवशी. आदल्या दिवशी दुपारी १२ वाजता घडला अपघात. तिसऱ्या दिवशी पहाटे मला शुद्ध आली. तेव्हा बहीण झोपलेली होती बाजूच्या कॉटवर. कुठलं हॉस्पिटल ते मला लगेच कळणं शक्य नव्हतं. एक हेडनर्स लगेच माझ्याकडे आली. मला विचारलं, ''कसं वाटतंय?'' मी वैतागून म्हटलं, ''काय वाटणार? पाय गेले तर? तुम्हीच कल्पना करा.'' तर ती म्हणाली, ''हो हो. ते बरोबर आहे. पण दुखतं आहे का?'' मी तिरस्कून म्हटलं, ''अर्थात'' ती हे ऐकून गेली नि इंजेक्शन घेऊन आली. पेनकिलर आहे, असं म्हणत माझ्या कुल्ल्यावर तिनं इंजेक्शन दिलंसुद्धा. बहीण उठली आमच्या आवाजानं. तिला आनंद झाला होता मी शुद्धीवर आल्याचा. मीही आनंदात होतो. च्यायला काय ग्रेट असतात ती भूल द्यायची इंजेक्शन. मला कळलं पण नाही मधले दोन दिवस कसे गेले ते. असे सगळे दिवस जायला पाहिजेत नाही. इंजेक्शन दिल्यावर एका क्षणात टेकऑफ झालं नि पुढचं काही कळलंच नाही. ''लाईफ असं पाहिजे, नाही?'' मी बहिणीला विचारलं. मी काय बोलतोय हे न कळल्यामुळे ती गोंधळून गेली.

एकदम लक्षात आलं की, हे आपलं मिलिटरीचं हॉस्पिटल आहे. अश्विनी. नेव्हीनगरचं. मी अगदी निर्धास्त झालो. दीड की दोन महिने हॉस्पिटलला होतो. बहीण किंवा तिचा नवरा हे दोघेच यायचे मला बघायला. बाप आणि आई एकदा आले होते. बहीण आणि तिचा नवरा तरी का येताहेत? कळेना. चांगलं वागण्याच्यामागे बहुतेकदा हेतू असतो. दीड की दोन महिन्यांनंतर मी घरी आलो. बाप, आई सचिंत बसले होते. कुणाची चिंता कुणास ठाऊक. बहीण आधी आत गेली नि मला ओवाळलं वगैरे. मी स्ट्रेचरवरच होतो. आत शिरल्या शिरल्या मला माझ्या शूजची आठवण आली. मी जोरात ओरडून विचारलं बहिणीला की, ''माझे शूज कुठे आहेत?'' ती म्हणाली, ''हे घेऊन येताहेत मागून.'' तिचा नवरा आला नि त्यानं ते शूज दरवाजाशी दिले टाकून. मी रागावलो नाही त्यांच्यावर. मला दिसतील अशाच ठिकाणी त्यांनी ते शूज टाकले होते. टाकण्याची पद्धत पायातली वहाण पायातच असावी असा आविर्भाव होता. म्हटलं असू दे.

ते शूज आता त्या जागेवरून हलवायचे नाहीत असा सगळ्यांना दम दिला. मग माझ्या तुटक्या पायांना फिजिओथेरपी सुरू झाली. पुढे जयपूर फूट वापरायचे म्हणून. ती पूर्ण झाली. जयपूरफूटसाठी माप घ्यायला त्यांची माणसं आली. मी जयपूरफूट वापरायला लागलो. माझी हालचाल सुरू झाली. माझी हालचाल सुरू होईस्तोवर माझ्या शूजचे बरेच हाल झाले. लोक लाथांनी तुडवायचे. मी परत त्यांना आक्रोशून जागेवर ठेवायला सांगायचो. माझी हालचाल सुरू झाल्यावर मी ते शू रॅक देवघरासारखं करून घेतलं. आत दिवा लावला आणि रोज शूजची नॉमिनल पूजा करायला लागलो.

''असं होय.''

विमलचा आवाज ऐकू आला. मला वाटलं होतं मी स्वतःशी मनात बोलतोय. म्हणजे मी हे सगळं विमलला सांगत होतो तर आणि मला रडू कोसळलं. मी रडत रडत तिला विचारलं. माझी आई कुठे आहे? कुठंय ती? आईला म्हटलं होतं मी माझ्याबरोबर थांब. नाही थांबली. गेली माझ्या त्या सोंड्या बापाबरोबर. रडू वाढलं.

विमलला काय वाटलं कुणास ठाऊक तिनं मला लहान मुलाला जवळ घ्यावं तसं छातीशी घेतलं. मी रडायला केव्हा लागलो ते मला कळलं नाही. तिच्या छातीशी मी खूप रडलो. तिनं मला खूप आंजारलं गोंजारलं. माझं रडू थांबलं. मी हिच्या छातीशी कसा? असा प्रश्न पडून मी तिला दूर ढकललं. ''तू काय आई आहेस का माझी?'' दरडावून विचारलं. जेवणाचं झालं का? ती नाही म्हणाली. मी तिच्या कानशिलात खेचली. ''चल, कर लवकर स्वयंपाक.'' ती रडत रडत म्हणाली, ''तुम्ही तुमची गोष्ट सांगत होतात. ती मी ऐकत होते. ऐकली नसती तरी तुम्ही रागावला असतात.'' बरं बरं म्हणून मी तिला क्षमा मागितल्यासारखं केलं. तिला मारणं, दरडावणं हे म्हणजे माझ्या अशा विचित्र वागण्याला माझी मलाच केलेली शिक्षा होती. स्वयंपाक झाला. दोघं जेवलो. ती तिच्या घरी जायला निघाली. मी तिला जवळ बोलावलं नि जवळ घेतलं.

***

देव फेकले त्याची शिक्षा भोगताहेत हे अशी चर्चा खूप पूर्वीच सुरू झाली होती सोसायटीत. मी एकदा

अनुक्रमणिका

सोसायटीतल्या बायका असं बोलत जातांना ऐकलं. लिफ्ट बंद होती म्हणून त्या जिना चढत होत्या. मी त्यांना थांबवलं. म्हटलं, ''मी देव फेकले नाहीत हे नशीब समजा तुमचं. मी ते विकले तांबापितळवाल्याला, कळलं?'' त्यातली धीट बाई बोलली, ''घरातून देव असे बाहेर काढले नसतेत तर पांगळे नसता झालात.'' च्यायला, जास्तच बोलतेय. म्हटलं दाखवू का मी पांगळा कसा नाय ते. तेवढ्यात विमल आली. त्या बायकांना म्हणाली, ''काय हो, काय दुसरा धंदा नाही का तुम्हाला?'' परत तीच धीट बाई बोलली, ''ही आली एक ह्यांचं पाप.'' विमल चिडली. त्या बाईला म्हणाली, ''हां... मी आहे पाप. तुमच्या नवऱ्यांची पापं तर तुमच्याबरोबरच चालतात. चला निघा... नवऱ्याला विचारा की तुमच्या 'वर' ते असतात तेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर कोणाचा चेहरा असतो...'' त्या बाईचा गोरामोरा चेहरा पाहून विमल खूप हसायला लागली. हसत हसत आत शिरली. थोड्या वेळाने ती बाई पोलिसांना घेऊन आली. तेव्हा मी शूजची पूजा करत होतो. शूजसमोर डोळे मिटून उभा होतो. विमलनं पोलिसांना आत घेतलं. खुणेनंच त्यांना थांबा असं सांगितलं होतं. माझी पूजा संपली. तोपर्यंत पोलिसांना पाणी वगैरे देऊन झालं होतं. आतापर्यंत माझ्या वागण्याच्या निरनिराळ्या कारणानं त्यांच्याकडे बऱ्याचदा तक्रारी गेल्या होत्या. ते ओळखत होते मला.

''काय साहेब ही आज कुठली नवी तक्रार?'' आणि एकदम त्यातल्या एका हवालदारानं विचारलं, ''हे काय? तुम्ही बुटांची पूजा करता होय.'' मी म्हटलं, ''हो. हाच माझा देव आहे.'' ''कसा काय?'' मी म्हटलं, मागे मी तुम्हाला सांगितलं ना माझ्या अपघाताचं. त्या अपघाताच्या आदल्या दिवशी मी हे शूज विकत घेतले होते. हे शूज वापरायच्या प्राणांतिक इच्छेपायी मी वाचलो. बेशुद्धीतही मी हे शूज वापरत असल्याचं पाहात होतो. तीन दिवस बेशुद्ध होतो. मी त्यांना मृत्युदेवता म्हणतो. मृत्युदेवता माणसाला केवळ मृत्यूच देते असं नाही. जीवन पण देते. नवं जीवन देते. ती तिचा प्रांत फिरवून आणते नि तुम्हाला परत जीवनात सोडून देते.'' हे त्यांनी शांतपणे ऐकलं. मग म्हणाले, ''किती तक्रारी तुमच्या? तुम्ही फौजी म्हणून आणि त्यात तुमची ही अशी अवस्था म्हणून आम्ही दुर्लक्ष करतो.'' विमलनं चहा आणला होता. तो त्यांनी घेतला आणि निघून गेले.

बाजूलाच एक फडके नावाचे ब्राह्मण काका राहतात. ते पण एकटेच आहेत. दोन्ही वेळा बाहेर जेवतात. बाईक वगैरे चालवतात. ते नेहमीप्रमाणे माझ्या घरात डोकावले. आल्या आल्या त्यांना त्या शूजना नमस्कार करायला लावला. हे त्यांच्या सवयीचं होतं. बसले. विमलनं त्यांना पाणी दिलं.

खाजगीत बोलावं तसं त्यांनी विचारलं. ''पोलीस आले होते?'' मी म्हटलं. हो. सगळं नेहमीचच बोलणं झाल्यावर त्यांनी मला विचारलं, ''तुम्ही बाहेर का नाही पडत? जरा एखादा किलोमीटर हिंडून यायचं. जरा शरीराची हालचाल पाहिजे. मन शांत राहातं. विपरित आणि विचित्र विचार येत नाहीत मनात.'' मी वैतागून बोललो, ''तुम्ही तर बाईक वापरता, ढुंगणाजवळ जायचं असलं तर.'' ते रागावले नाहीत. म्हणाले, ''मी एक आपलं सजेशन केलं...''

जवळ जवळ १०० वर्षांची हालचाल झालीय माझी. कशी? विचारा कशी?

''आईच्या गर्भाशयात ना, खूप वेगात गर्भ हालचाल करत असतो. आणि नऊ महिन्यांत आईच्या गर्भाशयात आपली जी हालचाल होते ती बाहेर आल्यावर ७० वर्षे जेवढी आपण हालचाल करू तेवढी झालेली असते. तर ती ७० वर्षे आणि पुढे जन्मल्यानंतरची मी केलेली अंदाजे ३० वर्षांची हालचाल. एकूण झाली १०० वर्षांची हालचाल. आता कशाला करायची मग हालचाल?''

हे ऐकून ते एकदम उठलेच आणि निघून गेले. विमलने ते आ वासून ऐकताना तिच्या नकळत तिनं तिच्या ओटीपोटावरून हात फिरवला. चकित झालेला तिचा श्वास जरा रेंगाळला आणि मग पुढे गेला. माझं लक्ष होतं तिच्याकडे. तिच्या सर्व हालचाली पाहून माझ्या मनात माया दाटून आली. पण ती न दर्शविण्यात मी यशस्वी ठरलो. तिच्या नजरेची टक लागली होती अधांतरात.

एका रात्री नेहमीप्रमाणे राणेंच्या कुत्र्याचं ओरडणं ऐकू येईना. बगळे होते चिरपत. म्हटलं गेला कुठे हा राणेंचा कुत्रा. त्याचं नाव डॉन होतं. राणेंची सून गर्भार होती. परवा पाहिलं तिला. चार-पाच महिने झाले असतील. तिला पाहिलं तेव्हा मला विमल आठवली. फडके काका आलेले असताना मी बोललो ते ऐकून ती जी अधांतर झाली होती, ते तिचं अधांतरत्व आठवलं.

अनुक्रमणिका

तिलाही हे सुख हवं असणार. नक्की हवं असतं का बायकांना आई होण्याचं सुख? तिचा विचार करताना माझ्या डोक्यात बाप होण्यात काय सुख असतं हा विचार सुरू झाला होता. तो पिच्छा सोडेना. तो विचार मला बाप करूनच सोडणार अशी परिस्थिती मनाची निर्माण झाली. मग मी डॉनच्या विचाराच्या मागे लागलो. पाठराखण म्हणून आणलेला कुत्रा गेला कुठे? मि. डॉन. व्हेअर आर यू मिस्टर डॉन? डॉनचा विचार करता करता मला झोप लागली. आज स्वप्नात मी विमलसोबत स्वतःला पाहिलं. म्हणजे माझा चेहरा नाही दिसला. तिचा दिसला. पण तिच्याशी रत झालेला मी आहे हे मला जाणवत होतं. मी गाणं म्हणत होतो, अरे दिवानो, मुझे पहचानो, मैं हूं कौन? मैं हूं डॉन, मैं हूं डॉन ऽऽऽ

विमल यायच्या आधीच मला रस्त्यावरल्या गडबडीमुळे जाग आली. लोक बोलत होते. त्यात राणेंच्या मुलाचा आवाज होता आणि राणेंची सून घरात रडत होती. मी डोळे चोळत खाली रस्त्यावर पाहिलं तर डॉन खाली रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. कुजबुजीतून कळलं की त्याला कोणीतरी गोळी झाडली. माझ्या घराच्या खालच्या अंगाला काही तरुणांची एक टोळी बसते. त्यांच्यातला एक शार्प शूटर आहे असं मला कळलं होतं. तो राणेंच्या मुलाचा मित्र. तेवढ्यात खाली विमल रेंगाळलेली दिसली. अचानक राणेंची सून स्वतःच्या नवऱ्यावर आळ घेऊ लागली. त्यानंच मारलं डॉनला म्हणून. तर तिची सासू तिचं तोंड आवळून तिला आत घेऊन गेली. विमल वर आली. मी दरवाजा उघडला. ती आत आल्या आल्या म्हणाली, ''की राणेंची सून स्वतःच्या नवऱ्यावर आळ घेते आहे डॉनला मारल्याचा.'' च्यायला, कमालचंय. असं का केलं असेल तिच्या नवऱ्यानं? मी सांगते, ''ही सारखी कुत्रा जवळ घेऊन बसायची. नवऱ्याकडे लक्षच नाही द्यायची म्हणे. नवऱ्यापेक्षा कुत्रा खूप लाडका तिचा. खरं पण असेल हो.'' माझ्या एकदम लक्षात आलं, की काळ बराच पुढं सरकलाय. राणेंच्या मुलाचं लग्न होऊन वर्ष झालं आणि आता तो बाप होणार. कुठलाही बुवा बाप होणं किंवा बाई आई होणं म्हणजे खूप काळ गेला असं वाटतं. विमल स्वयंपाकघरातून मला बोलवत होती. तिच्या हाका अधीर होत्या. मी गेलो. जयपूरफूट हल्ली मी वेगात घालतो. स्वयंपाकघरात गेलो. विमलचा चेहरा खुलला होता. ती देवघरासमोर उभी होती. इकडं या जवळ. मी गेलो. बघा म्हणाली. तर आत माझी मांजरी व्यायली होती. तिची छोटी छोटी पिल्लं तिच्या अंगावर पडून होती. आता ह्या पिल्लांचा बाप कोण? मी विमलला उगाचंच विचारलं. ह्यावर ती लाजली. का ते कळलं नाही. स्वप्नांत मी गाणं म्हणत होतो ते आठवलं. मी स्वतःला डॉन म्हणत होतो. डॉन कुत्रा. कुत्रा कुत्रीचं पण असंच असेल. बापाला कल्पना पण नसेल की आपल्यापासून पिल्लं झालीयत अमुक कुत्रीला.

ह्या दोन घटनांनी मला घुसळलं. माझ्या मनात बाप व्हायची इच्छा निर्माण झाली. मघा विमलचा विचार करताना. ती आता प्रबळ झाली. समजा बाप झालो तर मूल कसं सांभाळायला हवं. ह्या जमान्यात त्याचं संगोपन कसं करायला हवं. त्याला आदर्श माणूस कसं बनवायचं वगैरे खूप चांगुलपणाचे विचार माझ्या मनात थैमान घालायला लागले. मी ते आदर्श विचार टप्प्याटप्प्याने बाद केले आणि लक्ष सगळं बाप होण्यावर केंद्रित केलं. जनावरांना बाप होण्याची इच्छा असते की नाही मला माहीत नाही. ती इच्छा केवळ मी जिवंत ठेवली. पण मग लग्न करावं लागेल. छे, नकोच ते. तिकडं विमल मांजर नि तिची पिल्लं ह्यांच्या बडदास्तीत गुंतली होती.

तो दिवस ओसरला. विमलची घरी जायची वेळ झाली. मी तिला जवळ बोलावलं. ती घाबरून नको म्हणाली. म्हटलं आज का घाबरते आहेस? ती थोडावेळ गप्प बसली. लांबच उभी होती. म्हणाली मला पुढची इच्छा होते. मी म्हटलं मग ये. मलाही ती इच्छा झालीय. पण मला बाप व्हायचंय. तुला आई व्हायचंय का? तिच्या डोळ्यांतून पाणी यायला लागलं. त्या इच्छेची आग पेटलीय माझ्या पोटात. गर्भाशयात. आणि अचानक ती पिसाटल्यासारखी माझ्या अंगावर आली.

पहाटे केव्हा तरी जाग आली तर बाजूला विमल झोपलेली पाहून मी थोडा दचकलो. तिला उठवलं. म्हटलं, ''अगं घरी काय सांगशील. मोबाईल बंद ठेवलायस का? तुझ्या घरून फोन नाही आले ते.'' तिनं तिचा मोबाईल पाहिला. तो बंद होता. तिनं चालू केला. ''काय सांगशील घरी आता? सांगीन तुमची तब्येत अचानक बिघडली. मला थांबावं लागलं.'' तिनं घरी फोन केला. तिकडून विचारलं गेलं की, ''फोन का बंद होता.'' ती म्हणाली, ''हॉस्पिटलमध्ये चालत नाही ना मोबाईल चालू ठेवलेला. निघतेय मी. त्यांची बहीण आलीय आता. ती राहील ह्यांच्या सोबतीला. आलेच.''

अनुक्रमणिका

विमल गेली. एकदम मनात आलं, विमलला दिवस गेले तर? दुसरं मन म्हणालं, छे, एका वेळेत हे जमत असतं तर कितीतरी लोकं वर्षानुवर्षं वाट पाहतात ती त्यांना पाहावी लागली नसती? मला माहितीय हे दुसरं मन खोटं असतं. खरंतर ते नसतंच. मी घाबरलो. तिनं अबॉर्शनला नकार दिला आणि हट्टानं बाळाला जन्म दिला तर? पण आपलं लग्न कुठं झालं आहे? ती लग्नाच्या मागे लागली तर? अशा उलटसुलट विचारात मला ग्लानी आली. ग्लानीत माझे विचार घड्याळापेक्षा वेगात सुरू झाले असावेत. माझे एकदम कुणीतरी माझ्याशी बोलायला लागलं त्याचे? मीच की दुसरा कुणी? घुमणाऱ्या आवाजात ते बोललं जात होतं.

जन्माला येण्यापूर्वी माहीत नव्हतं माणसांत जाती वगैरे असतात. जन्माला घालणाऱ्यांना माहीत होतं. पण त्यांनी स्वतः उघड्या डोळ्यांनी माणसाचं भविष्य नाही पाहिलं. माझी मात्र जन्मकुंडली काढून घेतली. गर्भावस्थेत खरं तर कळायला हवं होतं की खूप गुंतागुंतीच्या व्यवस्थांच्या गराड्यात आपण सापडणार आहोत. प्रत्येक व्यवस्थेला एक नेता असतो. तो म्हणेल ती पूर्व दिशा मानतात त्या व्यवस्थेतले त्याचे शिष्यकम हुजरेकम त्याच्यामागोमाग जाणारी कमकुवत माणसं. अशी माणसंच जगात जास्त आहेत हे मला जन्मापूर्वी कुणी सांगितलं नाही. ह्या जगात येण्यापूर्वी माझ्याकडून फॉर्म वगैरे नको का भरून घ्यायला? त्यात एक प्रश्न असाही असायला हवा की तुम्ही स्वेच्छेने जन्माला येताय की जबरदस्ती झाल्यामुळे? माझ्या पाळण्याला काही रंगीबेरंगी खेळणी अडकवली होती वर. म्हणजे मी झोपलो की ती दिसावीत मला. मला ते रंग खूप आवडायचे. पाळण्यातच होतो मी. मोठं झाल्यावर पाहिलं तर हे रंग एकमेकांच्या जीवावर उठलेत. धर्माचा पाळणा मोठा असतो. कित्येक देश तो व्यापतो. त्यात खूप लोक झोपतात आणि वर त्यांच्या धर्माचा एकच रंग त्यांना आनंदित व्हायला, खेळायला दिलेला असतो. जन्माला येण्यापूर्वी सेक्स नव्हता माहीत. जन्माला आल्यावर स्तन पाहिले ते आईचे. पण त्या स्तनांची आठवण नाही राहिली. कारण त्या स्तनांचा अर्थ बदलला होता. तर शब्दांचे अर्थ बदलवणाऱ्या पण अनेक व्यवस्था आहेत आपल्या शरीरांतर्गत. मनांतर्गत. बाहेर. जन्मापूर्वी माहीत नव्हतं की जिवंत राहण्यासाठी शरीर झिजवावं लागतं. जन्मापूर्वी युद्ध माहीत नव्हतं. हा देश नव्हता माहीत किंवा एकूण सारे देश नव्हते माहीत. जन्मापूर्वी आपले आईवडील कोण असणार आहे हे माहीत नव्हतं तर बाकी कसं माहीत असणार? जन्माला येणं ह्याची एक व्यवस्था बनवायला माझं अज्ञान अनाघ्रात होतं. जन्माला आल्यावर ते बाटलं. जन्माला येताना जन्म हीच दिशा समग्र होती. एकच टोक होतं. बाहेर आल्यावर आईचा वगैरे स्पर्श झाल्यावर. मी बाटलो. पक्ष्यांमध्ये कसं की विशेषतः कावळ्यांमध्ये की एखाद्या कावळ्याला माणसाचा स्पर्श झाला की बाकी सगळे कावळे त्याला ठार मारू पाहतात. तसं माझं अज्ञान लोकांनी मारायला घेतलं. मला खोटं ज्ञान व्हायला लागलं आणि मी जन्माला येण्यापूर्वीचं अज्ञान जिवंत असतं तर ह्या अज्ञानाच्या पलीकडे जे आहे ते ज्ञान असं काहीतरी तथाकथित आध्यात्मिक सापडलं असतं का? कसलं ज्ञान नि अज्ञान. जन्मापूर्वी मन नावाचा प्रकार माहीत असावा? तो तुक्या बोलला ना... गर्भाचे आवडी मातेचा डोहळा वगैरे. झालं का त्रांगडं. तर मन नावाच्या गोष्टीचा शोध आपल्याला जन्मापूर्वी लागलेला असतो. तो जन्माला आल्यावर परत विसरतो. मग केव्हातरी कळतं की ही भयानक गोष्ट आहे. मनाचे श्लोक आहेत तसे मनाचे रोग आहेत किंवा रामदास स्वामींना मनाचे रोग आधी कळले मग त्यांनी मनाचे श्लोक लिहून काढले. जन्मापूर्वी हे लिहिणे कलाबिला काही माहीत नसतं. हेही माहीत नव्हतं की एका दगडानं एखादा मुलगा मरू शकतो नि ते त्या मुलाला, ज्यानं दगड फेकला त्याला, मरण पावलेल्या मुलाचा बाप त्या मुलाला क्षमा करू शकतो किंवा एखाद्याच्या मनात वेडाची लहर येते नि तो रस्त्यातल्या लोकांना आपल्या पँटच्या पट्ट्यानं मारत सुटतो. त्यात एक नाटककार जखमी होतात आणि तेही कलावंत मनाचे असल्यामुळे त्या माणसाला माफ करतात. पोलिसांना सांगतात, की माझी काही तक्रार नाही ह्या माणसाविरुद्ध. तर प्रत्येकाचं मन कलावंताचं हवं. त्यात कवीही आला. तर जन्मापूर्वी अनेक गोष्टी माहीत नसल्यातरी जन्मानंतर खऱ्या कलावंत मनाचा शोध लागतो. आता इथे मी 'खऱ्या' हा शब्द वापरलाय. जन्मापूर्वी माहीत नव्हतं की खरं-खोटं असं काही असतं. मरो सगळं.

तासाभरानं मला जाग आली. हे ग्लानीतले विचार जसेच्या तसे आठवले. ते लिहून काढले. विमलच्या पोटी येऊ घातलेलं बाळ बोलत होतं थोडं नि थोडं मी.

अनुक्रमणिका

एकमेकांच्या सहकार्यानं चाललं होतं चर्वण. कलावंत मन हे मला चांगलंच माहिती आहे. वाचनाचा परिणाम. हा परिणाम चांगला की वाईट? खूप वाचतो पडल्या पडल्या. बेशिस्त. खोत वाचले की विनोबानंतर भाऊ पाध्ये, मग जे कृष्णमूर्ती. मला कुठे कशात प्रावीण्य मिळवायचंय? मी नाही कवी किंवा मी नाही कथाकार. पण आता माझीच कथा घडणारय बहुतेक नऊएक महिन्यात.

सकाळी विमल आली लगेच. डोळे रडून लाल झालेले. नाकही. मी विचारायचं डेअरिंग नाही केलं. ती कामं करायला लागली. मी तिला आंघोळीचं बोललो. तर म्हणाली फणकारून करा तुम्ही एकटेच. माझं डोकंच फिरलं. मी म्हटलं ठीकय. तुला नाय ना मदत करायची... नको करूस. मी उठलो. तशी ती धावत आली. नेहमीप्रमाणे मला मदत करता करता बोलली, ''ते रात्री सगळं जमलं तुम्हाला, म्हंजे मला खूश करायला; पण मी आल्या आल्या विचारायचं तरी काय झालं ते. माझे डोळे दिसत होते ना लाल झालेले? मग. विचारलं असतं तर मला बरं वाटलं असतं. नि रात्रीच्या आठवणीचा आनंद वाढला असता. तुम्हाला तेवढंच येतं असं नसतं वाटलं. जाऊ द्या, करा आंघोळ.''

माझ्या मनात आलं की इथे कुठे सवय आहे मला असा दुसऱ्या माणसाचा विचार करायची? बाप रे! मग असं लक्षात आलं की शिकलेली असो की कमी शिकलेली असो की न शिकलेली असो, बाई ही जात पुरुषापेक्षा हुशार. कसं पकडलं मला हिनं? जरा खूश पण झालो मी विमलवर.

एवढ्यात कचरा घ्यायला प्रदीप आला. ही एकदम खूश होत कचरा द्यायला का जाते? दरवाजातून तिनं कचऱ्याची पिशवी बाहेर दिली. तर हात कितीतरी वेळ बाहेरच. मग हसत परत आली. हिला काय कुणीही चालतं का काय? असे विचार येत नव्हते विमलबाबतीत पूर्वी म्हणजे कालपर्यंत. काल ती माझ्याबरोबर झोपली. मला मालकीचीच वाटायला लागली की काय? कचरा द्यायला खूश होत जाणं पूर्वीही मी पाहिलं होतं तिचं. पण मी ते सोडून देऊ शकलो होतो. आता आणखी एक गोष्ट लक्षात आली की प्रदीप आपल्याकडे उशिरा येतो. म्हणजे विमल आल्यावर. मी पटकन दरवाजापाशी जाऊ शकत नव्हतो. हे असे निवाडे कोण करतं? विमलला वाटणारं प्रदीपबद्दलचं आकर्षण हे कोणी निवडून तिला दिलं? न्यायनिवाडा... बरं हे विमल-प्रदीप प्रकरण माझा केवळ संशय असू शकेल समजा, पण मी त्या मुलाला वाचवलं, त्यात माझे पाय गेले. ह्यातला न्याय कुठला नि निवाडा कुठला? काल विमलशी झालेला शारीरिक संबंध हे कोणी ठरवलं? आणि का? असं ठरवणाऱ्याला काय हवंय? ते मी द्यायचं का? मी अचानक माझा जयपूरफूट विमलच्या दिशेने फेकला. तिला तो लागला. ती कळवळली. तो जयपूरफूट घेऊन तणतणत माझ्याकडे आली. रागात तिनं विचारलं, ''मी काय केलं म्हणून हे?'' खरंच हिनं काय केलं? काही केलं नाही असं वाटत असतानाही मी म्हणालो, ''तुझं काय चालतं गं त्या प्रदीपशी? कचरा द्यायला हात बाहेर जातो तुझा तो खूप वेळ आत येत नाही? काय चालतं तुमचं?'' ती म्हणाली, ''अरे भाड्या, तो बादली परत देईस्तोवर माझा हात तसाच राहतो, कळलं का?'' आज प्रथमच तिनं मला शिवी दिली. भाड्या म्हणून. बोलून निघून गेली ती तिच्या कामाला.

मनात राग निर्माण झाला, क्रोध, एक विकार. काम-क्रोध-लोभ-मोह-अहंकार. कालचा काम तिच्या शरीरात उफाळलेला, मी रानटी होऊन भोगलेला, आज क्रोध. मजा आली. माझी खात्रीच आहे की विकार उफाळणे ही माणूस जिवंत असल्याची प्रमुख खूण. ती मला शिवी देऊ शकली... कसं काय? दे दे शिव्या. विकारी हो. असा विकारात गढलेला असताना एकदम एक भय समोरून गेलं झर्रकन. मी त्या भयाच्या मागोमाग गेलो. ते भय विमलच्या ओटीपोटात गेलं. मग पुढं गर्भाशयात. बाप रे! मी तिच्या हालचालींकडे पाहात होतो. मग स्वतःशीच हसलो. च्यायला, बाप व्हायची इच्छा आहे पण मूल नको असं माझं झालं आहे. दोन-तीन महिने गेले. एक दिवशी विमलबरोबर तिचे आईवडील, भाऊ आले. मी त्यांना या बसा वगैरे म्हटलं. तर ते म्हणाले, ''ते ऱ्हाऊ दे, आधी मला सांग, तू विमलशी लग्न करणार की नाहीस?'' मी उडालोच. संशय खरा ठरला. एका संबंधात हे घडलं. मी विचारलं, ''मी का करावं लग्न तिच्याशी?'' ते म्हणाले, ''तिच्या पोटी जे पोर आहे ते तुझंच आहे. त्याला कुणाचं नाव देणार?'' ''माझं पोर कशावरून?'' मी दरडावून विचारलं. ''अरे लंगड्या, गांडीत खूप जोर हाय तुझ्या. आं? आम्हाला पण कळतं, डीएनए टेस्ट करून घेतलीय. तुझा एक केस घेऊन.'' ''ए माझा दम नको काढूस... रिपोर्ट दाखव.

डीएनएचा.'' रिपोर्ट पाहिला. ''पण हा केस माझाच कशावरून? त्या कचरा उचलणाऱ्या प्रदीपचा कशावरून नाही? मी नाही करणार लग्न.'' तिला ते सगळं हवं होतं. चक्क तो बलात्कार होता माझ्यावर. मी आपल्या म्हणीप्रमाणे एन्जॉय केलं. When you are being raped, enjoy it. आणि मी खूप जोराजोरात हसायला लागलो. पुढे म्हटलं, तिला आई व्हायचंय... तेवढ्यात विमल पुढे होऊन आक्रमक होत म्हणाली, ''तू पण बाप व्हायची इच्छा बोललास का नाय? बोल, बोल.'' मी म्हटलं, ''हो, पण लग्नाचं कुठं बोललो होतो मी?'' चवताळली ती. ''अरे भाड्या ह्या माझ्या पोटातल्या बच्चूला कोण सांभाळील?'' माझ्या आत आता अंगार पेटला होता. एकेकाला लाफा मारून हाकलून द्यावं वाटत होतं. पांगळेपणानं मला काही करू दिलं नाही. काय झालं कुणास ठाऊक एक जयपूरफूट हातात घेतला, एका पायावर उभा राहिलो नि सगळ्यांच्या अंगावर तो हातातला जयपूरफूट घुमवला. तलवारीसारखा. प्रत्येकाला फटके बसले. तिच्या वडिलांच्या नाकावर फटका बसला. रक्त आलं. अचानक माझ्या लक्षात आलं ह्या मारातून मी विमलला वाचवत होतो. सगळे पळून गेले. विमल मात्र जिथं उभी होती तिथंच उभी राहिली. शांतपणे. ते गेले नि ती माझ्या घरातल्या कामाला लागली. मी विमलला का नाही मारलं?

दिवस नेहमीप्रमाणे गेला. संध्याकाळचं माझं नि विमलचं जेवण झालं. रात्रीचे नऊ वाजले. विमल तिच्या घरी जाईना. मी विचारलं तिला, ''का ग? घरी नाही जायचं का?'' तशी ती आतून आपली बॅग घेऊन आली. ही केव्हा आणली तिनं बॅग. ''मी इथंच राहणार आता. मी नाही जाणार घरी. तुम्ही लग्न करा नायतर नका करू. माझं बाळ इथं वाढेल आणि हो, तुम्ही आता माझ्या खाण्यापिण्याची काळजी घ्यायची.''

हे तिचं बोलणं म्हणजे माझ्या अंगाला काहीतरी लिबलिबीत चिकटतं आहे असं वाटलं. बाळाच्या वारेनं मला गुंडाळलं आहे असं भयंकर चित्र मला दिसलं. बाळाच्या अंगाच्या कोवळेपणाला ह्या जगात येऊ द्यायचं? येऊ दे नाहीतर त्याला ह्या जगात. मरेल नाहीतर मारील त्याला हे जग. न्याय नि निवाडा अलग अलग आहेत. आता निवाडा होईल त्यानं जन्माला येण्याचा नि मग न्याय. माझं हे क्रूर वाटणं मला आनंददायी झालं. तिच्या इथं राहण्याचं मी त्या आनंदाच्या भरात मनातल्या मनात मान्य केलं. मी काही केलं असतं तरी ती गेली नसती. जाऊ दे, राहातेय तर राहू दे.

''हे आता माझं पण घर आहे.'' तिनं घोषणा केली. मी दुर्लक्ष केलं नि झोपायच्या तयारीला लागलो. ब्रश वगैरे करून माझ्या दिवाणावर झोपलो. तर विमलही तिथंच आली नि माझ्या बाजूला झोपली. मी म्हटलं तिला, ''इथं झोपू नको म्हणून.'' तर ती म्हणाली, ''हीच माझी झोपायची जागा आता. तुझ्या बाजूला. बायको म्हणून.'' हे ऐकून मी तिच्याकडे पाठ फिरवून झोपलो. जागा होतो बराच वेळ. नैतिकतेचे विचार मनात यायला लागले. की आपली ही जबाबदारी आहे. माझंच बाळ ते, काय करावं पुढे? हाकलून द्यावं हिला पोलिसांना सांगून की नको वगैरे. विचारांनी थकून झोप लागली. सकाळी जाग आली ती कुत्र्याच्या जबरदस्त भुंकण्यानं. मी खिडकीतून पाहिलं तर राणेंची सून एका धिप्पाड कुत्र्याला मांडीत घेऊन बसली होती. च्यायला, हे काय आता नवीन. राणेंचा मुलगा पण बायकोबरोबर हसून खेळून बोलत होता. मी उठलो. जयपूरफूट घातले. तोंड धुवायला निघालो तर विमल आली धावत. ''थांबा, मी नेते तुम्हाला.'' चमकलो. कारण विमल रात्री इथंच राहिली होती ते मी विसरलो होतो. बेसिनपाशी तिनं नेलं. मी तोंडावर पाणी मारून, चुळा भरून पेस्ट घ्यायला गेलो तर ही घ्या, असं म्हणत विमलनं पेस्ट समोर धरली. कशीतरी दाबली नि माझ्या ब्रशवर दिली. मी दात घासू लागलो तशी ही किचनमध्ये गेली. आत डोकावलो तर किचन एकदम चकाचक होतं. देवघर पण. मी दात घासत घासत आत गेलो. देवघरात पाहिलं तर मांजर दिसेना. मी म्हटलं, ''अगं मांजर कुठे गेली?'' ती माझ्याकडे न पाहता घराची मालकीण असल्याप्रमाणे मला म्हणाली, ''हाकललं तिला.'' तिला हाकलल्यामुळे मला काय वाटेल वगैरे काहीही पर्वा तिच्या स्वरात नव्हती. तिनं चहा आणून दिला. नेहमीप्रमाणे मला लागतो तसा कमी साखरेचा नव्हता. भरपूर साखर होती. मी प्रश्नार्थक तिच्याकडे पाहून तिला विचारणार तोच ती बोलली. ''मला असाच चहा लागतो, तुम्हाला पण असाच प्यावा लागेल.'' तोंडात शिव्या आल्या त्या गिळल्या. मारायची इच्छा झाली पण तिच्या पोटाकडे पाहून मी थांबलो. तिच्या पोटाकडे पाहताना वाटलं की हिलाच मारून टाकावं, पोरगं पण मरेल नि हीपण. ढकलावं तिला जिन्यावरून. आधी मारावं लागेल पण. मग ढगलून द्यावं.

पुढचं सगळं आयुष्य तरी सुखात जाईल. पण मग दुसरी विमल कुठून आणणार?

राणेंच्या सुनेनं दुसरा कुत्रा आणला म्हणजे आणलाच असं म्हणून ती हसायला लागली विजयी झाल्यासारखं. कळलं का, बायको अशी असते. बायकोचा हट्ट असा असतो. पोटुश्या बाईचा तर हट्ट खूप वाईट. च्यायला, म्हणजे बाप एकटा नसतो, त्याची बायको असते. त्याच्या मुलाची आई असते. एक बाई दोन रोल करत असते. अस्खलितपणे. राणेंच्या सुनेचे दिवस भरत आले असावेत. सूज दिसत होती. पण ती गोड दिसत होती. मला गोड दिसत होती. मला? गोड म्हणजे काय? मला चांगलं वाटत होतं. चांगलं म्हणजे काय? विमल पण दिवस भरले की गोड दिसेल. हे स्वप्न मी का पाहतो आहे? मी तिला हाकलू पाहतो आहे नि त्याच वेळी हे काय मनात येतं आहे?

सकाळ होती. दुसऱ्या की तिसऱ्याच दिवशी तिला थोडा त्रास व्हायला लागला. मग मी तिला डॉक्टरकडे घेऊन निघालो. बाहेर पडलो तर सोसायटीतले लोक आम्हाला विचित्र नजरेनं पाहायला लागले. स्टिल्टमध्ये आलो तर प्रदीप म्हणाला, ''सायेब, तुमची मांजर तितं सडून पडलीय बघा. काय खायला घातलं तिला कुणीतरी काय म्हाईत.'' मी विमलकडे पाहिलं. ती कळवळत होती. हे तिचंच काम असणार. नक्की. पण आता काही बोलण्यात अर्थ नव्हता. रिक्षा बोलावलीच होती. आम्ही रिक्षेत बसलो.

त्या रात्री मला अनेक स्वप्नं पडली. त्यातलं एक आठवतंय. एक सूर्यफूल माझ्या एका डोळ्यावर पडलं. मग दुसरं दुसऱ्या डोळ्यावर पडलं. मग दोन-तीन एकदम चेहऱ्यावर पडली. मग खूपशी अंगावर पडली. आणखी पडली तेव्हा माझं अख्खं शरीर सूर्यफुलांनी झाकलं गेलं असावं. छान वाटत गेलं. काही वेळ शांत पडून राहिलो फुलांखाली. अचानक बदबदा सूर्यफुलं माझ्या शरीरावर कोसळतच राहिली. इतकी की ते वजन मला सहन होईना. मी गुदमरायला लागलो. श्वास कोंडल्यासारखं होऊन मी बेशुद्ध झालो. बेशुद्ध झालो नि मला जाग आली. घामाघूम झालो होतो. बाजूला विमल झोपली होती. तिचा मंद श्वासोच्छ्वास वातावरणात जाणवत होता. मी उठून बसलो नि तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं. लहान मुलासारखा इनोसंट दिसत होता. तो इनोसन्स पाहून मला रडायला यायला लागलं. ह्या इनोसन्सला मला ठार मारायचं आहे. तिच्या पोटात आणखी एक इनोसन्स आहे. तोही मारायचा आहे. रडू थांबवलं आणि मी तिथल्या तिथे माझ्यापुरतं एक तत्त्वज्ञान बनवलं की हे जग इनोसन्स माणसांनी जगण्यासारखं नाहीय. मी एका जीवाला वाचवलं. आता मी एक जीव मारू शकतो. तो अधिकार मला प्राप्त झाला आहे. नाही, पण हे दोन जीव आहेत. हिला काही खायला घालावं का? म्हणजे तिचा गर्भ पडून जाईल. मला असलेला अधिकार माझ्याकडून गाजवला जाईल. पण तरीही ही विमल मला सोडेल? छे... शक्य नाही. आयुष्य म्हणजे क्षणांची साखळी असते की माणसांची? च्यायला, सगळे साले सोनसाखळी खेळतात. शेवटचा उरतो तो मी असतो. बरोबर पकडतात त्याला. सगळे मिळून. मला परत रडू आलं. मी गदगदा रडू लागलो. विमल जागी झाली. ''काय वो? काय झालं?'' असं म्हणून तिनं मला तिच्या कुशीत घेतलं. माझ्या केसातून हात फिरवीत, उगी उगी म्हणत राहिली. मला गुंगी आली. नंतर झोप लागली असावी. एकदम सकाळी जाग आली. विमल आधीच उठली होती.

ती रोज माझ्या आधी उठून घरात तिला हवे तसे बदल करीत होती. आज काय, असा माझ्या मनात विचार आला. चहा, आंघोळ वगैरे प्रातर्विधी झाल्यावर मी नेहमीप्रमाणे शू रॅकजवळ आलो. अगरबत्ती लावली नि आतला दिवा लावला. नमस्कार करताना माझ्या लक्षात आलं की ते शूज माझे नेहमीचे नव्हते. कोरे करकरीत होते. मी प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणे मागे वळून पाहिलं. विमल स्वतःचं कौतुक करीत असल्याप्रमाणे हसत होती. तिच्या चेहऱ्यावरील भाव, माझ्यासाठी तिनं काही चांगलं केलं असा होता. डोळ्यांत प्रेमळ अधिकाराची नजर होती. मी चिडलो नाही. माझ्यातला विकार जागा झाला नाही. बहुतेक माझ्यात उत्क्रांती होत होती. तो तिनं माझ्यावर गाजवलेला अधिकार मला मोहवून गेला. मी फाटला होतो आत. दोन भागांत. मला हे नको होतं. ते माझ्या वाट्याला आलं असा एक भाग नि दुसरा हे किती चांगलं आहे, आपल्याबरोबर जगणारं कुणीतरी असणं, असा दुसरा भाग. काल ती एकटीच बाहेर गेली होती. मला दुपारी झोप लागली होती. दुपारच्या झोपेत ते नेहमीचं स्वप्न पडलं होतं. एकदम तिनं माझ्यासमोर जॉकीची बनियान समोर धरली. म्हणाली, ''हे घालायचे आजपासून.'' नेव्ही ब्ल्यू रंगाचा तो

बनियन मला आवडला. मी खूप आनंदानं घातला. मग तिनं एक शॉर्ट दिली. महागडी असावी. ''ही वापरायची रोज.'' असं सांगून निघून गेली.

नाश्त्याला आज थालीपीठ होतं. वर लोण्याचा गोळा. माझी ही आवड लक्षात ठेवून तिनं हा नाश्ता केला असावा तयार. काय झालं कुणास ठाऊक मला एकदम Aversion आलं, थालीपीठ जाईना. मला ही खूश करते आहे. नि मी खूश होतो आहे. हा एक व्यवहार चालू झाला आहे. उद्विग्नतेत मी ठरवून टाकलं की हा व्यवहार पूर्ण करायचा येत्या आठवड्यात. आत मनात काही तरी उद्ध्वस्त झालं होतं. लाईफ लाईन कुठंतरी डिस्टर्ब झाली होती. जगण्याचा ईसीजी ॲबनॉर्मल झाला होता. आपली जीवनधारणा हरवली होती. त्यातून हा फ्रस्ट्रेटेड विचार आलाय. विमलशी लग्न करून व्यवहार पूर्ण करण्याचा. माझे जुने शूज गेले, त्या जागी नवे आले, तेव्हाच मनात चरकलं होतं. आपला महामृत्युंजय मंत्र हरवला.

घरगुती स्वरूपात विमलशी लग्न केलं. तिच्या घरचे लोक आले होते. माझ्या घरच्यांना निरोप पाठवला होता; पण ते आले नाहीत. आता मी खऱ्या अर्थानं कायदेशीर बंधनात अडकलो होतो. त्याच्या दुसऱ्या दिवशीपासून विमलचं वागणं जरा जास्तच अधिकार गाजवणारं सुरू झालं. मी ते न नाकारता स्वीकारत गेलो. जसं प्रेत काही नाकारू शकत नाही. थंड पाण्यानं आंघोळ घातली तरी प्रेताला थंडी वाजत नाही. करकचून बांधलं तरी ते कळवळत नाही. जाळलं की जळत राहातं. प्रेताला चटके बसत नाहीत.

मीही प्रेम करीत राहिलो विमलवर. विमलचे दिवस भरण्याची वाट पाहात राहिलो. ते वाट पाहणं मला सुखावह वाटत होतं. का ते? विचार करू लागलो. उत्तर सापडत नव्हतं. एके दिवशी क्रिकेटची मॅच पाहात होतो. सचिनने शतक झळकवलं. कॉमेन्ट्रेटर म्हणाला, ''सचिन रमेश तेंडुलकरनं आपलं हे पंचविसावं शतक झळकावलं. रमेश तेंडुलकर कवी. सचिनमुळे त्यांचं नाव घेतलं जात होतं आणि लक्षात आलं. मला माझं नाव जिवंत ठेवायचं होतं. विमलला होणाऱ्या मुलाच्या नावात माझं नाव असणार होतं. आपण मेल्यानंतरही शिल्लक राहावं, ह्या जगात आपलं अस्तित्व राहावं अशी माझ्या मनात दबलेली इच्छा असावी ती. सगळ्यांची असते का ती?

सगळं वेगात घडतंय असा फील आला मला. विमलचे नऊ महिने भरकन गेले. तिचं नाव ज्या हॉस्पिटलमध्ये घातलं होतं तिथं ती कुठलाही त्रास न होता बाळंत झाली. मी हॉस्पिटलला नंतर गेलो होतो. तिच्याजवळ कुणी एक तरुण बसला होता. ती म्हणाली, ''हा माझा मावसभाऊ... विवेक.'' तो उठायला लागला मला आधार द्यायला तसं मी म्हटलं, ''बस, बस रे.'' बाळ गुटगुटीत होतं. ते त्या विवेकच्या हाती होतं. त्यानं माझ्या हातात दिलं. मला तो स्पर्श नकोसा वाटला. का? कारण कळलं नाही. भीती पण वाटली की माझ्या हातून ते पडेल की काय. मी झटकन विवेकच्या हाती बाळाला दिलं. ''काय वो, जरा आंदुळा की बाळाला.'' मी नको म्हटलं. थोडा वेळ बसलो नि निघालो. आता मला सूर्यफुलांचा गुदमरवून टाकणारा दबाव जाणवू लागला होता. मी ह्या सर्व जगाला सुखी वाटणाऱ्या संसाराच्या दबावाखाली मी मरणार असं एकदम भयाण वाटून गेलं. सूर्यफुलं सूर्याबरोबर संधान साधून असतात. मावळतीला आला असावा सूर्य.

त्या दुपारी मात्र मला दोन स्वप्नं पडली. एक त्या मुलाला वाचविण्याचं, दुसरं मात्र घाबरवणारं होतं. मी उघड्या माळावर झोपलो होतो. घोंगावणाऱ्या आवाजात दशदिशांनी क्षितिजं माझ्या जवळ येत होती. ती इतकी जवळ आली की अखेर मी त्या क्षितिजांमध्ये चिणला गेलो. दिसेनासा झालो. मला जाग आली.

दोन-तीन दिवसांत विमल घरी आली. घरची कामं करायला तिची आई आली होती. विमलला आराम मिळावा म्हणून. तिचा मावसभाऊ रोज यायचा काही हवं नको ते पाहायचा. बाळाला खेळवायचा. बारसं झालं. त्या मावसभावानेच बाळाचं नाव ठरवलं. चंद्रकांत. मला काही एवढा रस नव्हता त्या सगळ्या समारंभात. त्याचं पूर्ण नाव गमतीचं होणार, चंद्रकांत सूर्यकांत भोसले. ह्या सगळ्या गोष्टी माझ्या आयुष्यापासून दूर होत्या. संसाराच्या अनुषंगाने घडणाऱ्या. त्या आता स्वप्नातल्या क्षितिजाप्रमाणे जवळ जवळ येऊ लागल्या होत्या. मी ह्यात चिणला जाणं हे मला सुटकेसारखं वाटायला लागलं. तो विवेक रोज घरी यायचा. त्याला जमायचं; कारण तो रिक्षा चालवायचा. तो घरी येण्याचं बंद होईना. बाळ भर्रकन वाढलं. मध्ये बाळाची विमलची आजारपणं वगैरे विवेकनेच पाहिली. काळजी घेतली. बाळाला आतापासूनच चंदू म्हणायला सुरुवात झाली होती. मला नाही आवडत अशी नावं शॉर्ट केलेली. चंद्रकांतमध्ये कशी एक लय आहे.

एकदा दुपारी असाच झोपलो होतो. खुर्चीतच झोप लागली. केव्हा ते कळलं नाही. स्वप्नात नेहमीचं घडलं. मी त्या मुलाला वाचवलं नि माझे पाय गेले. वगैरे. छातीशी शूज घेतले नि मला जाग आली. लघवी लागली होती. खुर्चीत बसल्यामुळे जयपूरफूट पायातच होते. मी संडासाकडे निघालो. संडासापूर्वी किचन लागतं. सहज किचनमध्ये नजर गेली. विवेक आणि विमल बेभानपणे एकमेकांच्या विळख्यात होते. मी झटकन पुढे सरकलो. लघवी केली. किचनमध्ये न पाहता माझ्या खुर्चीवर आलो. मी अधिक शांत वाटलो मला. मी झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी वकिलाला बोलवून मी माझं मृत्युपत्र करवून घेतलं. त्यात माझं जे काही होतं ते सारं विमलच्या नावे केलं होतं. विवेकनं ते वाचून पाहिलं. तो उत्साहात आलेला दिसला. गुड. संपल्यात जमा होणं म्हणजे हेच ते. ह्यातलं जमा होणं एकट्याचं असतं. विवेकला वाटत असेल की आपण खूप काही मिळवलं. पण तसं नाहीय ते हे त्याला कळणार नाही कधीच. मी ते दिलं होतं. मी संपलो होतो. पण जमा झालो होतो. आयुष्याच्या दोन पारड्यांपैकी चांगल्या पारड्यात. अर्थात हा हिशेब सोपा नाहीय. हे गणित कुठल्याही पद्धतीने सोडवायचा प्रयत्न केला तरी अनेक उत्तरं येतील. मग एक काम वाढेल की, ह्यातलं उत्तर कुठलं खरं ते ठरवायचं. तो मुलगा माझ्यामुळे वाचायचा होता म्हणून ती घटना घडली की माझे पाय जायचे होते म्हणून ती घटना घडली. की माझं घरातल्यांशी भांडण होऊन मी एकटा पडणं ह्यासाठी होती ती घटना. की विमल माझ्या आयुष्यात येण्यासाठी ती घटना घडली होती. की काय? मरणानंतर सर्व घटना थांबतात असंही असेल असं नाही. समजा मी मेलो तर हा विवेक विमलशी लग्न करील. माझी प्रॉपर्टी विमलच्या नावे करण्याचा माझा उद्देश शून्य आहे. केवळ माझ्यानंतर ती बेवारस ठरून कायद्याच्या हातात जाण्यापेक्षा ती कुणाला तरी उपयोगी पडावी. त्याचा उपयोग कसा होईल हे माझ्या हातात नाहीय. भूतबीत कल्पना खऱ्या असतील तर भूत बनून मी ते पाहीन.

विमल घरी राहायला आल्यापासून माझे मित्र प्यायला माझ्याकडे येत नाहीत. एकदा ते आले होते. विमल कुठे बाहेर गेली होती. आमचं पिणं सुरू झालं नि ती आली. भडकली. म्हणाली, ''हे घरात नाही चालायचं.'' सगळ्यांना हाकललं. त्यांचा एक पेगही पूर्ण झाला नव्हता. हल्ली मी पितो ते विवेकबरोबर. विवेकबरोबर तिला चालतं. आज प्यायचा मूड आला होता. तो मूड कदाचित आता काय करू या प्रश्नाचं उत्तर म्हणून आला होता. विवेकला बोलवून घेतलं. अशा वेळी पिण्याची तयारी करायला विमल पुढे असते. सगळी तयारी झाली. आमचं पिणं सुरू झालं. गप्पा केवळ दारूच्या नि बाईच्या आणि रिक्षेच्या. रिक्षेतल्या पॅसेंजरच्या. रिक्षेत बसलेल्या लफड्यांच्या. म्हणजे एक लग्न झालेली बाई नि तिच्याबरोबर लग्न न झालेला एकदम तरुण मुलगा वगैरे. दोन पेग झाल्यावर मला प्रश्न पडायला लागले. हा समोर बसलेला माझा कोण आहे? ह्याला देवानं का जन्म दिला असावा? मला का दिला असावा? का दिला असावा? तेवढ्यात विमल भाजलेले बोंबील घेऊन आली. तो वास नाकात जाऊन जरा उतरली. मी तिसरा पेग भरला. आज मी असा का पितोय? दारू हे माझं अस्तित्व असल्याप्रमाणे आणि जणू मला हे अस्तित्व संपवायचं आहे. च्यायला संपू दे पण जगणं म्हणजे काय? असा काही विचार ह्या दोघांनी केला असेल का? मी स्वतःला शिवी घालून बोललो. अरे पण का त्यांनी विचार करावा? मला दुर्बुद्धी सुचली नि मी माझ्या आयुष्याला, जगण्याला अर्थ देण्याचा प्रयत्न केला. माझ्या जगण्याला अर्थ म्हणण्यापेक्षा हेतू मिळाला. पण असं आहे की तुम्ही जगण्यालाच काय कशालाही अर्थ देऊ पाहता तो अर्थ दुसरा कुणी काढून घेतो. त्याला हवा म्हणून नव्हे. तर त्याला कळतच नाही की तो त्याच्या जगण्याला अर्थ देताना दुसऱ्याच्या जगण्याचा अर्थ काढून घेतो आहे. तसा ह्या दोघांनी माझ्या पांगळ्या जगण्याचाही अर्थ काढून घेतला. ही माणसं का आली माझ्या आयुष्यात? माणसं एकमेकांच्या आयुष्यात का येतात? येतात नि ज्याच्या आयुष्यात ती जातात तिथं ती वेगळी राहतात. स्वतंत्रपणे. हे स्वातंत्र्य कोण देतं ह्यांना? निसर्गासारखं राहायला पाहिजे. झाड कसं एकाच जागी उभं राहातं. नदी तिच्या मार्गाने वाहते. समुद्र जागच्या जागी गाज देतो. हे माणसांचं जग ना निरर्थक आहे. माणूस अर्थपूर्ण आहे. पण त्याला ते कळत नाही. विवेकचं पिणं जोरात चालू होतं. मध्येच तो लघवीला म्हणून उठला. तो किचनमध्ये शिरलेला मी पाहिलं. हात्तीच्यायला, काय अर्थ आहे त्या विमलला ह्यानं लागू होण्यात? खूप हसायला यायला लागलं. भवताल मला ताल हरवलेलं वाटू लागलं. हे जग

नष्ट करायला हवं. सगळे लोचे संपतील. पण जग नष्ट कसं करणार? छ्या, नाही जमणार ते. विवेक आला. त्याला मी एकदम एक प्रश्न विचारला, सगळं वाचन बाहेर यायला लागलं. प्यायल्यावर माझं वाचन निघतं बाहेर. मी त्याला विचारलं, ''जगातली सर्वांत सुंदर गोष्ट कुठली?'' तो म्हणाला, ''काय भावोजी, काय पण प्रश्न विचारता?'' आणि हसला. हे सालं भावोजी डोक्यात जातं. माझ्या आवाक्यात होता तो, जागेवरून न उठता, मी त्याच्या कानाखाली सण्णकन वाजवली. तो तिरमिरला नि पडला. परत त्याला प्रश्न विचारला. विमल बाहेर आली होती. तिला पण बस म्हटलं. तिलाही तो प्रश्न विचारला. तर ते दोघे काही बोलू शकले नाहीत. नाही ना उत्तर तुमच्याकडे? मी सांगतो, ''जगातली सर्वांत सुंदर गोष्ट ही की लज्जेने जिचे गाल लाल पडले आहेत अशी जख्ख म्हातारी.'' तो आणि ती थोबाडं पाडून बसली. तिला म्हटलं, ''जा. जेवणाचं बघ.'' तर ती म्हणाली, ''तयार आहे जेवण.'' मी म्हटलं, ''पण आमची नाय झाली जेवायची वेळ.'' आवो पण विवेकला लागली असेल भूक. मी नुसतं विवेककडे पाहिलं. तो विमलला म्हणाला, ''आम्ही बरोबरच बसू जेवायला.''

नाकेबंदी असल्यासारखा मी एकदम गप्प झालो. ह्याचा अर्थ माझ्यातले विकार उसळू लागले होते. मी करणार असलेल्या कृतीचं समर्थन मला मिळालं होतं. जग नष्ट नाही करता येत तर, असं म्हणून मी डोळे मिटून पाहिले. सगळं जग नष्ट झालं होतं. पण कान आवाज ऐकणार. माझ्या मांडीखालची गोष्ट गरम झाली होती आणि मी एकदम थंड. कूल आणि क्रूर. मी मरायचं ठरवलं आहे. मी मेलो की हे जग नष्ट. पण माझं नाव जिवंत राहिलं पाहिजे. हो हो हो, ते जिवंत राहिलं पाहिजे. विवेकला म्हटलं शू रॅकमधून शूज काढून दे मला. विवेकने शूज दिले. त्यानं मेलेले उंदीर पकडावेत तसे पकडले होते. मी ते समोर ठेवले आणि त्याला म्हटलं, ''साष्टांग नमस्कार घाल या शूजना. देव समजून.'' तो अडला. म्हटलं, ''चल लवकर.'' त्यानं शूजना साष्टांग नमस्कार घातला. हे शूज विमलने आणलेले होते. माझे शूज तिनं फेकून दिले होते कचराकुंडीत. शूजकडे मी खूप वेळ पाहात राहिलो. सगळा भूतकाळ जगलो. आपोआप महामृत्युंजय मंत्र मुखावाटे बाहेर पडला.

मी मांडीखालून रिव्हॉल्वर काढलं. शांतपणे आतल्या गोळ्या पाहिल्या. विवेकला कळायच्या आत मी त्याच्यावर चार गोळ्या झाडल्या. आवाज ऐकून विमल बाहेर आली. ते दृश्य पाहून रडू लागली. तिच्या कडेवरचा चंदू पण रडत होता. मी चेक केलं, विवेक मेला होता. विमल दाराबाहेर पडून रडत रडत खून खून असं ओरडत राहिली.

मी माझ्या कपाळावर रिव्हॉल्वर टेकवलं आणि...

• • •

▪ रवींद्र दामोदर लाखे । २०१, रॉयल पॅलेस, पोस्ट ऑफिससमोर, टिळक चौक, कल्याण–४२१३०१, मोबाईल : ९८६९३९६३६९

युगवाणीकरिता साहित्य पाठविण्याबाबत सूचना :


- युगवाणीत नव्या लेखनाचे स्वागत आहे.
- युगवाणीकरिता ईमेलने लेखन पाठविताना edityug@gmail.com या पत्त्यावर पाठवावे. लेखन पोस्टानेही पाठविले जाऊ शकते.
- आलेल्या लेखनाबाबत साधारणतः दोन महिन्यांत निर्णय घेतला जातो. लेखन स्वीकारले असल्यास तसे कळविले जाईल. पुरेसे टपालशील जोडलेले असल्यास अस्वीकृत साहित्य पोस्टाने परत पाठविणे शक्य होईल.
- अस्वीकृत साहित्याबाबत वेगळा पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

आत्मकथन

काळ्यानिळ्या रेषा

(क्रमशः)

राजू बावीस्कर



गंगूभाई

गावातले लोक आपल्या गरिबीला चोरीची झालर लावून मोकळे होतील म्हणून त्याचं चित्त लागत नव्हतं. पूर्ण दिवस निघून गेला तरी बाप त्या भीतीच्या अंधारातून बाहेर आला नाही.

आपण सारेच गोष्टीवेल्हाळ. आई अशा काही गोष्टी सांगायची, की समोर दृश्य असल्याचा भास व्हायचा. ती व्यक्ती नसतानाही जाणवायची. त्यांची धुरकट आकृती नजरेसमोर येऊन जायची. गंगाराम मामा असाच एक होता. पांढरा सदरा, पांढरी पॅन्ट, डोक्याला चिटकलेले त्याचे केस. मिश्या मात्र खूप भारी. शहरी वाटणाऱ्या. कुठूनतरी मोठ्या शहरातून-सूरत येथून-आमच्याकडे यायचा गंगाराम मामा – इतकाच त्याचा आम्हाला परिचय. आई मात्र त्याचे बरेच किस्से सांगायची. हा आमच्या वहिनीचा सख्खा मोठा काका. अगदी दहा-बारा वर्षांचा असताना सूरतला एका मुसलमान मित्राबरोबर गेला. देखणा माणूस वाटायचा. इकडे खान्देशातल्या त्याच्या सर्व नातलगांना भेटायला क्वचितच यायचा. खूप अडीअडचणीची काही गोष्ट असेल तेव्हा तो खान्देशात यायचा. मग सर्व नातेवाइकांना भेटून जायचा. सूरतच्या सगळ्या दादा माणसांचा एक परिचित माणूस गंगूभाई! हे नाव पूर्ण सूरतमध्ये दादामित्रांमध्ये ओळखीचं. आई आम्हाला त्याची गोष्ट सांगताना म्हणायची, ''अरे तुम्हाले गंग्यामामा आठवतो का?'' मी त्याची प्रतिमा आठवायचो. तो असाच एक दिवस आमच्या गावाला आला त्या वेळी आम्ही खूप लहान होतो.

राजू बावीस्कर
प्लॉट क्र. ६बी,
याज्ञिकी अपार्टमेंट,
गुजरात पेट्रोल पम्पमागे,
रामद्वार पार्कजवळ,
जळगाव – ४२५ ००१
मो.: ९८८१४१५४७२
संपर्क :
rbaviskar.raju1@gmail.com

अनुक्रमणिका

जेमतेम चेहरा ओळखायचं वय असणार ते. नंतर पुन्हा हा जेव्हा जेव्हा आला तेव्हा आम्ही त्याला चांगलं ओळखायला लागलो होतो. या वेळी मात्र तो पार थकलेला होता. आईनं त्याच्याविषयी एक गोष्ट सांगितली होती. कायम लक्षात राहिली. तो एकदा रात्री गाव सुनसान झाल्यावर कुठूनतरी पायी आमच्या गावाला पोहचला. अंमळनेरवरून तापी नदी ओलांडून पायीच आलेला. अर्ध्या रात्री गंगाराम आल्याचं बघून आईबाप भीतीनं गारठून गेलेत. त्यांची बोलण्यातही बोबडी वळली. तो झोपडीच्या आत आला. आई त्याला जेवणाचं विचारत होती. ''येवढ्या रात्री काय करसीन बहीन. जे असीन ते दे.'' असं म्हटल्यावर गावातून मागून आणलेल्या भाकरीवर आईनं लहान पत्री डब्यातून मिरची काढून टाकली. तो खाताखाताच आईबापाला बोलत होता, ''काय तुम्हीपन या लाचारीच्या गावकामावर जगता दाजी.'' त्याला असलं गावकरण आवडायचं नाही. त्याला हे जगणं कुत्र्यासारखं वाटायचं. आई त्याला म्हणायची, ''गरिबीले कश्याले लाज्याचं भाऊ, गावकामामुळेच तर पोरांचं पोट भरतं ना?'' पण ही गोष्ट त्याला पटण्यासारखी नव्हती. त्याचे दोन घास खाऊन संपले. त्यानं त्याच्या बुटांच्या मोज्यामधून नोटांच्या गड्ड्या काढल्या. पॅन्ट वर करून पायाला रबरानं बांधलेल्या नोटांचे बंडल दाखवले, ''दाजी, हे राहू द्या नि तुमचं चांगलं करी घ्या याच्यात. मी दिवस उजाळण्याच्या आत निघी जाईन.'' बापाला तो सांगत होता. बाप हे सर्व पैसे पाहून कमालीचा घाबरला. त्याला सर्व घरभर भीती दाटून आल्यासारखी जाणवत होती. आईनं तोंडाला हात लावला. ''भाऊ नको तुहे पैसे. तुच घीजाये तुह्या पैश्यान्ले.'' आईचं हे बोलणं ऐकताच त्यानं ते नोटांचं बंडल पुन्हा आपल्या पायाला रबरानं बांधलं. काही नोटा मोज्यात टाकल्या. ''आमचं गावात भाकरी मांगून खानं बरं आहे तुह्या पैश्यांपेक्षा.'' आई गंग्याला बोलली. तो बाहेरच खाटीवर बसला होता. आईला नि बापाला झोप लागली नाही. बाप बिड्यांचे तुकडे फुकत घरातच बसला. तो झोपेतून पूर्ण उखडून गेला होता. गंगाराम केव्हा गेला बापालाही समजलं नाही. तो पहाटेला चार वाजताच तिथून गायब झाला होता.

बापाच्या अंगातलं भीतीचं थर्रक अजूनही कमी झालं नव्हतं. बापाला सारखं वाटत राहायचं याचा तपास करायला पोलीस आपल्याकडे येणार तर नाहीत. नाहक त्रास हा डोक्याला. गावातले लोक आपल्या गरिबीला चोरीची झालर लावून मोकळे होतील म्हणून त्याचं चित्त लागत नव्हतं. पूर्ण दिवस निघून गेला तरी बाप त्या भीतीच्या अंधारातून बाहेर आला नाही. दोन-तीन दिवस गेल्यावर आईबापाच्या जीवात जीव आला. आपल्यावरचं संकट गेल्यासारखे ते मोकळे झाले. बापाचं-आईचं म्हणणंच असायचं, ''गावातले भाकरीचे तुकडे मांगून खाऊ पण असल्या कामात हात काळे करण्यापेक्षा भुकेले मेलेले बरं'' हे त्यांच्यातलं तत्त्व सर्व कुटुंबात रुजत गेलं. गंगूमामानं रेल्वेत कुठंतरी व्यापाऱ्याची लुटमार करून खूप पैसा आणला होता. तो या बाबतीत खूप धाडसी आणि बेडर होता. तो स्वतःच्या जीवावर खेळून हे काम करायचा. नंतर या पैशाचं त्यानं काय केलं हे त्यालाच माहीत. खूप वेळा तो आतबाहेर असायचा. त्याचं जगणंच त्या विषयाशी जुळलेलं असल्यानं त्याला त्यातून बाहेर येता आलं नाही. त्याच्याबरोबर असलेल्या काही मित्रांनी स्वतःचे व्यवसाय थाटले. तो त्यांच्याकडेच सर्व पैसाअडका द्यायचा. हा त्यांच्यातला व्यवहार त्यालाच माहीत होता. त्यानं दिलेले पैसे कुणाकडूनही परत घेतले नाही. त्याचे मित्र त्याचे सर्व शौकपाणी पूर्ण करायचे. त्याच्यामुळे चोपड्याचा मुसलमान मित्र जब्बारभाई तर खूपच श्रीमंत झाला होता. हा गंगाराम मामाच्या जीवावरच मोठा झाला होता, असे लोक बोलायचे. इतका श्रीमंत होता की, त्या काळात त्यानं सूरतला एक सिनेमागृह उभं केलं होतं. नंतर जब्बारभाई स्थानिक राजकारणातही पडला. गंगाराम मात्र नेहमी आत-बाहेर राहात होता. त्याची मुलगी चोपड्यात मावशीच्या मुलालाच दिली होती. मुलीला टीबी झाल्याने मावशीच्या मुलाने तिला फारकत दिली होती. त्या कारणामुळेही त्याचं सूरतहून इकडं येणं थोडं कमी झालं.

एकदा आम्ही बॅण्ड वाजवायला चोपड्याला गेलो होतो. लग्नाघरून मधल्या काळात भाऊ आणि मी मावशीकडे भेटायला गेलो होतो. तेव्हा गंगाराम मामा मावशीजवळ चहा पीत बसलेला दिसला. त्याला मी भरपूर वर्षं लोटल्यावर पाहात होतो. हा तोच आहे का असा प्रश्न मी मनाला विचारत होतो. तो उठला नि दुसऱ्या नातेवाइकांना भेटायला चालत गेला. वाऱ्यासारख्या वेगानं धावणारा माणूस अगदी मुंगीसारखा चालत होता. मावशीनं चहावाल्याला आवाज दिला. चहाचा कप बाजूला ठेवून मावशी त्याच्याविषयी हळहळ

व्यक्त करत होती. त्याची मुलगी टीबीनं वारली होती. त्यानंतर यानं सर्व चोऱ्यामाऱ्यांचं काम सोडून दिलं. त्याला एकच मुलगी होती. त्याचा खूप जीव की प्राण असलेली मुलगी वारली नि त्या दिवसांपासून तो या सगळ्या काळ्या धंद्यातून बाहेर निघाला. परंतु त्याचा पोलिसांकडे असलेला मागचा तपशील त्याचा पिच्छा सोडत नव्हता. कुठंही काही झालं की, त्याला घरून उचलून घेऊन जाणं पोलिसांचं थांबलं नव्हतं. तो केलेली चोरी कबुलत नव्हता म्हणून पोलिसांनी त्याच्या घोडनसांवर मारून मारून त्या निकामी केल्या होत्या. त्याला धावता येणार नाही असा तो झाला होता. अंगावरचं मास कमी झाल्यानं उंच असलेला तो अधिकच हडकुळा, कमरेतून वाकून गेलेला. काय कमवलं या माणसानं? त्याच्याकडे बघून विचार सुन्न होत राहतात. मी त्याच्याकडे फक्त पाहात राहिलो. मावशी त्याचे हाल बघून डोळे पदराने पुसत बोलत होती. ''गंग्या कसा हुई गेला, कसं होईन याचं.'' मावशी त्याच्याविषयी खूप रडली. हा असाच नातेवाइकांकडे फिरत राहिला. सूरतला त्याच्या घरीच तो शेवटच्या वेळेला थांबून होता. खूप जीवाचे हाल झालेत. गंगाराम मामा संपला. आई म्हणायची, ''त्याच्या बायकोले आता कोन्हचा सारा नाही. काय करवा त्या बाईनं? शेवटी बाई बाई राहाते. सगळ्यांले जगवत राहानारी, नि जगवनारी.'' आईच्या सांगण्यासारखंच होतं. बाई शेवटी एकटीच राहिली होती. सर्व दुःख सोबत घेऊन जगत गेली. लग्नसमारंभात सुखदुःखाच्या वेळी येत गेली. पण गंगाराम मामाला गावकामाचा, गावात भाकरी मागण्याचा तिरस्कार का होता, हे मात्र शेवटपर्यंत कळलं नाही.

केंड्याबाप्पा

उंची कमी लहान असली तरी पीळदार शरीर होतं व भयंकरच देखणा होता. त्याच्या बोलण्यात जादू होती आणि ते अभ्यासपूर्ण असे. त्यात हा चोर आहे म्हटल्यावर ते फारच वेगळे वाटायचे.

पावसाची दहा-पंधरा दिवस झडी सुरू झाली की, सर्वच जण घरात आईजवळ तासन्तास गप्पा मारत बसणार. ती खूप वेगवेगळ्या गोष्टी सांगणार. भरपावसात बाप गावात भाकर मागायला गेला की त्याला उशीर होणार हे माहीत होतं; पण तिच्या गोष्टींमुळे एक व्हायचं, आमच्याच समाजाच्या काही चोऱ्या करणाऱ्या माणसांचे हाल कसे झाले, तो चांगला असल्यावरही चुकीच्या कामामुळे त्याचं जीवन किती त्रासदायक झालं हे ती सांगायची आणि त्यांची चांगली बाजूही तिच्या तोंडून ऐकायला मिळायची. हे सांगण्यामागे तिचं दुसरं कारण आपली मुलं अशा चुकीच्या मार्गापासून लांब राहावीत हे होतं.

केंड्या मांग हे पात्र तिच्या गोष्टीतून ऐकलेलं. आम्ही सर्व लहान मुलं केंडूबाप्पाकडे काय डेंजर माणूस, खतरनाक माणूस म्हणून बघायचो. हा उंचीने जरा कमी दिसायचा. पण गोऱ्या रंगाचा होता. पहिलवानाप्रमाणे गालावर वाकवलेल्या मिशा होत्या. त्यामुळे त्याचे ओठही दिसायचे नाहीत. याच्या डोळ्यांत भारी तेज. यानं नुसतं सहज जरी बघितलं तरी त्याच्या नजरेला नजर भिडवणं कठीण होतं. डोक्यावर स्वच्छ गांधी टोपी, पांढरा सदरा आणि एका हातात पांढऱ्याशुभ्र धोतरचा पंधा हातात धरून तो रुबाबात चालायचा. आमच्या समाजात इतका टापटिपीने राहाणारा माणूस लहानपणी मी पहिल्यांदाच पाहिला होता. चोपडा तालुक्यातील आडावद हे त्याचं मूळ गाव; पण तो काही नातेवाइकांना भेटण्यासाठी आमच्या गावाला कधी-कधी फेरफटका मारून येणार. गेला की एक दीड महिना मात्र दांडी मारणार. कला अवगत असल्यासारखी बोलण्याची हुशारी त्याच्याकडे होती. त्यानं बोलणं सुरू केलं की, आपोआप त्याची छाप समोरच्यावर पडणार. ती व्यक्ती त्याच्याबद्दल चांगलच बोलणार. तो जुनी सातवी पास होता. तो समजा गावात आलाच तर त्यांच्या नातेवाइकांकडे मुक्काम करायचा आणि आमच्या घरी चहापाणी घ्यायला यायचा. तेव्हा मात्र तो मोठ्या भावाचं पुस्तक घेऊन भावाला अभ्यास विचारायचा. गणित सोडवून दाखवणारा, सर्व पाढे म्हणून दाखवणारा तो एकटा होता. त्याच्या आईनं त्याला नोकरी मिळत असतानाही जाऊ दिलं नव्हतं. हे आईच्या सांगण्यावरून समजलं होतं. मी दुसरीचा वर्ग सोडून घरीच इकडे-तिकडे बिल्या हुस्कारतो हे त्याला खूप चीड आल्यासारखं वाटायचं. आई नात्याने त्याची लहान बहीण लागायची. 'अने याला शाळेत धाड' असं माझ्याकडे मोठे डोळे करून आईला बोलायचा. बापापेक्षाही वयाने मोठा असल्याने मी त्याला बाप्पा म्हणायचो. मला या माणसाविषयी नेहमीच कुतूहल जाणवत राहिलं. त्याला



कारणही होतं.

तो सातवी पास जुनी मॅट्रिक होता. उंची कमी लहान असली तरी पीळदार शरीर होतं व भयंकरच देखणा होता. त्याच्या बोलण्यात जादू होती आणि ते अभ्यासपूर्ण असे. त्यात हा चोर आहे म्हटल्यावर ते फारच वेगळे वाटायचे. मनात वेगवेगळे विचार यायचे. याची पद्धत इतर चोरांपेक्षा वेगळी होती. हा गावातल्या बैलजोड्या रातमरात चोरून दुसऱ्या बाजारात विकून टाकायचा. याने आमच्या शेजारपाजारच्या गावातल्या काही बैलजोड्या मध्य प्रदेशात नेऊन विकल्या. अशा गोष्टी ऐकायला मिळायच्या. असाच तो काही महिन्यानंतर आमच्या गावात आला. नातेवाइकांना भेटला. दुपारी आमच्या घरीही आला. नेहमीप्रमाणे बापाची दाजी म्हणून मजा घेत शेजारीच सुपाआत्याच्या भट्टीवर एकदोन हातभट्टीचे मारून नातेवाइकांकडे गावात निघून गेला. सकाळ झाल्यावर गावात एकच बोंबाबोंब उडाली. चौधरीवाड्याच्या मागच्या ढोरगोठ्यातून बैलजोडी चोरी गेली होती. गावातील सर्वच प्रतिष्ठित माणसं सर्व मांगाच्या दाराशी धडकली. आमच्या झोपडीसमोर येऊन गावाचा सरपंच विचारत होता. 'बाबू तुन्हाकडे केंड्या उन्था का?' बापानं जिभूला वाकून रामराम केला. केंड्या दुपारी आला नि निघून गेला पण रात्री कुणाकडे होता हे मात्र खरंच मला माहीत नाही. बापानं हे घाबरलेल्या शब्दांत जिभूला सांगितलं. आई नि बाप स्वतःशीच बडबड करत होते. ''हा केंड्याबी कश्याले तरफडतो आपल्या वरी. एकतर आपल्या पोटाचं पडलं अस्त. नि हा डोकश्याले तान द्यायले शिलगतो आढी.'' बाप एकटाच स्वतःशी बोलल्यासारखा बडबड करत होता.

समोरच पाटील समाजाचा दत्ता बाप्पाचा वाडा होता. त्या वाड्यात बैलजोडी, म्हशी, त्यांचा चारा असायचा. बाप्पा दिवसभर या वाड्यात बसायचा. त्यानं केंड्याला दुपारी आमच्या घरी बघितलं नि जातानाही पाहिलं होतं. त्यांनीही सरपंचांना हेच सांगितल्याने बापाची खरी बाजू सरपंचाला कळली होती. घरात बाप गुपचूपपणे आईजवळ बोलत होता. 'सांगता येत नी, केंड्याचच काम असेल हे.' बैलांचा आवाज न येताच त्यांना कसं वेगळ्या मार्गाने घेऊन जायचं, त्याला जंगलातले, इतर शेताबाजूचे, पायवाटेचे, आसपासच्या गावाचे सर्वच रस्ते माहीत होते. म्हणून तो कोणाच्याच नजरेला पडायचा नाही. इतर मांगांना ग्रामपंचायतेत बोलावलं तसेच बापालाही पंचायतमध्ये पोलिसांनी बोलवलं. तो तुझ्याकडे केव्हा आला, केव्हा गेला अशी विचारपूस करून सोडून दिले. बाप कमालीचा घाबरला होता. त्याने हातांच्या बाह्यांनी तोंडावरचा घाम पुसला बाप स्वभावाने गरीब नि प्रामाणिक आहे हे समद्या गावाला माहीत होतं. विनाकारण कोणतीही बला आपल्या अंगाशी येऊ नये म्हणून तो आधीच घाबरून असायचा. दुसऱ्यापायी आपलं कुटुंबाचं गावकाम असलेलं पोट भरण्याचं साधन हातातून निघून जाईल हीच भीती त्याच्या मनात जास्त होती. पण या वेळी मात्र केंड्यानं बैलं चोरले नव्हते. तो तर चोपड्यात आझाद चौकाच्या मांगवाड्यात दिवसाच पोहचला नि रात्रभर मांगवाड्यात मुक्कामाला होता. तरीही त्याला वाड्यातून उचलून नेलं. त्याच्याकडून काहीच हाती लागत नसल्याने पोलिसांनी संध्याकाळी सोडून दिलं.

तेव्हा शेतकऱ्यांची खरी धनसंपत्ती बैलजोडीच असायची आणि हा नेमका बैलजोडीच चोरण्यात पटाईत होता. गावातल्या व्यक्तिगत भांडणाचा वचपा काढण्यासाठी दुसऱ्याने ही बैलजोडी चोरून रातमरात पहाडात सोडून दिली. ती ढोरक्यांनी संध्याकाळपर्यंत त्या मालकाच्या घरी आणली. केंड्याबाप्पा कोणत्याही गावात गेला असेल तर त्या गावातल्या झोपडीतील लोकांना, गरीब नातेवाइकांना आजारपणासाठी,

अडीअडचणीसाठी पैसाआडका देऊन टाकायचा. बिकट प्रसंगात हा गरिबांना मदत करणार अशी पण याची एक बाजू होती. वेगवेगळ्या शहरांतील श्रीमंत माणसं याच्या मित्र कंपनीत होते. त्यामुळे तो कुठेही गेला तरी, त्याला कोणतीही अडचण भासणार नाही हे तितकंच खरं होतं. बोलण्यात, हिशेबात तो पटाईत असल्यानं बऱ्याच ठिकाणी त्याला चांगल्या कामासाठीही बोलवणं व्हायचं. पण याला नेहमीच भटकंती आवडायची. एका अशाच बैलजोडी चोरीच्या प्रकरणात हा पोलिसांच्या पाठलागात एका दगडावर पडला नि एक पाय निकामी होऊन कायमचा अपंग झाला. नंतर याच्या हातातली काठी कधी सुटली नाही.

हा पहाडासारखा हिमतीचा माणूस पार थकला होता. काही कामधंदा करू म्हणावं तर पायामुळे धड कोणतंच काम त्याच्याकडून होत नव्हतं. हा थकून बघून एखादा वाघ पिंजऱ्यात कोंडल्यासारखा दिसायचा. नातेवाइकांनाही याचे हे हाल बघून खूप वाईट वाटायचं. तो जेव्हा चोऱ्या करायचा तेव्हा तो म्हणायचा 'श्रीमंतांच्या घरी त्यांच्या आज्जांपासून विहिरी गच्च भरल्या आहेत. त्यातून बादली दोन बादली पाणी चोरून मी गरिबांना ग्लास-ग्लास वाटलं तर काय फरक पडतो त्यांच्या विहिरींना'? हे वाक्य तो थकला तेव्हा सर्वच गरिबांच्या लक्षात राहिलं. त्याने शेवट शेवटचे दिवस गावोगावी आपल्या नातेवाइकांकडे काढले. केंड्याबाप्पा त्याच्या गावीच वारला तेव्हा मी शाळेत नियमित जात होतो. चित्रांचं काम करत होतो आणि बॅण्डही वाजवत होतो. शेवटी त्याला भेटलो असतो तर बरं वाटलं असतं. मी शाळा शिकतो हे पाहून त्याच्या पाणीदार डोळ्यांतून मी शाळा न शिकण्याचा राग शांत होताना बघायचा होता. चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या माणसाच्या डोळ्यांत शिक्षणाचं महत्त्व मी पाहिलं ते विसरू शकत नाही.

तमाशा

माझ्यासमोर खूप गर्दी नि मी स्टेजवर ही गोष्ट मात्र माझ्यासाठी खूप नवी होती. बॅण्ड उभं राहून वाजवणं वेगळं. परंतु हे वेगळं वाटलं स्टेजवरून बघताना.

एखादं काम ध्यास घेऊन करत राहणं, ध्येयाचा पिच्छा करणं हेच माणसाला काही तरी मिळवून देत राहातं. आपण ध्येयामागे धावतो. परिस्थितीच या ध्यासाकडे जाण्याची आठवण करून देत राहते. चित्र काढणे हे शालेय जीवनातही छंद म्हणून नाही तर डोळ्यांच्या आत चिटकून गेल्यासारखं होतं.

गावात वर्षातून एकदोनदा तमाशा मंडळ यायचं. त्यातल्यात्यात 'भिका-भीमा लोकनाट्य' तंबूचा तमाशा जास्त करून यायचा. या तमाशाची पाटी-बाप डफडं वाजवत गावात फिरवायचा. त्यामुळे आम्ही तमाशाला तिकीट न घेताच पाहायचो. दुपारच्या वेळेत त्यांच्या राहण्याच्या तंबूत बाप वाजवण्याचे पैसे मागायला जायचा. मी हमखास त्याच्यासोबत जात असे. रात्रीच्या तमाशातला राजा, राणी, राजकुमार, राजकुमारी, डाकू हे मी सकाळी त्यांच्या रावळीत बघायचो. त्यांच्याविषयी मला भारी कुतूहल होतं. त्यांच्यात वाजवणारे, त्यांच्याविषयी तर खूप आकर्षण होतं. ते गावात चहापाण्याला आले की सगळे लोक त्यांच्याकडे बघत राहणार. पण यांना मी रावळीत प्रत्यक्ष भेटून येतो हा आनंद माझ्यासाठी वेगळा होता. हे सर्व लहानपणीचं आकर्षण होतंच. पुढे आठवीच्या वर्गात असताना हाच भिका-भीमाचा तमाशा गावाजवळ घाडेगावला आला. त्या गावाला मी हॉटेलच्या साईनबोर्डावर अमिताभ बच्चन काढलेला सर्वांना आवडला होता. हा साईनबोर्ड तमाशाच्या मालकालाही खूप आवडला. घाडेगावचा रजाळे नावाचा त्या तमाशातला एक जवळचा माणूस मला घ्यायला आमच्या गावी आला. घाडेगावला त्याच हॉटेलात रजाळे, मी आणि तमाशाचा मालक भिकाभाऊ चहा पीत त्यांना माझ्याकडून काय काम अपेक्षित आहे हे मला समजवून सांगत होते. त्यांच्या तंबूच्या मुख्य गेटला आजूबाजूला दोन नाचणाऱ्या बायकांचं चित्र पत्र्यांवर काढून हवं होतं. त्यांनी साहित्याला पैसेही दिले. दोन महिन्यांत आम्ही पुन्हा येणार तेव्हा ही दोन चित्रे देण्याचं ठरलं. हे काम खूप मन लावून केलं. त्यांनी दिलेल्या फोटोची हुबेहूब नक्कल सुंदर झाली होती. दोन महिन्यांनी जेव्हा त्यांचा तमाशा घाडेगावला आला तेव्हा तेही सात फूट x तीन फुटांचे पत्र्यावर काढलेली चित्रे घेऊन गेले. त्यांना हे काम खूप आवडले. जेव्हा पैसे घ्यायला गेलो तेव्हा कामाचे कौतुक केले. पैसे तितके दिले नाहीत; पण पुढचेही एक काम तुला देणार, असे सांगून पैसे हातात ठेवले.


पुढचं काम त्यांना प्रसन्न झालेले गुलाबबाबा हवे होते. त्यासाठी त्यांचा मॅनेजर माझ्याकडे येणार होता. तो अंमळनेर तालुक्याच्या 'गढखाम' या गावाचा. तोच मला

अनुक्रमणिका

फोटो देणार नि किती मोठं चित्र काढायचं हे सांगणार होता. ते नववीचं वर्ष होतं. हा मॅनेजर दिवाळीच्या आधी आला नि तीन फूट x तीन फूट एवढे मोठे गुलाबबाबांचे चित्र एक महिनाभरात काढून धरणगावला आणून दे असे सांगत पैसे टाकून गेला. महाराष्ट्रातलं तमाशा केंद्र अंमळनेर येथे असल्याने हा अशाच ठिकाणी असायचा. भिका-भीमा या तमाशाला गढखाम या गावानं मोठं केलं होतं. एक महिन्यानंतर त्यांचा तमाशा धरणगावला येणार होता. धरणगावच्या बाजारासाठी चोपड्याचे काही मांग झाडू विकायला जायचे. त्यांच्याकडे या मॅनेजरनं निरोप दिला. त्याने पाठवलेली चिठ्ठीचं आमच्याच गावच्या लक्ष्मामामींनी घरी दिली. शाळेतून आल्यावर चिठ्ठी वाचली. त्यात लिहिलं होतं, चित्र लवकर धरणगावला घेऊन येणे. एस.टी. बस स्टँडसमोर गुरांचा बाजार भरतो ते पटांगण. चित्र घेऊन मी दुसऱ्याच दिवशी धरणगावला पोहचलो. फ्रेम करायचे असल्याने चित्र प्लायवुडवर केले होते. चित्र आवडले पण पुन्हा पैसे कमी दिले.

तमाशात आमचा एक नातलग क्लॉरनेट वाजवायचा. तो घोडगावचाच भगवान मास्टर. त्यानं त्या दिवशी मला सहज थांबवून घेतलं. थंडीचे दिवस असल्याने रात्री स्टेजच्या मागे धुनी करून आग शेकत बसलो होतो. आपलं गाणं झालं की बायापण आग शेकायला यायच्या. ज्याचे पात्र संपले तो स्टेजमागे धुनीवरून यायचा. आपला रोल आला की परत उठून लाकडाच्या फळ्या असलेल्या पायऱ्यांवर चढून जाणार. आपल्या पात्राचे स्टेजवर पटापट संवाद बोलणार आणि परत हात शेकायला धुनीवर येऊन बसणार. धुनीवर बसलेल्यांच्या वेगवेगळ्या गमती सुरू राहाणार. 'शो' संपला की रात्री दोन वाजता जेवण असे. भाकरी आणि कसली तरी भाजी. जेवण झाल्यावर कोणी गप्पा मारणार, पाय मोकळे करू म्हणून फिरणार. यांची रात्रभरची कसरत बघत तीन वाजता झोपलो तर दुपारी बारा वाजता उठलो.

मी दुपारी निघण्याच्या तयारीत होतो. भगवान मास्टरने तमाशाचे मुख्य मालक भिका नि भीमा यांना माझ्या ट्रॉम्पेट वाजवण्याविषयी रात्री गप्पांमध्ये सांगितले होते. हा पेंटर तर आहेच; पण हा ट्रॉम्पेटमधला चांगला कारागीरपण आहे - अशी नव्याने माझी ओळख त्याने करून दिली होती. निघण्याच्या वेळी भगवान मास्टर म्हटला, ''अरे तुला ट्रॉम्पेट वाजवाला मालकानं



सांगलहे.'' मी म्हटलं, ''आई ओरडेल नि शाळाही बुडेल.'' भगवान मास्टरने काही ऐकले नाही. ''शाळेला काय करतोस? कारागीर म्हणून तुहे किती नाव हुईन.'' असे बोलत बोलत गावात बजरंग बॅण्डचे मालक असलेले आईचे एक नातेवाईक होते, त्यांच्या घरून पंधरा दिवसांसाठी चांगली ट्रॉम्पेट घेऊन आले. तमाशाचे सर्व कारागीर माझ्याकडे ट्रॉम्पेट बघून आश्चर्याने पाहात होते. त्यांना वाटले हा मुलगा तर चित्र द्यायला आला होता. चित्राचे त्या सर्व कलाकारांनी कौतुकही केले होते. हळूहळू त्या सर्वांना माहीत झाले की, मी ट्रॉम्पेटही चांगली वाजवतो. मी विचारात गुंतत होतो. रात्री कसे वाजवायचे? माझी तर या सर्वांबरोबर रिहर्सलही झालेली नाही. मास्टर म्हणायचा, तू कोणत्याही पट्टीत वाजवू शकतो. कारण त्याला माहीत होते मी यातला सर्वांत कमी वयाचा चांगला कारागीर आहे आणि सुरात वाजवणारा पण आहे. तरीही माझ्या मनात भीती होतीच. वाजवण्याची नाही पण ते जे फिल्मी गाणे सुरू करतील अचानक मला त्यांच्या आवाजाच्या पट्टीला धरून वाजवावे लागेल याची धाकधूक वाटत होती.

रात्र झाली. तमाशा सुरू होण्याची वेळही जवळ येत गेली. सगळे वाजवणारे कारागीर स्टेजवर आपापल्या जागेवर येऊन बसले. स्टेजच्या मागच्या पडद्याला खेटून डाव्या-उजव्या बाजूला ठरलेल्या ठिकाणी सर्व बसलेत. मी भगवान मास्टरजवळ खुर्ची टाकून बसलेला होतो.

अनुक्रमणिका

तमाशातील सुंदर आवाजाचा नेहमीच्या खास शैलीत शब्दफेक करणारा सूत्रधार तमाशाविषयी बोलला. भारदस्त आवाजाचा हा माणूस खूप सुंदर शब्दांची मांडणी करत होता. कुठलंही वाचून पाठांतर केलेले नाही अशी याची पद्धत होती. माझ्यासमोर खूप गर्दी नि मी स्टेजवर ही गोष्ट मात्र माझ्यासाठी खूप नवी होती. बॅण्ड उभं राहून वाजवणं वेगळं. परंतु हे वेगळं वाटलं स्टेजवरून बघताना. खूप मोठ्या गर्दीने दाटीवाटी करून खाली बसलेले आणि मी स्टेजवर हे मानपानासारखे वाटले. सर्वांचे लक्ष मी बसलेल्या या चौकोनी स्टेजवरून दुसरीकडे जाणार नाही हे मात्र मला ठाऊक होते. कोण काय चांगले वाजवतो, चांगला कारागीर कोण हे गर्दीतून कमीतकमी शंभर लोक तरी ओळखतील हे माझ्या डोक्यात होतं.

गवळणींचा बाजार सुरू झाला. मावशीचाही संवाद सुरू झाला. कृष्णा नि पेंद्या यांचे संवाद नि मग गाणं म्हटल्याशिवाय कृष्ण जाऊ देणार नाही म्हणून प्रत्येकीचं गाणं झालं. त्या वेळी मी त्यांच्या आवाजात मिसळत माझ्या ट्रॉम्पेटचा सूर काढला. सर्वांना हा आवाज स्पीकरमध्ये सेक्सोफोनसारखा वाटला. तमाशाबाहेर असणाऱ्या जाणकारांना भास झाला असेल की तमाशात क्लॉरनेट, सेक्सोफोनपण आहे. कारण गाणे म्हणणाऱ्यांना योग्य पट्टीत पकडण्यासाठी मला खूप कमी वेळ लागला. त्यांच्याबरोबर वाजवण्याचा हा पहिलाच दिवस होता. आमची गणगवळण संपली. मी स्टेजमागे येऊन पेटवलेल्या धुनीजवळ ट्रॉम्पेट पोटाशी धरून गुडघ्यावर आग शेकत बसलो. मास्टरने मला सांगितले होते यात कुठे वाजवण्याचा प्रसंग असला तर त्याआधी मी तुला सांगेन. तू झोपायला जाऊ नको असे जतवले. मी धुनीवर आग शेकत बसलो. हार्मोनियम, नाल आणि क्लॉरनेट या कारागिरांनी स्टेज सोडले नव्हते; कारण कोणत्याही प्रसंगात त्यांना मधला साईड आवाज देणे खूप प्रसंगाला आवश्यक असायचे. संगीत हा विषय तमाशाला जिवंत करतो हे मी अनुभवले.

सर्व ड्रेस घालूनच तिथे येऊन काम संपल्यावर बसायचे. पहिल्या दिवशी एका तिशीतल्या मुलीची ओळख झाली. ती वयाने मोठी पण दिसायला तरुण होती. ही नगरकडची. आम्ही गप्पा मारताना ती म्हटली, ''तू छान वाजवतो हे माहीत नव्हतं. तू चित्र काढतो इतकंच सगळे बोलायचे. पण तू ट्रॉम्पेट खूप चांगली वाजवतो.'' असं तिनं म्हटल्यावर मीही थोडा मोकळा झालो. कुठले, काय, विचारत संभाषण सुरू झाले. ती तिच्यापेक्षा वयाने मोठे असलेल्या तिच्या भावांना मदत करायची. तिचे दोन भाऊ कॉलेजात शिकत होते. ती त्यांना पैसे पाठवायची. त्यांचं घराणं आधीपासून तमाशात होतं. त्यांच्या घराण्यातले खूप मोठे तमाशातले प्रसिद्ध कारागीर होते. ती सांगत होती त्या गणामध्ये ती राणीची मुलगी असे. तिचे पात्र आले की ती जायची, संपले की पुन्हा सुरू असलेल्या जाळजवळ येऊन बसायची. असं तमाशा संपेपर्यंत चाललेला संवाद. तमाशा संपला. सर्व आपापल्या तंबूत गप्पा मारत थंडीला अंगाशी सांभाळत झोपले. दुपारी दोनला गप्पा मारताना हा पक्का तालासुरातला वाजवणारा आहे, असे सगळ्यांचे मत पडले. चांगला सूर मिळत ओळख वाढली. प्रत्येक दिवसाला अशी ओळख वाढत गेली. रोज रात्री मी गाण्यांना, नाट्यप्रसंगांना इतरांबरोबर वाजवायचो. असे एकामागून एक दिवस निघत गेले. मधेमधे घराचा, शाळेचा विचार यायचा. निघावं आता घरी असेही वाटायचे; पण पुन्हा संध्याकाळ व्हायची. रात्र व्हायची नि स्टेजवर वाजवायला बसलो की रात्री दोनला जेवण व्हायचे. हे सर्व अंगवळणी पडून जाईल की काय असे वाटायचे; पण आई, घर, शाळा या मधूनच डोक्यात घुसून या गोष्टी डोकं कोरायच्या.

पंधरा दिवस झाले. शेवटचा दिवस होता. दोनला पटापट जेवण आटोपून तंबू मोडण्याचे काम सुरू झाले. सकाळीच सहा वाजेपर्यंत नांदेड या मोठ्या शहरात जिल्ह्याच्या ठिकाणी तमाशा जाणार हे मला माहीत होतं. त्यासाठी मला आग्रहही सुरू होता. मी माझे पैसे घेतले नि रात्री तीन वाजता धरणगावच्या बस स्टँडसमोर धुनीवर आग शेकत बसलो. पाचला गाडी आहे म्हणून गाडीची वाट बघत वेळ निघून गेला. सकाळी नऊ वाजेपर्यंत मी घरी पोहचलो. आईजवळ द्यायला खिशातून पैसे काढले. आईचा संतापाचा पारा कसा कमी होईल याची मी वाट पाहात होतो. 'सिलगाव तुह्या पैस्याले, नाच्याले निघी जायं तमाश्यात रांडांबरोबर' असं खूप काही ती संतापाने बोलत मधेमधे शिव्या घालत होती. मला तिची सवय माहीत होती. उत्तरं दिलीत तर ती आगीसारखी भडकून बराच वेळ संतापात बोलत राहणार म्हणून ऐकत राहिलो. ती हळूहळू शांत होणार याची कल्पना होती. तिच्या

अनुक्रमणिका

माहीत असलेल्या सवयीप्रमाणे वागलो. गुपचूप शाळेच्या वह्या-पुस्तकं झटकलीत. शाळेला दांडी मारून पंधरा दिवस होऊन गेले. काय म्हणतील वर्गशिक्षक. मास्तर तर फारच खडूस. आई हळूहळू समजून जाईल पण यांना समजवणे कठीण. काय कारण सांगावे मोठा प्रश्न होता समोर. सरांना तब्येतीचे कारण सांगितले तरीही मार खावा लागणार. सरांनी खणकावून सांगितले, ''यापुढे जास्त दांड्या पडल्या की तू नापास होणार.'' आता दांड्या मारायचे सोडून शाळेत रोज येईल, असे मनाशी ठरवले. नववीच्या सुरुवातीच्या दिवसात 'आई' नावाचा निबंध सर्व वर्गाला सी.के. पाटलांनी दाखवला होता. पण आज मात्र निबंधाची वही पूर्ण झाली नाही म्हणून खूप फटके बसले. शारीरिक शिक्षण यांच्याकडे होते. यांनी त्यांच्या डाव्या हातावरची घड्याळ काढून पँटच्या खिशात टाकली की समजून [illegible]वे कुणीतरी मुलगा कामातून गेला आता. त्यांच्यासमोर मुले खाली मान घालूनच बोलत असत. खूप भयंकर दरारा. मराठी शिकवणे तसेच मन लावून असायचे. पुन्हा बँडचा सिझन सुरू झाला की अधूनमधून शाळेला दांड्या पडू लागल्या. शाळेत जाण्याचा अनियमितपणा जास्त वाढला. काही वह्या अपूर्ण. काही वह्यां पूर्ण. परीक्षा दिली आणि बँडमध्ये वाजवायला मोकळा झालो.

भाऊ तेव्हा अंमळनेरच्या प्रताप कॉलेजला बी.ए.च्या शेवटच्या वर्षाला होता. मे महिन्यात निकाल लागला पण सिझन सुरू असल्याने मी घ्यायला पण गेलो नाही. कोणी वर्गातला मित्र भेटला की मनात भीती दाटून यायची. मी नापास असे तर सांगणार नाही ना हा, असे मनात प्रश्न यायचे. जास्त गैरहजर राहिला तर नापास होशील, असे वेळोवेळी सांगणारे वर्गशिक्षक आठवायचे. शेवटी निकाल बघितला. 'नववी नापास!'

जून महिना लागला. माझ्या वर्गातली सगळी पोरं दहावीच्या वर्गात गेले. पार मनातून खचलो. मित्रांजवळ खूप रडलोही. खूप उदास वाटायचे. मी आता आयुष्यभर बँडच वाजवेल की काय असे वाटत राहायचे. दिवस असूनही सगळीकडे अंधारून आल्यासारखे वाटत राहायचे. अधूनमधून शाळेत जायचो. क्रिकेटमधले कॉलेजात शिकणारे मित्र खूप समजूत घालायचे. विजय लुल्हे सुतार गुरुजींचा मुलगा हा माझी खूप काळजी घेत असे. तासन्‌तास माझ्यासाठी द्यायचा. वेगवेगळी उदाहरणे देऊन समजूत घालायचा. मी शाळेत गेलो की नाही यासाठी घरी येऊन तपास करायचा. हा अमरावतीला इंजिनीअरिंगच्या डिप्लोमाला नापास होऊन घरी बसला होता. तो त्याचेही उदाहरण द्यायचा. गावात मी साईनबोर्डचं काम एका टेबलावर उभा राहून करत होतो. त्याने मला खाली उतरवले. माझ्या घरून आणलेली वह्यापुस्तके माझ्याकडे दिलीत नि शाळेच्या गेटपर्यंत पोहचवले. असे त्याने बऱ्याचदा केल्याने मग मलाही शाळेत जावेसे वाटायला लागले. दहावीला गेलेले मित्र काहीही म्हणो पण शाळेत जायचे असे ठरवले. इथून मात्र नियमित शाळेत जाणे सुरू झाले. उदास वाटणारे दिवस मागे निघून गेलेत. मित्र चांगले मिळाल्याने मनातून पूर्ण खचून गेलेला मी पुन्हा उभा राहिलो. उत्साह मनात आणत पुढे जात राहिलो.

गणपती

कलेचे लोक बदमाश असतात. तो नवा आहे. त्याला शिकायला वेळ लागेल. आपल्याच शेतातल्या मातीची मूर्ती करायला सांग त्याला असे सांगितले नि मी अगदी चिंतेच्या दारातून उडी मारून मोकळा झालो.

गावात मोठा गणपती बसवण्याची सुरुवात आमच्या इंदिरा प्लॉट या गावाबाहेरच्या भागातून झाली. गावात आपल्या घराच्या ओट्यावर, पुढच्या खोलीत शाळेची लहान मुले गणपती बसवायचे. सर्वांत मानाचा गाव गणपती राममंदिरात बसायचा. मूर्ती तशी लहानच असायची. पण तो गावाचा आहे म्हणून तो सर्वांना माहीत होता. माझं हे सातवीचं वर्ष होतं. या वर्गात मी सर्वांत वयाने मोठा. तरी बऱ्यापैकी वर्गातली मुलं माझ्या बरोबरीची दिसायची. त्याआधी मी लहान आकाराचे मातीचे गणपती बऱ्यापैकी बनवायचो. असंच मूर्ती बनवत बनवत मी सातवीला गेलो. त्याच वर्षी येसू हा सूरतवरून चार-दोन वर्षं राहून आला होता. येसू लग्नाच्या वयाचा. एका पायाने पूर्ण अपंग. तो चांगल्या पायावर हाताचा टेका देत अपंग पाय पुढे टाकायचा. पण हा खूप भारी. त्याच्या गोष्टींमध्ये आम्ही पोरं अर्धे सूरत फिरून यायचो. सर्व शेतात कामाला गेलेत की याच्या घरात हा एकटा. मग याला अनेक बुद्ध्या सुचायच्या. असेच गणपतीचे दिवस जवळ आलेत. येसू म्हटला, ''बाप्या आपन मन्हाच घर गणपतीनी मुर्ती बनाळूत'' त्याच्या सांगण्याने मलाही वाटले आपण याच्याच घरी मूर्ती बनवू या.



शेतातून चार-पाच टोपल्या काळी माती आणली. तिला गाळून छान लोण्यासारखी करून त्यांच्याच घरातल्या एका लाकडी पाटावर मूर्ती बनवायला सुरुवात झाली. मूर्ती कशी बनवायची याचे कोणतेही गणित माहीत नाही. मूर्ती मात्र छान बनली. मातीची आकाराची मूर्ती बघून प्लॉटमधल्या लोकांना खूप मोठे आश्चर्य वाटले. तीन फुटांपेक्षा मोठ्या आकाराची उभी असलेली मूर्ती प्लॉटमधल्याच नाही तर गावाच्या बऱ्याच लोकांनी पाहिली नव्हती. मुलांनी गावात इतकी मोठी मूर्ती पहिल्यांदाच पाहिली होती. या विषयाचे मात्र खूप भारी कौतुक झाले. सर्व गावाचे शेतमजूर प्लॉटमध्येच राहायचे.

येसू बोलायला पटाईत होता. प्लॉटमधल्या मूर्ती बघणाऱ्यांना तो सांगायचा, ''मूर्ती तर एवढी मोठी बनी राहीनी पण तिल्हे रंगले पैसा नहीत''. त्याच्या या बोलण्याने बऱ्याच लोकांनी पटापट पैसे जमा केलेत. रंग देऊन ही मूर्ती अधिक देखणी झाली. मूर्ती बघून मोठ्या माणसांनीही या विषयाकडे एक पाऊल टाकले. खूप बायकांनी साड्या दिल्यात. साड्यांचं डेकोरेशन करून मुख्य रस्त्याला लागून असलेलं येसूचं घर, घराला लागून मोठं पिंपळाचं झाड, झाडामागे मुंज्याचं मंदिर आणि त्या पिंपळाच्या झाडाला लागूनच पहिल्या वर्षी प्लॉटचा मोठा गणपती बसला. ही गोष्ट पूर्ण गावभर झाली. सर्व लहान्यांपासून ते मोठ्यांपर्यंत गणपती बघायला येत होते. एक गणपतीचे कॅलेंडर समोर ठेवून ही मूर्ती बघून बघून पाच-सात दिवस मन लावून केली होती.

या मूर्तीचे गावभर कौतुक झाले. येसू या उद्योगनगर गणेश मंडळाचा पहिला अध्यक्ष झाला. ''माय तेल्हे का गणपती प्रसन्नसे.'' असे म्हाताऱ्या बाया म्हणायच्या. ''बाबू मांगना पोऱ्या मुर्ती गयरी चांगली बनाव्हस.'' हे ऐकून खूप उत्साह वाटायचा. येसूचं प्लॉटमधलं घर मुख्य रस्त्यावर होतं. त्या रस्त्याकडून गावाचे सर्व मजूर आणि गाडेबैल शेतात जायचे. सर्व बायामाणसं दर्शन घेऊन कामावर जाणार. खासकरून मूर्ती बघायला थांबणार. 'गावाला चांगला कारागीर लाभला' असेही म्हणायचे. दुसऱ्या वर्षी वीस-बावीस दिवसांआधीच राममंदिरची गणपतीची मूर्ती मी बनवावी, असा निरोप बाजारपट्ट्यातून बापाने माझ्यासाठी आणला. भाला- बापू ही गावाची नामांकित व्यक्ती बापाला भेटली होती. त्यांनी बापाचे तोंड भरून कौतुक केले होते. तेव्हा मोठा भाऊ अंमळनेरच्या प्रताप कॉलेजला एफ.वाय.बी.ए.ला होता. 'गरिबीच्या घरात तू सोनं उगवलं हे तुझ्या इमानदारी निकष्टाचं फळ आहे' अशा शब्दाने भालाबापूंनी बापाचं कौतुक केलं. आयुष्यभर अंगावर कष्टाचा आलेला घाम आनंदाने त्याच्या आत जिरून गेला. त्यावेळी त्याला झाड झाडासारखे वाटले, सूर्य सूर्यासारखा, दिवस दिवसासारखा वाटला.

भालाबापूचे गावाच्या कोणत्याही राजकीय पदावर नसताना स्वतंत्र असे एक नैतिक वजन होते. राममंदिराची व्यवस्था बघणार. गावात नाट्यमंडळाची सुरुवातही त्यांनीच केलेली, हे माझ्या ऐकण्यात होते. बाजारात तलावाच्या पनगटाजवळ ट्रॅक्टरसाठी असलेल्या पत्रांच्या शेडच्या बाजूला बापू खुर्ची टाकून बसले होते. मी त्यांच्या घाऱ्या डोळ्यांना घाबरायचो. अर्थात त्यांचा वेगळा असा रुबाबही होता. मी दोन्ही हात मागे घेऊन त्यांच्या समोर उभा होतो. ''आपल्याला राममंदिराचा गावगणपती तुझ्या हातून बनवायचा आहे. पण तालुक्यावर ज्या मातीच्या मूर्त्या बनतात त्याच मातीची मूर्ती पाहिजे. म्हणजे तू साध्या मातीची बनवतो त्यापेक्षा अजून तुला सफाईदार बनवता येईल.'' माझ्या हातात गाडीभाड्यासह तालुक्यावरून माती विकत आणायला पैसे दिले. मोठ्या उत्साहात मी तालुक्याला गेलो. आझाद चौकाजवळच्या मशीदकडे सरळ जाणाऱ्या रस्त्याला कविकुमारचा फोटो स्टुडिओ होता. या स्टुडिओशेजारीज एक मूर्तिकार खूपच सुंदर मूर्ती बनवायचा. याला मोठ्या धाडसाने विचारले, ''तुम्ही मूर्ती बनवता ती माती विकत देणार का?'' त्यानं माती दिली तर नाहीच पण चुकीचा सल्ला मात्र दिला. मी याला बऱ्याचदा काम करताना पाहायचो, तो रागानंही

बघायचा. कुणीच इतकं वेड्यासारखं थांबत नाही पण हा काय इतका वेळ थांबतो या नजरेने मूर्ती बनवताना अधून-मधून बघायला. यामुळेही त्याच्या लक्षात मी राहिलो असेन. त्याने मला लांबूनच प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या पॅकिंगचे दुकान दाखवले. त्या मातीच्या पाच लहान पिशव्या घेऊन याच्यासारखीच मूर्ती आता मी बनवणार हा विचार डोक्यात घेऊन निघालो. घराच्या बाजूला एका पडक्या खोलीत बादलीत पाणी घेत मोठ्या तगारीत पिशव्या फोडून-फोडून टाकल्यात नि पाणी टाकून कालवायला सुरुवात केली. ओल्या मातीत हात टाकल्याबरोबर हाताला जोराचे चटके बसले आणि तसेच गरमगरम मातीचे गोळे असल्यावरही मी गणपतीच्या आकारासाठी ठेवत होतो. अर्धा एक तासात पाहतो तर सर्व माती कोरडी होऊन टणक झाली होती. पुन्हा पाणी टाकून प्रयत्न करावा तर तिचं काहीच होत नव्हतं. मनात भीती दाटून आली आता कसे होईल. इतक्या मोठ्या माणसाला कसं सांगावं की, मला मूर्तीची माती कोणती असते हे माहीत नव्हते. मोठा प्रश्न डोळ्यांसमोर यायचा. बापूंना बापानेच सांगितले माझ्या चुकीबद्दल. कलेचे लोक बदमाश असतात. तो नवा आहे. त्याला शिकायला वेळ लागेल. आपल्याच शेतातल्या मातीची मूर्ती करायला सांग त्याला असे सांगितले नि मी अगदी चिंतेच्या दारातून उडी मारून मोकळा झालो.


गावाचा मान असणारी राममंदिराची मूर्ती बनवली. प्लॉटमधली मूर्ती त्यावेळी पाच फुटांची बनवली. शेतातल्या मातीला तडे पडणार नाही याची काळजी घेत बनवली. त्या वर्षी येसूच्या घराच्या दारावरचे छत खोलून ही मूर्ती घरातून बाहेर आणली हाही त्या वेळी चर्चेचा विषय झाला. गावाच्या मातीला रंग देतानाचा वास मी आजही विसरलो नाही. तो कसा आहे याची व्याख्या नाही करता येत; पण तो येतो आणि समजतो. स्वतः भालाबापू राममंदिराची मूर्ती पाहून खूश झाले होते. उद्योगनगरात येसूच्या घरासमोरची थोडी जागा तेली बाप्पाच्या किराणासाठी टपरीला दिली होती. काही महिन्यांपासून अरुण हा त्यांचा मोठा मुलगा ही टपरी खूपच जोरात चालवत होता. अरुण चौधरी हा तिशीच्या आत असलेला देखणा उंच गोरापान, दाढी असलेला, एखाद्या सिनेमातल्या जितेंद्राच्या पात्रासारखा दिसायचा. या वर्षी मात्र अरुणलाच या मंडळाचा अध्यक्ष केलं. येथून दोन वर्षं पूर्ण प्लॉटला जेवणही गणपतीत दिलं. अरुण तेली म्हणजे गावाच्या सर्व राजकारणाचा अभ्यास असलेली तरुण व्यक्ती. सहा फूट उंची. आपल्या बोलण्यातून खूप प्रखरतेने समोरच्यावर छाप पाडणारा. याच वर्षी तालुक्यातील मुख्य पोलीस अधिकारी यांनी मूर्ती बघून पाचशे रुपये बक्षीस दिले. शालेय बक्षिसाव्यतिरिक्त पहिल्यांदाच मला बक्षीस मिळालं होतं. बापाला स्वतःचीच उंची वाढल्यासारखे व्हायचे.

अरुण तेलीचं जगण्याचं तत्त्व खूप वेगळं होतं. त्याला माणसं कळायचे. एक वेळा एखादी व्यक्ती भेटली की त्याचा चेहरा वाचून काढायचा. 'मानूसनी सेनं भो येळ हुई जावं, एकतर तेव्हा हा सगळा तानचं मिटी जासं, म्हणजे तेन्ही सगळाच झन कायजी लेयस नि तेल्हे येड म्हनीसन सोडी देथसं' हे त्यांचे बोलणे पोरांच्या डोक्यावरून जायचे. त्या दोन-तीन वर्षांत तो कपाशीचा मोठा व्यापारीही झाला. आर्थिक बाजू भक्कम झाली. सर्वच मोठमोठ्या माणसांमध्ये बसणं-उठणं सुरू झालं. मी गाव सोडून बाहेर शिकायला निघालो तेव्हा हा अरुणशेठ होता. सुट्ट्यांमध्ये घरी यायचो त्या दोन वर्षांत तो कधी भेटला नाही. नंतर बाजारात धावती भेट झाली. त्याचा व्यापार संपल्यात जमा होता. त्याची ही स्थिती कशी झाली याविषयी जास्त काही कळलेच नाही. पुन्हा अजून काही वर्षं गेलीत. गणपती बसायचा त्याच्या समोरच्या गोठ्यात. त्यानं गावठी दारूचा अड्डा सुरू केला. खूप दारूही प्यायचा. यामुळे त्याचं एक मोठं ऑपरेशन झालं. त्यानंतर मात्र हा पार खंगला होता. तरीही त्याचे पिणे काही सुटले नाही. शेवटी अजिबात त्राण नसल्यासारखा दिसायचा. अरुण तेली गेल्यानंतर महिनाभरानंतर कळलं. गणपती बसवायचो त्या जागेवर येसूच्या भावाच्या मुलांनी मोठं घर बांधलं. अरुणचा अड्डा होता त्या जागेवरही एक घर बांधलं गेलं. येसूही तसाच गेला. ही दोघे माणसे माझ्या चित्रांच्या कागदावर मला भेटतात. त्यांचा जगण्याचाही आकार होत राहतो. चित्रात आठवणींना बांधून ठेवल्यासारखा.

बॅण्ड

खूपच नाद भरल्यासारखा मी वाजवायचो. दिवाळीनंतर सिझन सुरू होणार त्या आधीच माझी तब्येत खराब झाली. इतकी की नाकातून आणि तोंडातून रक्त पडायचं.

आमचा बॅण्ड सुरू झाला त्याच्या आधी



गावापासून दक्षिणेला पंधरा मैल अंतरावर अनेर नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या घाडेगाव या गावी 'इकबाल बॅण्ड' त्या वेळी बराच प्रसिद्ध होता. त्यात मगन हा आमच्याच गावाचा नात्याने मामा त्या बॅण्डमध्ये ढोल वाजवायचा. त्याचा मोठा भाऊ जगन हा आमच्या बॅण्डमध्ये ट्रॉम्पेट वाजवत होता. मगनने सिझनच्या सुरुवातीचे बेने आमच्यात वाजवले नि वडिलांना बोलला 'दाजी तुम्हले तुमचा बॅण्ड जर अजून चांगला करी घ्याचा असीनं तर मह्या मालकाकडे सर्वा बॅण्डचा कंट्राक करी घ्या.'' बापाला मगनने पटवून-पटवून सांगितलं. अजून सिझन सुरू व्हायला वेळ होता. हा दुसऱ्या दिवशी गेला नि इकबाल मास्टरला लासूरला घेऊन आला. आमच्या बॅण्डचे तसे हे जेमतेम दुसरेच वर्ष होते. इकबालकडे दोन वेळचं जेवण आणि सहा माणसे बॅण्डच्या सामानासह असा कंत्राट झाला. चार महिने सिझनचे वाजवून द्यायचे. त्या बदल्यात तीन हजार रुपये मिळणार होते. सर्व बोल्याबंधन झालं. कंत्राट ठरला. आम्ही सर्व आपापले सामान घेऊन पायीच निघालोत. बाप गावकामासाठी घरीच थांबला होता. सर्व सामान त्यांच्या बॅण्डच्या रिहर्सल करण्याच्या खोलीत ठेवलं. यांची रिहर्सल खूप काटेकोरपणे चालायची. ग्रामोफोनवर काळी तबकडी ठेवून एक-एक गाण्याचा तुकडा बसवायचे. आम्ही सर्वच नवीन वाजवणारे. आमच्यासाठी इथे शिकण्यासारखं मात्र खूप काही निश्चितच होतं. एक पडकं धाब्याचं घर आम्हाला राहायला दिलं. तेथेच घरामागे एक चूल होती. स्वयंपाकाला सिझनभर लाकडं पुरतील एवढे दिले. सकाळी नि संध्याकाळी भाजीपाला. त्यांनी सांगून दिलेल्या भाजीवालीकडून गावातून आणायचा. कुणी मिरची वराठ्यावर वाटणार तर कुणी पीठ मळणार, पोळ्या करणार, पाणी भरणार. मी लहान असल्याने लहान पत्र्याच्या बादलीने विहिरीवरून पाणी आणायचो. मोठा भाऊ भाकरी करायचा. आंघोळीला काही दिवसांनी सरळ नदीवर जात असू. कपडेपण नदीवरच धुऊन वाळले की अंगावर चढवायचे. मी ट्रॉम्पेट जेमतेम वाजवायचो. इकबाल मास्टर क्लॉरनेट खूप बेहतरीन वाजवायचा. त्यात त्यांचे सर्व कारागीरही चांगले वाजवणारे. मात्र आम्ही कमकुवत पडायचो.

मी लहान असल्याने दोन-तीन बेनं त्यांनी मला ट्रॉम्पेट वाजवू दिली. नंतर गोले वाजवायला लावले. ट्रॉम्पेट काही लग्नांना वाजवल्याने माझी तब्येत खराब झाली होती. हे पण एक कारण होते मला ट्रॉम्पेट न वाजवू देण्याचे. पिऱ्या हरदास 'इकबाल' बॅण्डचा मॅनेजर. बॅण्ड याचा नव्हता पण हा मॅनेजर म्हणून बॅण्डच्या मागेपुढे राहाणार, बेनं घ्यायला इकबालबरोबर मालकासारखा जाणार. जिथे वाजवायला गेलो की तिथे याचा एक वेगळा थाट राहाणार. पिऱ्या हरदास म्हणजे नुसता बडम्या. बॅण्डचा मालक म्हणून तो लग्नाघरी येणार. पायात करकर आवाज करणाऱ्या वहाणा, पांढरं धोतर, नेहरू शर्ट, त्यावर काळं जाकीट आणि जाकीटच्या खिशात चार चष्मे. सोनेरी फ्रेमचा वेगळा, काळ्या फ्रेमचा वेगळा, अजून दोन वेगळे चष्मे. नाकात ओढण्याची कमला तपकीर एका देखण्या तांब्याच्या डबीत टाकलेली. ती डबी मात्र कायम हातात. लग्नाघरी बॅण्डची हजेरी सुरू झाली, की हा बॅण्डच्या मधोमध उभा राहाणार. डोळ्यांवर काळा चष्मा आणि हातातली डबी वाजवत मान डोलवणार. खांद्याला झटके देणारा बॅण्ड किती चांगला वाजतो आहे असं दाखवणार. टाळीच्या वेळेस याचा चष्मा बदलणार नि जाकीटसुद्धा. साला हा भलताच दिलखुलास जगणारा वाटायचा. तो व्यापारही करायचा. त्याच्या बायकोकडूनच आम्ही भाजीपाला

घ्यायचो. हा मात्र हजरजबाबी. कुणालाच बोलू न देणारा. त्याची बायकोनंपण याला मोकळं सोडलेलं. याच्या खिशातच आमच्या हिशेबाची डायरी असायची. इकबालकडून पैसे उचल करत करत बरेच पैसे होऊन गेलेत असं तो अधूनमधून सांगायचा. ज्या दिवशी बेनं नसेल ती रात्र नदीवर सायकलचे जुने टायर घेऊन जाणार. पेटवले की नदीतून धांगु, मन्स्या हे खेकडे पकडून त्यांचे आंगठे मोडत आमच्याकडे फेकले की आम्ही शर्ट काढून शर्टच्या कपड्यात जमा करणार. धांग्या नि मन्स्या जंगल फिरणारे. पण आमच्या बॅण्डमध्ये सिझन आलं की वाजवणारे असं त्याचं काम. जंगल ते बॅण्ड असा प्रवास करणारी माणसं. बॅण्डमध्ये ते एकच घाई करीत. वाजवायचे. त्यांना रिहर्सल काय माहीत म्हणून थोडा वाजवायला त्रासही व्हायचा.

सिझन संपलं. हातात काहीच मिळालं नाही. खाऊन पिऊन ढुंगनाला हात पुसत आम्ही घरी आलो. पण चांगला बॅण्ड कसा, त्याची रिहर्सल कशी एवढं मात्र सोबत मी तरी आणलं होतं. कंत्राट संपला होता. ही रिहर्सल बघून मी ट्रॉम्पेट सोडत नव्हतो. काय करावं बऱ्याचदा असं वाटायचं. यांच्यासारखा ग्रामोफोन रिहर्सलला असला पाहिजे, गाणं कोणत्या पट्टीत बसवायचं आणि त्यातले बारकावेही त्याशिवाय समजणार नाही हे पण तितकच महत्त्वाचं होतं. असं वाटत राहायचं. खूपच नाद भरल्यासारखा मी वाजवायचो. दिवाळीनंतर सिझन सुरू होणार त्या आधीच माझी तब्येत खराब झाली. इतकी की नाकातून आणि तोंडातून रक्त पडायचं. गावातल्या डॉक्टरांना दाखवून काहीही उपयोग होत नाही. तब्येत खूप खालवल्याने चोपड्याला आईबाबा घेऊन गेले. जीजीकडे थांबून आझाद चौकाजवळच्या दवाखान्यात दाखवले. रक्त मात्र थांबत नाही हे बघून आईबापाला मांगवाड्याचे सर्वच नातेवाईक कावळ्याच्या टोचा मारल्यासारखे बोलायचे, ''आने इवल्याश्या पोराले ट्रॉम्पेट वाजवणं शिकवलं हे काही मले पटलं नाही.'' असं जीजी बोलायची. ''त्यान्हले पैसे कमायाची पडली भो पोऱ्याच्या जीवशी खेयसिनं.'' कोणी असं काहीही बोलत राहायचं. आईबाप दोघेही तोंड उतरवून बसायचे. आझाद चौकाच्या मशीदजवळ एक भूतळाबाईचा दवाखाना. लाकडी जिना चढून वर गेलो. आई व जीजीने त्या दवाखान्यात दाखवले. पहिल्या दिवशी रक्त बऱ्यापैकी थांबले होते. आठ दिवस रोज डॉक्टरांना दाखवायचे. त्यांच्या औषधाने काय होते हे बघून ते पुढं काही पुड्यांमध्ये औषध बांधून देत. आठ दिवसांत बरा होईल, डॉक्टर सांगत होते; पण सांभाळा असेही सांगितले.

गावी आल्यावर आई म्हणत होती बापाला, ''पोरगं वाचलं-जगलं घीजा त्याल्हे मांगीरबाबावर नारयं फोड्याले''. गावाच्या पूर्वेला चौगाव आणि लासूर याच्या मधोमध मांगीरबाबा म्हणून आमचा देव होता. त्याला नारळ फोडले. निंबाच्या पानाने आंघोळ घातली. आईने बापाला जतवले, ''हे काही त्याचवालं वाज्याचं वय नी.'' बापाने एक वर्ष माझ्या हातात ट्रॉम्पेट दिसू दिली नाही. एकतर माझी वाजवण्याची इच्छा असून वाजवू देत नाही. मी वाजवत नाही हे आईला समाधानासारखं होतं. तिच्या मनात सारखी भीती, की पुन्हा असं काही झालं तर मुलगा हातात सापडणार नाही. माझी वाजवण्याची इच्छा आणि तिची चिंता अशा तऱ्हेनं दोघांच्या मनाशी खेळणारे वर्ष निघून गेले. पुन्हा एक वर्षाने ट्रॉम्पेट हातात घेतली. सिझनमधल्या पैशांत पहिल्यांदा ग्रामोफोन घेतला. डोक्यात असलेल्या रिहर्सलच्या मागे लागत इतर मोठ्या बॅण्डसारखं आपण का वाजवू शकत नाही हा विचार करत बॅण्ड मोठा होत गेला. शेवटच्या टप्प्याला बॅण्ड पंचवीस माणसांचा झाला. खूप लहानपणी मी ट्रॉम्पेट वाजवली यामुळेच हा त्रास मला झाला ही फक्त आईच्या मनात साठवलेली गोष्ट आहे.

धुपी

बऱ्याचदा तिला आकडा लागायचा म्हणून दुसरी बायामाणसे ती काय लावणार यावरही पाळत ठेवत असत. नाही तर विचारायचे, ''काय लावलं धुपे आज.'' मग तिला विचारून सट्टा लावायचे.

दिवस मावळण्याची वेळ. आईने चिमणी लावून झोपडीत जाणवणारा अंधार बाजूला करून बापाला भाकर मागण्याची टोपली हातात देणार तेव्हाच लोकांची गर्दी झोपडीजवळ येऊन पोहचली. जोरजोराचा आवाज होत होता. बाया, माणसं, मुलं जवळपास सगळी भिलाटीच झोपडीसमोर येऊन घाण शिव्या, मारून टाकण्यापासून ते हातपाय तोडण्यापर्यंतची भाषा करत होती. 'घरमासं तो रांडना' हा आऱ्याचा भावाचा आवाज मी घरातून ऐकला. घाबरलेल्या स्थितीत बाप



झोपडीबाहेर येऊन भाकरीची टोपली बाजूला ठेवून शरीरभर थरथरत होता. काय झालं आईबापाला काही एक समजत नव्हतं. मी चुलीच्या कोपऱ्यात लपून बसलो होतो. आन्याच्या आईने आन्याला आईच्यासमोर खाली ठेवलं. 'म्हनं लकरू नं तंगड तुन्ह्या पोऱ्यानी मोडी टाकं. भरतं बरंस न्हातं...' जोरजोरात आन्याचे आईवडील बोलत होते. त्याचा मोठा भाऊ तर अजून जास्त सनकी, बेडर होता. तो आईला धमकवून सांगायचा, तो कुठेही भेटला तर त्याचे तंगडे मोडल्याशिवाय राहणार नाही. आई दरवाजात सगळ्यांना अडवून उभी होती.

झाले असे होते की, घोडी घोडी खेळताना माझ्या उडीनंतर दुसऱ्या मुलाने त्याच्या पायावर जोरात उडी घेतली नि त्याचा पायाचा कट्कन आवाज आला होता. पाय मोडल्याचे सर्व पोरे ओरडत असतानाच मी घराकडे धाव घेऊन भीतीने घरात बसलो होतो. आता आपले कसे होईल ही काळजी वाटत होती. त्याचे नातेवाईक, आईवडील, त्याचा भाऊ ही सगळी खतरनाक माणसे होती. त्यांच्यासमोर आईवडिलांचे, आमच्या सर्व घराचे कसे होईल या चिंतेने मी अर्धमेला झालो होतो.

आईबाप दोघेही खूप घाबरलेल्या स्थितीत त्यांना दाराजवळच थांबवत, त्यांच्या पाया पडत, भांडण मिटवण्याचा प्रयत्न करत होते; पण तरीही कुणीच मानायला तयार नव्हते. बापाने त्यांच्या पाया पडत थोडा माहोल शांत होईल असे केले. आन्याला त्याच्या आईने कडेवर घेत सर्वांसह ग्रामपंचायत गाठली. आईबाप हे दोघेही त्यांच्यासोबत ग्रामपंचायतेत हे भांडण घेऊन पोहचले. सरपंचाने सांगून टाकले, "बाबु तुल्हे या पोऱ्याले दवाखानाया लि जानं पडीनं, त्यान्हा सगळा खर्च तुल्हे भरनं पडीनं." हे ऐकून आईने भांडण मिटावे यासाठी हो म्हणून दिले. सकाळीच मुक्कामाच्या गाडीनं आन्या आणि त्याचे आईवडील यांचे गाडीभाडे भरून आई त्यांना चोपड्याच्या दवाखान्यात घेऊन गेली. नंतर दुपारच्या गाडीने बाप मला घेऊन चोपड्याला गेला. आझाद चौकात आईची मोठी बहीण 'जीजी'कडे मला सोडून परत गावी जाऊन त्याने घरातल्या दोन बकऱ्या दुसऱ्या दिवशी चोपड्याला विकण्यासाठी पायी घेऊन आला. तोपर्यंत आई दवाखान्यात आन्याजवळच होती. त्याचं जेवण ती जीजीकडून बनवून घेऊन रोज जात होती. बापाने बकऱ्या विकून दवाखान्याचे पैसे भरले. त्याच्या पायाला पाटा बांधला. काही गोळ्या औषधी घेतल्या. संध्याकाळच्या गाडीत त्यांना बसवून ते दोघे जीजीकडे आले. आई व जीजी गप्पा मारताना जीजीचे आईच्या हाताकडे लक्ष गेले. तिच्या अंगाला हात लावत जीजी म्हटली, "अने काय झालं वं तुह्या हाताले?" आईने हात पदराखाली घेत वेगळ्या विषयाला सुरुवात केली. त्या दिवशी बापाने मला मारताना ती आडवी आली म्हणून तिच्या हाताला काठी मारली होती. तिच्या हातावरचा वळ माझ्या चुकीमुळे आला हे मात्र मनाला खोलवर टोचल्यासारखं होतं. सकाळी दोघेही घरी जाताना जीजीला खूप सूचना देऊन सांगत होते. याला इकडे तिकडे फिरू देऊ नको. ते लोक खूप खतरनाक आहेत. तालुक्यावर ते कधीकधी येतात. डूख धरून आहेत ते याच्यावर. हा शहरात कुठे सापडला तर ते याचे काहीही करून टाकतील. सांभाळ याला. मी अधूनमधून येत राहील. दोन महिने याला तुझ्याकडेच ठेव, असे जतवून जतवून सांगत होते. ते शेवटच्या गाडीने घरी निघून गेले. दोन महिन्यांसाठी आता इथे थांबावे लागेल. ही आईला सोडून राहण्याची शिक्षा खूप जास्त झाली होती. रविवारच्या बाजाराला येत जाईल अशा पद्धतीने समजूत घालून आई घरी निघून गेली होती. मी एकटा कधीही

कोणत्याही नातेवाइकांकडे राहिलो नव्हतो. आईबरोबर जीजीकडे-मामाकडे चोपड्याला यायचो, पण एकटा राहण्याचा हा पहिला प्रसंग होता. गावाला गेलो तर आन्याचा भाऊ मला मारेल ही पण भीती होती. म्हणून इथेच राहिलेले बरं अशी मनाची समजूत घालत मोठं धाडस करत पहिली रात्र काढली. आझाद चौकात तेली, चौधरी, मुसलमान, खाटीक आणि बाजाराला लागूनच मुख्य भागी मांगवाडा होता. एप्रिल महिन्याची सुरुवात झाली होती. मांगवाड्यातले बरेच लोक दुसऱ्यांच्या बॅण्डमध्ये तर काही झाडू, टोपल्या, सुपड्यांचे दुकान लावून घरासमोरच बाजारात विकत बसायचे. मांगांचे एक-दोन बॅण्ड होते पण म्हणावे तेवढे चांगले नव्हते. बन्नेखाँ त्यावेळी सर्वांत चांगला बॅण्ड म्हणून नावाजलेला होता. या सर्व बॅण्डची दुकाने आझाद चौकातच होती.

वाड्यातच सट्टा, जुगार खेळण्याचा शोक जवळपास सर्वांना सारखाच होता. अगदी लहान मुलांनासुद्धा हा छंद जडलेला होता. गावी बाप व भिलाटीतली बरीच बायामाणसे सट्टा खेळायची हे माहीत होते आणि नवेही नव्हते. पण लहान मुलेही खेळतात हे मी इथे बघत होतो. माझे रोज सकाळी तोंडावर पाणी मारून आझाद चौकातील धुपीच्या झाडूच्या दुकानावर येऊन बसणे नित्यनियमाचे झाले होते. ती आधी बादल्या-बादल्यांनी जीजीच्या घराजवळून पाणी भरून आणत असे. नंतर दुकानात लावलेल्या सर्व झाडूंना ओलं करत असे. लांबूनच धुपी चहावाल्यांना आवाज देणार. सकाळचा चहा धुपीच्या झाडू दुकानावर होणार आणि तिथून दिवस सुरू होणार हे अगदी ठरल्यासारखं होतं. धुपीचं दुकान रस्त्यावरचे. तिची धंद्याची विक्री झाली की समोरच्या उसळ विकणाऱ्या बाईकडून ती माझ्या हातात तीन प्लेट उसळ घेऊन ठेवणार. शंकर, मी आणि ती असे हे तिघांसाठी. बरं तर शंकर हा माझ्याच वयाचा होता. तोही त्याच्या नातेवाइकांकडे राहायला आलेला. तो आधीपासून तिच्या दुकानात दुकान लावण्यापासून सर्व काम करणारा आणि द्रोपदी ही आमच्या नातलगातली मुलगी आमच्यापेक्षा वयाने मोठी. तिला सर्व धुपी म्हणायचे. आम्ही दोघांनी तिनं सांगितलेली कामे करावी. दुपारचे जेवणही रस्त्यावर खाटीवर झावर टाकून करावे. खाटीला दोन्ही बाजूंनी लहान काठ्यांच्या आधाराने झोपडी केलेली. त्या झोपडीतच जेवणं. दुपारच्या सुमारास धुपी हमखास सट्टा लावायला पाठवणार. दुपारचे तिच्याबरोबर जेवण आटोपून शंकर नि मी तिने कागदावर लिहून दिलेला सट्टा लावायला जायचो. ती झाडूचा धंदा छान करायची. व्यापाऱ्याकडून माल घेणे, त्याला आठवड्याला पैसे देणे अशी वरच्यावर उलाढाल करणारी धुपी व्यवहारात मात्र हुशार होती. सट्ट्यात जास्त पैसे गेले की, ती वाघिणीसारखी आमच्यावर तुटून पडायची. जोड, पाना असा बराच सट्ट्याचा अभ्यास केल्यासारखं ती आम्हाला सांगत असे. कोणता आकडा कोणत्या वारी आला, त्याच्या मागच्या आठवड्यात कोणता आला होता. मग आता कोणता लावला पाहिजे हे महिनाभराचे मागे येऊन गेलेले आकडे ती तोंडपाठ सांगायची. रविवारी बाजाराला सर्वच आजूबाजूचे सगळे चोपड्याला यायचे. पहाडातल्या गावातून पावरेही बाजार करायला यायचे. हे आकडे कुठून तरी काढून आणतात ते तिच्या ओळखीचेही झाले होते. बऱ्याचदा तिला आकडा लागायचा म्हणून दुसरी बायामाणसे ती काय लावणार यावरही पाळत ठेवत असत. नाही तर विचारायचे, ''काय लावलं धुपे आज.'' मग तिला विचारून सट्टा लावायचे. धुपी गोऱ्या रंगाची. मुलासारखा तिचा सर्व आझाद चौकात वावर. आझाद चौकात तिला सगळे ओळखायचे. मुलांसारखा पांढरा शर्ट नि निळ्या रंगाचा परकर हा तिचा पेहराव. तिचा सट्टा लागला की आमच्यासाठी दिवाळीच असायची. समोरच ताज हॉटेल. तिथून बाजार शांत झाला की मासे-मांडे आणणार. तिथेच दुकानाजवळ लाईटाखाली बसून खाणार. हे मात्र भारीच होतं. ती धंदा चांगला करते म्हणून तिचे घरचेही तिला काही बोलायचे नाही. ही घराला बऱ्यापैकी आधार द्यायची. बाजाराच्या दिवशी सहा ते नऊचा सिनेमा आम्हा तिघांचा हमखास असायचा. मालकिणीसारखा शंकऱ्या नि मी जणू तिच्याकडे कामालाच आहोत अशा थाटात तिचा रुबाब असायचा.

उन्हाळ्यात मला खूप घामोळ्या होतात. त्यासाठी तिने कुठून तरी पावडरही विकत आणून दिली. दोघांविषयी तिच्या मनात खूप आपुलकी होती. रागवायची नि तितकाच जीव लावून काळजीही घ्यायची. जीजीकडे माझे झोपणे नि कधी-कधी रात्रीचे जेवण होते. त्यांनंही माझा त्रास कमी झाल्यासारखाच होता. रोज डल्ल्या तोडून-तोडून तब्येत चांगली झाली असे जीजीचे कधी-कधी बोलणेही ऐकावे लागायचे. आई रविवारी आली की, मला मांडीवर घेऊन मिठी मारायची. मी तिला

बरा दिसायचो. आईला सगळं कळल्यावर आई धुपीला भेटून त्या पोरीसोबत खूप प्रेमाने नि तिचे कौतुक करून बोलायची. हे मात्र मी ज्यांच्या आधाराने इथे होतो त्यांना आवडायचे नाही. भुऱ्या तू इथेच राहा अजून काही दिवस, असे आईचे शब्द ऐकल्यावर डोक्यातून बंद झालेल्या आठवणी पुन्हा पुढं यायच्या. मी गंभीरपणे त्या प्रसंगाला आठवून अंगावर काटे यायचे. आई जाताना जीजीकडे पैसे ठेवून जायची. जीजीचा मुलगा मोठ्या भावाच्या वयाचा होता. तो स्वभावाने खूप चांगला. तो सिनेमा टॉकीजमध्ये तिकीट चेकर म्हणून काम करायचा. त्याच्या कामातून लग्नाआधीच तो चांगला पैसा कमवायचा. या माधु आप्पाचा शेवटचा सिनेमा रात्री बारा वाजता सुटणार. तोपर्यंत बाजाराच्या रस्त्यावर दुकानासमोर मांगवाड्यातले लहानमोठे बरेच जण गोधडी टाकून झोपून जाणार, तर काही गप्पा मारत बसणार. कपड्याच्या दुकानाच्या ओट्यावर मी अप्पाची गोधडी टाकून झोपून जायचो. आम्हाला सकाळी आठला तो दुकान मालकच उठवायचा. धुपीला माझं उशिरा उठणं कधीच आवडलं नाही; कारण ती सहाला उठून तयारी करत सातपर्यंत चहाच्या दुकानावर चहा पिऊन आपल्या झाडूंचा माल घराबाहेर काढत त्याचा गठ्ठा बांधून बसून राहणार. आम्ही दोघं तिचे गठ्ठे उचलणार. नऊ वाजत नाही तोपर्यंत तिचं दुकान लावून टाकणार. तोपर्यंत अर्धा मांगवाडा झोपलेला असायचा. ग्राहक दहाच्या पुढे क्वचित येणार. तरीही ती नऊपासून आपलं दुकान थाटायची. इतक्या लहान वयातही ती भलतीच कष्टाळू होती.

गावाकडे आन्याच्या पायाला पाटा होता तोपर्यंत हे प्रकरण शांत झाल्यासारखे नव्हते. आता त्याच्या पायाचा पाटा सुटून बरेच दिवस निघून गेल्याने हा विषय भिलाटीत आगीवर पाणी पडावं तसा शांत झाला होता. कुटुंबावरचे व माझ्या मनावरचे दडपण कमी झाल्याने आम्ही सर्वच मोकळे झालो होतो. तरीही विचार भटकून जात. आन्याचा भाऊ - त्याला तर अर्धी भिलाटी घाबरते. त्याने जंगलात वाघाच्या जबड्यातून बकरी वाचवल्याचे किस्से डोळ्यांसमोर येत. अगदी बेडर आणि ताकदवान होता. गावातही चांगले-चांगले त्याच्या लफड्यात पडत नसत. आता आन्याचा पाय चांगला झाला आहे, काही करणार नाही असं दुसऱ्या मनाच्या कप्प्यात स्वतःला समजवत राहायचो.

धुपीचं काम करायला लागलो की हे सगळं विसरून जायचो. हे मात्र माझ्यासाठी बरं होतं. हे सारे दिवस निघून गेले. जून महिन्यात आई मला परत गावी घेऊन गेली. सर्व सुरळीत आणि शांत झालं होतं. तरीही आईबापाच्या मनात भीती होतीच. ते मला खेळायला जाऊ देत नसत. जास्त वेळ बाहेर कुणात उभं राहणं यावरही त्यांचं बारीक लक्ष असायचं. हळूहळू मुलांना समजत गेलं की, मी तालुक्यावर जाऊन खूप सिनेमे पाहिले आहेत आणि तेवढ्यासाठी बऱ्यापैकी पोरं-पोरी आमच्या झोपडीच्या बाहेर सिनेमाची स्टोरी ऐकायला येऊ लागले. त्यात काही दिवसांनी आन्याही आला. मग रोजचा नवा 'सिनेमा'. ते एक-दुसऱ्याला विचारायचे 'आज कोणता सर' मी संपूर्ण सिनेमा तोंडपाठसारखा सांगायचो. त्यामुळे माझी किंमत वाढत गेली. माझ्यावर आलेला प्रसंगही निघून गेला. पण धुपीचं माझ्या मनात स्वतंत्र एक घर आहे. त्यात मी बघत राहतो. तिने दिलेला सहारा, दिलासा आणि पोटाला आधार महत्त्वाचा होता. काही वर्षं निघून गेलीत. मी शाळाही शिकतो आणि बॅण्डमधला चांगला कारागीरही आहे हे बघून तिला खूप बरं वाटायचं. नंतर नोकरीला लागलो तेव्हाही कधी-कधी तिची भेट व्हायची. त्याच ठिकाणी झाडूच्या दुकानावर. ती मागेही म्हटली होती, ''बापू सर तुम्हले नौकरीवाल्याने काय बांधा भो. आमचं बरं हे भो. रोजचंचं मरणं, काय करवां जगी घेवा असं ही.'' तिचं लग्न झालं होतं. तिचा इतका मोकळेपणा, खुल्या मनानं वागणं तिच्या नवऱ्याला आवडलं नाही म्हणून त्यानं तिला टाकून दिलं. ती हाच व्यवसाय करायची. खेड्यापाड्यावरही झाडू विकायला जायची. चोपड्याच्या नदीकाठी तिने पाच-सहा पत्रे ठोकून घर बांधले होते. बारा-तेरा वर्षांपूर्वी एके रात्री नदीला भयानक पूर आला. असा पूर खूप वर्षांत कधी आला नव्हता. त्या पुरात तिचे टिनाच्या पत्र्याचे घर वाहून गेले. मला धक्का याचा बसला की, त्या घराच्या पत्र्यांसोबतच धुपीदेखील नदीच्या प्रवाहात नाहीशी झाली. नदीच्या पुरात धुपी झोपेतच वाहून गेली. कुठेही झाडूचे दुकान दिसले की धुपी आठवते. झाडूत जिवंत झाल्यासारखी. तिची आकृती मला दिसू लागते.

• • •

समीक्षा

प्रभा गणोरकर : कवितेचा एक निर्विवाद टप्पा

राणी दुर्वे

प्रा. डॉ. प्रभा गणोरकर (८ जानेवारी १९४५) यांनी नुकताच वयाच्या पंच्याहत्तरीत प्रवेश केला आहे. त्यानिमित्त त्यांच्या काव्यलेखनाचा आढावा घेणारा हा विशेष लेख.

राणी दुर्वे
बी-६, वरदा, रिझर्व्ह बँक ऑफिसर्स क्वॉर्टर्स, कीर्ती कॉलेज लेन, दादर, मुंबई - ४०० ०२८
मो.: ९६१९६६३९७२



'प्रभा गणोरकर' नावाची कविता माझ्यासाठी सुरू होते 'व्यतीत'मधील 'कदंब'पासून -

'मला वाटले
कदंब माझा
घेऊन येईल
थेंबसाखळी
दवबिंदूंची
घेऊन येईल
खुळी ओढणी
कालिंदीची
परंतु तो तर...

कधीतरी कॉलेजच्या सुरुवातीच्या दिवसात वाचलेल्या ह्या कवितेपासून 'प्रभा गणोरकर' ह्या नावाशी मी जोडले गेले. ही कविता मी नेमकी पहिल्यांदा कधी वाचली ते आता आठवत नाही. तोंडपाठ असूनही आजवर किती वेळा वाचली आहे याची गणती नाही. काही कविता अशा असतात की हाताला पुस्तक लागले की त्या संग्रहातली ती कविता वाचली जातेच. जणू त्या थांब्यावर थांबल्याखेरीज ती कविता आपल्याला पुढे जाऊच देत नाही. काही कविता तर शरीरात वाहणाऱ्या रक्ताच्या प्रवाहासारख्या आपल्या आतून वाहात राहतात. जशी बालकवींची 'औदुंबर', महानोरांची 'या नभाने', कुसुमाग्रजांचे 'पृथ्वीचे प्रेमगीत' किंवा इंदिराबाईंची 'कुब्जा'...

अनुक्रमणिका

अजून नाही जागी राधा
अजून नाही जागे गोकुळ
अशा अवेळी पैलतिरावर
आज घुमे का पावा मंजुळ...

वर वर पाहता इंदिराबाईंच्या ह्याच जातकुळीतली कुब्जेप्रमाणेच कृष्णसखीची प्रीत सांगणारी प्रभा गणोरकरांची 'कदंब' ही कविता! मात्र कदंबचे वेगळेपण असे की...

...परंतु तो तर
घेऊन आला
ओंजळीमध्ये
धगधगणारा
भोग काजळी...

व्यतीत, विवर्त आणि व्यामोह – आयुष्याच्या विशी, चाळिशी आणि सत्तरीच्या तीन टप्प्यांवरचे प्रभा गणोरकरांचे हे तीन कवितासंग्रह आहेत. अत्यंत आंतरिक, आत्ममग्न तरीही स्वतःमध्ये बंदिस्त नाही अशा अनुभवनिष्ठ, अतिसंवेदनशील, विव्हळ भावकवितेचा अंतःप्रवाह गणोरकरांच्या तीनही कवितासंग्रहांत आहे. यापैकी व्यतीतची पहिली आवृत्ती आहे १९७४ सालची. त्यात असलेला लेखनकाल आहे एका दशकाचा; म्हणजेच १९६३ ते १९७३ सालचा. वयाच्या विशी–पंचविशीच्या पहिल्या टप्प्यावरची व्यतीत'मधील कविता वरवर पाहता प्रेमकविता वाटली तरी प्रेमापेक्षाही ही कविता उरी घेऊन येते 'धगधगणारा भोग काजळी'. एकूणच माणसांच्या भाराभार पसाऱ्यात एकटे असण्याची किंवा भोवताली पसरलेल्या माणसांनी आपल्याला समजून न घेण्याची भावना आणि काजळी भोग हा गणोरकरांच्या केवळ 'व्यतीत'मधील नाही तर सर्वच कवितांचा एक अविभाज्य भाग आहे. सभोवतालच्या माणसांनी आपल्याला समजून न घेण्याच्या भावनेबाबत रूढ अर्थाच्या दुःखापेक्षाही आतवर – ज्याला बालकवी 'हृदयाच्या अंतर्हृदयात' म्हणतात असा रुतलेला सल त्यांच्या कवितेत जाणवत राहतो. पायात रुतलेला काटा दिसत नाही पण जीवघेणा ठणकत राहतो अशी व्याकुळता गणोरकरांच्या कवितेचा स्वभाव आहे. 'व्यतीत'च्या अर्पण पत्रिकेत त्यांनी वसंत आबाजी डहाके यांच्या ओळी उद्धृत केल्या आहेत :

जमिनीत मुळं रुतवून
असलेली स्थावर जंगम माणसं
ज्यांना धास्ती असते झंझावाताची
आणि जी दचकून शिशिराला
उमलतात भीतीनं
ती तुला समजून घेऊ शकत नाहीत

या ओळी प्रभा गणोरकरांच्या बाबतीत अत्यंत सार्थक ठरतात.

विसाव्या शतकातील १९५०–६० हे दशक सर्वच आविष्कारांच्या माध्यमांत विशेष आहे. जागतिक स्तरावर दुसऱ्या महायुद्धानंतरची आणि आपल्याकडेही स्वातंत्र्यानंतरची राजकीय उलथापालथ घडून, जबरदस्त तोडफोड होऊन अनेक स्तरांवरचा स्वप्नाळूपणा गळून वास्तव जीवनाला सन्मुख होऊन सामोरे जाण्याची ताकद आणि हिंमत या काळातील अनेक कलाविष्कारांत आढळून येते. एका नव्या परिमाणाने या काळातील कलाविष्कारांत नाती आणि नीतिमूल्ये तपासली जाऊ लागली. विशेष म्हणजे आजच्या–सारखी सोशल मीडिया कार्यान्वित नसतानाही जगभरात याच सुमारास एकाच वेळी बरीच उलथापालथ घडत गेली. मराठी कवितेबाबत बोलायचे तर ५०च्या दशकात मर्ढेकर आले आणि 'पिपात मेले ओल्या उंदिर' लिहून निसर्ग आणि प्रेमात आकंठ बुडालेल्या रचनाबद्ध कवितेला मेलेल्या उंदराची शेपटी धरून समोर धरावे तसे वाचकांपुढे मराठी कविता उलटी धरून त्यांनी ढवळून काढले. मर्ढेकरांव्यतिरिक्तही मराठी कविता निश्चितच बदलली असती; परंतु त्यांच्या कवितांनी दिलेल्या दणक्यामुळे कविता बदलण्याची प्रक्रिया वेगाने घडली. त्यांच्या पुढली मराठी कविता इतकी पटकन प्रगल्भ झाली की त्यासाठी मर्ढेकरांचे ऋण मानावे तितके कमीच! कुरूप किंवा असुंदर असले तरी अशाही वास्तव जीवनाला सामोरे जाण्याचा आणि बेदरकारपणे मांडण्याचा त्यांचा प्रभाव जसा कवींवर पडला आणि मराठी कविता बदलली तशी काही प्रमाणात का होईना परंतु कवयित्रींचीही कविता बदलू लागली. लग्न, मूल, नवरा, संसार, प्रेमस्वरूप आई अशा मृदु–मुलायम कवितांमध्ये रेंगाळणारी स्त्रीची कविताही साठच्या दशकात बदलण्यास सुरुवात झाली. अशा साठोत्तर कवयित्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आघाडीच्या कवयित्रींमध्ये

अनुक्रमणिका

प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील या कवयित्री आहेत. त्या आधीच्या पिढीत इंदिरा संत, शांता शेळके, पद्मा या कवयित्रींनी मराठी कवितेचा वारसा चालवला. इंदिराबाईंच्या किंवा शांताबाईंच्या कित्येक कवितांनी निश्चितच मराठीला समृद्ध केले आहे; परंतु या कविता अधिकतर स्त्रीविषयक जाणिवांच्या चौकटीतच राहिल्या असे म्हणावे लागेल. ज्या प्रमाणात मर्ढेकरांच्या पश्चात लिहिणाऱ्या कवींची कविता वास्तवाला सन्मुख होत गेली किंवा सामाजिक व राजकीय घडामोडींचे पडसाद त्यांच्या कवितेत उमटत गेले त्या प्रमाणात न या आधीच्या पिढीच्या कवयित्रींची कविता बदलली, नाही त्यांच्या आविष्काराच्या भाषेत बदल घडला. आणि त्या अर्थाने ती कविता तिथेच रेंगाळली. त्यांच्या कवितांचाच हात धरून आलेली गणोरकरांची कविता आत्मपर असूनही आविष्काराच्या बाबतीत मात्र त्यांच्या थांब्यावरून पुढे गेली. ही कविता स्त्रीची असूनही माणूस म्हणून जगण्याचा वास्तव अनुभव मांडते. तसे पाहिले तर प्रतिमा-प्रतीकांचा आधार 'व्यतीत'मधली गणोरकरांची कविताही घेत नाही. वयानुरूप काही कवितांमध्ये प्रेमाचा अंतर्भाव आहे; परंतु प्रेमभावनेपेक्षाही संवेदनशील मनाला जाणवणारे एकाकीपण 'व्यतीत'मध्ये वारंवार प्रकट होते. प्रवास, स्थलांतर, स्थलांतरामुळे येणारे तुटलेपण किंवा प्रेमाच्या माणसासोबतही अंतःस्तरावर वाटणारी तुटलेपणाची भावना... कवितांमधील हे तुटलेपण हा जितका त्या व्यक्तीचा भाव दर्शवतो तितकाच तो साठच्या दशकाचा भागही असू शकतो.

स्वातंत्र्योत्तर भारलेपणापासून एक पिढी दूर जाऊ लागली होती. स्वप्नाळू, भारलेपण जाऊन जगण्याच्या दाहकतेला सामोऱ्या जाणाऱ्या तरुण पिढीची घुसमट आणि ती व्यक्त करण्याची भावना. त्यातही स्त्रीच्या बाबतीत घराचा सुरक्षित उंबरठा ओलांडून शिक्षण-नोकरी-पोटापाण्यापायी घराबाहेर पडू पाहणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रीची माणूस म्हणून व्यथा! स्त्री असूनही स्त्रीत्वाच्या कोषातून बाहेर पडून आपल्या जगण्याच्या व्यथा आणि वेदना मांडणारी कविता 'व्यतीत'मधून बहुधा पहिल्यांदाच आली. आपल्या आधीच्या कवयित्रींचा हात सोडून गणोरकरांची कविता मग इथेच वेगळी होते. 'व्यतीत'मधली पहिलीच कविता – प्रवास :

नकळत मैलांचे दगड मागे पडत असतात
स्वतःला काळोखाच्या ओंजळीत लपवून
कुठून आले असते मी?
कुठे जाणार असते?
मध्यरात्री उभी रहाते गाडी;
तेव्हा एक अनोळखी गाव तेवढे दिसते...

इतक्या ताकदीने ही कविता आपल्याला अनोळखी गावाच्या वेशीवर नेऊन पोचवते की वाचता वाचता आपल्यालाच – कुठल्यातरी लांब पल्ल्याच्या गाडीने जात असताना अचानक अपरात्री जाग येते. कुठल्यातरी अनाम, छोट्या अशा स्टेशनवर गाडी उभी असते. गाडी थांबल्यामुळे इवलीशी जाग फलाटावर असते. चहावाल्याची किणकिण किंवा एखाद्याच चढणाऱ्या-उतरणाऱ्याची लगबग होते न होते तोच गाडी किरकिरत पुढे जाऊ लागते. फलाटाबाहेर एखादे डेरेदार झाड काळोख अंगावर झेलत उभे असते. हे झाड इथेच कायम राहणारे. आपण मात्र कुठूनतरी आलेलो, कुठेतरी चाललेलो असतो. ज्याचे नावही कळले नाही असे एक अनाम गाव मागे पडत जाते...

'मध्यरात्री उभी रहाते गाडी; तेव्हा एक अनोळखी गाव तेवढे दिसते...' व्यतीत हा गणोरकरांचा पहिलाच संग्रह असून त्यांच्या कवितांचे सामर्थ्य असे की एखाद-दोन ओळींतसुद्धा एक समग्र अनुभूती वाचणाऱ्याला मिळते. संपूर्णपणे आत्माविष्कारी परंतु तो आविष्कार वाचणाऱ्याच्या आत संक्रमित करणारी आणि निव्वळ स्त्रीत्वाचे नाही तर माणूस म्हणून जगण्याचा सल उमटवणे ही बाब आजच्या काळात महान नसली तरी, साठ ते सत्तरच्या दशकाचा विचार करता ती निःसंशय एक मोठी गोष्ट होती. ज्या काळात स्त्रीची कविता प्रेमभाव, जोडीदार, विरह, मातृत्व अशा उदात्त भावनांमध्ये गुंतून होती त्या काळासाठी रोजच्या आयुष्यातल्या जगण्यातला सल सोलून हातावर ठेवणारी कविता लिहिणे सोपे नाही. अनुभवनिष्ठतेच्या सामर्थ्याचे प्रत्यंतर 'व्यतीत'च्या पहिल्या कवितेपासूनच लक्षात येते आणि गणोरकरी कवितेच्या वेगळेपणाचा प्रवास 'व्यतीत'मधून सुरू होतो :

काही कळत नाही
नेमकी कुठून चुकत गेली वाट
अजूनही भेटले कुणी, तर परतावे म्हणते...

किंवा 'चकवा'मध्ये त्या म्हणतात :

आयुष्य आपल्याला फरफटत नेते हे खोटे आहे
खूपदा आपणच आयुष्याचे बोट धरून
त्याला भलत्या ठिकाणी सोडून देतो.

प्रवासाच्या कवितांमधील त्यांचा प्रवास हा दोन पातळ्यांवरील आहे. तो जितका खरा प्रवास आहे तितकाच आंतरिक, आयुष्याचा प्रवासही आहे. मध्यमवर्गीय जाणिवांचे बदलते रूप, त्यातही स्त्रीची होणारी फरफट, तिचे एकटेपण आणि त्या अर्थाने तिचा प्रवास – हा केवळ एका प्रभा गणोरकरांचा नव्हे तर नोकरीधंद्यानिमित घराबाहेर पडावे लागणाऱ्या, आपल्या संस्कार आणि एकत्र कुटुंबाच्या मुळांमध्ये अडकून असलेल्या तरीही त्यातून विभक्त कुटुंबपद्धत आत्मसात करीत स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या त्या पिढीतल्या स्त्रियांचा हा उद्‌गार आहे. पोटापाण्याच्या उद्देशाने केला गेलेला खरा प्रवास 'विवर्त' किंवा 'व्यामोह'पेक्षा 'व्यतीत'मध्ये जास्त जाणवतो. प्रवास आणि सतत होणारे स्थलांतर या जणू त्यांच्यासाठी एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. स्थलांतरापाठोपाठ येणारी तुटलेपणाची भावना आहे. 'ऋणानुबंध' कवितेत त्या म्हणतात :

तसे हे गाव आणि मी एकमेकांचे
काहीच लागत नव्हतो देणे
टिपायचे होते तेवढे टिपून घेतले
झाले चोचीत दोन-चार दाणे
मग गावासाठी मी उरले नाही
आणि संपले माझ्यापुरते हे गाव.
पुन्हा शोधणे नवे रस्ते, नवी माणसे,
पुन्हा एखादे नवे नाव.

'ओळख'मध्येही तुटलेपणाची तीच भावना जाणवते :

पाहून घ्यावा हा परिसर डोळाभर शेवटचा
कुणास ठाऊक हे गाव पुन्हा दिसते की नाही
...ओळख किती लवकर विसरतात सारी माणसे.

'सोबतीला घोंगावणारा वेगवान वारा,
उडणारी चक्राकार वाळू
आणि बेभानपणे हलणारी खजुरीची झाडे
तरीही मी एकटी भोवतालच्या प्रचंड गर्दीत
रंगीबेरंगी आवाजातून उरलेली,
ह्या माणसांमध्ये परकी.
वाळवंटात प्रवास करीत
रात्री दिशा शोधणाऱ्या अरबासारखी.'

'व्यतीत'ची कविता या दिशा शोधणाऱ्या अरबासारखी ढगळ कपडे चढवून फिरत राहते वाळवंटभर कधी मुळापासून तुटलेपणाचे घाव सोसत तर कधी एकटेपणाचे घाव सोसत तर कधी नात्यांमधल्या तुटलेपणाचे घाव सोसत. 'कदंब'प्रमाणेच 'व्यतीत'मधील आणखी एक लक्षणीय कविता म्हणजे 'द्वारका' :

पाणी हलले थोडे दिलेले दान परत घेण्याची
वेळ आली तेव्हा
खोल आतल्याआत गुदमरले हुंदके सारी
निरवानिरव करावी लागली तेव्हा

......

तो तर केव्हाचाच पाठमोरा झाला,
निर्मम, त्याची सावली दिसेनाशी झाली
माझ्या उघड्या डोळ्यांनी मी पाहते आहे
द्वारका बुडत चाललेली

स्वतःच उभारलेले सारे बुडत जात असताना निर्ममपणे पाठमोरा होणाऱ्या श्रीकृष्णाइतकी उंची ही कविता अंताला गाठते. या कवितेत 'पाणी हलले', 'गुदमरले हुंदके' हे शब्द, केवळ शब्द न राहता भाव होतात आणि आपल्या डोळ्यांसमोर वैभवावस्थेतील द्वारका हळूहळू समुद्रात बुडत जाते. उंच, पसरलेली एक सावली झरझर पुढे निघून जाते, आभाळातील ढगाची पृथ्वीवर पडलेली सावली निघून जावी तशी.

'व्यतीत'नंतर साधारणपणे दहा वर्षांच्या कालखंडानंतरचा संग्रह 'विवर्त'. याची पहिली आवृत्ती आहे १९८५ सालची. 'विवर्त'च्या ब्लर्बमध्ये वसंत आबाजी डहाके लिहितात : 'या संग्रहातील कवितांमधून मुख्यतः नेणिवेतील स्त्रीत्व व्यक्त झालेले आहे. रुजणे, वाढणे, झिजणे, उखडणे या अस्तित्वाच्या अपरिहार्य संदर्भातून झाड ही आदिबंधात्मक प्रतिमा या कवितेत वारंवार येते ती यामुळेच. या कवितेची भाषा अनुभव जसाच्या तसा पोहचवणारी, थेट भिडणारी अशी आहे. स्वाभाविकच तिला आविष्कारासाठी पौराणिक संदर्भ, विज्ञान-प्रतिमा किंवा आधुनिक राजकीय-सामाजिक संकल्पनांची आवश्यकता राहात नाही. मात्र व्यक्तीचे जीवन व्यापून असणाऱ्या, दैनंदिन अनुभवाच्या अगदी साध्यासाध्या गोष्टी विलक्षणपणे प्रतिमारूप होऊन

जातात. 'व्यतीत'मध्ये प्रकटलेले वेगळेपण कायम ठेवून ही कविता गेल्या दहा वर्षांत अधिक खोल व गंभीर होत गेलेली आहे.'

'व्यतीत'ची कविता 'विवर्त'मध्ये परावर्तित होताना प्रगल्भ नक्कीच झाली आहे. डहाके म्हणतात त्याप्रमाणे झाडाची प्रतिमा रुजणे आणि उखडणे या अर्थाने वारंवार येते. 'झाडे कुठल्या जीवनप्रेरणेने चिवटपणे जगतात?' झाडांचे आणि पर्यायाने स्त्रीचे चिवटपणे जगण्याचे भान ही कविता पुन्हापुन्हा जाणवून देते. प्रामुख्याने 'जगण्याचा अपरिहार्य स्वीकार' 'विवर्त'मधील सुरुवातीची कविता करते. निश्चित, बदल, या वर्षी, नशीब... अशा काही कवितांमधून ही भावना प्रकट होत राहते. 'कसे आपण अपरिचयाच्या क्रूर काटेरानाकडे वळलो एकाएकी' आयुष्याला त्या प्रश्न करतात. 'विवर्त' कवितेमध्येही आयुष्याला हाच प्रश्न केला जातो की, 'कोणते व्यर्थ? निरर्थक? संगतिशून्य? फसवे?' 'व्यतीत'पेक्षाही प्रतिमांची विविध रूपे 'विवर्त'मध्ये असली तरी प्रायः 'आहे त्या आयुष्याचा स्वीकार' आणि 'सारे काही व्यर्थ, पोकळ निरर्थक' वाटण्याची अभिव्यक्ती समुद्राच्या लाटेप्रमाणे पुन्हा पुन्हा किनाऱ्यावर येऊन आदळते आणि त्या अर्थाने 'विवर्त'ची कविता प्रगल्भ होऊनही काहीशी एकांगी वाटते...

...असे अचानक काही झाले
तर मलाही अंगणातल्या गुलमोहोराखाली
असेच राहू द्या,
म्हणजे मातीआडून मागे राहिलेले सारे
बघता येईल.

यात 'जाणिवेपलीकडे नेणिवेच्या रूपात अस्तित्व' ही संकल्पना कवितेला विशेष उंची देते. आई म्हणून असलेल्या 'विवर्त'मधील काही कविता – 'चित्र' किंवा 'राहीसाठी एक कविता' किंवा 'गंमत' सारखी प्रसन्न कविता; यांचा अपवाद सोडता 'विवर्त' हा आयुष्याच्या एका टप्प्यावरील गणोरकरांचा स्वतःमधील द्वंद्वाचा आरसा आहे असे म्हणावे लागते. 'नकार' या कवितेत त्या म्हणतात, 'ती जगत असते एक प्रचंड नकार, आकाशासारखा मनात वागवीत या गावात...' 'व्यतीत'मध्ये असणारी तुटलेपणाची भावना आता अधिकच एकवटून येत जगण्यासाठी आलेल्या त्या प्रचंड शहरात उमटत जाणारी अस्तित्वहीनतेची भावना स्वतःमधून ओरबाडून काढण्याची धडपडच यात सापडते. 'थांबवू शकत नाही, दुःखाच्या सहस्र हातांनी, वेढले जाणे' – ही असहायता. 'या गावात राहून, आपल्या गावाकडचं आभाळ आठवीत रहावं, हे या गावाचं अपयश'. आपली अस्तित्वमुळं कुठल्यातरी गावात ठेवून नव्या प्रचंड आकाराच्या आणि व्याप्तीच्या महाकाय शहरात होणारी घुसमट त्या मांडतात. 'विवर्त' हा आयुष्याच्या एका प्रदीर्घ कालावधीचा आरसा आहे. ही तगमग, तडफड त्या संवेदशील मनाला अशी असह्य होत असली पाहिजे की कधी कधी ती कविता आत्मनाशाच्याही जवळ जाते.

आताच माझ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबाचे ओझे
इतके असह्य झाले असताना
आतील सूक्ष्म रेषा
हा प्रवाह
किती दिवस खेळवू शकणार?
त्यापेक्षा एखादे धारदार पाते...

किंवा

माझे हे मर्त्य शरीर मी संपूर्ण सत्यासह
पुढे ठेवले आहे तुझ्या,
मागे वळून किनाऱ्याला आधाराला
नको जाऊस
समुद्र आत्महत्येच्या मनःस्थितीत असताना

एकीकडे आपली मुळे तुटवून कुठल्यातरी परक्या शहरात वसताना होणारी घुसमट तर त्याच वेळी साथीदाराशी (स्त्री म्हणून पुरुषाशी किंवा व्यक्ती म्हणून आयुष्याशीच) असलेले प्रियतम नाते या एका टप्प्यावर येऊन काहीसे दूरस्थ झालेले असण्याची साशंकता...

रात्रीच्या या निर्जन
नीरव प्रहरात हिंडत
मी फोडीत असलेला हा निःशब्द टाहो
निद्रेच्या बंद दारातून
तुझ्या कानापर्यंत कसा जाईल?
जागेपणीही प्रत्यक्ष मी ऐकवलेला शब्द
तुला ऐकू येत नसताना...
....
पण, मला स्वीकारणे
शक्य होत नाही आहे
आजचे आपले आपण नसणे

हे परकेपण, ही अनोळख.

'विवर्त'च्या बहुतांश कविता झाकोळलेल्या, म्लान मनःस्थितीच्या द्योतक आहेत असे वाटते. ही कविता 'व्यतीत'च्याहीपेक्षा जास्त आंतरिक झाली आहे. स्वतःमध्ये चोच खुपसून बसलेल्या पाखराप्रमाणे. विद्ध, विव्हळ. नकाराची भावना झेलणारी. जाणवते की ही व्यक्ती स्वतःची मुळं उपटून अशा एखाद्या महानगराकाठी जाऊन वसण्याचा प्रयत्न करीत आहे जिथे दया-माया नाही. रोजच्या जगण्याचे, उखडून पुन्हा रुजण्याचे, माणसाला झाकोळून टाकणाऱ्या सनातन एकाकीपणाचे आणि अगदी टोकाला जाऊन आत्मनाशाच्या उंबरठ्यावरून परत फिरण्याचे एक चक्र म्हणजे विवर्त.

मला माझ्या डोळ्यांच्या आतल्या गार
अंधारात बसू द्या,
तूही माझ्या खांद्यावरचा तो हात काढून घे,
माझ्या थकलेल्या शरीराला हे दयेचे ओझे
सहन होत नाही. (दाराबाहेर)

किंवा

प्रचंड अनावर वेगाने बेभानपणे
झेपावणारे धुंद पाणी
कसे कोमेजून गेले आहे.
आतली जीवनशक्ती खचल्यासारखा
समुद्र मलूल आहे. (समुद्र गढूळ आहे)

किंवा

पुन्हा एकदा भर्त्सना आत्मकरुणा
पश्चात्तापाच्या दारुण झळा
पुरती ग्लानीही नाही
पुरते मरणही नाही
तडफड. तडफड. तडफड. (पुन्हा एकदा)

या सगळ्याच कविता पुन्हा पुन्हा शक्तिपात, तडफड, उन्मळून पडणे आणि अखेर आत्मनाशाचा विचार यापाशी येऊन थांबतात खऱ्या; मात्र 'व्यामोह'ची सुरुवात 'विवर्त'मध्येच उमटते म्हटल्यास वावगे ठरू नये. त्या दृष्टीने 'विवर्त'ची शेवटची कविता – जाण्याआधी – लक्षणीय आहे :

जाण्याआधी
आईने पावलांवर
थोडे कुंकू टाकले
मी चालायला लागल्यावर
चार पावले पुढे येऊन
तांब्यातले पाणी सोडून तिने
माझ्या जात्या पावलांच्या खुणा
पुसून टाकल्या.
वळणावरून मागे पाहिले
तेव्हा
ती हातात कुंकवाची कुयरी धरून
तशीच उभी होती...

'विवर्त'नंतर 'व्यामोह' हा कवितासंग्रह जवळपास एकोणतीस वर्षांनी आला. व्यामोहची प्रथमावृत्ती २०१५ सालची आहे. 'व्यतीत'नंतर अकरा वर्षांनी 'विवर्त' तर जवळपास तीन दशकांच्या अंतराने पुढला संग्रह आला आहे. 'व्यामोह'च्या मनोगतात त्याच लिहितात त्यानुसार 'आत्यंतिक भावनिक आणि मानसिक गरजेतूनच मी या काळात कविता लिहिली आहे. त्यामुळे ती अतिशय, कमालीची व्यक्तिगत आहे. प्रेमकविता, राजकीय कविता, वैचारिक कविता – यांपैकी काहीही मी लिहिले नाही. जगताना, स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या दुःखाने व्याकूळ होताना मला कविता, थोडेतरी व्यक्त व्हावे, यासाठी आधाराला घ्यावीशी वाटली. एवढेच.'

'व्यतीत' आणि 'व्यामोह' मधला झुलता पूल म्हणजे 'विवर्त'. 'व्यामोह'मध्ये गणोरकरांची कविता अधिक व्यापक झाली आहे आणि त्याचे बीज 'विवर्त'मध्येच आहे. एकूणच गणोरकरांची कविता राजकीय किंवा सामाजिक विषयभान बाळगणारी किंवा वैचारिकतेचे ओझे बाळगणारी नसेलही; परंतु 'व्यामोह'मध्ये ती असा एक अवकाश कवेत घेते की 'व्यतीत'मध्ये जाणवणारे कवितेचे वेगळेपण इथे अधिकच झळाळून येते. तीनही संग्रहांचा मिळून एक आलेख काढायचा झाला तर कालसापेक्ष अशा वेगळेपणाने 'व्यतीत' एका विशिष्ट उंचीवर आहे किंबहुना कवितेचा एक टप्पा आहे. 'विवर्त'त कविता प्रगल्भ झाली आहे. मात्र 'व्यामोह'ची कविता प्रदीर्घ कालावधी घेऊन पूर्णतः विकसित होते. मी व्यक्तिगत कविताच लिहिते असे सांगूनही व्यक्तिगत असण्याचे कुंपण तोडून ही कविता स्वतःच्या पलीकडे जाते. एरवी 'व्यतीत' आणि 'विवर्त'मध्ये लहानखुरा वाटणारा त्यांच्या कवितेचा आकृतिबंध 'व्यामोह'मध्ये विस्तारलेला आहे. यातील काही कविता दीर्घ कवितेचा फॉर्म घेतात.

अनुक्रमणिका

कवितेच्या दृश्य फॉर्मचा विचार करीत मी संग्रह वाचण्यासाठी हातात घेतला तो नीरव रात्रीच्या प्रहरी, माझ्या फार्म हाऊसवर. हवेत मधुमालती आणि रातराणीचा एकत्र गंध भरलेला असताना. घराबाहेर निःस्तब्ध झाडे. नारळ-पोफळी, आंबा, कडूनिंब. अंगाभोवती शिरशिरी आणणारा गारवा. आभाळात शीतल चंद्रकोर. संग्रह उघडून पहिलीच कविता वाचत होते, 'प्रिय आई'. माझीही मनःस्थिती अशी की नुकतीच आई गेलेली, त्यामुळे तिच्या आठवणीत सतत डुंबलेली, व्याकूळ, मात्र वरवर पाहता तिच्या मृत्युपश्चात पूर्ण सावरलेली. कधी कधी आपणच आपल्याला बेमालूम फसवत असतो. असेच काहीसे. गणोरकरांची 'प्रिय आई' वाचता वाचता व्यापक होत कधी माझ्या आईच्या आठवणींच्या अंगणात ती कविता पसरली कळलेच नाही. जशी रातराणी मधुमालतीच्या गंधात मिसळावी!

हवेत बुचाच्या फुलांचा मंद गंध.
आपला आवडता.
पण मी व्याकूळ आहे ती या
गारशा रात्रीच्या
कोमल स्पर्शाने नाही (प्रिय आई)
....

आईच्या पश्चात तिच्या कवितांच्या पुस्तकातून हिंडताना वाटते आहे की, या कवितेतून ऐकू येणारा आवाज आपल्या ओळखीचा नाही. मात्र त्यातल्या त्या परिचित अशा व्यक्तीला शोधण्याचा थकवून टाकणारा प्रवास मुलीला करायचा आहे. आईचे लहान परकरी मुलगी असतानाचे रूप तिचे भागधेय, दुःख, तिचे एकटेपण शोधत ती मुलगी जात आहे!

आई मला दिसते आहे ती एवढीशी
साडीतली मुलगी.
तीन दिवस संकोचाने घराच्या कोपऱ्यात
बसून राहिलेली.
बाई असणे नको म्हणणारी
आलवणातली थोरली आजी
....
जगण्याचा मनःपूर्वक सत्कार केलास
नि म्हणून तू
मला आकार दिलास.
स्वतःहून घडवलेस.
स्वतः अनुभवलेल्या साऱ्या
वादळांपासून मला दूर ठेवून
पदरातला दिवा सांभाळावा
तसे मला तेवत ठेवलेस.
....
अंधारातही दरवळणाऱ्या
फुलाची ओळख पटावी,
तशी आज आता मला,
एवढ्या वर्षांनी तुझ्या शब्दांच्या,
अक्षरांच्या, स्वरांतून, व्यंजनातून,
काना-मात्रा-वेलांट्यांतून
मला तू कळते आहेस.
अनावर ममत्वाचे हळुवार ढग
दाटून आलेले आहेत
माझ्या मनात आणि हलक्या सरी
निःशब्द झरताहेत.

ही कविता एका स्तरावर व्यक्तिगत खरीच परंतु त्यातल्या प्रतिमा, संवेदना आणि शब्दांचा बाज असा की ती युगायुगांतील आईची आणि तिचा शोध घेऊ पाहणाऱ्या मुलीची कविता होऊन जाते. 'व्यामोह'मधील मी वाचलेली ही पहिली कविता. त्यानंतर एकापाठोपाठ एक मी कविता वाचत गेले तेव्हा जाणवले की 'व्यतीत'मध्ये एकटेपणाशी झुंजणारी, 'विवर्त'मधली आंतरिक दुःखाने व्यथित अशी कवयित्री निर्णायक, ठाम रूपात नव्या उमेदीने आपली व्यापक अशी कविता सादर करीत आहे :

...कदाचित आज मी लिहू शकेन
आज शुभ्र चांदण्यांनी खचून भरलेले
आकाश दिसले पहाटे,
सुकून पाचोळा झालेल्या पानांजवळच
तांबूस कोवळी नवी पाने दिसली आज.

एक नवी पहाट, आशा 'व्यामोह'मध्ये आहे. मग ते 'स्वीकार'मधील पूर्वायुष्याचे स्वीकारणे असो *(मी त्याला घरात घेतले, एखाद्या थकून परत आलेल्या उधळ्या मुलाला आईने घरात घ्यावे, तसे)* किंवा

'निर्मळ मोकळ्या आभाळाखाली माझ्या स्वतःच्या अंगणात मी माझी स्वतःची छोटी रांगोळी घातली' म्हणत स्त्रीचे 'स्व'रूप प्रकटीकरण असो. सगळ्यापार जाणारी *'आयुष्यच सुरू होण्यापूर्वीची*

अनाम, निराकार नास्तित्वावस्था' ही कविता मागते. 'जुन्या घराच्या कविता' यादेखील 'व्यामोह'मधील अशाच लक्षणीय कविता.

दार हलकेच किलकिले करून
जुने घर मला जाताना पाहत राहिले
जुने घर पुटपुटले
इथली पुरुष माणसेसुद्धा शिक्षणासाठी
बाहेर पडली नव्हती आणि आता
तर ही पोर...

एकत्र कुटुंबपद्धतीतून, विशिष्ट संस्कारातून वाढलेल्या मनाला जाणवणारी त्या जुन्या घराची आणि परंपरांची ओढ, घरातून बाहेर गेलेल्या माणसांसह आठवणीत असलेले जुने घर आणि त्या घरात परतल्यानंतर वाटणारी मायेची ऊब... व्यक्तिगत पातळीवर असणारा हा अनुभव बघता बघता एका पिढीचा होऊन जातो :

हजारो हातांनी जुने घर मला गोंजारत राहते
कढ आतल्या आत जिरवीत मंद श्वास सोडीत
जुने घर मला जवळ घेऊन थोपटत राहते.

परकऱ्या पोरी, बाई, हळूहळू किंवा तत्सम कवितांतून स्वतःमधील स्त्रीत्वाच्या पलीकडची बाईपणाची कविता येते. अगदी सुरुवातीपासून कवितेत आढळणारी निसर्गाची विविधता 'व्यामोह'मध्येही आहेच; पण इतरही अनेक प्रगल्भ जाणिवांनी 'व्यामोह'मधील कविता अवतरली आहे. जणू इथे एक विशाल स्वगतच चालू झाले आहे, जगण्याकडून जीवनाचा, ज्ञाताकडून अज्ञाताचा, आकाराकडून निराकाराकडे जाण्याचा एक प्रदीर्घ प्रवास. जगण्यातील अतितरल आणि सूक्ष्म अनुभव व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम म्हणून गणोरकरांनी दीर्घकाल कवितेचा आधार घेतला आहे. भाषेचे सौंदर्य हे कवितेचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे आणि त्या सौंदर्यछटा त्यांच्या कवितेत सर्वत्र आढळून येतात. जसे पावसाबद्दल बोलताना त्या लिहितात :

निमूट झेलीत रहावे त्याचे अनावर होणे
किंवा डोळे वटारून बसणे, मूकपणे
सहन करावे.
मग तो प्रसन्न होतो. ओंजळभर जुईच्या
फुलांसारखा टपटपतो. झिम्मा घालतो.
टिपूर चांदण्यांसारखा लपेटून घेतो.
काळ्या शेतांच्या
आनंदाचा अश्रू बनून डोळाभर होतो.

अशी ही प्रभा गणोरकर यांची कविता – एकाकी, व्यथित, विवर्त मनाची पण अनुभवसिद्ध अशी! सामाजिक, राजकीय किंवा तात्त्विक भूमिका ही कविता घेत नाही; किंबहुना तशी कविता लिहायचे ठरवले असते तर त्या लिहू शकल्या नसत्या असे नाही तर अशी काही भूमिका त्या घेऊ इच्छित नाहीत. प्रतिमा-प्रतीकांच्या जंजाळात त्यांची कविता अडकत नाही. ती थेट आहे. आपला अनुभव थेटपणे पोचवावा, उगीच प्रतीकांच्या मोहात अडकायचे नाही असे त्यांच्या कवितांनी ठरवले आहे जणू. कविता आत्मपर असली तरी आत्ममग्न नाही आणि त्यामुळे ती मर्यादित न राहता अनुभवप्रचितीच्या व्यापक पातळीवर जाऊन पोचते. ही कविता निःसंशय स्त्रीची आहे; परंतु स्त्रीची कविता असली तरीदेखील कुठेही ही स्त्रीवादी होत नाही. आक्रस्ताळी तर नाहीच नाही. खांद्यावर एकतारी घेऊन आपलाच स्वर आळवत, स्वतःतच दंग अशी एक संवेदनात्मक, व्यथित-व्याकूळ-विव्हळ अशी ही भावकविता, एकूणच मराठी स्त्रीकवितेचा विचार करता आशय आणि आविष्काराच्या वेगळेपणाने कवितेचा एक निर्विवाद टप्पा ठरते.

• • •

अनुक्रमणिका

वारसा

युगवाणी जानेवारी १९४६
वर्ष पहिले, अंक पहिला

मराठशाहीतील ऐतिहासिक स्त्रियांचे कर्तृत्व

रावबहादूर
गोविंद सखाराम सरदेसाई
बी.ए., रियासतकार

'इतिहासमार्तंड' नानासाहेब सरदेसाई यांचे लेखन इतक्या वृद्धापकालीही सुरू आहे, याचे कुणास आश्चर्य वाटणार नाही? महाराष्ट्राच्या या सर्वश्रेष्ठ इतिहासकाराने 'ऐतिहासिक स्त्रियांची कर्तबगारी' या लेखात दिग्दर्शित केली आहे. ती खुद्द स्त्रियांप्रमाणे पुरुषांसही उद्‌बोधक वाटेल, यात शंका नाही.

– वामन नारायण देशपांडे
संपादक, युगवाणी
जानेवारी १९४६,
वर्ष पहिले, अंक पहिला

नुकतेच मला एका सद्‌गृहस्थांचे पत्र आले, त्यात त्यांनी विचारणा केली की, ''पूर्वकालात राजपूत, मराठा, ब्राह्मणी, मुसलमानी किंवा इतर पेशवेकालीन स्त्रियांचे व्यायाम काय होते, घोड्यावर बसणे, तरवार, भाला, खंजीर, बोथाटी इत्यादिकांत त्यांची प्रवीणता कशी असे, राजघराण्यांतील किंवा सरदारांच्या स्त्रियांना कोणते व्यायाम प्रिय होते, हे सांगणाऱ्या पाच–पंचवीस स्त्रियांची नावनिशी आपण सुचविल्यास मी आपला अत्यंत आभारी होईन.'' हे पत्र आल्यावर मी थोडा विचार करून उत्तर लिहू लागलो, तेव्हा पुष्कळच उपयुक्त नावे दृष्टीपुढे सुचली, त्यांचे जीवनक्रम मनात उभे राहिले आणि मागील कालाची आठवण प्रस्तुत परिस्थितीत किती बुजून गेली आहे, हे लक्षात येऊन एक प्रकारचे विलक्षण आश्चर्य माझे मलाच वाटू लागले. अनेक नानाविध ऐतिहासिक स्त्रियांची चरित्रे माझ्या वाचनात होती. त्यांची नावनिशी केल्यावर मागील स्त्री–जीवनाशी आज प्रचंड विरोध उत्पन्न झालेला आढळला, तोच मी आज वाचकांपुढे मांडण्याचे योजिले आहे. आशा आहे की, माझ्याप्रमाणेच वाचकांसही हा विरोध चमत्कृतिजनक वाटून पूर्वकालाचे संशोधन करण्याची जिज्ञासा त्यांना उत्पन्न होईल.


राष्ट्राचे स्वातंत्र्याचे समृद्ध जीवन संपले की, पराधीनतेचे प्रचंड आघात त्यास कसे सहन करावे लागतात, ही गोष्ट आपल्या स्त्रीवर्गाच्या जीवनात ठळकपणे नजरेस येते. मराठ्यांचे राज्य गेल्याबरोबर पूर्वीचे व्यवसाय एकदम नष्ट होऊन जनतेचा एकंदर आयुःक्रम पार बदलून गेला. स. १९४५ च्या मेअखेर हिटलरच्या जर्मनीचा जसा चहूंकडून एकदम कोंडमारा झाला, तसाच प्रकार स. १८१८ च्या मे महिन्यात जवळ जवळ सव्वाशे वर्षांपूर्वी बाजीराव पेशव्याचा होऊन मराठ्यांचे राज्य इंग्रजांच्या कबजात गेले. पुण्यास एल्फिन्स्टन होता, त्याने लगेच वरिष्ठांस सूचना लिहून पाठविली की, मराठ्यांचे राज्य आता आपल्या हाती आले खरे, पण मला मोठी धास्ती वाटते की, मराठ्यांच्या मोठमोठ्या फौजा आहेत, त्या निकामी होऊन आपणांवर उठतील, सबब त्यांस निवीर्य बनविण्याची मला एक योजना सुचते, ती अशी की, या फौजांच्या पुढाऱ्यांस सरकारातून जमिनी द्याव्या. मी त्यास सांगतो की, तुम्हाला ही भालेतलवारींची दगदग आता कशास पाहिजे? ही हत्यारे मोडून त्यांचे नांगराचे फाळ उत्कृष्ट बनतील ते तयार करा आणि शेती करून शांततेने सुखोपभोग घ्या कसे! एल्फिन्स्टनने ही क्लृप्ती एकदम अमलात आणली. तिचा परिणाम काय झाला, तो आज आपण पाहत आहो. स्वसंरक्षणाचा हक्क सर्वस्वी गमावून आपण पोलिसाकडे धाव घेऊ लागलो.

अनुक्रमणिका

आश्चर्याची गोष्ट परवा वाचली, ती ही की, आज जागतिक युद्ध संपल्याबरोबर ज्या हिंदी फौजा रिकाम्या होणार, त्यांचे करायचे काय, ही विवंचना आजच्या सरकारास पडून त्यांनीही पुनरपि एल्फिस्टनच्याच मार्गाचा अवलंब सुचविला आहे. इंग्रजांची राजनीती कशी अस्खलित अखंड चालते पहा. इटली, ग्रीस, ब्रह्मदेश इत्यादी देशांत हिंदी सैनिकांनी बहादुरी मिळविल्यावर पुनरपि त्यांच्या हातात नांगरच येणार की काय, कोणी सांगावे!

स्वराज्याच्या काळात आपल्या समाजाची स्थिती व तयारी इतकी भिन्न होती की, आजच्या आमच्या लेखण्यांना ते पूर्वीचे सामर्थ्य दर्शविता येणार नाही. इतिहासात आपण काही थोडी पुरुषांची नावे तेवढी वाचतो. स्त्रियांची नावे विद्यार्थ्यांच्या कानावरून गेली, तर ती जिजाबाई, अहल्याबाई, राणी लक्ष्मीबाई अशा चार-चौघींचीच. फार झाले तर, पद्मिनी, रझियाबेगम, चांदबिबी वगैरे आणखी चार-दोन नावे मिळविली की, संपला स्त्रियांचा भाग. मग खुशाल रामायण-महाभारताकडे जाऊन सीता, द्रौपदी, दमयंती, सावित्री यांची आख्याने पाठ करून माना डोलवाव्या.

मराठ्यांच्या इतिहासात स्त्रियांचा भाग केवढा होता, याची जाणीव माझ्या मते फार थोड्यास असेल. शाळेत जाऊन साक्षरता पैदा करण्याचा तो काळ नव्हता. संसारातले प्रत्यक्ष व्यवहार जबाबदारीने उलगडण्याची ताकद पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही असते, तेव्हाच ते राष्ट्र जिवंत राहते. संताजी घोरपडे बऱ्हाणपुरापासून जिंजीपावेतो हजार मैलांच्या क्षेत्रात चमकत राहून औरंगजेबाच्या फौजेस आठ वर्षेपावेतो नमवू शकला, त्यावेळी त्याचे घरचे प्रपंच व जागिरीची व्यवस्था कोण सांभाळीत होते, याचा विचार आपल्या मनात येतो काय? तंजावर, जिंजी, श्रीरंगपट्टण, भागानगर, उज्जैन, झाशी, मकसुदाबाद, मथुरा, लाहोर, अटकपावेतो मराठे सरदार व त्यांचे सैनिक सारखे शेदोनशे वर्षे मुलूखगिरी करीत दौडत होते, तेव्हा त्यांच्या वतनी गावांचा कारभार सर्व त्यांच्या बायका पाहत होत्या. पुरुष दहापंधरा वर्षांचा झाला की, तो वडिलांबरोबर बाहेर पडे. घरचा कारभार सर्व स्त्रियांच्या हाती. प्रत्येकाच्या घरी पाचपन्नास कारकून व शिपाईप्यादे बंदोबस्तास असत, त्यांजवर सर्व मालकी व देखरेख मुख्य मालकिणीची असे. वसूल वेळेवर करणे,



युगवाणी

वर्ष १ लें | जानेवारी १९४६ | पुष्प १ लें

संपादक—वामन नारायण देशपांडे.

पिकलें पान

पण मजला येईल कसें जातां,
म्हणु ओवूं मी काव्य कसें आतां ?
अंगि नुरली निर्माणशक्ति * लेश
—कसा यावा भर काव्यकौमुदीत !

स्फूर्तिगंगीचा लोप झाला 'मंत्र'
तिथें शाळे शिकलों गहन 'मंत्र' †
'मंत्र' विसरलों, लोप मी उदास !
—कसा यावा भर काव्यकौमुदीत ?

एक नैसर्गिक जन्म सर्वमान्य
अन्य होतो संस्कारकर्म-जन्य
[illegible]
काव्यसौंदर्यी आमचे दुर्गीय !

काव्यदेवी-देउळी-गर्भगारीं § —
शिरें नकळीं मी ना कधीं अभागी !
मलभींचे [illegible] दर्शनानें
मुग्ध स्वर्गानंदि तें न मिळायाचें !

भाग्य नसतां मज रसिकरंजनाचें
कसे फार्डू उद्गार अन्तरींचे ?
कुणा सांगूं या कर्मकहाणीला ?
—मला वाटे हा जन्म फुकट गेला !

Bee

* Creative Power. † Art. § गाभारा.

जमा-खर्च ठेवणे, लांड्या-लबाड्या मिटविणे, लग्नकार्याचे व सणावारांचे समारंभ उरकणे ही कामे तर बायकांना करावी लागतच, पण शिवाय बाहेर लढणाऱ्या पुरुषांकडून मागणी येई त्याप्रमाणे नवीन रिक्रूट भरती करणे, त्यांची परीक्षा करून पगार ठरविणे, त्यांना घोडे सामान वगैरे पुरविणे, अशी सर्व आनुषंगिक कामे बहुधा बायकाच करीत. लिहिता येत असो नसो, पण व्यवहार काही अडत नसे, जिवंत राष्ट्राच्या स्त्रियांना हे व्यवहार उलगडल्याशिवाय भागलेच नसते. यावरून व्यावहारिक शहाणपण व प्रपंचचातुर्य स्त्रीवर्गाला त्या काळी केवढे आले असेल, याची कल्पना होईल.

पण याशिवाय दुसरा एक स्वसंरक्षणाचा प्रकार त्यावेळी अत्यंत निकडीचा कसा होता, हे सहसा कोणाच्या लक्षात येण्याजोगे नाही. तो काळ आजच्या-सारख्या इंग्रजी शांततेचा नव्हता. चोऱ्या, दंगे, खून, मारामाऱ्या अशा धामधुमी सारख्या चालत. कोणतेही

अनुक्रमणिका

लग्नकार्य किंवा समारंभ निर्विघ्नपणे पार पडणे इतके मुश्किलीचे होते की, मानवी उपाय पुरे करूनही यशाची खात्री नसे. म्हणून प्रत्येक लहान-मोठ्या कृत्याच्या आरंभी विघ्नहर्त्या गजाननाची पूजा करण्याचा प्रघात सार्वत्रिक बनला. त्यातून स्त्रियांना तर इतर प्रापंचिक दक्षतेपलीकडे स्वतःच्या अब्रूचा बचाव करणे हे एक अवघड जोखीमच होते. केव्हा कोठे कसा प्रसंग येईल, याचा नेम नसे. प्रवास तर अत्यंत संकटमय होता. त्यासाठी प्रत्येक स्त्रीला घोड्यावर बसण्याची कला अवगत असावी लागे. अकस्मात हल्ला आला, तर शत्रूचा पाडाव व स्वतःचा बचाव करण्यासाठी तरवार, बर्ची, भाले इत्यादी शस्त्रे बाळगून त्यांचा उपयोग करण्याचे सामर्थ्य स्त्रियांना असावे लागे. काही तरी गुप्त हत्यार वेणीत वगैरे बाळगून किंवा निदान विष घेऊन प्राणत्याग करण्याची तयारी त्या ठेवीत.

होळकरांचा सरदार गंगाधर यशवंत चंद्रचूड आपल्या पुत्रांसह उत्तरेत दिल्लीकडे कामगिरीवर असता दक्षिणेत निजामाने पुणे, नाशिक वगैरे शहरे जाळल्याची बातमी त्यास कळली. त्याने वाफगावास बायका होत्या त्यांस खबर विचारली की, तुमचा समाचार कसा काय आहे. त्यावर त्या स्त्रियांनी बाणेदार उत्तर पाठविले, त्यात त्यांच्या दक्षतेचे उत्कृष्ट वर्णन आढळते. त्यांनी कळविले की, आपण सर्व तिकडे निश्चिंत राहा, येथे आमचा बंदोबस्त पक्का आहे. मोलवान जिंदगी सर्व जागजागी गुप्त ठेविली आहे. शत्रू आला, तर त्याच्या हाती काही लागू नये, अशी तजवीज केली आहे. तुम्ही ज्या कामगिरीवर आहा, ती उत्कृष्ट पार पाडा, म्हणजे आम्हांस सर्व पावले. अशा बायका धीर देणाऱ्या राष्ट्रांत असतात, तेव्हाच राज्य चालते.

युद्धकला, राजकारण, न्यायनिवाडे, लोकसंग्रह अशा राज्याच्या नानाविध अंगात महाराष्ट्रीय स्त्रिया किंबहुना पुष्कळशा हिंदी स्त्रिया-पुरुषांच्या बरोबरीने आलेली कामे कशा उलगडीत होत्या, याची उदाहरणे वाटेल तितकी देता येतील, बाजीरावांचे प्रेमपात्र मस्तानी ही सुस्वरूप व नृत्यगायनादी कलांत निष्णात होती, हे आपण जाणतो. पण तिच्या अंगी बाजीरावाला आवडणारे अश्वारोहण व शस्त्रकला हे गुणविशेष होते, म्हणूनच बाजीराव तिजवर इतका फिदा झाला. 'तारिखी महंमदशाही' या ग्रंथांत मस्तानीचे वर्णन दिले आहे, ते असे, "ही कंचनी असून अश्वारोहणात विशेष कुशल होती. बाजीरावाप्रमाणेच ती तरवार-भाला वापरून त्याजबरोबर भरधाव दौड करी. ती दोघे तीव्र वेगाने घोडदौड करीत, तेव्हा त्यांच्या रिकिबी यत्किंचित मागे पुढे होत नसत. मोहिमांत ती बाजीरावाच्या बरोबरीने हजर असे." ("Mastani was a dancing girl possessing fine horsemanship and skill in handling the sword and the spear. She always accompanied Bajirao in his campaigns and rode stirrup to stirrup with him.")

सुरजमल्ल जाठाचे नाव मराठी इतिहासात गाजलेले आहे. त्याची राणी किशोरी हिचा लौकिक त्यावेळी सर्व देशभर गाजलेला होता. सदा हसतमुख असल्यामुळे तिला 'हसिया' हे टोपणनाव पडले होते. तिने केवळ स्वतःच्या अकलेने जाठ राज्याचा लौकिक तर वाढविलाच, पण देशातील अनेक बिकट राजकारणे परहितबुद्धीने सोडवून आपले नाव अजरामर करून ठेविले. स. १७५४ साली राघोबादादांनी जाठांच्या कुंभेरी किल्ल्यास वेढा घातला, त्या प्रसंगात मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव (अहल्याबाईचा नवरा) मारला गेला, त्या शोकावेगात मल्हाररावाने प्रतिज्ञा केली की, जाठांचे राज्य समूळ बुडविणार. सुरजमल्लावर मोठा पेच येऊन पडला. या पेचातून राणी किशोरीने जयाप्पा सिंद्याशी संधान बांधून संकट निवारण केले. पुढे सात वर्षांनी पानिपतावर मराठ्यांचा संहार होऊन हजारो लोक जीव बचावून परत आले, त्यास स्वखर्चाने अन्नवस्त्रादी साहित्य पुरवून राणी किशोरीने त्यांचा उत्कृष्ट परामर्श घेतला. या तिच्या शहाणपणाचे व औदार्याचे वर्णन मराठी कागदांत आढळते. यावरून स्त्रियांच्या अंगी त्यावेळी केवढे कर्तृत्व होते, याची कल्पना होईल.

पेशव्यांच्या घराण्यांत अनेक नामांकित स्त्रिया निपजल्या. त्यांची चरित्रे वाचकांस थोडीबहुत परिचित असल्यामुळे त्यांचा निर्देश करण्याची आवश्यकता नाही. शिवाजीची मातुःश्री जशी जिजाबाई तशीच बाजीरावाची मातुःश्री राधाबाई ही एक राज्यांतील प्रचंड शक्ती होती. गोपिकाबाई, रमाबाई, आनंदीबाई यांची कर्तबगारी सुविख्यात आहे. शिवाजीने कर्नाटकात स्वारी करून सावत्र बंधू एकोजीशी कलह मांडला, त्या बिकट राजकारणाचे निरसन एकोजीची बायको दीपाबाईने केले.

या दीपाबाईची वाखाणणी प्रत्यक्ष शिवाजीनेच केलेली आढळते. 'आमची भाजयी शहाणी. त्यांनी योग्य निकाल लावला', असे म्हणून बंधूचा जिंकलेला प्रदेश शिवाजीने या भावजयीच्या स्वाधीन केला. अशा स्त्रिया आपल्या सामर्थ्याने राज्ये सांभाळीत, हा त्यांचा गुण चिरस्मरणीय नाही काय? शिवाजीच्या दोघी सुना, संभाजीची बायको येसूबाई व राजारामाची ताराबाई, एवढ्या पराक्रमी लौकिकवान निघाल्या की, त्यांच्या कर्तबगारीची छाप मराठी राज्यावर कायमची बसली. महादजी सिंद्यांच्या तिघी स्त्रिया लक्ष्मीबाई, भागीरथीबाई व यमुनाबाई यांनी दौलतराव सिंद्याशी तीन-चार वर्षे प्रचंड युद्धसंग्राम करून सर्व हिंदुस्थान हालवून सोडले, हे कितीकांस माहीत आहे? मात्र हा युद्धकलह केवळ आपसातला असल्यामुळे त्यास राष्ट्रोपकारक स्वरूप प्राप्त झाले नाही. पण त्यामुळे त्या स्त्रियांच्या नैसर्गिक पराक्रमास वैगुण्य येत नाही.

दौलतराव सिंद्याची बायको बायजाबाई हिचे नाव अव्वल इंग्रजीत विशेष गाजले. पराक्रमास क्षेत्र नसल्यामुळे त्या बाईचा कोंडमारा झाला. स. १८३४ साली वैधव्य स्थितीत ती ग्वाल्हेरचा कारभार करीत असता मिस् पार्क नावाची एक इंग्रजबाई या राणीकडे पाहुणचारासाठी आली. या इंग्रज बाईला घोड्यांचा शौक असून अश्वारोहणात ती आपणास पटाईत समजे. तिच्यासाठी बायजाबाईने मुद्दाम एक अश्वप्रदर्शन भरविले. त्यावेळी ग्वाल्हेरकरांजवळ वीस-पंचवीस हजार स्वारांची फौज सज्ज होती. बायजाबाईने एक घोडासमोर आणून त्या इंग्रज पाहुणीला सांगितले, ''याच्यावर बसून दाखवा.'' बाईने आपली शिकस्त केली, पण तो घोडा तिला नुसता हात लावू देईना. हिरमुसली होऊन ती परत आली, तेव्हा बायजाबाईने मागे दासी उभी होती, तिला डोळ्यांची खूण केली आणि सांगितले, ''पहा ग, तुला हा घोडा बसू देतो का!'' लगेच ती दासी लुगड्याचा काचा मारून चटकन त्या घोड्यावर आरूढ झाली आणि घटका-अर्ध घटकेत त्याला दौडवून इतका नरम करून आणला की, त्या इंग्रज बाईला मराठी स्त्रियांच्या या अश्वारोहण-कौशल्याचे मोठे आश्चर्य वाटले. त्या बाईनेच ही हकिकत आपल्या प्रवासवर्णनात लिहून ठेविली आहे. स्वराज्य असले, म्हणजे राष्ट्रगुणांचे संगोपन कसे होते, हा प्रकार यात दिसून येतो.

मी काही केवळ हिंदू स्त्रियांचेच वर्णन करीत आहे, असे नाही. हिंदुस्थानात झालेल्या कोणत्याही धर्माच्या किंवा समाजाच्या स्त्रिया असल्या, तरी कर्तबगारीच्या दृष्टीने त्या सर्व समान होत. मुसलमानांच्या कित्येक स्त्रिया हिंदूसारख्याच नामवंत झाल्या. नूरजहान, मुमताजमहल, जहानआरा, औरंगजेबाच्या कन्या झेबुन्निसा व झीनतुन्निसा यांची चरित्रे इतिहासात थोडीबहुत महशूर आहेत. झीनतुन्निसा या बेगमने येसूबाई व तिचा पुत्र शाहू ही बादशहाच्या कैदेत होती, त्यांचा परामर्श घेतला. किंबहुना, त्यांना पुढे चांगले दिवस दिसले, ह्याचे श्रेय या परोपकारी बाईलाच दिले पाहिजे. दुसऱ्या एका दृष्टीने एक मुसलमान बाई अब्दाली-मराठ्यांच्या झगड्यात प्रमुख होती. तिचे आख्यान फारसे कोणास माहीत नाही. हिचे नाव मुगलानी बेगम. पंजाबचा सुभेदार मीर मन्नू म्हणून होता, त्याची ही बायको मोठी, जहांबाज, हरएक कपटात निष्णात व राजकारण हालविणारी झाली. मीर मन्नू मेल्यावर पंजाबचा कारभार हिच्या हातात आला, तेव्हा अब्दालीला हिंदुस्थानात आणून मराठ्यांची खोड मोडण्याचा उपक्रम तिने केला. स्वरूपसौंदर्य व आकर्षक भाषण यांच्या जोरावर ती आपला पगडा वाटेल त्याजवर बसवी. पंजाबच्या व दिल्लीच्या उमरावांची, त्यांच्या संपत्तीची व गुणावगुणांची बातमी या बाईला खडान्‌खडा माहीत असून अब्दाली दिल्लीवर आला, तेव्हा तेथील धनिकांची व त्यांच्या गुप्त संपत्तीची संपूर्ण माहिती तिने अब्दालीस पुरविली, त्या आधारावर त्याने सर्व दिल्ली लुटून फस्त केली. अब्दालीने या बाईचा बडेजाव अतोनात वाढवून तिच्याकडून आपला मतलब साधला. त्याने तिला जागिरीची वचने दिली. 'मीर्झा' म्हणजे राजपुत्र असा किताब तिला देऊन इतके काही खूश केले की, चार-दोन महिनेपावेतो अब्दालीची मर्जी सांभाळण्याकरिता दिल्लीचे उमराव मुगलांनी बेगमेच्या पायांशी लोटांगणे घेत. पण अब्दालीही तिला पूर्ण ओळखून होता. स. १७५७ च्या एप्रिलात तो परत स्वदेशी जाण्यास निघाला, तेव्हा ती त्याजपाशी आपल्या श्रमाचे बक्षीस मागू लागली. मग तो तिची भेटही घेईना. लाहोर, अटकपावेतो ती तशीच त्याच्यामागोमाग त्यास अडवीत गेली. शेवटी नाइलाज होऊन त्याने तिला छड्यांनी बडवून घालवून दिले. तेव्हा ती पुढे अन्नान्न-दशेत मरण पावली. तिचे भरपूर चरित्र मिस्किन नावाच्या

तिच्याच एका नोकराने फारशीत लिहिलेले ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. मुगलानी बेगमच्या कर्तबगारीचा हाही एक प्रकार इतिहासात संस्मरणीय नाही का?

ताई तेलीण, झाशीची राणी, तुळसाबाई होळकर अशा कित्येक स्त्रियांच्या हकिकती वाचकास थोड्या-बहुत अवगत आहेत, म्हणून त्या मी येथे सांगत नाही. पंजाबच्या रणजितसिंहाचा इतिहास पुष्कळास अवगत आहे, पण त्याची राणी जिंदनकौर व तिचा पुत्र धुलीपसिंह यांची चरित्रे इंग्रजीत भरपूर असून ती वाचल्यावर त्यांच्या दुर्दैवी कहाणीने हृदय भरून आल्याशिवाय राहत नाही. धुलीपसिंह दहा वर्षांचा असताना डलहौझीने त्यांचे राज्य व कोहिनूर हिरा त्याजकडून घेतला आणि त्यास अल्प नेमणूक देऊन युरोपास पाठविले आणि त्याच्या मातुःश्रीस काशी येथे प्रतिबंधात ठेविले. धुलीपसिंह ख्रिस्ती झाला, युरोपात भटकून थकला आणि इंग्रजांच्या वैराने नखशिखांत जळून गेला. मातुःश्रीलाही त्याने पारिस येथे नेले. उभयतांचे अंत कष्टप्रद झाले. लेडी लोगिन म्हणून धुलीपसिंहाची पालनकर्ती इंग्रजांनी नेमलेली होती, तिने आपल्या आठवणीचे भले मोठे पुस्तक लिहिले आहे, ते जिज्ञासूंनी वाचल्यास राजकारणाचे देखावे कसे बदलत जातात, ते कळून येते.

जोधपूरची इंद्रकुमारी व उदेपूरची कृष्णाकुमारी या राजपूत स्त्रियांची नावे विशिष्ट कारणांनी प्रख्यात पावली, त्यांच्या हकिकती येथे सांगू लागल्यास त्यासाठी एक स्वतंत्र ग्रंथ करावा लागेल. नेपाळ व कुर्ग येथील राजकन्यांची चरित्रे अव्वल इंग्रजीत गाजलेली आहेत. नाना फडणिसाची शेवटची स्त्री जिऊबाई हिच्यावर बाजीरावाचा डोळा असता मोठ्या हिकमतीने तिने आर्थर वेल्स्लीशी संधान बांधून आपल्या शीलाचा बचाव केला, ते तिचे धैर्य नावाजण्यासारखेच म्हटले पाहिजे.

ख्रिस्तधर्मी स्त्रियाही कित्येक या विषयात माझ्या स्मरणात आहेत. क्लाइव्ह व वॉरन्हेस्टिंग्स यांची नावे इंग्रज बादशाहीचे संस्थापक म्हणून इतिहासात झळकतात, पण नीतिमत्तेच्या दृष्टीने त्यांच्या नावास लागलेले डाग कालत्रयी निघणारे नाहीत. क्लाइव्हने आत्महत्या केली आणि हेस्टिंग्सला सात वर्षे पार्लमेंटापुढे कैदी होऊन पापांचा झाडा द्यावा लागला. या हेस्टिंग्सची बायको मारियन हिचा इतिहासही नवऱ्याच्या कीर्तीस शोभेसाच बनला हे फारसे कोणास माहीत नाही. 'माझी प्रिया मारियन' या नावाचे एक सुंदर पुस्तक इंग्रजीत आहे, ते जिज्ञासूंनी अवश्य वाचावे. मूळची ही जर्मन बाई सरदार इमॉफची विवाहित बायको. नवऱ्यासह स. १७६९ त हिंदुस्थानात येत असता त्याच बोटीवर हेस्टिंग्सही प्रवासी होता. प्रवासास त्यावेळी तीन-चार महिने लागत. केप ऑफ गुडहोपजवळ हेस्टिंग्स समुद्र लागून महिनाभर विव्हळ झाला. या बाईने आजारात कायम सलगी जडली. पुढे नवऱ्याशी काडी मोडून तिने हेस्टिंग्सशी लग्न केले. बारा वर्षे हेस्टिंग्सने गव्हर्नर जनरल म्हणून कारभार केला, तो काळ म्हणजे एखाद्या मोगल बादशहासही मागे टाकील अशा थाटाचा इतिहासात गाजला. त्याची वर्णने बर्क व मेकॉले यांच्या ग्रंथांत चिरस्मरणीय झाली आहेत. मग त्या बारा वर्षांत हेस्टिंग्सच्या या प्रियकर पत्नीचा थाट व दिमाख केवढा असेल, याची कल्पना करावी. कलकत्त्याजवळ अलीपूर येथे हेस्टिंग्सचा वाडा होता, त्यावरून या बाईला 'अलीपूरची माता' हे टोपण नाव प्रचारात पडून बंगाल प्रांतात ती एक कायम थट्टेचा विषय बनली होती. एक इंग्रज नोकरीतून कमी झाला व आपल्या मित्रास विचारू लागला, 'मला एखादी भरीव नोकरी मिळविण्याची युक्ती सांग रे!' मित्र म्हणाला, 'वाः युक्तीला रे काय तोटा? ती अलीपूरची माता मारिया आहेना, तिच्या जाऊन पाया पड किंवा जवळ असेल नसेल, ते विकून त्या 'पूलबंदी'ची भर कर, म्हणजे नोकरी ठेवलेली.' पूलबंदी हे सरन्यायाधीश एलिजा इंपे यांचे टोपण नाव त्यावेळी लोकचर्चेत होते. अशी ही सुप्रसिद्ध इंग्रज मुत्सद्यांची नीतिमत्ता इतिहासात गाजली आणि हेच लोक आम्हा प्राच्य लोकांस 'एशियाटिक' म्हणून हिणवितात. मारियन बाईने हेस्टिंग्सला अखेरपर्यंत सोबत केली. त्यांचा पत्रव्यवहार वाचण्याजोगा आहे.

बेगम समरू नावाच्या दुसऱ्या एका कर्तबगार बाईचे नाव इतिहासात झळकले आहे. ही मूळची काश्मीरची मुसलमानीण. वॉल्टर रेनार्ट नावाचा एक जर्मन सेनानायक नबाब मीर कासीमजवळ नोकरीस होता, त्याची ही बायको. नवऱ्याच्या पश्चात ती त्याच्या लष्करी पथकाची मालकीण होऊन शहाआलम बादशहाच्या नोकरीस राहिली आणि तीस वर्षेपावेतो अंगच्या पराक्रमाने तिने अनेक संकटांतून त्या दुर्दैवी बादशहाचा बचाव केला. तिने ख्रिस्ती धर्म स्वीकारून मोठा लौकिक

मिळविला. मीरतजवळ सारधाना येथे तिची जागीर असून तिचे वाडे वगैरे विद्यमान आहेत. बेगम समरू हे तिचे नाव इतिहासप्रसिद्ध आहे.

लिहिता लिहिता प्रकरण कल्पनेबाहेर लांबले, स्वराज्याच्या दीड-दोनशे वर्षांच्या काळात पुरुषांप्रमाणेच हिंदी स्त्रियांनीदेखील केवढी कर्तबगारी गाजविलेली आहे, याची जाणीव आज सर्वत्र बुजालेली दिसते आणि आपल्या प्राच्य स्त्रिया अज्ञानी व कर्तृत्वशून्य असून हल्लीच काय ती इंग्रजी राज्यात त्यांची उन्नती होत आहे, असा समज प्रचलित झालेला दिसतो. तो किती अवास्तव आहे आणि जिवंत राष्ट्राला कोणत्याही काळात पुरुषांप्रमाणेच स्त्रियांच्या कर्तृत्वाची केवढी जरूर असत, हेच मला मुख्यत्वे सांगावयाचे आहे. मी केवळ पाच-पंचवीस ठळक उदाहरणे या लेखात आणली आहेत, पण त्याशिवाय आणखी कितीतरी अशीच उदाहरणे इतिहासात आढळतात. ती वाचून आपले मिथ्या ग्रह दुरुस्त होतील, तर आपल्या उदयेच्छु राष्ट्राला एक नवीन पाठिंबा मिळून आजकालच्या विजयलक्ष्मीसारख्यांना विशिष्ट स्फुरण मिळेल, असे मला वाटते. एवढे सांगून मी वाचकांची रजा घेतो.

• • •

अनुक्रमणिका

कवितांतर

भारतीय कविता


भारतीय कविता : त्रिविधा

के. जी. संकर पिल्लै
(मल्याळी)

सुकुमारन
(तमिळ)

नीलिमकुमार
(आसामी)

अनुवाद
चंद्रकांत पाटील



के. जी. संकर पिल्लै
(मल्याळी)

१९४८ मध्ये जन्मलेले के.जी.एस. साठोत्तर मल्याळी साहित्यातील आघाडीचे कवी आहेत. 'बंगाल' या १९७० मध्ये प्रकाशित झालेल्या कवितेनंतर मध्यप्रवाहात आल्यानंतर त्यांना समकालीन मल्याळी कवितेतील एक प्रमुख स्वर म्हणून ओळखले जाऊ लागले. आतापर्यंत त्यांचे ११ कवितासंग्रह आणि दोन निबंधसंग्रह प्रकाशित झालेले आहेत; शिवाय त्यांच्या मुलाखतींचे दोन संग्रह व एक त्यांच्या निवडक कवितांचा संग्रहही बहुचर्चित झालेला आहे. त्यांच्या कविता बहुतेक भारतीय भाषांत व चिनी, फ्रेंच, स्वीडिश, अरबी, जर्मन, इंग्रजी आणि सिंहली भाषेत प्रकाशित झालेल्या आहेत. नुकताच त्यांच्या निवडक कवितांच्या इंग्रजी भाषांतराचा 'द ट्रीज ऑफ कोची ॲण्ड आदर पोएम्स' हा संग्रह प्रकाशित झाला असून तो प्रसिद्ध मल्याळी कवी व समीक्षक ई.व्ही. रामकृष्णन यांनी अनुवादित व संपादित केला आहे. (प्रकाशक : साहित्य अकादमी, दिल्ली.) शिवाय त्यांचे संग्रह हिंदी, कन्नड, तमिळ भाषांतही अनुवादित झालेले आहेत. त्यांना साहित्य अकादमी, दिल्लीसह राज्य व राष्ट्रीय स्तरावरील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

के.जी.एस. हे साहित्याचे प्राध्यापक म्हणून सुमारे ३२ वर्षे कार्यरत होते. एक महत्त्वाचे मल्याळी अनुवादक असलेले केजीएस अनेक महत्त्वाच्या वाङ्मयीन नियतकालिकांचे संपादकही होते. सध्या ते आशियाई मानवी हक्क कमिशन, हाँगकाँगच्या निर्देशक समितीचे एक माननीय सदस्य आहेत.

सध्या त्यांचे वास्तव्य बंगळुरूत आहे.

दिवसभरातली बहुश्रुतता

शेकडो गावांत
शाळांमधल्या हजारो वर्गांत
एकसारखीच दिवसाची सुरुवात

कविता असते उत्स्फूर्त
उद्रेक प्रबळ भावनांचा
म्हणतो वर्डस्वर्थ

चंद्रकांत पाटील
'ऋतुरंग' अपार्टमेंट्स, परांजपे शाळेजवळ, कोथरूड, पुणे
मो.: ९८२२४९८५६४
संपर्क :
patilcn43@gmail.com

अनुक्रमणिका

सकाळी अकराचा सूर्योदय
कोरतोय शंकांचं चर्च
टाकून दिलेल्या खडकावर

कविता असते पलायन
भावनांपासून
म्हणतो एलियट

तोच-तो आत्मा-शोधक
सूर्य भरमाध्यान्हीचा
अपयशात आक्रसणाऱ्या रस्त्यांवर
अभ्यासक्रमाबाहेर

कविता असते शस्त्रात्रंही
म्हणतो ब्रेख्त

गडद होत जाणाऱ्या सावल्यांची
न बदलणारी तिपार
करपलेल्या माळरानात आसुसलेली
म्लान होणाऱ्या ढगांच्या गडगडाटासाठी

कविता असते राजकारण
म्हणतात ई एम् एस्

कविता असते चषक जिंकलेला
अखेरच्या चेंडूवर मारलेल्या षट्कारानं
एक-दिवसीय क्रिकेटमध्ये
म्हणतेय गॅलरी

कविता असते
लहान लहान लाटांनी वितळणारं
द्रव एखाद्याच्या 'स्व'मध्ये
घोषित केलंय दारुड्यांच्या घोळक्यानं

कविता असते
स्त्रीची काया जी गाते
आणि नाचते, झिंग रतिभावाची
डोक्यापासून पायापर्यंत
म्हणते दूरदर्शनची सांध्यवंदना

शेकडो जंगलांत
हजारो फांद्यांवर
तोच-तो सूर्यास्त

कविता असते
सशस्त्र अहिंसा,
म्हणतो सांबर
(शिंगांकरिता शिंगं असतात)

कविता असते
जगाच्या आवेगाचं आरोहण
चंद्राच्या अवस्थांमधून,
म्हमते चंद्रकोर

कविता असतो
धर्मविधी
जीवनाच्या प्रवासाचा
म्हणतो मृत्यू

कविता असते
क्षुब्ध अंतहीन संघर्ष
चांद्रमासाच्या भरती-ओहोटीचे,
म्हणतो समुद्र.

• • •

अर्थ

भाषेत गुंफून
घेऊन जातो मी हे जग सगळीकडे
हातातल्या घड्याळासारखं
जिथं जिथं जातो मी
जे काही करतो मी

म्हणून
कुठल्याही अंतराचा
कुठल्याही कृतीचा
कुठल्याही शब्दाचा
कुठल्याही लयीचा
कुठल्याही क्षणाचा
एकच असतो अर्थ : काळ

• • •

अनुक्रमणिका

कोलाहलदैत्याच्या शहरात

कानांचा थवा भटकतोय
शांततेच्या शोधात
कोलाहलदैत्याच्या शहरात

तत्काळ न वितळणारा
कोलाहल विरळ हवेत
प्रेमासारखा वा गहाण वस्तूसारखा
किंवा पीएफवरील कर्जासारखा
किंवा खडकाच्या सुळक्यासारखा
किंवा महासरोवरासारखा

शांतता जी कोरली जाऊ शकते
शिल्पांमध्ये
किंवा जिचं सिंचन केलं जाऊ शकतं
गोडव्याच्या कापणीसाठी

• • •

आत्मचरित्राची प्रस्तावना

कुठून सुरू करू?

इतिहास माझ्यातून सुरू झाला
की मी सुरू झालो इतिहासातून?

कुणी कुणापासून आकार घेतला?

मी जग पाहिलं
की जगानं मला पाहिलं?

कोण कुणामध्ये झालं साक्षात?

मी कसं बघावं?

आठवणींसह
की विस्मरणासह?

मी बदलवतोय का रुळलेल्या वाटा
माझ्या रक्तवाहिन्यांत?
मी बदलवतोय का अस्ताव्यस्त पसरलेली
शेतं माझ्या मांसात?
मी बदलवतोय का गळा आवळणारं वादळ
माझ्या श्वासोच्छ्वासात?

आनंदित
वा अतिव्यथेत

मी बदलवून टाकेल का जगण्यातलं भय
प्रेमात?
मी पवित्र करतोय का
मीच परलेली पापं?

मी बदलवून टाकतोय का माझे उन्मत्त विजय
त्यागकर्मात?
गुप्तपणे
वा उघडपणे

मी बदलवून टाकतोय का फुलझाडं
भुताखेतात?
मी बदलवून टाकतोय का नातीगोती
सिद्धान्तात?
मी बदलवून टाकतोय का पाहिलेला पाताळ
मिथ्यकथेत?

वा गतिमानतेत वक्रीकरणात

मी आणतोय का मागचं जग
पुढं?

नम्रपणे वाकून
लाथाडून

वा गौरवानं

मी बदलवतोय का पतित घोड्याला
विजेत्यात?

स्तुती करीत
वा अनादर करीत

मी विद्रूप करतोय भूतकाळ?

• • •

म्हणून मी पागल झालो नाही

जर मी बोललो
तर माझ्यावर आरोप होतील
जर मी विसरून गेलो
तर होईन उजाड भुई
जर मी बोललोही नाही आणि
विसरलोही नाही तर मला वेड लागेल

म्हणून मी गाडून टाकल्या
काही आत्मीयता माझ्या
भाषणाच्या किनाऱ्यावर, माझी
काही दुःखं माझ्या डोळ्यांच्या
परिघावर, काही सत्यं
माझ्या स्मितहास्याच्या शेजारी

मी त्यांना सुरक्षित ठेवलं
माझ्या सावध डोळ्यांच्या कमानीत
उत्सुकतेनं बघायला कसं वाढतात ते


मी गाडून टाकला माझा थोडासा क्रोध
जटायूच्या अवाढव्य चोचीत
गोयाच्या रंगरेषांत
'इन्किलाब'च्या बाणाच्या टोकात
स्वाक्षऱ्यांत, पायदळातल्या
वाहिनीच्या स्वाक्षरकर्त्यांसोबत

म्हणून मी पागल झालो नाही
माझ्या कपाळावर उगवून आली नाहीत
शिंगं किंवा माझं भय बदललं नाही
कपट वा धोकेबाजपणात किंवा माझ्या चुका
भरकटल्या नाहीत रक्ताच्या सीमांवर.

• • •

अनुक्रमणिका

सुकुमारन
(तमिळ)



जन्माने केरळी असलेले सुकुमारन (जन्म : १९५७) हे समकालीन तमिळ कवितेतील महत्त्वाचे कवी, कादंबरीकार, अनुवादक आणि संपादक आहेत. 'कुंगुमम्' या प्रख्यात तमिळ साप्ताहिकाचे दीर्घकाळ संपादन केल्यानंतर सध्या ते सूर्या टीव्हीचे प्रमुख वृत्तसंपादक आहेत.

आतापर्यंत त्यांचे सहा कवितासंग्रह, दोन कादंबऱ्या आणि सहा लेखसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या कविता इंग्रजी, जर्मन, मल्याळी, बंगाली, पंजाबी आणि मराठीत प्रकाशित झालेल्या आहेत.

त्यांनी मल्याळीतून तमिळमध्ये केलेल्या भाषांतराची ११ पुस्तके त्यात वायकम् महम्मद बशीर, अदूर गोपालकृष्णन, सच्चिदानंदनच्या पुस्तकांचा समावेश आहे; शिवाय त्यांनी गॅब्रिअल गार्शा मार्केज, पाब्लो नेरुदा इत्यादींच्या साहित्यकृतींसह इटली, तुर्की पोलिश साहित्यकृतींचे सात अनुवाद केलेले आहेत. त्यांना कॅनडातील तमिळ लिटररी गार्डनचा मानाचा पुरस्कार मिळालेला आहे.

सध्या ते 'कला चिवाडू' या कलाविषयक नियतकालिकाचे संपादक आहेत.

ते सध्या तिरुअनंतपुरमला राहतात.

शक्यता

तुम्हाला समजू शकतं का
पानाचं कण्हणं
फांदीपासून तुटलेल्या ?
तरच
तुम्हाला कळेल
झाडाचा इतिहास

जर तुम्हाला पकडता येईल
भरकटणारं पीस
पाखराच्या पंखापासून तुटलेलं
तरच
तुम्हाला कळू शकेल
पाखराचं स्वातंत्र्य

जर तुम्हाला जाणवू शकेल
थेंबाची तरलता
ढगातून निसटलेल्या
तरच
तुम्हाला शक्य होईल वाचणं
नदीची कुंडली

जर तुम्ही ऐकू शकाल
मौनाचा आवाज
शब्दातून उमटणारा
तरच
तुम्ही अनुभवू शकाल
कवितेचं असतेपण
• • •

ज्या दिवशी मी मरण्यात अपयशी झालो होतो

मरणं ही कला आहे – इतर सगळ्या गोष्टींप्रमाणे
मी तिला आत्मसात केलं आहे अपवादात्मकरीत्या उत्तम.
– सिल्व्हिया प्लाथ

जेव्हा मी ही शेवटची गोळी गिळली
माझ्या मनातल्या विचारांच्या लाटा ओसरल्या
सगळं शांत झालं
मरण चालून आलं दयाभावानं

अनुक्रमणिका

इथून पुढं जागेपणाची दु:खं असणार नाहीत
आसवं असणार नाहीत
भळभळून वाहणाऱ्या कुठल्याही जखमा असणार नाहीत
किंवा वेदनेतल्या भटकंत्या
खोटेपणातला कडवटपणाही
असणार नाही

सडलेल्या स्मितांचा तिखट वास
आत्मदयेचे क्षय
भय
रितेपणाचा स्थायी अनुभव
बिनप्रेमाचे क्षण

आता असणार नाहीत काल, अवकाश वा नावं

सगळ्यात शेवटी
जगण्याबद्दलची घृणाही नसेल

माझ्या जिभेला माझ्या डोळ्यांतल्या
मिठाची चव घेऊ द्या

तुमचे डोळे निरोगी ठेवा
शेवटी
तेच तर सगळ्या रोगांचे कारक आहेत.
• • •

पश्चातमन

कधीकधी
पानगळीतल्या झाडासारखं
चक्रीवादळालाही न जुमानणाऱ्या
(मी शब्दांचं अंकुरण करीन भयभीत फांद्यांवर नंतर)

कधीकधी
दुकानदारानं रस्त्यावर अंथरलेल्या ओल्या पोत्यासारखं
पायदळी तुडवून वाळण्यासाठी
(मी होईन कोरडा निर्दयीपणे नंतर)

कधी कधी
काटेसावरीच्या म्हातारीसारखं
पोहचण्याचं ठिकाण हरवल्याप्रमाणे
(मी दु:ख भोगेन एकटेपणात कोपऱ्यातल्या
कोळ्याच्या जाळ्याप्रमाणं नंतर)

कधी कधी
सगळं दु:ख रितं करणाऱ्या संगीतासारखं
(मी परतेन आत्महत्या फसल्यानंतरच्या मौनात नंतर)

कधी कधी
माझं स्मितहास्य वाट बघतं आरशात
(मी धारण करीन लहान मुलाचा चेहरा
रडणारा आणि धडपडणारा प्राण्याच्या
जबड्यात अडकलेला पाय सोडवण्यासाठी, नंतर)
• • •

स्वप्नकविता

मी पाहिलं स्वप्नात
की दोघे जण
अगदी माझ्यासारखेच दिसणारे
बोलत होते आपापसात

जसा मी त्यांच्याजवळ गेलो
मी पाहिलं की ती दोघंही
बोलत होती स्वप्नाबद्दलच

पण
त्यांच्यातलं एक जण
जो बोलत होता
मुका होता
आणि दुसरा
जो ऐकत होता
ठार बहिरा होता!
• • •

अनुक्रमणिका

परभणीतली एक रात्र

'देहाला धर्म असतो का?'
देह म्हणजे एक रसायनांचं भांडं
त्यात आयुष्य राहतं आणि सक्रिय होतं
म्हणून
देह असतं निव्वळ एक रासायनिक पात्र

पण मला कळलं की हे खरं नाहीय
परभणीतल्या त्या रात्रीनंतर

हिवाळा जेव्हा पानांचा थरकाप होतो
आणि झाडं उभी असतात थरथरत

रात्र जेव्हा दिवे निमूट उभे असतात रस्त्याच्या कडेला
अंधाराशी अपयशी वाद करून झाल्यावर
एक गुदमरून टाकणारं शहर
नरकातला कचराडेपोच जणू
रस्ते निर्जन झालेले
कुत्र्यांच्या भुंकण्यामुळं

मी चालत गेलो त्या रस्त्यांवरून
अगदी माझ्या सावलीचीही शंका घेत
रस्त्याच्या आतंकित शेवटापर्यंत
मी पोहचलो चालत गेलो अभावितपणे

बॅटऱ्या उंच झाल्या
जणू जमिनीवरचा उल्कापातच
टायरच्या व केसांच्या जळण्याचा तीव्र वास
विषारी दातांचं घुसणंच जणू
पोटात तसा आवाजांचा थवा
आवाज जवळजवळ येत गेले
आणि भगव्या रुमालांनी झाकलेल्या
चेहऱ्यांनी विचारलं :
'कोण आहेस तू?'

माझी लुळीपांगळी जीभ उचलून
उत्तर द्यायच्या आधीच
मला कमरेखाली नागडं करण्यात आलं
मी गारठलो भयावह थंडीनं
माझं इंद्रिय पिरगाळलं गेलं
आणि तपासलं गेलं बॅटरीच्या प्रकाशात

अखेरीस बॅटऱ्या दूर करून म्हणाले ते :
''हा काही त्यांच्या धर्मातला नाहीय''

त्या उन्मादी सावल्या नंतर
दूरवर जाऊन नाहीशा झाल्या
माझ्या दुखऱ्या डोळ्यांसमोरून
मला आठवली तेव्हा
दुसऱ्या एका शहरातली
अशीच एक रात्र
तिथं अशाच सावल्यांनी
मला धमकावलं होतं
विद्वेषाच्या दगडांचा वर्षाव
होत असताना सगळीकडे
सगळ्या प्रवाशांना थांबवलं जात असताना
सगळ्या वाहनांची तोडफोड होताना
जीवांवर मानसिक आघात होताना
शरीरं तुडवली जाताना
रक्ताच्या चिळकांड्या उडत असताना
पवित्र अल्लाच्या नावानं
सावल्या उन्मत्त झाल्या होत्या
कुणात तरी शिल्लक उरलेल्या दयेमुळं
मी सुखरूप बाहेर आलो होतो
त्या रात्री

कमरेखाली
इंद्रियाला असतात
खूप कामं

मुतणं
मैथुन करणं
जन्म देणं
पण त्या कळपातल्या लोकांना
नसतात फक्त एवढीच कामं

देह – देवांचं मुद्रांकित पात्र
इंद्रिय – धर्म
मग
देवानं देव व्हायच्या आधी
मसीहानं मसीहा व्हायच्या आधी
इंद्रियाचा धर्म कोणता होता?
देहाचा धर्म कोणता होता?

• • •

नीलिमकुमार
(आसामी)



१९६१ मध्ये जन्मलेले नीलिमकुमार आसामी साहित्यातील नव्या पिढीचे एक प्रमुख कवी आहेत. व्यवसायाने वैद्यकीय क्षेत्रात असलेले नीलिमकुमार यांचे आतापर्यंत १७ कवितासंग्रह, तीन कादंबऱ्या आणि एक लेखसंग्रह प्रकाशित झालेले आहेत; शिवाय त्यांच्या कवितांच्या इंग्रजी अनुवादाचे दोन संग्रह, हिंदी अनुवादाचे दोन संग्रह आणि नेपाळी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या काही कवितांचे फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराथी, बंगाली, उडिया, कन्नड, नेपाळी इत्यादी भाषांत अनुवाद झालेले आहेत. त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय काव्यसमारोहात आमंत्रित करण्यात आलेले असून भारतीय साहित्यिकांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी फ्रान्स व बांग्ला देशाचा दौरा केलेला आहे.

त्यांना उदयभारती पुरस्कार, शब्द पुरस्कार, रझा फाउंडेशनचा पुरस्कार मिळालेला आहे.

ते गुवाहाटी (आसाम) येथे राहतात.

भाड्याचं घर

माझ्या एका खोलीत बसून
तो वाचत असतो
दुसऱ्या खोलीत तो जेवत असतो
एका खोलीत तो गात असतो
आणि एका खोलीत तो झोपत
असतो

माझ्या हृदयाच्या चाऱ्ही खोल्या
भाड्यानं घेऊन ठेवल्यात त्यानं

तो म्हणजे दुसरा-तिसरा कुणी नसून
दुःख आहे!
• • •

एकटेपणाबद्दल

जी माणसं कुठल्याही कारणांशिवाय एकटी असतात
त्यांच्यासारखीच फुलपाखरंही कधीकधी अकारण एकटी असतात
पक्षीही असतो एकटा अगदी तसाच
काही प्राणीही असतात असेच एकटे-एकटे
अगदी गच्च झाडांच्या गर्दीतलं झाडंही होतं एकटं
इवलीशी मुंगी पण एकटेपणाची जाणीव झाल्यावर माणसांसारखीच
एकटीच एका कोपऱ्यात बसून वाट बघत बसते

माणसांप्रमाणेच नदीलाही वाटत असतं एकटं एकटं
नदीही कधी कधी तिच्या आत खेळणाऱ्या माशांना थांबवते
तिला आवडत नाही सतत वाहात राहणं पण तिला वाहावंच लागतं
समुद्र तर नेहमीच असतो एकटा आणि उदास
चंद्रासारखा तो असतो नेहमीच एकटा. सूर्यही तसाच.
अगणित ताऱ्यांमधला एखादा तारा तर नक्कीच असतो एकटा

एकटं असणं एका परीनं सौंदर्यच असतं
फक्त माणसांनाच नसतो एकटेपणाचा शाप
कोण, कधी, का एकटं असेल हे माहीत करून घेणं सोपं नाहीय
कित्येकदा तर त्याला काही कारणच नसतं
अवघड आहे विश्वास ठेवणं की अजस्र मॉलही असतात एकटे
शाळाही असते एकटी-एकटी
बाग, मिनार, धुरांड, विद्युतग्रह, बस, सायकल पण होतात एकटे
कुणी कल्पना करू शकतं का की सगळ्यात अवजड वाहन
पृथ्वीवरचं - यंत्र ओढून नेणारं महायंत्रही होतं एकटं
आता हे सगळेजण विचारू शकतात
अगदी निर्जीव वस्तूंना व यंत्रांना
कसं काय वाटतं एकटं-एकटं

तीच तर मेख आहे खरी
हे कवींचं काम नाही का
की निर्जीव वस्तूंत आणि यंत्रांत
जीव ओतणं?
• • •

प्रतीकांच्या विरोधात

प्रतीकांचा वापर करणं आता संपलं आहे. ते कालबाह्य झालंय.
सूर्याला सूर्यच म्हटलं पाहिजे, आपण
हिरव्याच्या विरुद्ध होणाऱ्या हिंसांमधलं हिरवेपण
थोपवलं पाहिजे. आपण हिरवेपणाचं काय काय
केलं नाही? आपण लिहिलं - हिरवं दुःख, हिरवं हास्य
हिरवे ओठ, हिरवं प्रेम, हिरवा झेंडा आणि अजून
बरंच काही. आपण हिरवा रंग का न्याहाळत बसतो?
त्यात हिरवेपण ठासून भरलंय म्हणून?
आता माझी नम्र इच्छा आहे - हिरवा फक्त हिरवाच राहू द्या
रक्ताचा रंग लाल आहे. आपण हा सगळ्या क्रांत्यांत वापरलाय
आणि तो कपाळावर कुंकू म्हणून पण वापरलाय
खूप खूप वापरून झाल्यामुळे आता त्याला पंडुरोग झालाय
आपण आता लालला प्रतीक म्हणून वापरण्यावर बंदी घालावी
आपण आपल्या मेंदूतूनच प्रतीकं काढून टाकली पाहिजेत
प्रतीकांपेक्षा अधिक फसवं काहीच असू शकत नाही
प्रतीकं रस्त्यात आडवा पडलेला लाल दगडंही उचलू शकत नाहीत!
• • •

अनुक्रमणिका

सज्जन माणूस

सज्जन माणसाला भेटून त्रास होतो या विचारानं
की त्याची दु:खं अनंत असतात, सज्जन माणसाला
कडकडून भेटल्यावर जाणवतं की ते किती बुडालेले
असतील, किती स्तब्ध होऊन पाहात राहतो त्यांचे ओठ
जे घट्ट मिटून घेतलेले असतील निर्मम अविश्वासानं
आणि दाबून धरलेले त्यांचे हात जे बुडालेले आहेत
असंख्य चुकांच्या डागांत सहजपणे

सज्जन माणसाला भेटून त्रास होतो कारण
निद्रानाश त्याची शिकार करतो
त्यांना अंमळ जास्तीच दातांची वेदना होते
सज्जन माणसाची मुलं त्याला जास्तच त्रास देतात
त्याचे शेजारी असतात दुष्ट, क्रूर
ड्रायव्हर त्यांना कायम फसवतात, नोकर सतावतात
सज्जन माणसाला कळत नाही खरेदी करणं
तो विकत आणतो सडलेले बटाटे
अभाव नावाचा राक्षस त्यांचा पाठलाग करीत असतो

सज्जन माणसं पटकन् मरून जातात किंवा
जगत राहतात क्षणाक्षणानं
सज्जन माणसांना भेटून छान वाटतं या विचारानं
की त्यांनाच शक्य असतं धरतीवरचं सगळ्यात सुंदर हास्य?
• • •

अरण्यासारखी आहेस

तू एखाद्या अरण्यासारखी आहेस
तुझ्या आत आहेत झाडंझुडपं, आभाळाला
स्पर्शिणाऱ्या वेली आहेत. तुझ्या ह्रदयातून
वाहतोय झरा. तुझ्या ह्रदयात शिळा आहे.
शिळेमधून वाहतोय झरा. शिळा तुझ्या
ह्रदयात शिळा राहात नाही. तिच्यावर बसून
धरतीवरचं सगळ्यात कोमल गाणं गायिलं जाऊ शकतं
सगळ्यात जास्त प्रदीर्घ गाणं गाइलं जाऊ शकतं
तू म्हणाली होतीस तू हिरवी आहेस. तुला
बघायला उगवतात चंद्र-सूर्य. तू सूर्यासारखी
प्राचीन आहेस, चंद्रासारखी प्राचीन आहेस.
तू नाहीस रंग. तू आधी हिरवी आहेस.
तुला ढग आवडतात. ढगात तू पाऊल टाकू
इच्छितेस, म्हणून पाऊस तुला भिजवतो
कधी कधी संततधार मेघमल्हार मेघमल्हार मेघमल्हार
आणि कधी कधी विसरून जातेस दीर्घ काळ
तेव्हा तुटलेल्या पानांनी तू सळसळीचा गालिचा अंथरतेस
तू इतर कुणाचीच नाहीस, तू तुझ्यातच हिरवीकंच आहेस
तू एखाद्या अरण्यासारखी आहेस.
मी त्या अरण्यात हरवून जाऊ इच्छितो.
• • •

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

मकर संक्रांत १९२३

कार्यवृत्त

(ऑक्टो.-नोव्हें.-डिसें. २०१८ या काळातील)

रविवार २ ऑक्टोबर २०१८

विदर्भ साहित्य संघाची प्रतिवर्षी होणारी गणेश व्याख्यानमाला यंदा राष्ट्रीय वाचनालय (महाल-नागपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय वाचनालयाच्या सभागृहात झाली. व्याख्यानाचे वक्ते विद्यावाचस्पती स्वानंद पुंड होते. व्याख्यानाचा विषय ''आंतरराष्ट्रीय गणेश'' असा होता. अध्यक्षस्थानी वामन तेलंग आणि प्रास्ताविक श्री. प्रकाश एदलाबादकर यांचे होते.

बुधवार, दि. १४ नोव्हेंबर २०१८

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात 'तीन लेखक : तीन आविष्कार' हा आगळा वेगळा असा अभिवाचनाचा कार्यक्रम सादर झाला. मराठी साहित्यातील ज्येष्ठ कथा लेखिका आशा बगे यांच्या 'मादी' या कथेचे अभिवाचन रेणुका देशकर, महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे यांच्या एका पत्राचे व कवितेचे अभिवाचन प्रकाश एदलाबादकर, जी.ए. कुळकर्णी यांच्या 'पडदा' या कथेचे अभिवाचन अभिनेते अजित दिवाडकर यांनी केले. दिग्दर्शन - अजित दिवाडकर, निर्मिती साहाय्य अनिल चनाखेकर व संगीत नियोजन - अनिद इंदाणे.

शनिवार, दि. १५ डिसेंबर २०१८

ज्येष्ठ कादंबरीकार व पत्रमहर्षी कै. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या स्मरणार्थ विदर्भ साहित्य संघातर्फे प्रतिवर्षी आयोजित व्याख्यान ज्येष्ठ लेखक रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ यांचे '२१व्या शतकातील स्त्री-पुरुष संबंध' या विषयावर झाले. व्याख्यानाला प्रेक्षकांची चांगली उपस्थिती होती.

- सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ — **ग्रंथ ॥ सहवास ॥** वाचन संस्कृतीचे निवांत स्थळ — महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय आणि विद्वत्‌रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय ह्यांचा संयुक्त उपक्रम

ग्रंथालय कार्यवृत्त

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१८

६ ऑक्टोबर - 'आपुलाची वाद आपणासी' : या नव्या उपक्रमात मनीषा अतुल यांनी आपले अनुभव प्रथमपुरुषी एक वचनात श्रोत्यांसमोर उलगडले. ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे यांची विशेष उपस्थिती होती. साहित्य संघाच्या दुसऱ्या महिला सरचिटणीस दिवंगत शोभा उबगडे यांच्या जन्मदिनी या नव्या उपक्रमाची सुरुवात झाली. त्यानिमित्त शोभा उबगडे यांच्या दीर्घकाळ सहकारी असलेल्या शुभदा पडणवीस यांनी त्यांच्या आठवणींचा गोफ विणला. या उपक्रमाची संकल्पना ग्रंथालय समन्वयक श्री. दिलीप म्हैसाळकर यांची होती.

११ ऑक्टोबर - कथांजली - वाढवू झाड कथेचे। : कथावाचनाच्या या उपक्रमांतर्गत रवींद्रनाथ टागोर यांची 'पत्र' ही कथा व रशियन कथाकार ॲन्टन चेकाव्हची एक कथा सादर करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जागतिक कथा आणि भारतीय कथा त्यांच्या महाविद्यालयात जाऊन सांगणाऱ्या आणि कथनशैलीला प्रोत्साहन देणाऱ्या 'वाढवू झाड कथेचे' हा कार्यक्रम हिस्लॉप महाविद्यालयाच्या शालोम सभागृहात प्रा. सुपांथ भट्टाचार्य यांच्या उपस्थितीत पार पडला.

११ ऑक्टोबर - मुहूर्त - जगदंबा नाटक : रामदास भटकळ लिखित 'जगदंबा' ह्या नाटकाचा मुहूर्त ज्येष्ठ रंगकर्मी गणेश नायडू यांनी ग्रंथसहवासमध्ये नारळ फोडून केला. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा प्रगती पाटील, ज्येष्ठ समाजसेविका लीलाताई चितळे, डॉ. रवींद्र शोभणे, शेफ विष्णू मनोहर यांच्या उपस्थितीत पार पडला.

१५ ऑक्टोबर - वाचन प्रेरणा दिवस : ग्रंथसहवासात डॉ. कलामांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. ग्रंथालय संचालक डॉ. अरुंधती वैद्य यांनी प्रारंभी कार्यक्रमामागील भूमिका सांगून डॉ. कलामांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमात वृषाली देशपांडे, सागर पंडित, रोहित डोंगरे, विवेक अलोणी, सायली लाखे, रश्मी मदनकर यांनी विविध ग्रंथांतील निवडक भागाचे वाचन करून श्रोत्यांना वाचन करण्याची प्रेरणा दिली.

१२ नोव्हेंबर - दिवाळी प्रदर्शन अंक उद्घाटन - सुमारे १०० दिवाळी अंकांच्या प्रदर्शनाचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

सत्कार - ग्रंथालयाचे हितचिंतक श्री. अनंत ढोले यांची विकलांग संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ व ग्रंथभेट देऊन ग्रंथालय संचालक डॉ. अरुंधती वैद्य आणि डॉ. रवींद्र शोभणे यांनी सत्कार केला.

१५ नोव्हेंबर - सदिच्छा भेट - नाना जोग लिखित 'हॅम्लेट' नाटकाच्या टीममधील चंद्रकांत कुळकर्णी, रणजित जोग, तुषार दळवी, आशिष इत्यादी मान्यवरांनी ग्रंथसहवासला सदिच्छा भेट दिली.

२६ नोव्हेंबर - संविधान दिवस - ग्रंथालयात यंदा संविधान दिनानिमित्त 'सद्य परिस्थितीत संविधानाची आवश्यकता' या विषयावर चर्चा करण्यासाठी डॉ. ईश्वर नंदपुरे, स्मिता सदावर्ते आणि विशेष अतिथी म्हणून डॉ. इंद्रजित ओरके यांना आमंत्रित करण्यात आले.

३० नोव्हेंबर - काव्यकलश - 'दीर्घ कवितेचा

अनुक्रमणिका

काव्यकलश' या उपक्रमात डॉ. विजया जोशी व नेहा भांडारकर यांना आमंत्रित करण्यात आले. डॉ. विजया जोशी यांनी श्री. भा. वर्णेकर यांच्या 'विनायकवैजयंती' या दीर्घकाव्यावर भाष्य केले तर कविता महाजन यांच्या 'समुद्रच आहे एक विशाल जाळं' या दीर्घकवितेवर नेहा भांडारकर यांनी आपले विचार अनोख्या पद्धतीने उलगडून दाखविले.

१ डिसेंबर – ऐशा टापूत चैफेर – मर्ढेकर जन्मदिवस – 'गेय'ता लाभलेल्या कवितांचे नादानुसंधान करणारा 'ऐशा टापूत... चैफेर' हा मर्ढेकर जन्मदिवसाचा हा अनोखा सांगीतिक कार्यक्रम ग्रंथसहवासमध्ये डॉ. पराग घोंगे यांनी समालोचनासह सादर केला. शुभदा फडणवीस यांनी डॉ. घोंगे यांचा परिचय करून दिला. ग्रंथालयाचे समन्वयक श्री. दिलीप म्हैसाळकर यांनी डॉ. घोंगे यांचे पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन अभिनंदन केले.

७ डिसेंबर – लेखक तुमच्या भेटीला – लेखकाला प्रोत्साहन देणारा 'लेखक तुमच्या भेटीला' नवा उपक्रम सुरू करण्यात आला. या प्रथम उपक्रमात सना पंडित यांच्या 'समर्पण' या कवितासंग्रहावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. चर्चेसाठी डॉ. वसुधा वैद्य, आशुतोष अडोणी, शुभदा फडणवीस आणि प्रमुखं अतिथी म्हणून माधुरी अशिरगडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. वसंतराव नाईक शासकीय कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तसेच उपस्थित श्रोत्यांनी लेखिकेशी संवाद साधला.

१९ डिसेंबर – 'कविता समजून घेताना' – कविता महाजन यांच्या वाङ्मयीन कार्याचे स्मरण करण्यासाठी 'कविता समजून घेताना' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रास्ताविकामध्ये डॉ. अरुंधती वैद्य यांनी आयोजनामागील भूमिका विशद केली. मुख्य अतिथी म्हणून डॉ. विलास चिंतामण देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमात प्रामुख्याने 'ब्र' व 'भिन्न' या कादंबरीवर अकोल्याच्या सीमा रोठे यांनी आपली निरीक्षणे मांडली तर चंद्रपूरच्या डॉ. पद्मरेखा धनकर यांनी लिहिलेला कविता महाजनांच्या कवितेवरचा शोधनिबंध वर्षा थोटे यांनी वाचला. कविता महाजनांचा सहवास लाभलेल्या जया सबजीवाले यांनी त्यांच्याबरोबर घालवलेल्या क्षणांना उजाळा दिला. श्रद्धा भारद्वाज यांनी 'कुहू' कादंबरीवर आपली मते मांडलीत. स्मिता सदावर्ते यांनी 'ग्रॅफिटी' मधल्या काही अंशाचे वाचन केले. मंजूषा अनिल यांनी कविता महाजनांच्या ब्लॉगचे वाचन केले. कार्यक्रमाला सर्व कार्यकारिणी सदस्य कविता महाजनांच्या साहित्यावर प्रेम करणारे रसिक श्रोते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते

२२ डिसेंबर – काव्यकलश – जन्मशताब्दीच्या पर्वावर 'गदिमांची अलक्षित राहिलेली कविता' आणि 'ज्योती लांजेवर यांच्या कविता' यावर भाष्य करण्यासाठी अनुक्रमे ज्येष्ठ पत्रकार स्वाती हुद्दार व डॉ. अजय चिकाटे यांना आमंत्रित करण्यात आले होते. उभय वक्त्यांनी दोन वेगवेगळ्या प्रवृत्तींच्या काव्यधारणेवर सोदाहरण प्रकाश टाकला. मान्यवरांना ग्रंथालयाचे समन्वयक दिलीप म्हैसाळकर यांच्या हस्ते सन्मानिका देण्यात आली.

– संचालक, ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक 'युगवाणी'बद्दल वार्षिक निवेदन

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाची मालकी व इतर बाबी यांच्यासंबंधी वृत्तपत्रे आणि पुस्तक नोंदणी अधिनियम, कलम डी १९(बी) आणि वृत्तपत्रे नोंदणी (केंद्रीय) नियमावली १९५६, नियम, ८, नमुना ४, यांना अनुसरून केलेले निवेदन.

०१. **प्रकाशनस्थळ :** नागपूर, महाराष्ट्र

०२. **प्रकाशनाची कालनियतता :**
त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

०३. **प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
विलास गंगाधर मानेकर, भारतीय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर - ४४० ०१२.

०४. **मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
माधव प्रकाश लोखंडे, भारतीय, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर - ४४० ०२२.

०५. **मुद्रणस्थळ :** मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर - ४४० ०२२.

०६. **संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
प्रफुल्ल दत्तात्रय शिलेदार, भारतीय, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५.

मी विलास गंगाधर मानेकर, असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

विलास गंगाधर मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर (प्रकाशक)

अनुक्रमणिका

१० जुलै – 'जीए : एक डोह नितळ' : ग्रंथालयाच्यावतीने गुरुनाथ आबाजी कुळकर्णी यांचा जन्मदिवस त्यांच्या साहित्याच्या वाचनाने साजरा करण्यात आला. जीएंच्या भाच्यांनी आपल्या मामांवर केलेल्या दोन कविता गौरी शेलगावकर आणि शरण्या इंदूरकर यांनी सादर केल्यात. 'पडदा' ही कथा ज्येष्ठ रंगकर्मी अजित दिवाडकर यांनी साभिनय सादर केली. 'लेखनातून माझ्यापर्यंत पोचलेले जीए' या विषयावर दिनकर बेडेकर यांनी तर डॉ. पराग घोंगे यांनी 'जीएंना अभिवादन' यामध्ये मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांची उपस्थिती होती. ग्रंथालय संचालक डॉ. अरुंधती वैद्य यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता शेलगावकर यांनी केले.

१३ जुलै – आषाढस्य प्रथम दिवसे (संयुक्त आयोजन) : हा दिवस सी.पी. ॲण्ड बेरार महाविद्यालयाचा संस्कृत विभाग आणि ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात येतो. यंदा हा दिवस महाविद्यालयाच्या सभागृहात 'ऋतुसंहार' या खंडकाव्यावर घेण्यात आला. कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत माधव गोविंद वैद्य व क. का. सं. विश्वविद्यालयाचे आचार्य विजयकुमार मेनन हे विशेषत्वाने उपस्थित होते. आमंत्रित अतिथींचा दोन्ही संस्थांतर्फे शाल, श्रीफळ, स्मृचिचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन डॉ. मिलिंद बारहाते तसेच डॉ. विभा क्षीरसागर यांच्या सत्कार हस्ते करण्यात आला. तर आभार प्रदर्शन ग्रंथसहवासच्या सदस्य डॉ. विनिता हिंगे यांनी केले.

२१ जुलै – दीप लाविला... जाणा : संत साहित्यविषयक या उपक्रमात जनाबाई यांच्यावर डॉ. वसुधा वैद्य यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमास संस्थेच्या शुभदा फडणवीस यांची विशेषत्वाने उपस्थिती होती. संचालक ग्रंथालय डॉ. अरुंधती वैद्य यांनी वाङ्मयीन उपक्रमामागील भूमिका मांडून मान्यवरांचे स्वागत केले, तर डॉ. सुरुची डबीर यांनी डॉ. वसुधा वैद्य यांचा परिचय करून दिला. शुभदा फडणवीस यांच्या हस्ते डॉ. वसुधा वैद्य यांना सदिच्छापत्र देण्यात आले.

२ ऑगस्ट – ज्ञानपीठ विजेते विंदा विंदांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'विंदा आस्वाद आणि शोध' या विषयावर अ.भा.सा. महामंडळाचे विश्वस्त असलेले राजन लाखे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी विंदांचे बहुपेडी व्यक्तिमत्त्व चार टप्प्यांत श्रोत्यांना उलगडून दाखविले. संस्थेचे सरचिटणीस विलास मानेकर यांनी त्यांना ग्रंथभेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली देशपांडे तर आभार प्रदर्शन डॉ. अरुंधती वैद्य यांनी केले. कार्यक्रमात डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. इंद्रजित ओरके, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. ईश्वर नंदपुरे, आचार्य विवेक गोखले इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.

८ ऑगस्ट – ४ था वार्षिक वाचक मेळावा : **ग्रंथप्रदर्शन** – वार्षिक मेळाव्यानिमित्त कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या आणि सारस्वत सभा लायब्ररी यांच्या सहकार्याने हिंदी, मराठी, इंग्रजी ग्रंथ आमि भवभूतीवरील संस्कृत ग्रंथ यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्याचे उद्‌घाटन कथालेखक जयशंकर पिल्ले, प्रफुल्ल शिलेदार, डॉ. दीपक कापडे यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रंथ प्रकाशन : साहित्य महामंडळाचे सरचिटणीस डॉ. विलास चिं. देशपांडे यांच्या 'सांस्कृतिक धुमाकूळ' या ग्रंथाचे प्रकाशन ग्रंथालयात जयशंकर पिल्ले यांच्या हस्ते करण्यात आले.

भगिनी निवेदिता यांची १५० वी जयंती आणि एकपात्री 'मैं नरेन्द्र' : सविता ओगिरल आणि वर्षा कौशिक यांनी स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद आणि भगिनी निवेदिता यांच्या जीवन चरित्रावर प्रश्नमंजूषा आयोजित केली होती. या स्पर्धेत सर्वाधिक अचूक उत्तरे देणाऱ्या मृणाल टामणे आणि कांचन देवघरे यांना ग्रंथालयाच्यावतीने 'विस्तारित_शब्दरत्नाकर' हा शब्दकोश भेट देण्यात आला.

कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून वार्षिक वाचक मेळावा २०१८ चे उद्‌घाटन करण्यात आले. 'मैं नरेन्द्र' या हिन्दी नाटकाचा प्रयोग ज्येष्ठ रंगकर्मी दीपाली घोंगे यांनी सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध उद्‌घोषिका श्रद्धा भारद्वाज यांनी केले.

९ ऑगस्ट – डॉ.एस.आर. रंगनाथन जन्मदिवस :

स्थानिक दोन महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. अश्विनी व डॉ. पराग पराडकर दाम्पत्यास प्रकट मुलाखतीसाठी निमंत्रित करण्यात आले होते. ही मुलाखत संस्कृत विश्वविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. दीपक कापडे, वृषाली देशपांडे, पत्रकार रेवती जोशी–अंधारे यांनी सकाळच्या सत्रात घेतली. आमंत्रित दाम्पत्यास ग्रंथभेट आणि स्मृतिचिन्ह देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुचिता खनगई यांनी केले.

संध्याकाळच्या सत्रात कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलनाने झाल्यानंतर अल्का चिडले यांचा 'या दिवाळी अंकाचे करायचे काय?' हा लेख डॉ. अमृता इंदूरकर यांनी प्रभावीपणे वाचून दाखविला. त्यानिमित्त डॉ. अरुंधती वैद्य यांच्या हस्ते अल्का चिडले यांना ग्रंथभेट, सदिच्छापत्र व दीर्घसेवेबद्दल कमलाकर मलेवार यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ग्रंथालय सहायक माधुरी

वाडीभस्मे यांचा मुख्य अतिथी संजय आर्वीकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

१० आणि १२वीच्या शालान्त परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या ग्रंथालयाच्या सभासदांच्या मुलींचा आभा अभिजित देशपांडे, ईशा प्रशांत भांडारकर, मीनाक्षी संजय खनगई या विद्यार्थिनींचा मराठी शब्दकोश भेट देऊन डॉ. अरुंधती वैद्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पु. ल. जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून सतीश ठेंगडी यांनी पुलोपदेशचे (पत्र) वाचन केले. सुप्रसिद्ध लेखिका आशा बगे यांच्या 'मादी' या कथेचे वाचन माधुरी दिनकर बेडेकर यांनी केले. तर विख्यात नाटककार महेश एलकुंचवार यांच्या 'मौनराग'मधील 'पुनरागमनाय च' या ललित बंधाचे वाचन अजित दिवाडकर यांनी केले.

समारोप रंगनाथन यांच्या जन्मदिवसानिमित्त झालेल्या कार्यक्रमात 'पुस्तके वाचणाऱ्यांमध्ये वाचनवेडे आणि वाचनप्रेमी असे दोन प्रकार आहेत. पुस्तकांचे वाचन आपल्याला मानवी विकारांपासून दूर ठेवीत जीवनजाणिवाही प्रगल्भ करीत असतात' असे मत ज्येष्ठ लेखक आणि संस्कृती विश्लेषक संजय आर्वीकर यांनी केले.

सर्वोत्कृष्ट वाचक पुरस्कार २०१८ : यंदाचा पुरस्कार ग्रंथालयाचे ज्येष्ठ सभासद अजित दिवाडकर यांना स्मृतिचिन्ह आणि पाच हजार रुपयाचा धनादेश अशा स्वरूपात संस्थेचे सरचिटणीस विलास मानेकर यांच्या हस्ते देण्यात आला.

३१ ऑगस्ट दिनविशेष : ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या अमृता प्रीतम यांचा ९९वा वाढदिवस त्यांच्या साहित्यावर आधारित 'तारों से लदे आसमां तले, नींद के गाँव से गुजरते हुए' या शीर्षकांतर्गत ग्रंथालयाच्या सुमारे २५ हिंदी, मराठी सभासदांनी एकत्र येऊन स्मरणदीप उजळवत साजरा केला.

वसंतराव नाईक कलाविज्ञान संस्थेच्या हिंदी विभागप्रमुख डॉ. रेणू बाली विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. सुरूवातीला संचालक ग्रंथालय डॉ. अरुंधती वैद्य यांनी त्यांचे पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन स्वागत केले. संकल्पना आणि रूपांकन ग्रंथालयाचे समन्वयक दिलीप म्हैसाळकर यांचे होते. प्रास्ताविक शुभदा फडणवीस यांनी केले. श्रद्धा भारद्वाज यांनी 'शाह की कंजरी' ही अमृता प्रीतम यांची कथा प्रभावीपणे सादर केली. ख्वाजा साजिद आणि श्वेता शेलगावकर यांनी अमृता आणि इमरोज यांच्यातील पत्रसंवाद पेश केला. अंजली भांडारकर, मंजूषा जोशी, संगीता व्यास, सोनाली वाजपेयी, हिमद्युती श्रीवास्तव, किरण इंदाणे, स्मिता खनगई, स्मिता माहुरकर, प्रकाश एदलाबादकर, डॉ. अरुंधती वैद्य, प्रा. विवेक अलोणी यांनी विविध भावस्पर्शी कवितांचे वाचन केले. अनिल इंदाणे यांनी पार्श्वसंगीताची बाजू सांभाळली. कार्यक्रमाची सांगता भाग्यश्री बारस्कर यांनी गायीलेल्या अमृता प्रीतम यांच्या कवितेने झाली. कार्यक्रमाचे निवेदन रश्मी मदनकर यांनी केले.

२६ सप्टेंबर – ग्रंथचर्चा : कवी राज मेहर यांच्या 'उद्याचे स्टॅण्डबाय सूर्य' या काव्यसंग्रहावर चर्चेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात ग्रंथचर्चा उपक्रमाविषयी डॉ. अरुंधती वैद्य यांनी भूमिका मांडून राज मेहर यांच्या दोन कवितांचे वाचन केले. डॉ. विनिता हिंगे, डॉ. पराग घोंगे आणि समीक्षक डॉ. प्रज्ञा आपटे यांनी संग्रहातील कवितेविषयी मत मांडले व संचालक ग्रंथालय डॉ. अरुंधती वैद्य यांनी सहभागी वक्त्यांना सन्मानपत्र दिले. कवी राज मेहर यांनी स्मृतिचिन्ह भेट दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुणा भांडारकर यांनी केले.

ग्रंथदेणगी :

१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळाचे सदस्य असलेले व संस्थेचे कार्याध्यक्ष वामन तेलंग यांनी ग्रंथालयास महामंडळाच्या प्रकाशनाची पाच पुस्तके भेट दिली.

२) अमरावती स्थित भगवान वैद्य या हिंदीतून लेखन करणाऱ्या मराठी माणसाने विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयास आपले दहा ग्रंथ भेट दिले.

– संचालक (ग्रंथालय)
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

श्रद्धांजली

डॉ. नामवर सिंह, कृष्णा सोबती,
यशवंत पाठक, मनोहर रोकडे, मुकुंद नानिवाडेकर,
डॉ. राम म्हैसाळकर, विष्णू सुर्या वाघ



अनुक्रमणिका



यशवंतराव दाते स्मृती संस्था, वर्धा

कार्यालय : प्रदीप दाते, शिवबावाडी, साबळे प्लॉट, वर्धा - ४४२ ००१, दूरध्वनी : ०७१५२-२४१०५१/२५२५१०

- महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व साहित्याच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था.
- संस्थेद्वारे दरवर्षी दि. १ व २ फेब्रुवारीला यशवंतराव दाते स्मृती व्याख्यानमाला व साहित्यिक पुरस्कारांचे वितरण.
- २४ डिसेंबरला डॉ. भा. ल. भोळे व डॉ. यशवंत सुमंत स्मृति साहित्य पुरस्कार वितरण.
- पर्यावरण जागृतीपासून जागतिकीकरणापर्यंत... वर्तमानकालीन समस्यांवरील परिसंवाद, संमेलन आणि कार्यशाळांच्या आयोजनापासून नाट्यप्रयोग निर्मितीपर्यंत... संगीत मैफलीच्या सादरीकरणापासून आरोग्य शिबीर व क्रीडा स्पर्धांपर्यंत... अनेकानेक क्षेत्रात संस्था आपले योगदान सातत्याने देत आहे.

* संस्थेचे साहित्य पुरस्कार *

* यशवंतराव दाते स्मृती अनुवाद पुरस्कार * बाबा पद्मनजी साहित्य पुरस्कार
* डॉ. भा. ल. भोळे वैचारिक ग्रंथ पुरस्कार * डॉ. भा. ल. भोळे सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार
* डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधक प्रेरणा पुरस्कार * शिक्षणमहर्षी बापूरावजी देशमुख कथासंग्रह पुरस्कार
* संत भगवानबाबा काव्यसंग्रह पुरस्कार * अंजनाबाई इंगळे तिगावकर स्त्रीवादी साहित्य पुरस्कार
* पद्माकरजी श्रावणे स्मृती बालसाहित्य पुरस्कार * भाऊरावजी शिंगाडे विनोदी साहित्य पुरस्कार
* हरीश मोकलकर सामाजिक ऋण पुरस्कार